म. ग्रं. सं. ठाणे
विषय — गरिम
क्र. नं. ६८५



# सरदार [illegible]रामई

REFBK-0006622

डॉ. यश गुप्त

## Sardar

# Sakharam Hari Gupte

थोरल्या शिवछत्रपतींचें ध्येय गांठलेल्या श्रीमंत पहिल्या बाजीराव-
साहेबांनीं पुढें आणिलेले आणि उत्तरेंत व कर्नाटकांत
बिनीवर गर्जणारे सरदार सखाराम हरि गुप्ते
यांचें चरित्र.

—o—

"My strength is gone, my life is going," said the dying enthusiast (Sardar Sakharam Hari Gupte); "but when voice and breath fail, my fleshless bones shall still shout Rugonath Rao! Rugonath Rao!"—*A History of the Marathas by James Grant Duff, Vol.II, p.353.*

"Sakharam Hari Gupte has been considered one of the national heroes of the Marathas and in their epic poems his name frequently occurs coupled with that of his brother Baburao Hari." — *Rai Bahadur B. A. Gupte, F.Z.S., Official Delegate for the Government of Bombay in "An Exemplary Model of Unshaken Fidelity as a General of the Maratha Army."* —*London.*

"या सखाराम हरीच्या धाडसास कांहीं मर्यादाच नव्हती."

—कै. वासुदेवशास्त्री खरे, ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ४
पृ १६४६. हैदरवरील तिसऱ्या स्वारीची प्रस्तावना.

---

लेखक

**य. रा. गुप्ते,**

बी.ए., एम्.आर.ए.एस्. (लंडन),
समासद, भा. इ. सं. मं.; समासद, राजवाडे संशोधक मंडळ;
माजी शिक्षक (इतिहास विषय,) नू. म. वि.; माजी
असि. सुप. फॉर एपिग्रॅफी; कऱ्हाड, सज्जनगडची
यात्रा, घारापुरीचीं लेणीं, या पुस्तकांचे कर्ते वगैरे.

६६९२

मुद्रक व प्रकाशक— लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें शहर.



**श्रीमंत राजश्री भवानराव श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधि,**
**बी. ए., सी. बी. ई.**

यांस त्यांची स्वदेशप्रीति, कलेंतील प्रावीण्य, इतिहासाविषयीं आवड आणि छत्रपतींच्या प्रतिनिधित्वाची जाणीव या उत्कृष्ट गुणांवर लुब्ध होऊन हें चरित्र गुप्ते व पारसनीस कुलांच्या वंशजानें त्यांस त्यांच्या परवानगीनें अत्यादरें अर्पण केलें आहे.

—य. रा. गुप्ते

# Foreword

**By Sir Jadunath Sarkar,**

KT., C.I.E., D.LITT.

Sakhārām Hari Gupté of Ambégāon was a real hero, who rose to the surface on the flood-tide of Maratha expansion in the middle 18th century. But he loyally clung to the losing side : his patron Rāghobā Dādā lost his suit in the trial by arms, and after his death the tribunal of History also gave its verdict against him. Therefore, Sakhārām Hari's name has fallen into oblivion in the land of his birth.

But I do not see any reason why the story of Sakhārām Hari's varied achievements should not be studied today, when the tragic civil strife in the Peshwa family in which he and his patron finally went down has long been a matter of dead politics. A character like Sakhārām Hari is a national possession of which all castes and parties in Maharashtra may well be proud. When we contemplate his deeds, the silly ancient squabble between the Prabus and the Bhats is shamed into silence. He disproves the theory "made in England" and swallowed by blind followers of English thought, that personal valour and leadership in war are exclusive heritage of certain castes and races and are beyond the reach of the writer (*Prabhu*) and trader (*bania*) castes. This little book by Y. R. Gupte shows how many true warriors a single branch of the writer caste produced in a single province of India.

The second merit of this book is that it gives the well-documented arguments of the counsel for the defence of

Rāghobā Dādā. It tells us all that can be reasonably said in favour of that Peshwa and his disputed shares in the tragic end of Nārāyan Rao. It also shows us that there were times in the course of this family dispute when Rāghobā Dādā's motive was not guilty ambition, but the desire to serve the best interests of the State as against an incompetent and volatile lad (Nārāyan Rao) and a dictatorial Machiavellian Secretary of State (Nana Fadnis). These arguments have to be calmly considered before the modern historian can pronounce the final verdict on the event.

I therefore gladly commend Mr. Y. R. Gupte's book to the public, though I entirely differ from him in his estimate of Rāghobā Dādā, whose incompetence during the northern campaigns of 1756-59 and character and habits throughout life disgusted me when studying the original sources of the history of that period. He was no hero.

May I suggest to my own caste-brethren in the Southern Land that they should move in accordance with the spirit of the modern age by totally forgetting the old old grievance of the *Prabhu Grāmaṇya?* We should remember that in this Kali Yuga the only twice-born supreme caste in the world are the white Aryan-folk (German translation *Harren-volk*), whose muscles are nourished on beef, whose hearts are stimulated by the fermented *soma* juice, and who hear sermons from the Artharva Veda every Sunday,—while all the yellow, brown and black races alike are *Dāsas* (Sudras or slaves) ? Then why quarrel for a social superiority that has no real existence ?

# प्रस्तावना

सखाराम हरि गुप्ते, आंबेगांवकर, यांचा गौरवपूर्वक उल्लेख कॅप्टन ग्रँट डफसाहेब यांनीं आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत केला. कै. वासुदेवशास्त्री खरे यांनीं त्यांच्या धाडसाचें कौतुक केलें. कै. रा. ब. बा. आ. गुप्ते, एफ. झेड. एस., यांनीं लंडन येथें त्यांचें लहानसें पण चित्ताकर्षक चरित्र इंग्रजींत प्रसिद्ध करून त्यांचें एक सुंदर चित्र त्यांत घातलें. त्या चरित्रांत कांहीं दोष राहून गेले. नंतर रा. ब.नीं का. प्र. इ.चीं साधनें यांत सखाराम हरींचें अल्पसें पण इंग्रजीपेक्षां थोडें विस्तृत चरित्र दिलें. त्यांत बाबूराव व सखाराम हरि गुप्ते यांस दुसऱ्या अलमगीरांनीं दिलेल्या सनदेचें भाषान्तर व इतर माहिती छापली. ह्या सनदेचें भाषांतर देतांना जरी बऱ्याच चुका झाल्या असल्या तरी तिच्या खरेपणाविषयीं संशय घेण्यास जागा रहात नाहीं. इंग्रजींतील चरित्रावरून रा. ब. चा आंबेगांवाविषयीं गैरसमज झालेला उघड दिसतो. तथापि ते दूरस्थ असल्यामुळें व आंबेगांव नांवाचीं गांवें कैक असल्यामुळें तो होणें साहजिक आहे. इंग्रजींतील चरित्रांत ते म्हणतात कीं, आंबेगांवची सनद शहा [१]अलमनें दिली तर मराठींतील चरित्रांत ती दुसऱ्या अलमगीरनीं[२] दिल्याचा दाखला आहे.

सखाराम हरींनीं शिद्दी रहिमानचा निकाल लाविला, मेलकोट-मोतीतलावाजवळ हैदरास मराठे काय आहेत याची जाणीव करून दिली, त्रिनीवर पराक्रम गाजवून त्यास थक्क करून सोडलें, त्याच्या तंबूंत शिरून हि गुप्त्यांशीं लढा किती घातकी आहे हें प्रत्यक्ष दाखवून दिलें, अहमदशहा अबदालीस त्याचें सैन्य चौपट असून पायबंद बसविला, अटकेस झेंडे लाविले.

वकीलीच्या कामांत अलौकिक बुद्धिमत्ता त्यांनीं प्रकट केली. रघुनाथरावांसाठीं प्राण पणास लावून बारभाईबरोबर ते लढले व शेवटीं खरोखरीच त्यांच्यासाठीं त्यांनीं प्राण अर्पण केले.

---

१. Reprint p. 2.

२. का. प्र. इ. सा., थोर पुरुषांचीं चरित्रें, सखाराम हरि आंबेगांवकर पृ. १.

तरी ते नाना फडणीसांच्या पक्षास मिळाले नाहींत म्हणून व तो राजपक्ष भासविल्यामुळें व अल्पकाळ समजला गेल्यामुळें त्यांचें कर्तृत्व कांहींसें फिकें पडलें; आणि एका दृष्टी पक्षानें त्यांस दिली त्याहून अधिक कडक शिक्षा फर्माविणें योग्य ठरविलें, तर दुसऱ्यानें कायद्यांच्या कचाटींत सांपडल्यामुळें त्यांचें उत्तर आयुष्य वाया गेलें असा विचारार्ह निर्णय दिला.

रा. ब. सरदेसायांनीं पेशवे दप्तर प्रकाशनाचे वेळीं त्यांचीं निवडक पत्रें बाहेर आणून त्यांची थोरवी वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिली. 'सह्याद्रि'कारांनीं एक छोटसा लेख त्यांजवर लिहून देण्यास आम्हांस विनंति केली. "सखाराम हरींचें शौर्य व स्वामिभक्ति"[1] या शीर्षकाखालीं तो प्रसिद्ध करून त्यांच्या गुणांची जाणीव त्यांनीं इतिहासज्ञांस करून दिली याबद्दल आम्हीं त्याचे ऋणी आहोंत.

श्री. कृ. वा. पुरंधरे या निःपक्षपाती व उत्साही संशोधकांस सखाराम हरींच्या चरित्राविषयीं फार तळमळ वाटत असे. त्यांनीं एक जरा पूर्वीहून विस्तृत चरित्र लिहिण्यास आम्हांस अनेक वेळां विनंति केली. कांहीं पत्रें त्यांनीं स्वतः जेजुरीच्या पेशव्यांकडे असलेल्या दप्तरांतून निवडून काढिलीं होतीं. पण प्रकाशनास त्यांस पैशाची अडचण होती. सबब कोठें तरी तीं लवकर प्रसिद्ध करण्यास त्यांनीं आम्हांस सांगून त्यांच्या नकला दिल्या. त्या श्री. भा. वा. भट, बी. ए., एल्‌एल्. बी., वकील-साहेब, धुळें, यांच्या कृपेनें आम्हीं संशोधक व. १० अं. २ ऐ. ले. च. पृ. १–१६ वर "सरदार सखाराम हरि व बाबूराव हरि गुप्ते यांचीं कागदपत्रें" या शीर्षकाखालीं टिप्पणी देऊन प्रसिद्ध केल्या. या प्रकाशनाबद्दल रा. सं. मं.चे आभार मानणें युक्त होय.

इतर अनेक सद्‌गृहस्थांनीं सखाराम हरींचें एक चरित्र आम्हींच लिहावें अशी उत्कट इच्छा प्रदर्शित केली. बेळगांवास "ऐतिहासिक-ग्रंथ-प्रकाशन समिति" स्थापन झाली. तिनें प्रस्तुत चरित्रप्रकाशनाचें कार्य अंगावर घेतलें हें स्तुत्य होय.

---

१. सह्याद्रि, जून १९३९ पृ. ४७३-७४.

श्री. सौ. महाराणीसाहेब, बडोदें, यांचे खानगी कारभारी ले. क. राणे, यांनीं सखाराम हरींच्या आपल्या शस्त्रागारांत असलेल्या खास तलवारीचें छायाचित्र त्यांच्या चरित्रांत घालण्याची परवानगी देण्याबद्दल व श्री. सौ. इंदिराबाई नारायणराव गुप्ते आंबेगांवकर यांनीं तलवारीच्या व आपल्या संग्रहीं असलेल्या त्यांच्या ढालीच्या छायाचित्रांचा खर्च स्वतः सोसल्याबद्दल त्यांचे फार फार आभार मानल्यावांचून राहवत नाहीं.

चां. का. प्रभु ऐतिहासिक मंडळी, पुणें, यांचे चिटणीस श्री. काशीनाथ रामचंद्र कोंढवीकर, असिस्टंट एंजिनिअर, यांजकडून रा. ब. गुप्ते यांनीं आपल्या लंडन येथें छापलेल्या चरित्रांतील चित्रावरून तयार केलेल्या चित्राच्या ५०० प्रती आम्हांस दिल्या त्याबद्दल आम्हीं सदर मंडळी व श्री. कोंढवीकर यांचे आभार मानितों.

सखाराम हरींच्या चरित्राची सामग्री फार विस्कळित आहे. खालीं उपयोगांत आणिलेली एकत्र करण्यांत आमचें एक वर्ष गेलें. गुप्त्यांच्या आमच्या कारखानीस पुरंधऱ्याच्या शाखेपेक्षां आमच्या सासुरवाडीं त्यांचीं कागदपत्रें अधिक होतीं. पैकीं कांहीं रा. ब. पारसनीसांनीं इतिहास-संग्रहांत छापलीं. थोडीं श्री. बा. स. कुलकर्णी यांस मिळालीं. तरी आणखी पुष्कळ तपासलीं पाहिजेत. धरणें घेतल्याशिवाय हीं कामें होत नाहींत. नाना फडणीसानीं सखाराम हरींचा वाडा लुटविला त्या वेळीं बहुतेक कागदपत्रें व सनदाहि गेल्या.[1] बाबूराव हरींच्या वंशजांकडे कागद आहेत. चिटणीसांच्या संग्रहीं थोडे कां होईनात पण आहेत. मल्हार रामराव सखाराम हरींचे जामात होते. ग्रँट डफ साहेबांस अष्टप्रधानांच्या पगाराविषयींची[2] इतर माहिती आमचे पणजे-आईचे आजे-आबासाहेब पारसनीस-उर्फ आबा शास्त्री यांनीं पुरविली. पण त्यांचेकडील दप्तर बहुतेक नष्ट झालें आहे.

आमचे मित्र श्री. कृ. वा. पुरंधरे[3] यांनीं जेजुरीहून गुप्त्यांचे गुरु

---

१. रा. ब. बा. आ. गुप्तेकृत सखाराम हरि गुप्ते चरित्र पृ. १.

२. पे. द. भा. ४२ नं. २.

छत्रपति प्रतापसिंह यांचे रोजनिशींतील उतारे, ता. ७-७-१८१९, ८-७-१८१९, १५-७-१८१९ वगैरे पहा.

महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास पृ. ३१७-३१८.

३. संशोधक व. १० अं. २ पृ. १-१६.

पेशवे यांचेकडून कांहीं उपयुक्त पत्रांच्या नकला करून आणून आमच्या स्वाधीन केल्या नसल्या तर या चरित्रांतील एक दालन बंद राहतें. श्री. पुरंधऱ्यांचा आणखी कितीतरी उपयोग होण्यासारखा आहे. जेजुरीचे श्रीमंत पेशवे यांजकडील आणखी कागद छापले पाहिजेत.

मावळातील आमच्या तिन्ही गुप्त्यांच्या शाखांनीं महाराष्ट्राची थोरल्या शिवछत्रपतींपासून तों आजतागायत निस्सीम व अलौकिक सेवा केलेली आहे. पैकीं आंबेगांवकर आणि पुरंधरे-वडवाथरकर-केतकावळेकर यांचे वंशजांनीं सरदार, सरकारी वकील, वकील, सबजज्, एम्. एल्. सी., वक्ते, मेजर, किंग्ज कमिशन्ड व व्हॉइसरॉयज कमिशन्ड अम्मलदार होऊन आपली परंपरा उज्ज्वल राखिली आहे. पेशवे सरकारनेंहि त्यांचा गौरव केलेला आहे. श्रीमंत नारायणराव पेशव्यांखेरीज प्रत्येक पेशव्यांनीं नोकरींत त्यांस प्राधान्य दिलेलें आहे. बारभाईंनीं सखाराम हरि व पुरंधरे कारखानीस शाखेंतील स्त्री-पुरुष यांचा ते श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबांचा पक्ष सोडून आपल्या पक्षास मिळतील या आशेनें केलेला अमानुष छळ यावच्चंद्रदिवाकरौ त्याच्या कारकीर्दीस लांछन आहे, कीर्तिस कलंक आहे.

प्राथमिक शब्द आमच्या विनंतीस मान देऊन सर जदुनाथ सरकार, केटी., सी. आय्. ई., डी. लिट्, यांनीं इतक्या उतार वयांत परिश्रमपूर्वक लिहिले याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत ऋणी आहोंत. श्रीमंत दादासाहेबांविषयींचें आमचें मत आम्हीं या चरित्रांत दिलेला पुरावा जमेस धरून आणि त्याबरोबर प्रत्यक्ष लढत असलेल्या सरदारांच्या व योध्यांच्या घराण्यांत विशेषेंकरून आमच्या गुप्तेकुलांत प्रचलित असलेल्या आख्यायिका विचारांत घेऊन दिलें आहे.

सूचि आमचे मित्र प्रा. गोखले व श्री. स. बा. राजे, से. नि. सबरजिस्ट्रार, हवेली (पुणें), यांनीं आमची प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें आपला महत्त्वाचा वेळ घालवून करून दिली यास्तव त्यांचे आभार मानणें उचित होय.

ज्या सद्‌गृहस्थानीं आपला अमूल्य वेळ खर्च करून हें वाचून व मनन करून अभिप्राय दिले आहेत त्या सर्वांचे आम्हीं कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

ता. २१-१२-४५. य. रा. गुप्ते.

# अनुक्रमणिका


१ गुप्त्यांचें पूर्ववृत्त ... १

२ सखाराम हरींचें पूर्वचरित्र
श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब यांची गुणग्राहकता ... ३

३ दादासाहेबांवांचून दुराणीस अडवितां येणार नाहीं ... १३

४ राक्षसभुवन–तांदुळजा ... १४

५ दादासाहेबांची खाजगी व्यवस्था ... १४

६ मातीतलाव–मेलकोट–नागमंगल येथील मर्दुमकी ... १५

७ थोरल्या माधवरावांची रसदीविषयीं आज्ञा ... २०

८ गोविंदराव गायकवाडांस सखाराम हरींची मदत ... २१

९ श्रीमंत नारायणरावांच्या कारकीर्दीतील ग्रामण्य प्रकरण ... २३

नारायणराव पेशव्यांचा मृत्यु ... २६

मॉस्टिनची रोजनिशी ... २७

महमद इसुफची जबानी ... ३३

तुळया पवाराची जबानी ... ३९

"धरावें–मारावें" 'ध'चा 'मा' कोणीं केला ! ... ४४

वामनराव पटवर्धनांस लिहिलेलीं पत्रें ... ४६

दादासाहेबांचें पत्र व साठे घराण्यांतील आख्यायिका ... ४९

बखरी व पांडुरंग कवीचें काव्य ... ४९

नारायणरावांचा खून नानांनीं करविला काय ? त्यांनीं आत्महत्या केली काय ? ... ५३

नारायणरावांस मारण्याच्या कामात श्रीमंत दादासाहेब नव्हते, आनंदीबाई नव्हती, कोणीहि सरदार वा मुत्सद्दी नव्हता ... ५४

१० रघुनाथराव दादासाहेब नादान होते काय ? ... ५६
११ कासेगांवची लढाई, त्रिंबकराव मामांचा मृत्यु व पुढील हालचाली ... ६१
१२ सखाराम हरींच्या व पुरंधरच्या कारखानीसांच्या माणसांस अटक ... ६२
१३ हैदरावरील स्वारी व तह ... ६३
१४ दादासाहेबांच्या व सखाराम हरींच्या हालचाली दौलत लोभ न धरतां दोघां रायाचेच नांवें चालवली. सखाराम-बापूंच्या वागण्यामुळें मर्जी उदास ... ६३
१५ बाबुराव व सखाराम हरि यांच्या घरीं चौक्या बसविल्यानें काम बिनसते अशी शिंदे होळकरांची सल्ला ... ६६
१६ बाबूराव घरीं जाऊन फसल्याबद्दल सखाराम हरींचें पत्र ... ६७
१७ दादासाहेबांच्या पक्षाच्या मंडळींचीं मुलें-माणसें सुटल्याचें वर्तमान येत नाहीं म्हणून महादजी शिंद्यांचें बापूस पत्र ... ६९
१८ गायकवाडांचें प्रकरण ... ७०
१९ सखाराम हरि यांची मातुःश्री, रामचंद्र विठ्ठल गुते कारखानीस व मल्हार यशवंतराव पोतनीस यांच्या मुलांमाणसास अटक व जप्त्या ... ७१
२० सखाराम हरि वगैरे मुत्सद्यांचा गोडवा स्वभाव ... ७२
२१ सावध रहावें ...
२२ आनंदमोगरीची लढाई वगैरे ... ७५
२३ सैन्याच्या हालचाली व अडचणी ... ७५
२४ गायकवाड प्रकरण. राजापुरकरांची वकिली ... ७४-७५
सुरतेचा तह, अशेरीच्या किल्लेदारांचा फितवा ... ७६-७७
सखाराम हरि गोविंदराव गायकवाड यांच्या हालचाली ... ७७
हरिपंत भ्रमाचा भोपळा नजरेस आणतात ... ७८

२५ नापार, आडास, आरास येथें दादासाहेब व इंग्रज आणि बारभाईंच्या सैन्याची लढाई. दोन्ही पक्ष आपला विजय मानतात. ... ७९

२६ आनंदीबाईचें सखाराम हरींस जखमेसंबंधीं पत्र ... ८०

२७ हरिपंत फडक्यांचे फ्रेंच व इंग्रज यांविषयीं विचार. पाण्यांत इंग्रज अधिक. साष्टी इंग्रजांस देऊन दादासाहेबांस हातीं घ्यावें. ... ८०

२८ वॉरन् हेस्टिंग्ज राघोबा दादांचा पक्ष सोडावा सांगतो. त्यांजवर नारायणरावांस मारल्याचा दोन वर्षांनीं केलेला आरोप. ... ८१

२९ सखाराम हरींची बारभाईंचा अंदाज काढण्याच्या कामीं नेमणूक. फितुरीयाचा इतबार काय ? ... ८१

३० कलकत्तेकरांच्या पाठबळाखेरीज बारभाईंचा टिकाव लागता ना. ... ८२

३१ धौशाची नेमणूक हरीपंतांच्या कुमकेस. ... ८३

३२ गोविंदराव गायकवाड व सखाराम हरि वगैरेंचा रुसवा ... ८३

३३ श्री. कुलकर्ण्यांचीं पत्रें. ... ८३

३४ मि. कीटिंग, मॉस्टिन, अप्टण व हेस्टिंग्ज. ... ८५

३५ हरिपंत व सवाई माधवराव यांची भेट. ... ८५

३६ सरदार त्रिंबक सूर्याजी चौबळ वर्तमान मोघम लिहावें कारण होळकरांकडील रामचंद्र धोंडदेव लष्करची बातमी देतो, आपसांत कलह करूं नये, अमृतरावांस दादासाहेबांची मर्जी रक्षावी असें सखाराम हरींस पत्र. सखाराम हरींचें तुफान उठवून इंग्रजांस चिडविल्याविषयींचें पत्र. ...८५-८६

३७ सवाई माधवरावांस दादासाहेबांच्या ओटींत घालण्याचा सखाराम हरींचा बेमालुम उपाय. ... ८७

३८ कर्नल कीटिंग व सखाराम हरि यांचें वितुष्ट. सखाराम हरींचा निश्चय. प्राणाचा संकल्प घालोन रघुनाथरावांची सेवा आरंभिली आहे. ...८७-८८
३९ बाबूराव हरि फुटतात ... ८८
४० पुरंधरचा तह ... ८९
४१ अप्टणच्या गुंत्यामुळें मोंगल अनुकूल करणें प्राप्त ... ९१
४२ अप्टणनें आमची अब्रूच घेतली .. ९१
४३ मारणे देशमुखांस पत्र ... ९२
४४ ज्याचा हात इंग्रजांनीं धरला तो सोडला नाहीं. ... ९२
४५ बाबूराव हरींची मातुःश्री व आप्पा बळवंत सखाराम बापू कोणास भीड घालीत नाहींत. ... ९३
४६ सदाशिव रामचंद्रांस दिवाणगिरीचीं वस्त्रें ... ९५
४७ कीटिंगनें हरिपंतास सांगितलें कीं आतां लढा नाहीं. ... ९५
४८ दादासाहिबांस देशीं आणण्याचा सखाराम हरींचा प्रयत्न ... ९५
४९ सदाशिव रामचंद्र सुकटणकर, कर्नल कीटिंग, हरिपंत फडके, सखाराम हरि गुप्ते, मानाजी शिंदे ( फांकडे ) दादासाहिबांच्या जिवास अपाय करणार असा सर्वत्र समज. ... ९५
५० सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र यांचा अपमान ... ९८
५१ सखाराम हरींच्या मातुःश्रीची मोकळीक. ... ९८
५२ सखाराम हरींस पुरंधरावर अटक. ... ९९
५३ लक्ष्मण आप्पाजी आंबेकर व सखाराम हरि गुप्ते यांचा पत्रव्यवहार. आंब्रीकरांचे वंशज. ... १००
५४ कारागृहवास. राजापुरकरांनीं केलेला विश्वासघात. ... १०१
५५ सखाराम हरींस बेडी घालून नगरच्या किल्ल्यांत पाठविलें. ... १०३
५६ बाबूराव हरि, दौलत व महिपत बाबूरावांसहि किल्ले दाखविले. ... १०५

५७ रामचंद्र गोविंद कारखानीस वगैरेंचा सखाराम हरींस मोकळे करण्याचा मनसबा. भयंकर शिक्षा. ... १०६
५८ नगरच्या किल्ल्यांत सखाराम हरींचे हाल. ... १०७
५९ 'फितुरी' 'फितुर केला' याचा अर्थ मॉस्टिन म्हणतो कीं मध्यांस (बारभाईस ) पेशवाईच गुंडाळावयाची होती. अप्टननें म्हटलें कीं दौलत चालवावयास योग्य दादासाहेब थोर कृतकर्मे. मूल लहान. ... १०८
६० ढमाल्यानें रोजचे रोज सखाराम हरींची बेडी हलवून पहाणें. रखवालदारांस त्यांशीं बोलूं नये म्हणून ताकीद करणें. सखाराम हरींस मेरोबांनीं सोडलें काय ? ... ११०
६१ सखाराम हरींच्या मातुःश्रीच्या वर्षश्राद्धास पांच पांच रुपयांच्या देणग्या. ... १११
६२ नाना सखाराम हरींस नागलीचें पीठ देववितात. उपास करूं लागल्यास करूं देण्यास सांगतात. ... ११२
६३ बारा हजार रुपयांचें आमिष दाखविताच थंड पडतात. ... ११३
६४ बाबूराव हरींची रवानगी प्रतापगडाहून सुयारगडास. त्यांच्या स्त्रीस सुयारगडास जाणें नसल्यास उरवड्यास पोहोंचवून देण्याची आज्ञा. ... ११४
६५ गोविंद रामचंद्रास जामीन घेऊन सोडून देण्याची सनद. मल्हार रामराव बखरकार याचे निमित्त चिटणीसांचा सरंजाम जप्त. ... ११५
६६ सखाराम हरींचा अंत कसा झाला ? ... ११६
६७ सखाराम हरींवर कारभाऱ्यांची इतराजी होण्याचें कारण मेरोबाच काय ? ... ११८
६८ सखाराम हरींसारखा मोहरा फुकट घालविला. ... ११९
६९ नारायण सखारामांचा अपघातानें मृत्यु. ... १२०
७० सखाराम हरींच्या स्त्रीपासून द्रव्यदंड वसूल करण्याचा नानांचा अमानुष तगादा. महादजी शिंद्यांचा थोरपणा ... १२२

७१ सखाराम हरि कधीं मृत्यु पावले ? .. १२३
७२ सखाराम हरि गुप्ते यांचे गुणदोष ... १२३
७३ सखाराम हरींची स्वामिनिष्ठा व ध्येय. ... १२७
७४ दादासाहेबांचे गुणदोष. ... १२९
७५ दादासाहेबांची सावधगिरी. ... १४०
७६ श्रीमंत दादासाहेब, आनंदीबाई व त्यांचा पक्ष यांस इंग्रजांकडे जाण्याची आवश्यकता कां भासली ? ... १४४
७७ गुप्ते घराण्यापैकीं सखाराम हरींच्या शाखेचा वंशवेल. ... १५३
७८ आंबेगांवकर गुप्ते ... १५३
७९ आख्याअिका ... १५६
८० सखाराम हरि गुप्ते यांचीं स्मृतिस्थानें ... १५७
८१ हलवितां येण्यासारख्या जिनसा ... १५८
८२ खूप शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना–बाळा ब्रहिरू क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेंकी डुबा दिई । देवनाथ कहे मुझे गरज नहि राज्य डुबाया बम्मनका ॥ यांपैकीं खरें कोणतें ? ... १६१
८३ पेशव्यांच्या राज्याचा अधःपात नानासाहेब पेशव्यांच्या वेळेपासून. ... १६७
८४ दादासाहेबांस बारभाईनीं मदत केली असती, सरदारांनीं स्वार्थापेक्षां मराठी राज्य टिकविण्याचा प्रयत्न केला असता तर ? ... १६८



Sardar Sakharam Hari Gupte.

Vaidya Bros' Press.

६४५२

# गुप्त्यांचें पूर्ववृत्त

आमच्या गुप्त्यांच्या मावळांतील थोरल्या शिवछत्रपतींच्या वेळेअगोदर-पासूनच्या शाखा तीन : (१) दादाजी नरस प्रभु गुप्ते-देशपांडे रोहिड-खोरेकर, ज्यांनीं थोरल्या शिवछत्रपतींबरोबर मुऱ्हारायरेश्वरीं स्वराज्याच्या शफता वाहिल्या[1] व ज्यांस विजापुरच्या आदिलशाही बादशहांनीं गर्दन मारण्याची धमकी घातली[2] त्यांची. त्यांचे वंशज सुप्रसिद्ध रंगो बापूजी, ज्यांनीं छत्रपति प्रतापसिंह महाराज यांची बाजू पार्लमेंटपर्यंत लढविली त्यांची. (२) सखाराम व बाबूराव हरि गुप्ते, ज्यांस श्रीमंत थोरल्या बाजीराव साहेबांनीं पुढें आणिलें व ज्यांनीं श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब यांचेबरोबर जाऊन पुढें अटकेपार बिनी नेऊन झेंडे लाविले त्यांची. (३) वडवाथरकर, केतकावळेकर, भादेकर ज्यांस पुरंधरे, कारखानीस, चिटणवीस, खोत, इनामदार म्हणत व जे मुरार बाजीसह नारायणेश्वराचे देवळाजवळ दिल्लेर-खानाशीं व पुढें महिपतराव चिटणीसासह पानीपतीं लढले त्या आमची. आमच्या एका पूर्वजांनीं काळ्या आंब्यापासून जवळच वीरश्रीची शर्थ केली. खंदकांत पडले. पण कर्णिक नांवाचा सैनिक जखमा झाल्या तेव्हां पाठीवर नेत असतां त्यास झिडकारून धारातीर्थी देह ठेवणार म्हणून ते तेथेंच समाप्त झाले.

रवळनाथ व भूतनाथ हीं रत्नागिरी जिल्ह्यांतील दैवतें होत. रवळनाथ वेंगुर्लें गांवांत असून भूतनाथ अथवा वेतोबा अरवली गांवांत मालवणपासून दहा मैलांवर आहे. यांच्या पादुका आंबेगांवकर व वडवाथरकर, पुरंधरे, केतकावळेकर पूजितात. अर्थात् एके काळीं त्यांचें वास्तव्य त्या बाजूस होतें याचें हें द्योतक होय. वडवाथरकर गुप्ते मालवणाजवळील राजकोटचे

१. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५ पृ.२७१-२७२.

२. सह्याद्रि मे १९४५ पृ.२६५ "हे न जालीयास खुदावंत शाह तुजला विजापुरीं नेऊन गर्दन मारतील." लेखांकाची तारीख ३०-३-१६४५.

थोरल्या शिवछत्रपतींच्या पुष्कळ पूर्वीचे किल्लेदार. मालवणचा सिंधुदुर्ग पुढें बांधिला. मालणगांवची खोती वडवाथरकर गुप्त्यांची होती. मालण, मालवण तालुक्यांत मालवणहून बारा मैल आहे. केतकवळेकर, वडवाथरकर यांस मोंगलाईतहि गांवें मोकासा असून त्यांस तिकडे मोकाशी म्हणतात. नीरेजवळील मार्दे (यास चोराचें मार्दे म्हणतात) हि त्यांस इनाम असल्यामुळें त्या बाजूस त्यांस इनामदार संबोधितात. नासिक, नगर व पुणें या जिल्ह्यांतील मोकासा गांवावरून कागदपत्रांत त्यांस मोकाशी म्हटलेलें आहे. पुण्याच्या तुळसीबागेंतील "श्रीरामचंद्र" गुप्ते धाकटा भाऊ मानतात. केतकावळें अगोदर गुप्त्यांस मोकासा चौथाई हक्कानें मिळालें. तदनंतर श्रीरामचंद्रास इनाम मिळालें. मुंजी व लग्नें यांची अक्षत गुप्त्यांस रामचंद्रास न्यावी लागते व रामनवमीच्या दिवशीं नारळाचा त्यांचा मान आहे.

केतकवळे, पुरंधर येथें त्यांची वस्ती असल्यामुळें त्यांस पुरंधरे व केतकवळेकर संबोधितात. केतकवळें पुरंधरच्या पायथ्याशीं आहे. सडकेपासून आंत पूर्वेस एक मैल आहे. केतकवळ्याचे इनामदार तुळसीबागेंतील श्रीरामचंद्र.

पुरंधरची कारखानीशी गुप्त्यांकडे वंशपरंपरेनें होती. मध्यें थोडे दिवस अम्मल नव्हता. तो श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबांनीं चालू केला. आनंदवल्लीस जवळ रहावयास घर दिलें.[1]

मुरार बाजीचे सोयरे केतकवळेकर गुप्ते त्यांचेबरोबर दिलेरखानाशीं नारायणेश्वराचे देवळावर्यंत लढले. ते केतकवळ्यास रांजणाई देवी आहे तीस यश मिळाल्यास सात बकरीं देऊं असा नवस करून बाहेर पडले होते. मुरार बाजी पडल्यावर भेल्याचें सोंग घेऊन ते निजले होते. त्यांनीं झेंडा मातींत व वाळूंत पुरून ठेविला होता. मोंगल रात्रीं निघून गेल्यावर तो पुरंधरीं आणून थोरले शिवाजी महाराज किल्ल्यावर आले तेव्हां त्यांस त्यांनीं दाखविला. महाराजांनीं त्यांस नांवाजिलें. बकऱ्यांचा नवस फिटला नाहीं म्हणून आजपर्यंत नडतें असा समज आहे.[2]

---

१. गुप्ते घराण्याच्या सनदा, भा. इ. स. मं. त्रै. व. २३ अं. ३ पृ. १२८. ऐ. सं. सा. खं. ४. पृ. १२८.

२. म हिती पुरविणार गं. भा. लक्ष्मीबाई भ्रतार विठ्ठल गुप्ते केतकावळेकरीण.

विठ्ठल दादाजी पुरंधरचे कारखानीस यांचे पुत्र रामचंद्र विठ्ठल चिटणीसांचे निसबत होते. त्यांचे वंशजहि होते. म्हणून पुणें, नगर व नासिक जिल्ह्यांत आमच्या शाखेंतील पुरुषांस चिटणीस म्हणूनहि उल्लेखिलेलें आहे.

सखाराम हरि व वडवाथरकर गुप्ते यांचे व दिघे देशपांडे यांचे सोईरसंबंध पुरातनकाळापासून होते. पोतनीस चिटणीसाशींहि होते. सखाराम हरि यांचे अगदीं जवळचे नातेवाईक बेलवड्यास होते. यास्तव ते बेलवड्यास रहात होते. त्या वेळीं त्यांची गरिबी होती. वडवाथरकर गुप्त्यांचें नातें आसपासच्या देशपांडे मंडळींशीं असल्यामुळें ते वडवाथरास रहात असत. वडवाथर गांवीं त्यांस पाळणूक होती. हा गांव महिपतराव चिटणीसांस मोकासा होता. त्यामुळें त्यांजबरोबर ही वडवाथरकर मंडळी उत्तरेंत युद्धास जात. शिद्यांच्या स्वाऱ्यांतहि असत. त्यामुळें त्यांची चलती होती. विठ्ठल दादाजीपासूनची कारखानीसांची माहिती पेशवे दप्तरांत आहेच.

---

## सखाराम हरींचें पूर्वचरित्र

### जन्म १७१८ मृत्यु १७७९

## श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब यांची गुणग्राहता

सखाराम हरींचे वडील बंधु बाबूराव हरि श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब यांचे बरोबर इ. स. १७३३ च्या जंजिऱ्याचे स्वारीस गेले होते. त्या वेळीं शिद्दी रहिमान स्वतः हत्तीवर बसून ईर्षेनें लढत होता. बाबूराव हरि घिनीवर होते. श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब मागें सैन्यासह पाठपुरावा करण्यास तितक्याच आवेशानें सज्ज होते. रायबहादूर गुप्ते लंडनला प्रसिद्ध केलेल्या आपल्या दुर्मिळ झालेल्या सखाराम हरींच्या चरित्रांत लिहितातः—

"Sakharam Hari entered the Maratha Army in the time of Bajirao I. in 1735[१] when his brother, Baburao Hari, accompanied him to Janjira. Sakharam was then only 17 years[२] of age, and yet he felt an intuitive craving for military service, which resulted in his obtaining the command of a small detachment of the army in his brother's charge. It was not long, however, before an opportunity for acquiring fame was presented to him, for, in the action between the armies of Siddhi Rahiman and the Peshva, he came across the leader of the opposing army and suddenly attacking him, killed him on the spot. This turned the tide of fortune and the battle was won by the Marathas. In due appreciation of the services thus rendered, young Sakharam was presented with the very elephant on which Siddhi Rahiman rode on the battlefield, and appointed commander of a cavalry consisting of 1200 mounted horse."

यांत श्रीमंत थोरल्या बाजीरावसाहेबांची गुणग्राहता चांगलीच निदर्शनास येते. त्यांनीं सखाराम हरींसारखीं रत्नें हुडकून काढून पुढें आणलीं. त्यांच्या पुत्रांनीं– रघुनाथरावांनीं व थोरल्या माधवराव साहेबांनीं यांचा बिनीवर उत्कृष्ट उपयोग करून घेतला. पण त्यांच्यामागें त्यांस उकिरड्यावर फेंकून देऊन त्यांचा वाडा नाना फडणवीसांनीं लुटविला. शाबास ! हीहि गुणग्राहता !

या वरील हल्ल्यासंबंधीं गुप्ते घराण्यांत जी आख्यायिका आहे ती निवेदन करणें अत्यवश्य आहे. या हल्ल्याचे वेळीं बाबूराव हरि बिनीवर गेले. त्यांनीं आपल्या धाकट्या भावास– सखाराम हरीस– श्रीमंत बाजीरावसाहेब यांजजवळ बसवून ठेविलें. त्या वेळीं त्यांचें वय फक्त पंधराच– सत्रा नव्हे– वर्षांचें होतें. हल्ल्याचे वेळीं चलबिचल होऊं लागली. फौजा मागें सरूं लागतांच सखारामांस त्वेष चढला. त्यांनीं समोरील एकाचें घोडें घेऊन

१. इ. स. १७३५ त बाजीराव जंजिऱ्यावर गेलेच नव्हते.

२. इ. स. १७३५ त वय १७ येतें. १७३३ त स्वारीच्या वेळीं १५ येतें.

त्याजवर टांग मारली व ते श्रीमंतांची नजर चुकवून हल्ल्यांत धडाडीनें शिरले. थेट शिद्दी रहिमानावर चालून येऊन त्यांनीं त्यास कंठस्नान घातलें. सखाराम हरीसहि जखम लागून त्यांस मूर्छा आली. तथापि शिद्दी रहिमान पडल्यामुळें लढाईचें पारडें फिरलें व मराठ्यांचा विजय झाला. बाबूराव हरि परत आले तों त्यांस आपले बंधु दिसेनात. तेव्हां गडबड उडाली. श्रीमंत गोंधळले. इतक्यांत त्यांस खरी हकीकत लोकांनीं येऊन सांगितली. त्यांची मर्जी बहाल झाली. सखाराम हरीस जवळ आणून सावध करण्यांत आलें. श्रीमंतांनीं त्यांस नांवाजून त्यांची पाठ थोपटून ज्या हत्तीवर शिद्दी रहिमान बसला होता व जो पाडाव करण्यांत आला होता तोच त्यांस इनाम दिला. खेरीज बाबूराव हरींच्या पथकांत त्यांस ५०० घोडेस्वारांचें सहपथक दिलें. येथून पुढें बहुधा बाबूराव हरि व सखाराम हरि बरोबरच युद्धास जात व शेजारीं शेजारीं लढत. रा. ब. गुप्ते यांनीं त्यास १२०० स्वारांच्या रिसाल्यावर नेमल्याचें लिहिलें आहे; परंतु गुप्ते घराण्यांत या वेळीं १२०० चे मालक बाबूराव हरि व ५०० चे सखाराम हरि अशी आख्यायिका आहे. जाबता सांपडल्या-वांचून नक्की आंकडा कळण्यासारखा नाहीं. संशोधन केलें पाहिजे.

रा. ब. गुप्ते यांनीं इ. स. १७३५ दिला आहे. तथापि श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब **इ. स. १७३३ त** जंजिऱ्यावर गेले होते. शिद्दी रहिमान त्यांचेबरोबर लढल्याचा दाखला राजवाडे यांनीं छापलेल्या दुसऱ्या खंडांत पेशव्यांच्या शकावलींत दिला आहे तो असाः—[1] "बाजीराव पेशवे यांनीं जंजिरे प्रांतांतील अशी महालोंमहालीं ठाणीं बसविल्यानंतर ज्या चौघांनीं वडील अबदुला यास मारिलें, त्यांपैकीं शिद्दी रहयान बाजीराव साहेब यांशीं लढला; परंतु त्यांतच तो ठार झाला." वयाच्या सत्रावे वर्षी सखाराम हरीस स्फूर्ति झाल्याचें रायबहादुर लिहितात. पण आंबेगांवकर घराण्यांत ती त्यांस त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी झाल्याची आख्यायिका आहे. इ. स. १७३३ त त्यांचें वय १५ च वर्षांचें होतें. पहा ही गोष्ट किती तंतोतंत जमते ती.

---

१. राजवाडे खं. २ पृ. ६८.

शिद्दी "रहमान" ऐवजीं "रह्यान" वाचलें गेलें. ही मोडी वाचनाची चूक होय. कारण मोडींत 'मा' व 'या' जवळ जवळ सारखाच काढीत.

हा शिद्दी २९ ऑक्टोबर ते ११ डिसेंबर १७३३ चे दर्म्यान केव्हां तरी मारला गेला.

सखाराम हरि इ. स. १७१८ त जन्मास आले. महिना तारीख कळत नाहीं.

१५ डिसेंबर[१] इ. स. १७३७ ते ७ जानेवारी इ. स. १७३८ च्या स्वारींत पहिले बाजीराव साहेब नर्मदा ओलांडून निजामउल्मुल्कावर चालून गेले. रा. ब. गुप्ते म्हणतात: —

The Marathas had very nearly lost an action when Sakharam again turned the scale by beating a false retreat and rounding a hill to attack the enemy on both sides. This resulted in success to the Marathas. Raghunathrav Peshva, the father of the unfortunate Bajirav II., was present in this campaign. He was a brave man himself and duly recognized in Sakharam the true spark of martial fire He took him under his direct command, raised him to the rank of a Sardar (an Indian peer) and obtained for him handsone presents from the State. Sakharam henceforward accompained Raghunathrav in all future expeditions.[२]

वरील निजामावर छापा घालण्याच्या कामगिरीबद्दल पेशवे सरकारनें त्यांस फौजेची बक्षीगिरी, सरदारीचा सरंजाम व कारभार दिला.

श्रीमंत बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांचे कारकीर्दींत खर्चाचे नेमणुकीसाठीं खासगी सरंजामासुद्धां सालीना रोकड तीन लक्ष व सहा लक्षांच्या वराती (त्यांच्या ताब्यांतील सरकारी फौजेच्या खर्चाकरितां) मिळत गेल्या.[३]

---

१. राजवाडे खंड २ पृ. ७८–७९.

२. Reprint p. 1.

३. सखाराम हरि आंबेगांवकर यांचे कै. बा. आ. गुप्ते यांनी संपादिलेलें चरित्र पृ. २.

बाबूराव हरि व सखाराम हरि यांच्या मावळांतील गुप्त्यांच्या शाखेला पुढें आणण्याचें श्रय थोरले बाजीराव साहेब पेशवे, थोरले माधवराव व रघुनाथराव दादासाहेब यांजकडे आहे. पुढें गोविंदराव गायकवाड यांस त्यांच्या दोन मुलांकडे सरदारी चालू ठेवण्याबद्दल धन्यवाद दिले पाहिजेत.

रायबहादुर बा. आ. गुप्ते म्हणतात.:—

In 1745 Sakharam was granted an annual personal allowance of Rs. 3,00,000 (£ 30,000) and army allowance Rs. 6,00,000 (£ 60,000).

पुढें ते म्हणतात:– In this conflict [with the Abdulla and Vazir Suja Daula] Sakharam Hari distinguished himself by rendering important services which were rewarded by Shah Alum by the bestowal on him and his brother Baburao and their descendants of the perpetual grant of the village of Ambegaon in the province of Aurangabad, which was previous to this compaign conquered from "Salabat Jung the Subbadar of the Deccan who ceded to the Marathas a considerable part of the province." (The History of the reign of Shaha Alum by W. Franklin, published in 1798 by Cooper and Graham.) As Salabat Jung was the Subhadar or Governor under the Empire of Delhi, this grant when assigned by the Emperor was binding on him even if he were to recover his lost territory from the Marathas on some future day. It has also been recognised by the British Government after being scrutinized by the Inam Commission, and the decendants of the two brothers are in full enjoyment of it up to the present day (1886).

तथापि इ. स. १७४१ त अब्दाली दिल्लीस आलाच नाहीं. तो इ. स. १७४८ त फक्त लाहोरपर्यंत आला होता. मराठे त्या वेळीं फक्त राजपुतान्यांत जयपुरपर्यंत गेले होते. राघोबादादा इ. स. १७५८ त

अटकेपर्यंत गेले. इ. स. १७४८ त महमदशहा गादीवर होता. तेव्हां अब्दालीचा पराभव झाला. कमरुद्दीन वजीर मारला गेला.

शहाअलम इ. स. १७४९ त गादीवरच नव्हता. अहमदशहा गादीवर असून वजीर सफतरजंग होता. शहाअलमचें फ्रँकलीननें लिहिलेलें चरित्र प्रथम इ. स. १७९८ त छापण्यांत आलें. त्याचें पुनर्मुद्रण पाणिनी कचेरीनें प्रयागास इ. स. १९१५ त केलें आहे त्यांत वरील उतारा नाहीं. शहाअलम इ. स. १७५९ त गादीवर आला. पण तो निघून बंगाल्यांत गेला होता. परत इ. स. १७७१ डिसेंबरांत दिल्लीस आला. त्या वेळीं मराठ्यांची त्यास मदत होती. महादजी शिंदे, तुकोजी होळकर व विसाजी कृष्ण बिनीवाले मदतीस होते.

रघुनाथराव दादासाहेबांचा सर्व मराठ्यांस भूषणास्पद असा पराक्रम पे. द. मा. २७ नं. २१८ पृ. २१५-२१६ यांत सारांशरूपानें वर्णिला आहे. हें पत्र हरि रघुनाथ भिडे यांनीं नाना फडणीसास (कारण पैवस्ती त्यांच्या हातची आहे) चैत्र शुद्ध १३ ता. २१-४-१७५८ रोजीं लाहोरहून लिहिलेलें आहे. नदी यैरावती[1] अर्थात् इरावती दिली आहे. जरूरीपुरता सारांश असा:—

पौ छ. १८ रमजान.

श्रीरामचंद्र

श्रीमंत राजश्री. नाना स्वामीचे सेवेसीः—

सेवक हरि रघुनाथ भिडे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी... श्रीमंत साहेबी आबदुल समदखान सरहद्देत होता. त्याचे पारपत्य करून मुलूक प्रा मजकुर व दुवब दोन्ही तालुके आदिना बेग मोगल याजकडे खंडणी ठराऊन त्याचे स्वाधीन केले. तदुत्तर मजल दरमजल ज्याहानखान आबदालीचे पुत्रासहवर्तमान लाहुरी विसा हजारा फोजनसी होता त्याजकड चालिले. तेव्हां विपाशा[2] नदी तिरीहून खड्या फौजा मानजी पायगुडे व गंगाधर बाजीराव व गोपाळराव गणेश पुढें

१. हल्लीं हीस 'रावी' म्हणतात.

२. ब्यास म्हणतात.

रवाना केले. यासी, त्याणी येऊन मारनिलेसी गाठ घातली. तेव्हां तो घाबरा होऊन आपले बुणगे व तोफखाना वगैरे कितीक फौज मागे टाकून सडा ती चौ हजारा फौजेनसी चिनाव[१] नदीपार उतरोन जीव रक्षणमुळें पळाला. आपले फौजेनें नदीपरियंत पाठिलाग करून सर्व फौज तोफखा(ना) देखील लुटिला. पुढें चिनाव पार व्हावे तरी नदीस (पाणी) फार. उपाये नाहीं म्हणून राहिले. नाहीं **तरी तोहि लुटला जाता. भगवंते रक्षिला. येरवी श्रीमंत साहेबाचा प्रताप इकड बहुत विस्तार पावला.** त्याचा विस्तार ल्याहावासा नाहीं. **उयाहानखान व तयेमूरशा** सलाबतीनेच पलाले. इतकियानें या प्रांतीं वर्तमान हिंदुस्थान रजवाड व दिली व जाट वगैरे याजवरी सलाबत भारी पडली. **दक्षणी फौज पहिले दिलीं आलाकडे आली नवती. ते चिनाव नदीपरियंत पोहोचली.** चिनावेस पाणी थोडे आसते तरी आटक परियंत जाती. **सहात (?) मात्र आट (क) पार होऊन गेला.** पुढें पूल बांधोन फौजा जाव्या त्यास आटकाव भारी पडेल मग छावणीस मूळ जाले. छावणी दूरदेशी करता न ये. त्याहीवरी लोक कष्टी होतात. येसे आसोन ।। सहसा विदधीत न क्रियां ।। म्हणोन लाहून प्रांतीचा बंदोबस्त करून श्रीमंत साहेब देशोदेशे माघारे फिरतीलसे दिसते. याहीवरी भगवत्सता प्रमाण. जाले वर्तमान सेवेसी लिहीलं..."

पहा काय त्रेधा दादासाहेबांनीं दुराण्यांची अब्दालीचा वजीर जहानखान व पुत्र तैमूरशहा यांची उडवून दिली ! मानाजी पायगुडे, गंगाधर बाजीराव व गोपाळराव गणेश यांसी गांठ पडली तेव्हां जहानखान घाबरा होऊन बुणगे, तोफखाना मागें टाकून सडा तीन चार हजार फौजेनिसी चिनाब उतरून जीव घेऊन पळाला. दादासाहेबांच्या फौजेनें पाठलाग करून सर्व फौज व तोफखाना लुटला ! चिनाब नदीस पाणी फार म्हणून वांचला. श्रीमंतांचा प्रताप बहुत विस्तार पावला. त्याचा विस्तार ल्याहावासा नाहीं. चिनाबास थोडें पाणी असतें तरी दक्षिणी फौज अटकपरियंत जाती. या अडथळयामुळें सर्व फौजा अटकेस जाणें शक्य नव्हतें. **पण सहात (?) मात्र अट(क)पार होऊन गेली.**

---

१. चिनाब.

आमच्या आंबेगांवकर व वडवाथरकर गुप्ते घराण्याच्या शाखांत बाबूराव हरि (दादा) व सखाराम हरि (भाऊ) अटकेपार जाऊन त्यांनीं झेंडे लाविले म्हणून कौतुक करीत असतात. हे दोघे बंधू रिसाल्याचे मुख्य होते. हे नेहमींच आघाडीवर असत. शिद्दी रहिमानाच्या स्वारींत हैदरवरील हल्ल्यांत सखाराम हरीच पुढें होते हें निदर्शनास येईल. या आमच्या घराण्यांतील माहितीस दुजोरा श्री. ग. ह. खरे यांच्या सह्याद्रींतील[1] विवेचनावरून मिळत आहे. तेव्हां मराठे चिनाबच्या पलीकडे गेले नव्हते हें प्रतिपादन टिकत नाहीं.

या विषयावर रा. ब. सरदेसाई यांचा व माझा पत्रव्यवहार झाला होता. त्यांनीं एक लेख संशोधकांसाठीं पाठविला होता. त्या वेळींहि हा प्रश्न उपस्थित झाला होता. माझें अटकेपार मराठ्यांनीं झेंडे लावल्याचें विधान परत घ्यावें असें रा. ब. वगैरेंचें म्हणणें होतें. पण आमचे घराण्यांत दादा व भाऊ बिनीवर असून त्यांनीं अटकेपार झेंडे लाविले हा अभिमान बाळगण्यांत येत असल्यामुळें मीं विधान परत घेण्याचें नाकारलें. श्री. खरे यांनीं दाखविलें आहे कीं मराठे पेशावरपर्यंत सुद्धां मुलूख जिंकीत खंडण्या घेत गेले होते.[2]

तथापि या वेळीं चिनाब नदीस पाणी असल्यामुळें त्यांची फौज पुढें न जातां त्यांची बिनी जाऊन तिनें अटकेपार झेंडे लाविले हें "सबात"च्या ऐवजीं चुकीनें "सहात" वाचल्यानें स्पष्ट होतें. श्री. खऱ्यांनीं सबातचा अर्थ घोडदल केलेला बरोबर आहे. हे गुप्ते बंधू रिसाल्याचेच– बिनीचेच– अमलदार होते.

हरि रघुनाथ भिडे हे दादासाहेबांच्या परम विश्वासांतील गृहस्थ होते.

या वेळीं इ. स. १७५८ त दादासाहेबांनीं अब्दालीचें सर्व सैन्य चौपट होतें तरी सखाराम हरीस बरोबर घेऊन अटक नदीच्या पार पिटाळून लावलें.[3] सखाराम हरींची ही मर्दुमकी पाहून आलमगीर[4] पादशहानें

---

१. व. ९ अं. ३ पृ. ६०८ सप्टेंबर १९४३.

२ केसरी २-७-४३.

३. कायस्थ प्रभूंच्या इतिहासाची साधनें, थोर पुरुषांचीं चरित्रें. सखाराम हरि आंबेगांवकर, बा. आ. गुप्ते संपादित पृ. २.

४. आलमगीर दुसरा इ. स. १७५९ त मारला गेला. नोव्हेंबर.

त्यांच्या शूरत्वाच्या बक्षिसीसाठीं दीड हजार रुपयांचें गांव मौजे आंबेगांव् तर्फ मुशे(से) खोरें वंशपरंपरें इनाम दिलें. जी सनद फारसी[१] लिपींत शिक्यानिशी दिली तिचें मराठी भाषांतर सखाराम हरी गुप्त्यांच्या त्रोटक चरित्रांत[२] दिलेलें आहे तें असेंः—

"श्री[३]

मोहोर

अलमगीर

पादशाह

यादी[४] बसांत फुरमान बाकशान[५] सादर जाहला कीं, दीड हजार दाम् मौजे आंबेगांव तर्फे[६] मोशे खोरें.[७]

अमले प्रांत रायगड मसाफ[८] सुबे खुदस्ते बुनीयाद[९] औरंगाबाद एथून कीं दाम[१०] मजकुर तेथील हंसील आहे. बाबूराव हरी व सखाराम हरी ह्यांजला पुत्रपौत्रांसह दुसरे कोणाचा हिस्सा नसतां[११] जागीर माफ करून दिली असे. तवजे कसलूकान यांनमावर अफाजूद झाल्यास तारीख ३[१२] रबिलोईल पासून बमूजब तपसील मुकरर व्हावें. त्यांस फुर्जनदान[१३] जामदार[१४] व वज़ीरान ज़ुलइक्तदार[१५] व अमीरान व अलिमिकदार[१६] व हकीमान व अमीलान व मुत्सदिआन माहेमात[१७] दिवानी व वकीलात मामलात सुलतानी व जागीरदारान व करारियान[१८] वर्तमान भावी यांसी कळावें कीं, हंमेशा हा हुकुम जारी ठेवण्याविषीं कोशीश करून दाम मजकुर वंशपरंपरा उभयतांचे अखत्यारांत सोपावें व तगीरी[१९] व तबदिली पासून

---

१. सखाराम हरि आंबेगांवकर चरित्र, बा. आ. गुप्ते संपादित पृ. २. २. सदर पृ. ३. ३. भाषान्तर करणारानें श्री घालणें शक्य आहे. ४. या दिवसात दरीविला वगैरे शब्द मूळांत असेल. ५. बालाशान = ज्याचा दिमाख फार मोठा आहे. ६. तर्फ इ मोसे खोरे. ७. मोशेखोरें = मोसे खोरे. ८. (रायगड) नव्यानें जोडलेला. ९. औरंगाबाद. १०. वर सांगितलेले दाम = १५००. ११. सोडून. १२. रबिलाईल = लावणीच्या रब्बीच्या हंगामापासून. १३. फर्जंदान = मुलांना. १४. नामदार = कीर्तिमान्. १५. शक्तीनें युक्त. १६. ज्यांचें सामर्थ्य मोठें आहे. १७. कामें. १८. करोडीयान = जकातीचे अधिकारी. १९. जप्त.

सुरक्षित जाणून सुबेदारी व फौजदारी वगैरे नजराण्याविषीं व तमान[1] खराजातीविषीं तुमचे माइसलान व जातान व दारोगान व शिकारपटी व मुलादमी[2] व कानूताई[3] वगैरे यांजविषीं मुजाहिम न होतां कुल तकलिफात दिवाणी व पादशाहीपासून माफ कलम जाणून याजविषीं ताकीद सक्त जाणून हरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें व हुकुम बमुजब वर्तणूक करावी. तारीख २५ माहे सफर सन १७५९ त लिहिलें गेलें."

वरील सन इ. स. असावा. मुसलमानी दिसत नाहीं. इ. स. धरला तर २५ सफरला आरबी ११६०, फसली ११६९ व हिजरी ११७३ येईल.

जुलुस ६ अथवा हिजरी ११७३ असला पाहिजे. इंग्रजी ता. १७ ऑक्टोबर १७५९ इसवी ही येते.

वरील सनद मजकुरावरून खरी असली पाहिजे. पण भाषांतरांत कित्येक शब्द चुकीचे आहेत. कांहीं भाषांतरकारास लागले नसतांहि दडपून दिले आहेत. जसें रबिलीईल ऐवजीं तारीख ३ रबिलोईल. तारीख ३ दडपून दिली.

हें भाषांतर दुरुस्त करण्यांत श्री. ग. ह. खरे यांची मदत झाली आहे.

हें आंबेगांव कोणचें व सखाराम व बाबूराव हरींस कोणच्या आंबेगांवावरून आंबेगांवकर म्हणूं लागले? पोतनीस मंडळी म्हणतात कीं या बंधुद्वयास दिलेलें मूळचें 'महाल आंबेगांव' मोसें खोऱ्यांतील ( उरवडें ) आंबेगांवाहून जवळच्या रस्त्यानें १५।२० मैल आहे. तेथील पाटील मुसलमान वंशपरंपरेनें आहे. हें म्हणणें वरील सनदेशीं जुळतें आहे. "मुसें खोऱ्यांतील आंबेगांव ( सखाराम हरि व बाबूराव हरि ) यांस बादशहाकडून इनाम असल्यामुळें यांस आंबेगांवकर म्हणतात" असें म. रि. म. वि. ४ पृ. २९३ वर आहे.

दुसऱ्या अलमगीर बादशहानें इनाम दिलेल्या आंबेगांवचा अम्मल चालला नाहीं. सबब बाबूराव हरि व सखाराम हरि यांस त्यांच्या मावशीनें

---

१. तमाम अखराजातीविषयीं = सर्व प्रकारचे (सरकारी) खर्च. २. मुकादमी. ३. कानूनाई.

पैशाची मदत करून उरवड्याजवळील आंबेगांव देशपांड्याकडून खरेदी देवविलें अशी आमच्या गुप्ते[1] घराण्यांत व देशपांडे कुलांतहि आख्यायिका आहे ती खरी दिसते. मराठी रियासत उ. वि. पृ. ६२५ वर "बाबूराव व सखाराम हरि या बंधूंनीं आंबेगांवचें देश कुलकर्ण व गांवकुलकर्ण सबा सितैन मया व अलफ [ सु ११६७ ] मध्यें माधवराव जनार्दन व अमृतराव व खंडेराव व आनंदराव जनार्दन दिघे प्रभु कुलकर्णी यांजपासून खरेदी घेतलें असें आहे. इ. स. १७६६–६७ येतो. सरदार दत्तात्राव आंबेगांवकरांस विचारतां ( उरवडें ) आंबेगांवावरून आपणांस आंबेगांवकर संबोधूं लागले असें ते म्हणतात. हें खरें दिसतें कारण बादशहांनीं दिलेलें आंबेगांव गेलें तरी कोणतें तरी आंबेगांव राहिलें म्हणून सखाराम व बाबूराव हरींच्या मावशीनें त्यांची समजूत घातली अशी आख्यायिका आहे. खेरीज ( उरवडें ) आंबेगांवास बंधुद्वयांचे वाडे होते. त्यांच्या चौथऱ्याचे अवशेष अद्याप तेथें आहेत.

## दादासाहेबांवांचून दुराणीस अडवितां येणार नाहीं.

इ. स. १७६१ च्या स्वारीस दादासाहेब गेले नाहींत. मागील स्वाऱ्यांत कर्ज झाल्याचें सदाशिवरावभाऊंनीं दाखविलें. स्वतःच स्वारीस जा म्हणून रागानें दादासाहेबांनीं सांगितलें. सखाराम हरींस तिकडील माहिती आहे व ते बिनीवर असणारे शूर सरदार आहेत तरी ते बरोबर हवेत असें भाऊसाहेबांनीं दादासाहेबांस व नानासाहेब पेशव्यांस कळविलें व निघण्यापूर्वी आपल्या डेऱ्यावर सज्ज होऊन येण्यास गुप्त्यांस कळविलें. दादासाहेबांची परवानगी असेल तर येऊं असें ते उत्तरले कारण मालक ते. सदाशिवरावभाऊंनीं तंबी दिली कीं पाणीपताहून आल्यावर पाहून घेईन. तुमचा निर्वंश करीन. सखाराम हरि उत्तरले कीं दुराणी पाहिला नाहीं तोंवर या धमक्या. तुमच्यानें त्यास आडविणें होणार नाहीं. श्रीमंत दादासाहेबच दौड करूं जाणोत. ते नसले येत तर मीहि येत नाहीं. अखेर सखाराम हरि भाऊसाहेबांबरोबर गेले नाहींत. महिपतराव चिटणीसांच्या पथकांत फक्त वडवाथरकर गुप्ते गेले. आंबेगावकर गेले नाहींत.

---

१. वडवाथरकर व आंबेगांवकर ( बाबूराव हरींचे वंशज ) घराण्यांत.

## राक्षसभुवन-तांदुळजा.

१०-८-१७६३ रोजीं राक्षसभुवनावर त्यानें (सखाराम हरीनें) अद्वितीय शौर्य दाखविलें (म.रि.म. वि.४ पृ.२९०[१]). "बाबूराव हरि, सखाराम हरि, महिपतराव चिटणीस यांनीं शिपाईगिरी बहुत केली. त्यास जखमा लागल्या. ह्यावरून वाढविलें."

या लढाईत सखाराम हरि श्रीमंत रघुनाथराव दादा समवेत देशी मोगलांबरोबर चाललेल्या प्रत्येक हल्ल्यांत आघाडीवर असत. श्रीमंतांची निभावणी त्यांनीं केली. ग्रँड डफ साहेब त्यांचे मित्र म्हणून त्यांस गौरवतात.

Rugonathrao was amongst the foremost in every attack, and at one time, almost alone, was completely surrounded and cut off from his troops, but *his own determined bravery*, and that of his *friend Sakaram Hurry*, who fought by his side, enabled him to defend himself until rescued by his nephew."[२]

मराठे हीस तांदुळज्याची लढाई संबोधितात.

या कामगिरीबद्दल दादासाहेबांनीं सखाराम हरीस आणखी ५००० फौजेचा नवीन बंदोबस्त आपले स्वतःचे अंमलांत करून दिला. आनंदीबाईस ते सांगत कीं माझे घशांत घांस जातो तेवढाच माझा. बाकी सर्व ऐश्वर्य सखाराम हरींचेंच समजा.[३]

## दादासाहेबांची खाजगी व्यवस्था

इ. स. १७६७ च्या नोव्हेंबर अखेर चिंतो विठ्ठल रायरीकर यांवर सर्व कारभार सोंपवून आपण अंजनेरीस बसावें व सालीना पांच लाख त्यांनीं शिल्केस पाडून दाखवावे. सखाराम हरि व बाबूराव हरि यांपैकीं एकानें आपणांजवळ रहावें आणि दुसऱ्यानें भेलसा वगैरे प्रांतांत चारणीस जावें असें दादासाहेबांनीं बोलणें लाविलें होतें.

---

१. म. रि. म. वि. ४ पृ. ५८

२. A History of the Maharattas by James Grant Duff, Vol. II. p.175.

३. सखाराम हरींचें चरित्र पृ. ४ पहा.

इ. स. १७६७ च्या नोव्हेंबर ३० तारखेचें[1] एक पत्र बाजी गोविंद यास लिहिलेलें पे. द. भा. १९ पृ. ७५ अ. नं. ७१ चें छापलेलें आहे त्यांत हें वृत्त आहे.

" श्रीमंत (रघुनाथराव) राजश्री चिंतो विठ्ठल यास म्हणतात कीं, सर्व कारभाराचा येखत्यार तुम्हांस सांगतो. आपले नांवे सिके करावे पाच लक्ष सालीना सिलकेस पाडून द्यावे. आपणांस कारभार करणें नाहीं. अंजिणी(री)स जाऊन राहतो ऐसे म्हणतात.

रो बाबूराव हरी यास व सखाराम हरी यास उभयतास दाहा हजार रुो सालीना पभे साडे तिहा हजाराचे गांव बाकी इतलाख याप्रो देऊ आणि येक जण हजर रहावे, येकजणानें पागा घेऊन भेलसे वगैरे महालांत चारणीस जावे यैसें म्हणतात. अद्याप कबूल केलें नाहीं. तिकडेच समजावीस जाहाल्यास द्यावे यैसे मानस आहे. तमाम पागा देखील हुजूर पागा घोडी बारासे गणती भरली."

अर्थात् चिंतो विठ्ठल व सखाराम व बाबूराव हरि यांचा मुक्काम त्या वेळीं नासिकजवळपास होता. गुप्ते बंधूंपैकीं एकानें हुजूर दादासोजवळ रहावें व एकानें पागा घेऊन भेलसें वगैरे महालांत चारणीस जावें.

## मोतीतलाव-मेलकोट— नागमंगल येथील मर्दुमकी

हैदरावरील तिसऱ्या स्वारीच्या वेळीं श्रीमंतांचें दुखणें विकोपास गेल्यामुळें त्रिंबकराव मामांस सैन्याचें आधिपत्य देऊन ते पावसाळयाच्या प्रारंभीं पुण्यास आले.

सरदारांची सभा त्या वेळीं भरून बिदनुराकडे न जातां एकदम मागें वळून हैदर मेलकोटयास आहे तोंच त्यास गांठावें असा बेत ठरला. त्रिंबकराव मामांनीं त्याच्या हालचालींची बातमी काढण्याकरितां हजार दोन हजार स्वारांची टोळी पाठविली. तिचे प्रमुख सखाराम हरि गुप्ते होते.

ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग चवथा, हैदरवरील तिसऱ्या स्वारीच्या प्रस्तावनेंत कै. वासुदेव वामनशास्त्री खरे मार्मिकपणें लिहितातः— " या

---

१. छ. ८ रजब, पो छ. १२ रजब.

सखाराम हरीच्या धाडसास कांहीं मर्यादाच नव्हती. तो हळूच फक्त तीनशें स्वारांनिशीं शत्रूच्या लष्करासमीप गेला व त्या लष्कराची कही भरून परत चालली होती तिजवर अकस्मात् पडून तीपैकीं कांहीं हत्ती, उंटें व पांच सात हजार बकरीं त्यानें लांबविलीं. तेथून तो नाहींसा झाला तो तीन कोसांवर नागमंगल आहे तेथें उमटला. शत्रूचें जंगी लष्कर इतकें समीप आहे याविषयीं पर्वा न करितां तें शहर त्यानें स्वस्थपणें लुटून फस्त केलें. प्रथम कही लुटली गेल्याची ओरड हैदरकडे गेलीच होती व नंतर नागमंगल लुटल्याचीहि बातमी गेली. तेव्हां तेथून गडबडीनें फौज धांवून आली. तिचे नगारे ऐकूं येऊं लागले व तोफेचे एक दोन बारही झाले तेव्हां सखाराम हरि तेथून बेरूळास गेला. तेथें त्याबरोबर आलेले बाकीचे दीड हजार स्वार होते. त्याच ठिकाणीं मुक्काम करून त्यानें त्रिंबकराव मामांस अतित्वरेनें सर्व फौजेसह निघून येण्याविषयीं पत्र पाठविलें." [१] खालील पत्र यासंबंधाचें आहे:—

नं. १०९७ श्री ( फाल्गुन वद्य द्वितीया
३ मार्च १७७१ इ.

विनंती उपरी. [२] राजश्री सखाराम हरि बातमीस गेलकोटकडे गेले होते. (त्यांनीं) **थेट हैदरखानाच्या लष्करापर्यंत जाऊन कही लुटिली.** उंटे व तट्टे व पांच सात हजार बकरी वळवून गोटाच्या आसपास कोसाच्या अंतरें **झाल्यास पासोड्या बांधून मातबर फौज आली अशी दिखाई देऊन** आनंदराव तोफखानें व भवानजी जाधव यास वाट नीट पहावयास पाठविलें. चेन्नगिरीस आघाडीस, पश्चिमेस मेलकोटा, येणेंप्रमाणें (हैदर) उतरला आहे. डावे उजवे बाजूस मैदान मातबर आहे. **सखाराम हरी यांजबराबर फौज मातबर असती तर काम पोक्तें झा(जा)लें असतें.** बातमीस तीनशें राऊतासहीत गेल्यासारखें त्यांनीं काम असत्यांत करून माघारे नागमंगलास येऊन गांव मारून तलफ करून मनस्वीं लुटिलें.

---

१. ऐ. ले. सं. भा. ४, पृ. १६४६.

२. ही चिठी वामरावास कोणीं लिहिली आहे कळत नाहीं. ऐ. ले. सं. भा. ४ पृ. १७७२.

हैदरखानाच्या गोटांत नगारे होऊन गडबड जाली. एक दोनी तोफाचे बार जाले. तेथे राहिल्यास निभाव नाहीसा पाहून माघारे चार पाच कोस बेलुरास आले. तंव इकडून गायकवाडाची फौज हजार दीड हजार सामील जाली. तेथें थांबून राजश्री मामांस पत्र पाठविले जे भारी फौज पुढें पाठवून आपणही यावें असें लिहिलें आहे. आपणांस परस्परें मामा लिहितील. आपणही फौजेस ताकीद करून तयारींत असून मामा लिहितील त्याप्रमाणें करितील. सूचना कळावी म्हणून जलदीनें चिठी लिहिली असे. येथें मुख्या-खेरीज सर्वत्र सिद्ध जाले आहेत. चार सहा घटकेंत निघतील. विदित होय हे विनंती. राजश्री मामाही अरुणोदयाचे सुमारें निघणार. सध्यां पाच हजार फौज निवडक पुढें पाठवितात. लौकर जाईल हे विनंति.

चिठ्ठी आल्यावर त्रिंबकराव मामांनीं थोरल्या माधवरावांस माहिती सरकारी रीत्या कळविली

कर्नाटकच्या स्वारीचें आधिपत्य त्रिंबकराव मामांकडे होतें. त्यांच्या-बरोबर कृष्णराव बळवंत म्हणजे आपा बळवंत, सखाराम हरि गुप्ते, नीळकंठराव थोरात, भवानजी वाघ, महिमाजी मुढे, अंतोजी माने, दोरगे, निगडे वगैरे थोर थोर सरदार होते. हैदरनें तरतूद करून लढ-ण्याची शिकस्त करून पाहिली. कावे करून पाहिले. आडरानांत व अड-चणीच्या जाग्यांत दबे धरून पाहिले. तेथें आश्रय करून संधि साधून या लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून एकदम घाला घालण्याचे प्रयत्न केले. दिवटीचे पोत बैलाचे शिंगास बांधून लष्कराकडे पिटले. आपण निराळाच येऊन गोटावर पडला. मायावी कर्तृत्व दाखविलें. तथापि कसलेली ही मंडळी कसली दाद देतात! ती त्यांस पुरून उरली. हैदरची त्यांनीं तिरपीट उडवून दिली. या वेळचें एक पत्र त्रिंबक विश्वनाथांनीं म्हणजे त्रिंबकराव मामांनीं रावसाहेबांस अर्थात् थोरले माधवराव पेशवे यांस लिहि-लेलें आहे. त्यांत या मेलकोटजवळच्या, श्रीरंगपट्टण मोती तळ्याजवळच्या हल्ल्याचें वर्णन मोठ्या बहारीचें आलेलें आहे. तें वाचल्याशिवाय त्यांतील प्रसंगाची योग्य कल्पना येणार नाहीं. सखाराम हरि नित्याप्रमाणें बिनीवर होते. त्यांस मस्तकावर जखम लागली. पाठपुराव्यास आपा बळवंत आदि-

करून मंडळी होती. पे. द. भा. ३७ अ. नं. २२६ पृष्ठावरील याचा महत्त्वाचा भाग खालीं देतों:--

श्री १०-३-१७७१

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २२ जिलकाद मु। मोतीतले नजीक श्रीरंगपट्टण तीन कोस पावेतों स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीच्या आज्ञेप्रमाणें टुमकुराहून कूच करून हेबुरावर आलों, तो हैदरखान सात आठ हजार फौज व पंचेताळीस तोफा व पंधरा हजार गाडदी व बारवाले फिरंगी या सिवाये करनाटकीं प्यादे वगैरे बेमबलक बाण घेऊन मोठे तरतुदीनें मागडीवर आला. हजार दोन हजार दिवटींचे पोत करून बैलाचे सिंगांस बांधून लस्कराकडे पिटावे, त्या रोखे आमच्या फौजेने जावे आणि आपण निराळेच गोटावर पडावे इत्यादिक मायावी कतृत्व. आमच्या तर बातम्या जागा जागा बारीक होत्या. बातमी येऊनें पोहचताच येकदा तर फौजेची तयारी करून गोटाबाहेर जाऊन उभे राहिलो. त्यास वर्तमान कळताच माघारे जाऊन मागडीच्या रानांत आवलून राहिला. आम्हीं कूच करून त्याचे समोर भैरवदुर्गाजवळ येऊन हेबुराजवळ येक दोन मुकाम केले. हैदरखान बिदनुराच्या झाडींत शिरल्यानंतर मग आम्हांस झाडींत सिरो देईल हा भरवसा न पुरे. या अर्थे बिदनूरचा रोख सोडून तुरविकिऱ्यावर आलो. तो हैदरखान मागडीच्या झाडींतून निघोन नागमंगलावरून मेलकोटे देवाचे स्थल. चौफेर बिकट जागा त्याच्या आश्रियास येऊन राहिला. ते बातमी आम्हांस कलताच सडी फौज करून राजश्री कृष्णराव बलवंत याजबराबर **राजश्री सखाराम** हरी व नीककंठराव थोरात व भवानजी वाग व महिमाजी मुढे व अंतोजी माने दोरगे, निगडे मंडळी वगैरे फौज देऊन रवाना केले. त्यास सखाराम हरि व निलकंठराव थोरात व भवानजी वाघ व महिमाजी मुढे व अंतोजी माने व दोरगे व निगडे मंडली पुढे गेले. तेव्हां हे वर्तमान त्यास कलताच हैदरखानाची दीड

हजार फौज गोट सोडून गोटापुढें आली होती त्याजवर चालून घेतले. मागे उपरालियास कृष्णराव होते. तेव्हां हैदरखानाचे फौजेस उधलून मारीत मारीत गोटांत नेऊन घातले. आडीच तीनसे हैदरखानाचे घोडे पाडाव करून आणले, तों हैदरखानांनी तोफा गाडदी पुढें घालून तोफाची व बाण जेजालाची मारागिरी फार केली. **ते समई सखाराम हरीस डोईवर तरवारीची चोट लागली. वरकड मातबर सरदार फारसे जखमी जाले नाहीं.** तीस चाळीस घोडीं ठार जाली. सेपन्नास माणूसहि जखमी व ठार जाले. इतक्यांत आह्मी फौज सुधा जाऊन पोहोचलो. अस्तमान जाहला याजकरितां लढाई महकूफ केली आणि कोसाचे तफावतीनें मुकाम केला. रात्रीस हैदरखान जरा मर सरोन मेलकोटयाचे पश्चिमेस माचीस पुढें तोफा रोखून आरव्यानें राहिला... मोठी शर्तीची लढाई जाली..."

पहा या मोठ्या शर्तीचे लढाईत सखाराम हरि गुप्ते बिनीवर **सर्वांच्या पुढें** ! त्रिंबकराव मामांनीं **मागें उपरालियास** कृष्णराव बळवंताची नेमणूक केली होती. तेव्हां हैदरखानाचे फौजेस **उधळून मारीत मारीत गोटांत नेऊन घातलें** ! काय ही धडाडी !! केवढा हा पराक्रम !!! आघाडीस सखाराम हरि !! तेव्हां त्यांस डोईवर तरवारीची चोट लागली ! बाण बंदुकीची गोळी किंवा तोफेचा गोळा लागता तर वेगळें. डोक्यावर तरवारीची चोट लागणें म्हणजे ते हातीं तरवार घेऊन लढत होते. तेव्हां दुसऱ्याच्या तरवारीची चोट लागली. आणि ती डोक्यावर !! अशा वीरास नानांनीं कसा मृत्यु आणला तर कडेलोटानें नाहीं तर बेडीवर भुके डोकें आपटून प्राणत्याग करवण्याचा ! काय ही परीक्षा ! ! उकरड्यांत हिरा फेंकला ! वरील लढाईत 'वरकड मातबर सरदार फारसे जखमी जाले नाहींत' असें मामा रावसाहेबांस या चौकशीअंतीं कळविलेल्या सरकारी हकीकतींत लिहितात. हल्लींचे शब्द वापरावयाचे तर "Sakharam Hari was mentioned as the Commander-In-Chief's despatches."

हैदरच्या मर छावणींत शिरून त्याचा त्यांनीं विध्वंस उडवून दिला.[1]

---

[1] १. म. रि. म. वि. ४ पृ. २९०

## थोरल्या माधवरावांची रसदीविषयीं आज्ञा.

पण एवढी कामगिरी बजाविली म्हणून रसद वेळीं न पोहोंचवितां शिरें प्रांतीं रेंगाळत बसवल्याबद्दल— रावसाहेबांच्या शब्दांत स्वस्त बसल्याबद्दल- असल्याहि आघाडीवर काम करणाऱ्या सेनापतींची कानउघाडणी करण्यास ते चुकत नसत, पुन्हा योग्य कामास तात्काळ लागण्याची समज देत. पे. द. क्र. २३० ता. १५।६।१७७१ चा पहाः—

पा। छ ७ राविल.

श्री.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री सखाराम हरि गोसावी
यासी

श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुहुर सन इसने सबैन मया व अलफ. तुम्हांस निरोप समई रस्ते विसी सागणे त्या प्रकारें सांगितले असतां तुम्ही सिरे प्रांती स्वस्त जाऊन बसला. हे इकडे मनुसब्याचे तोंड लागले असता या दिवसात लष्करांत माहागाई फार. तीन सेर प्रमाणे दाणे मिळत नाही असे असता या दिवसात तुह्मी मेहनत करून रस्त आणून पोहचवावी ते न जाले. हे गोष्ट मनसुब्याचे प्रकारें तुह्मापासोन चुकोन गेली. असो. या उपरि पत्रदर्शनी **वीस पंचवीस हजार रस्तेचे बैल घेऊन तुह्मी दर मजल येऊन पोहचणें.** गरुडगडीकडील गुंता उरकलाच असेल. अतःपर येक घडीचा विलंब न करितां **रस्त घेऊन** हुजूर येऊन पोहोंचे ते करणे. तुह्मी तुरविकारा याचे सुमारे लस्करापासून येक मजल दाहा बारा कोसावर राहणें. आधीं जरूर लौकर लि॥ प्रकारे करणे. जरूर जाणोन लि॥ असे. जाणिजे छ १ रावल. बहुत काय लिहिणें.

सर्व महत्त्वाच्या व निकडीच्या कामगिऱ्या सखाराम हरींकडे सोंपविलेल्या असावयच्या ! पत्रदर्शनीं वीसपंचवीस हजार रसदचे बैल भरावयाचे ! ते काय एक घडींत जमा होतात ! श्रीमंतांची खात्री होती कीं 'तुम्ही स्वस्थ जाऊन बसला... हे गोष्ट मनसुब्याचे प्रकारें तुम्हांपासोन चुकोन गेली' एवढे शब्द सखाराम हरींस टोंचण्यास अगदीं पुरे पुरे होते. **हेंच**

दटावणें कामास येई ! पत्रदर्शनीं' 'बैल रसदेचे घेऊन येण्यास लिहिलें कीं तात्काळ सखाराम हरि येऊन धडकतील व रसद येऊन पोहोंचेल ! आज्ञा करणार व ती पाळणार असे जलदीनें गोष्टी घडवून आणणारे होते ! गुसे कांहीं स्वस्थ बसले नव्हते. गरुडगडाकडील गुंता उरकीतच होते. परंतु श्रीमंतांची गडबड भारी ! ते " जरूर जाणूनच हें पत्र लिहिल्याचें " बजावतात.

## गोविंदराव गायकवाडांस सखाराम हरींची मदत.

बडोद्याचे गायकवाडांच्या गादीविषयीं वाद उपस्थित झाला. दमाजीरावांच्या[1] मागें त्यांचे वडील पुत्र सयाजीराव[2] गादीवर आले व फत्तेसिंह[3] मुतालिक झाले. सयाजीराव दिवंगत झाल्यावर फत्तेसिंहांनीं गादी बळकाविली. गोविंदराव[4] पुण्यास येऊन राहिले होते. त्यांनीं सखाराम हरींचें पेशव्यांच्या दरबारीं वजन व मानमान्यता पाहून आपली हकीकत त्यांच्या कानीं घातली. ती अशी कीं आपली मातुःश्री वडील व सयाजीराव व फत्तेसिंह यांची धाकटी. सायाजीराव गादीवर बसले तेव्हां आपण अगदींच अल्पवयी होतों. आतां धाकट्या स्त्रीच्या पुत्रास अधिकार मिळतो हा न्याय किंवा काय ? आपण श्रीमंतांच्या कानीं सर्व हकीकत घालून मला न्याय देववावा. सखाराम हरींनीं श्रीमंत थोरले माधवराव व रघुनाथराव दादासाहेब यांस हा प्रकार कळविला. तेव्हां रामशास्त्री आदिकरून मंडळींचे विचारें गोविंदरावांस वस्त्रें देण्याचें ठरलें. फत्तेसिंहांनीं सखाराम हरींस पत्र लिहिलें कीं दरबार खर्चाबद्दल दोन लक्ष रुपये आाण स्त्री या नात्यानें पांच लक्ष व सिनोर

---

१. मृत्यु १८-८-१७६८ म. रि. वि. पृ. १५४.

२. सर्वांत वडील पुत्र पण दुसऱ्या कुटुबाचे– काशीबाईचे Bombay Gazetteer, Baroda Vol. VII. p. 188.

३. फत्तेसिंग तिसऱ्या कुटुबाचे पुत्र. इ. स. १७७१ म. रि. उ. वि. १ पृ. ३३. Bom. Gaz. Vol. VII. p. 188.
by the second or less probably by the third wife.

४ गोविंदराव द्वितीय पुत्र परंतु पहिल्या कुटुंबाचे– मनूबाईचे. म. रि. उ. वि. १ पृ. ३३ व Bom. Gaz. Vol. VII. p. 188.

महाल वंशपरंपरेनें करून देतों पण आमच्या उलट जाऊं नये. गुप्त्यांनीं फत्तेसिंहाच्या वकीलास कळविलें कीं मी लोभी नाहीं. मला न्याय दिला पाहिजे. अप्रामाणिकपणें मी पेशवे सरकारशीं वागलों नाहीं. तुमचा माझा द्वेष नाहीं. मी तुम्हांसहि मित्रच समजतों. पण रामशास्त्री वगैरे मंडळींनीं निकाल दिला त्या न्याय्य निकालाच्या उलट मला कसें जातां येईल ? नंतर श्रीमंतांस नजराणा देऊन नवसारी महाल व रोकड पन्नास लक्ष आणि सखाराम हरींस सिनोर व तेलाडी महालांची जहागिरी देऊं करण्याविषयीं वकिलांस लिहून आलें. त्यांनीं पुण्यास सखाराम हरींची त्यांच्या वाड्यांत गांठ घेतली. त्यांस ते रागानें बोलले कीं मीं लोभानें कांहीं करणार नाहीं. गोविंदरावांचाच पक्ष खरा आहे. त्यांजपासून मला मोठी प्राप्ति होणार आहे थोडीच ! पण त्यांचा सत्पक्ष जाणून व त्यांचें अल्पवय आणि निर्धनता पाहून मला कळवळा आला. मीं श्रीमंतांस विनंति केली व त्यांनीं न्याय देण्याचा निश्चय केला. सखाराम हरि व गोविंदराव यांचे वाडे समोरासमोर असल्यामुळें त्यांचा स्नेह वृद्धिंगत पावला. कांहीं पदार्थ गोड झाला कीं तो गोविंदरावांकडे धाडण्यांत येई. त्यांच्या सावकारांचे तगादेहि सखाराम हरि वारीत. त्यांनीं गोविंदरावांस गादीचीं वस्त्रें देवविलीं. श्रीमंतांच्या आज्ञेनें ते ससैन्य बडोद्यास दाखल झाले. सखाराम हरींनीं फत्तेसिंहास निरोप पाठविला कीं गोविंदरावांस गादी देऊन आपण मुतालिकी करावी. फत्तेसिंहानीं मानलें नाहीं. युद्ध जुंपलें. सखाराम हरि नित्य फ्रिनीवर असावयाचे. त्यांस जखमा लागल्या. परंतु त्याचा जय होऊन श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं गोविंदरावांस गादीवर बसोविलें. ही व्यवस्था दोन वर्षें चालली. ह्या कामगिरीबद्दल गोविंदराव गायकवाड यानीं त्याच वेळेस म्हणजे सन १७७२ सालीं वीस हजार रुपयांचीं गांवें जहागीर करून दिलीं असें रा. ब. गुप्ते लिहितात.[1] तथापि त्यांनीं पृ. ७ व ८ वर जी सनद या गांवांबद्दल छापली आहे तींतील तारखेवरून ती ता. २४ नोव्हेंबर इ. स. १७७४ रोजीं दिली असें उघड दिसतें.

---

१. सखाराम हरि गुप्ते यांचें चरित्र पृ. ७.

# श्रीमंत नारायणरावांच्या कारकीर्दीतील ग्रामण्य प्रकरण.

## सखाराम हरि आदिकरून चां. का. प्रभु पुढाऱ्यांच्या जबरदस्तीनें घेतलेल्या सह्या.

ग्रामण्य प्रकरणें बहुधा लटपटीचींच असतात. त्यांतून बहुधा एका जातीनें दुसऱ्या जातीवर धार्मिक ग्रंथांतील शब्दार्थावर कोट्या करून ज्या-वर ग्रामण्य उभारलें त्यांवर शिंतोडे उडवून आपण श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न केलेला असतो. इ. स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकांतहि शातकर्णी व क्षत्रप यांचे विवाह झाल्याचे दाखले आहेत. तिसऱ्या चवथ्या शतकापर्यंत वर्णाश्रम कडक होता. तरी हल्लींच्या धर्तीवर जातीस महत्त्व नव्हतें. पुढें राजे लोक आपआपसांत विवाह करीत. अगदीं खालच्या दर्जाचे लोकहि राजे होतांच उच्च मानलेल्या क्षत्रिय कुलाशीं संबंध करीत: उदा-हरणार्थ भर. हिंदुस्थानांत हूण, चीन, क्षात्रप, बर्बर, यवन आदिकरून लोक आले ते गेले कोठें? सर्वांचाच नायनाट झाला? अमक्या ब्राह्मण जाती-च्या पोटशाखेंत आधुनिक शास्त्राप्रमाणें अमुक शेंकडों आर्यन ४०–६० रक्त, सा. गौ. त ६०–८० अमुक, चां. का. त सुमारें ६० याचा तरी अर्थ काय? ११ व्या व १२ व्या शतकापासून जाती पक्क्या दृढ होऊं लागल्या. एका जातीच्या माणसानें दुसऱ्या जातींत जाणें फार कठिण झालें. ऐतिहासिकदृष्ट्या देशस्थ, चां. का. प्र., कोंकणस्थ यांच्या वंशा-वळी व लेख ११ व्या १२ व्या शतकांपासून विपुल आहेत. पूर्वींच्या वंशावळी कांहीं काल्पनिक, कांहीं खऱ्या अशा आहेत. पळशे, कोंकणस्थ, सारस्वत, चां. का. प्रभु यांजवर वेळोवेळीं ग्रामण्यें झालीं. त्यांचे इतिहास उपलब्ध आहेत. साधारणपणें शंकराचार्यांचे निर्णय प्रगतिपर असत. पण कित्येक वेळां ते स्वतःच कबूल करीत कीं कांहीं आपणांस निरुपायास्तव व जबरदस्तीनें तसे द्यावे लागले.

नारायणराव पेशव्यांच्या वेळीं चां. का. प्र. च्या ग्रामण्याविषयीं नऊ कलमी कतबा त्यांनीं जबरीनें करून घेतला. तीं कलमें अशीं:—

१ वैदिकमंत्रेंकरून कांहींच कर्म करणार नाहीं. २ वैदिक मंत्र येत असतील त्यांचा उच्चार करणार नाहीं. ३ माताचे पिंड करणार नाहीं. ४ देवपूजादिक विहित कर्मे पुराणोक्त मंत्र करूनच करूं व ब्राह्मणभोजन आपले घरीं करणार नाहीं. ५ शालिग्रामपूजा करणार नाहीं. ६ ज्या देवास शूद्र जातात त्या देवास जाऊं. ७ ब्राह्मणांना दंडवत मोठ्यानें म्हणत जाऊं व आपले जातींतहि दंडवत म्हणत जाऊं. ८ वैदिक ब्राह्मण व आचारी व पाणके व शागीर्द ब्राह्मण व ब्राह्मण बायका चाकरीला ठेवणार नाहीं व आपले घरींहि ठेवणार नाहीं. ९ आमच्या जातीमध्यें संतोषें पाट लावतील त्यांना आम्ही अडथळा करणार नाहीं. हा कतबा गागाभट्टाच्या निर्णयाच्या उलट होता.

कित्येक चां. का. प्र. स कैद करून ठेविलें[1] होतें. वरील कतब्यावर त्यांपैकीं प्रमुख सोळा इसमांनीं सह्या केल्यावर त्यांस बंधमुक्त करण्यांत आलें. त्यांचीं नांवें:—(१) रामराव जिवाजी चिटणवीस (२) विठ्ठल यशवंत पोतनीस (३) रामजी मल्हार [ नि। चिटणीस ] (४) मुरारराव दौलत-[ नाडकर ][2] (५) बाजीराव साबाजी (६) सोयरो वामन (७) बचाजी खंडेराव (८) आप्पाजी भिकाजी (९) खंडेराव बापूजी (१०) त्रिंबकराव महिपतराव चिटणवीस (११) बळवंतराव शंकर (१२) सखाराम हरि [ गुप्ते, आंबेगांवकर ] (१३) नीलकंठ रामचंद्र [ पेशव्यांचे पागे ] (१४) नारायण हरि (१५) बाळाजी गणेश व (१६) त्रिंबक सूर्याजी प्रभु[3] [ चौबळ, चेऊलकर. दादासाहेबांचे-सरदार. ]

नं. २, ४, ९ ते १२ व १६ या प्रसिद्ध कर्त्या व्यक्तींस दुखविण्यांत तात्त्विक दृष्ट्या श्रीमंत नारायणराव व त्यांचे सल्लागार यांची घोडचूक झाली म्हटल्यावांचून रहावत नाहीं. ग्रामण्य प्रकरणांत अधिक शिरण्याचें

---

१. के. सी. ठाकरेकृत ग्रामण्याचा साद्यंत इतिहास, पृ. ३९.

२. [ ] कंसांतील माहिती आमची आहे.

३. श्री. वाकसकरकृत अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें, पृ १५३ हि पहा. हीं नांवें कै. बळवंतराव चिटणीस, फौजदार यांनीं श्री. बा. स. कुलकर्णी यांजकडे पाठविलेल्या ग्रामण्याच्या बखरींत होतीं.

च विवक्षित लोकांचीं मनें दुखविण्याचें हें स्थळ नव्हे व तसें करणेंहि इष्ट नाहीं. या प्रकरणाचा थोडाबहुत परिणाम राजकारणावर होणें व त्यामुळें श्रीमंत नारायणरावांविषयीं मनें कलुषित होणें अनिवार्य होतें एवढें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रत्यक्ष पेशव्यांनीं पुढाकार घेऊन ग्रामण्य करून जबरदस्तीनें सह्या घेतल्याचा हा प्रकार फक्त नारायणरावांनींच केला. हा कतबा त्यांचें प्रेत शनिवार वाड्याबाहेर जाण्यापूर्वींच फाडून टाकावा व तंटे मिटवून टाकावे अशी विनंति सखाराम हरींनीं श्रीमंत दादासाहेब यांस केली. तेव्हां तो नानांचे दप्तरांत असलेला आणवून त्यावरील श्रीकार त्यांनीं फाडून देऊन तो सखाराम हरींच्या हातीं दिला. त्यांनीं व्यंकटराव काशींस दिला आणि पेशव्यांच्या गादीशीं आमचा तंटा नव्हता असें सांगितलें. नंतर सखाराम हरि ब्राह्मण मंडळींस धीर देऊन त्रिंबकराव मामांबरोबर स्मशानांत गेले ही आख्यायिका आहे.

"सन १७७३ सालीं पेणकर वगैरे ब्राह्मण मंडळीनें प्रभु जातीवर ग्रामण्य केलें... ते समयीं हा सर्व मजकूर सखाराम हरि यांनीं श्रीमंत दादासाहेब यांस श्रुत करून मोठ्या प्रयत्नानें प्रभूंच्या चालू वहिवाटी पूर्वापार चालत आलेल्या वेदोक्त धर्माप्रमाणेंच आहेत असें दादासाहेबांचे मनांत पूर्णपणें ठसविलें. ह्याविषयीं श्रीमंतांनीं स्वतः चांगल्या रीतीनें शोध केला. शोधान्तीं त्यांस असें समजलें कीं, ब्राह्मण लोकांनीं माजविलेलें बंड व्यर्थ आहे. प्रभूंचे सर्व धर्म यथार्थ आहेत."[1]

श्रीमंत दादासाहेबांनीं कर्में पूर्ववत् चालू करविलीं हें सांगावयास नकोच.

या ग्रामण्य प्रकारणाचे वेळीं एक गोष्ट उघड दिसते कीं नारायणरावांनीं सखाराम हरि व नीलकंठराव पागे यांचीं मनें दुखविलीं नसतीं तर सुमेरसिंग, महंमद इसुफ व तुळ्या पवार अशांसारख्या लोकांस खोटी सबब पुढें करून शनिवार वाड्यांत शिरून नारायणरावांस मारण्याची प्राज्ञा नव्हती. एकटे सखाराम हरि या सर्वांस भारी होते. पण त्यांनीं अंग चोरल्यावर धरण्याच्या कटाची इतिश्री मारण्यांत सहज होऊं शकली.

---

१. सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांचे रा. ब. गुप्ते यांनीं प्रकाशिलेलें चरित्र, पृ. ८.

# नारायणराव पेशव्यांचा मृत्यु.

हल्लीं ज्याच्या त्याच्या तोंडीं हा विषय आहे. महंमद इसुफ व तुळ्या पवार यांच्या जबान्यांत नारायणरावास धरण्याच्या कटांत मोठमोठ्या नामांकित मुत्सद्यांचीं नांवें आहेत. सखाराम हरींचेंहि आहे. बेळगांवचे इतिहासभास्कर डॉ. पां. गो. रानडे यांनीं नारायणरावांचा 'खून कीं आत्महत्या ?' प्रश्न करून आपलें मत आपल्या दोन भागांपैकीं दुसऱ्यांत दिग्दर्शित केलें आहे.[1] श्रीमत रघुनाथराव दादासाहेब ता. ३० ऑगस्ट १७७३ रोजीं व त्यापूर्वी श्रीमंत नारायणरावांच्या सक्त कैदेंत होते. दुसऱ्या दिवशीं त्यांस व सखाराम बापूंस बेड्या ठोकावयाच्या होत्या असें मि. मॉस्टिन[2] आपल्या रोजनिशींत लिहितो. अर्थात् त्यांस प्रतिकार करणें भाग होतें. मॉस्टिन म्हणतो कीं धरण्याच्या कटांत नाना फडणीस व हरिपंत फडके यांखेरीज सर्व मुत्सद्दी होते.[3] अशा परिस्थितींत श्रीमंत नारायणराव मारले गेले हें लक्षांत धरून या मुद्याचा विचार केला पाहिजे.

मि. मॉस्टिन पुण्यास होता. पण त्याची माहिती सर्वस्वीं विश्वसनीय होती किंवा नाहीं का तींत कांहीं बाद घातले पाहिजेत ? महमद इसुफ व तुळ्या पवार यांच्या जबान्या कायद्याच्या कसोटीस किती उतरतात ? शिवाजी पंतांनीं वामनराव पटवर्धनांस लिहिलेलीं दोन पत्रें खरे शास्त्री यांनीं ऐ. ले. सं. त दिलीं आहेत. त्यांतील ता. ३१-८-१७७३ च्या पत्रांत असें आहे:— घोडें लगामी आहे. चिंता करूं नका. वृद्ध बरें वाटत नाहीं म्हणून रात्रीस घरास गेला आहे. तो आज कांहीं आला नाहीं. हकार नामक माणसांसुद्धां परगृहीं कोठें गेले आहेत ते अद्याप भेटले नाहींत" वगैरे गोष्टी विचारार्ह आहेत. क्रमशः छाननी करूं.

---

१. नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या ? भा.२ पृ.१२५४ ते १२९६.

२. "... and even then it was hastened on by Ragobah and Sacaram Bappoos having heard Naron Row had come to a Resolution of Confining them both in Irons. Mostyn's Diary, p. 200.

३. "... the others meant only to make Him Prisoner, to which every one of the Ministers, except Nanna Furneese and Hurry Punt, were privy;" Mostyn's Diary, p.199.

## Mostyn's Diary

## मॉस्टिनची रोजनिशी.

"The Third English Embassy to Poona, Comprising Mostyn's Diary September, 1772-Feburary 1774 and Mostyn's Letters February 1774-November या शीर्षकाखालीं J. H. Gense, S.J., Ph.D., व D. R. Banaji, M.A., LL.B., यांनीं इ. स. १९३४ त पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. मॉस्टिन एकंदर तीन वेळीं पुण्यांत होता. येथें आपणांस त्याच्या तिसऱ्या वकिलातीशीं संबंध येतो. २९ सप्टेंबर १७७२ ते १३ फेब्रुवारी १७७४ पर्यंतच्या कालाची रोजनिशी त्यानें लिहिलेली आहे. हा सोळा महिन्यांचा होतो. [1]प्रास्ताविक लेखांत रा. ब. सरदेसाई लिहितातः—

"For the purposes of checking the Maratha power, Mostyn proved for the British Presidency of Bombay a most willing and tried instrument, as may be gathered from his three visits to Poona on diplomatic missions, which have been so lucidly described in the introduction to this book."

अर्थात् मुंबई इलाख्यांतील मराठ्यांच्या सत्तेवर दाब ठेवावयाचा हा त्याच्या वकलातीचा उद्देश होता. नारायणराव मारले गेल्यासंबंधानें त्यानें लिहिलेलीं पत्रें वरील पुस्तकांत नमूद आहेत. मेजर बसूंची अशी खात्री आहे कीं या कामांत मॉस्टिनचें अंग असावें. परंतु असें मानण्यास कांहीं पुरावा नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यास या बाबतची पक्की इत्थंभूत माहिती नसावी असें त्याच्या रोजनिशींतील उताऱ्यांवरून दिसतें. मात्र तो तशी बातमी काढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असावा व योग्य संधि मिळाल्यास तिचा फायदा इंग्रजांस मिळवून देण्यास टपून बसला होता. हें त्याचें कामच होतें. एवढ्याचकरितां त्याची नेमणूक होती. नारायणरावांस मारल्याबद्दलचे त्याचे जरूरीपुरते उतारे असेः—

---

१. Preface p. IV.

[1]Monday 30th (August 1773).

About one Oclock this Afternoon I was informed there was some Disturbance in the Durbar, and that a Number of Musquets had been fired. Immediately sent People to gain the Best Intelligence they could, who returned in about Half an Hour, and acquainted me that Mahomed Esoof and Sumersing, two Subedars of the Foot Guards, had under pretence of being Mustered (which it seems they had been ordered to do some Days ago), marched with their Men, which in all were about 500, to the Durbar, where they rushed in at two of the Gates, and put the Chokeys to the Sword; that the greatest part were now Mounted on the walls, and kept every Person from approaching the Place by firing at them, and some People Venturing too near had been Wounded. At three o'clock, report was brought me that most of the ministers with some Morattah Officers were Assembled at the Chokey in the Great Street leading to the Durbar, but undetermined what to do, as not knowing (at least some of them) what was transacting within, tho' most supposed it must be [2]Ragobahs Party endeavouring to seize His Nephew; some proposed bringing Cannon and Elephants against the Durbar, while others, particularly Sacaram Bappoo, opposed it by asking against whom they meant to Act; for those within were both equally their Masters. About four Oclock different Reports were brought: some saying Naron Row was killed, and others that he was made Prisoner; but soon after everything seemed Hushed in the Palace, and Ragobah was Proclaimed by a Party

१. Mostyn's Diary (August 1773) p. 198. यांतील कॅपिट्ल् लेटर्स घालण्याची पद्धत, अपोस्ट्रफी गाळण्याची तऱ्हा व स्पेलिंग या बाबी आज चमत्कारिक वाटतात.

२. Mostyn's Diary (August 1773), p. 199.

of Horse. At Six some of the Ministers and Officers were sent for to the Palace; a few went; and two or three, I hear, have Secreted themselves. As I cannot for certain learn whether Naron Row is really Killed or not, I must defer advising my Superiors of this Sudden change untill to morrow.

Tuesday 31st. Having used my best Endeavours to procure the most certain Intelligence of what passed Yesterday, find Naron Row was Killed, and His Body carried out privately at midnight and Burnt; but to cut Him off, from what I can learn, [१]*was not the intentions* of those that Planed the Scheme for Ragobahs release, and was kept a profound secret between Ragobah and Sumersing, the Man that did the deed; the others meant only to make Him Prisoner, to which every one of the Ministers, except Nana Furneese and Hurry Punt, were privy; but the Plan was principally carried on by the Duan, Assisted by some of Ragobahs menial Servants. The whole of the Foot Guards, who are kept in Constant Pay and Consist of Eight Companies (some amounting to five and others to two Hundred Men), were bought over and Pitched upon for the finishing Blow; many Morattah Officers were also in the Secret. [१]*The scheme was laid six Months ago,* and every opportunity for some months watched to put it in [२]Execution, but a Favourable one never offered till yesterday, and [३]**even then it was hastened on by Ragobah and Sacaram Bappoos having heard Naron Row had come to a Resolution of Confining them both in Irons.** It is said Naron Row had Intimation given Him of it, but this I can scarce believe, as He would certainly have taken some Precautions to prevent it,

१. इंटॅलिक्स आमचें आहे. २. Mostyn's Diary, p. 200.
३. मोठा टाइप आम्हीं घातला आहे.

which was easily done by having a few Trusty Men with Him; but instead of which, He went as usual to take His afternoons nap; and almost every servant and every one else, except the Chokeys at the Gates. were gone out of the Palace. There has at different times been Reports of Schemes formed for Ragobahs release, and some Bramins have been Confined on that Account. But this was carried on with such secrecy that nothing Transpired untill put into Execution. What alterations this Event may make with Respect to Us or the Ministry is yet impossible to say; in the latter great changes are expected, as I hear Chokeys are already placed on the Houses of Nanna Furneese and Hurry Punt, and, it's said, [1]*they are both Absconded*. As Naron Rows Death cannot Effect [affect] the Presidencies of Bengal and Madrass, Judge it best to defer advising them thereof, till I can give some Guess what turn Affairs will take....

या चौकशी करून सरकारी रीत्या लिहिलेल्या पत्रावरून कित्येक गोष्टी उघड होतात. मि. मॉस्टिन यास शनिवार वाड्यांतील बातम्या बरोबर मिळत नव्हत्या. वाड्याबाहेरील खबरी त्यानें एक वाजतां, दीड वाजतां, तीन वाजतां, चार वाजतां, सहा वाजतां काढल्या अथवा त्यास त्या मिळाल्या. सहा वाजेपर्यंत त्यास नारायणरावांस पकडलें का मारलें याचा थांग लागला नाहीं. नाना व हरिपंत यांच्या घरांवर चौक्या बसल्या होत्या. ते पळून गेल्याचें लोक सांगत होते. एकूण मॉस्टिन जरी पुण्यास होता तरी त्यास इत्थंभूत बातमी मिळत नव्हती. त्याचे हेर नानांच्या हेरांच्या तोडीचे नव्हते. किंबहुना बातम्या काढण्यांत तो नानांच्या एवढा चाणाक्ष नव्हता. नाना व हरिपंत यांखेरीज धरण्याच्या कटांत कारभाऱ्यांपैकीं कित्येकजण होते असें त्यास कळलें ह्यावरून (from what I can learn) तो म्हणतो. अर्थात् ही त्याची माहिती सर्वस्वीं विश्वसनीय होती असें तो म्हणत नाहीं. त्यास कळलें त्या-

१. इटॅलिक्स आमचें आहे.

वरून तो म्हणतो. पण मुख्य प्रधान अथवा कारभारी नाना व वाड्यावरील मुख्य संरक्षणाचा अधिकारी हरिपंत यांखेरीज कटांत सर्व असल्याची अफवा किती विश्वसनीय मानावयाची ! ज्यांच्यावर मूळ जबाबदारी त्यांसच **कटाचा पत्ता नाहीं पण तो सहा महिने मात्र चालला होता !** नानांसारख्यांस त्याचा पत्ता **सहा महिने नव्हता** व हरिपंत क्षुल्लक बाबीची सबब सांगून पेशव्यांनीं सावध केलें तरी निघून गेले याचा अर्थ काय ? याचा अर्थ एवढाच दिसतो कीं नारायणरावांस पकडील तर पकडूं दे. दादासाहेबांस नाहीं का त्यांनीं पकडलें ? पुढें पाहूं. सोडवूं. मॉस्टिन म्हणतो, नारायणरावांस पकडण्याच्या कटाची बातमी दिलेली होती यावर आपला फारसा विश्वास बसत नाहीं कारण तसें असतें तर त्यांनीं निवारणार्थ उपाय केले असते. तथापि ही बातमी कैक दिवस पुण्याभर होती. तिची कल्पना नानांस अथवा हरिपंतास नव्हती हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून दिसत नाहीं.

'सहा महिने कट चालला होता पण योग्य संधी मिळाली नव्हती. ती काल आली. आणि **तीसुद्धां राघोबादादा व सखाराम बापू यांस कैद करून बेड्या ठोकण्याचा नारायणरावांचा निश्चय जेव्हां कळला** तेव्हांच हें काम करण्यांत आलें.' अर्थात् मि. मॉस्टिनच्या बातमीदारावर विश्वास ठेवावयाचा तर राघोबास व सखाराम बापूंस दुसऱ्या दिवशीं बेड्या ठोकणार म्हणून त्यांनीं त्यांस धरण्याची त्वरा केली. त्याच्या अगोदर गोपीकाबाईच्या चिथावणीवरून आपणांस व राघोबादादांस ठार मारण्याच्या उद्देशाची बातमी सखाराम बापूंस मुधोजी भोसल्यांच्यामार्फत मिळाली असल्याचें पत्र ता. ९ ऑक्टोबर १७७५ रोजीं मि. डब्ल्यू. टेलरनें गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज् यांस लिहिलें.[१] तेव्हां दादासाहेबास नारायणरावांस धरण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें.

---

१. "It is said by means of Mudaji Bhonsla the Devan Sakharam received information of an intention to assassinate him and Raghoba at the instigation of Gopikabai".—Selections from the Letters, Despatches and other State Papers preserved in the Bombay Secretariat, Maratha Series, Vol. I Edited by George W. Forrest, B.A., p. 251.

मि. मॉस्टिननें ता. ३१ रोजीं चौकशी केली तेव्हां त्यास कळलें कीं नारायणराव काल ( ता. ३० रोजीं ) मारले गेले. मध्यरात्रीं त्यांचें शव खाजगी रीतीनें दहन करण्यांत आलें **राघोबाची सुटका करणारांचा उद्देश रायास मारण्याचा नव्हता.** राघोबाचें व सुमेरसिंगाचें हें गुपित होतें. म्हणजे मारण्याची वा धरण्याची माहिती दोघांस. इतर नारायणरावांस कांहीं तरी सर्वांच्या हितार्थ नजरकैद करणार.

ता. ३१ रोजींच ऑ. विल्यम हॉर्नबी एस्कायर, मुंबईच्या कौन्सिलवरील प्रेसिडेंट व गव्हर्नर, यांस मि. मॉस्टिन यानें पत्र लिहिलें त्यांत असें आहे[१]:—

About one o'clock, two Subedars (Mahomed Esoof and Sumersing) of the Foot Guards, marched with their People, about 500, to the Durbar under pretence of going to Muster, rushed in Bodily at two of the Gates and put the Chokeys to the Sword; the greatest part then mounted the Walls and kept every Body from approaching the Palace, while a few went to Naron Rows apartment. He was at this time asleep, but being a waked by a Servant and hearing a Disturbance, was making the best of His way to Ragobah, who was at the same time running down Stairs. He immediately ran into Ragohahs Arms, and beged Him to save His life and take the Government; for *He had then received a cut in His Back*;[२] five or six Sepoys followed Him close, and told Ragobah if *He did not let Him go, they would cut them both Down*,[२] when Ragobah pusned Him from Him, and He was instantly killed with a servant who fell on Him to save Him. Mahomed Esoof then led Ragobah to the Durbar where He Issued Orders for His being Proclaimed about Town; and the whole was over in a little Time without noise ro much Blood shed.

---

१. Mostyn's Diary (August 1773) p. 201.

२. इटॅलिक्स आमचें आहे.

२/२१ ...

There has at different times been reports of Schemes being formed for Ragobahs release, but they either never had being, or were discovered before they were put into Execution; but this, from all I can learn, and indeed from the manner it was Effected, must have been carried on with the utmost Secrecy, as nothing transpired till the firing from the Durbar made it known; and *what is more Extraordinary and quite unusual, not a Minister nor hardly a servant was in the Palace at the time.*[१]

वरील हकीकत बहुतेक मराठी बखरी व कवनें यांस मिळतीच आहे. पण प्रश्न विचारावासा वाटतो तो हा कीं नारायणरावांस धरण्याचा डाव टाकला गेला व ते मारले गेले तेव्हां शनिवार वाड्यांत एकहि मंत्री, मुत्सद्दी कां असूं नये ? मि. मॉस्टिन म्हणतो कीं क्वचित् एखादा नोकर ( hardly a servant ). फारच थोडे नोकर होते हें तर आपणांस ठाऊक आहे. पण असें कां ? मि. मॉस्टिन म्हणतो हें अनन्यसाधारण व अगदीं नेहमींच्या उलट (extraordinary and quite unusual ) आहे. कारभारी नाना व वाड्यावरील अधिकारी हरिपंत यांचें रायांस पकडण्याच्या अफवा असतां व सहा महिने कट चालला असतां वाड्यांत योग्य बंदोबस्त करण्याचें काम नव्हतें काय ? याबद्दल त्यांस खरमरीत समज ( severe scolding ) देऊन तरी मागेल काय? शनिवारवाड्याच्या रक्षणार्थ कित्येक हजार लोक असत. पण या वेळीं ते बदलून कां टाकले ? एकूण कारभाऱ्यांनीं कुचराई केली, अंग चोरून काम केलें, म्हणणें भाग पडतें.[२] नारायणरावांविषयीं त्यांस प्रेम वाटत होतेंसें दिसत नाहीं. त्यांस कारभार करूं न देण्याचाच बहुतेक मुत्सद्यांचा घाट दिसतो.

---

१ इटॅलिक्स आमचें आहे.

२. "...on the contrary he (Narayanrav) behaved in so senseless, imperious and disregardful a manner even to the ministers of his own party that they became lukewarm in his interest and in time suffered him to fall a sacrifice to the machinations of his enemies."—Forrest's Selections, p. 251.

**दादासाहेबांनीं आपणांस जखमा होईपर्यंत नारायणरावांस संभाळलें यावरून ते मारले जाऊं नयेत असाच त्यांचा इरादा होता हें सूर्यप्रकाशाएवढें उघड आहे.** त्यांच्या प्रायश्चित्तांतील शब्दांवरून 'कलागत पडली आणि त्यांत कदाचित् मारले गेले तर दोष ठेऊं नये' या सोडवणुकीचा गारदी असा फायदा घेतीलसें त्यांस वाटलें नव्हतें. पण गारदी झालेले बेफाम! नारायणराव जगल्यास ते आपणांस सुळावर चढविल्याशिवाय रहाणार नाहींत हें सुमेरसिंग व महमद इसुफ जाणून होते. त्यांस स्वतःचें संरक्षण करणें जरूर होतें. स्वसंरक्षणार्थ त्यांनीं धन्यावर हात टाकला. स्वसंरक्षणार्थ त्यांनीं त्यांस मारलें असें प्रायश्चित्ताच्या वेळीं दादासाहेब वदतात. त्यांचा त्या वेळेचा रंग पश्चात्तापाचा होता. "सरळपणें स्वच्छ चित्त दाखवून (ते) विश्वासावर बोलत होते. त्यांत दरद दिसत नव्हते. मुखावर ग्लान होतें. केवळ गरीबीनें भाषण होत असे. गुह्य दोष होता तो आपलें मुखें उच्चारण करून मातुश्री सांगतील त्याप्रमाणें प्रायश्चित्त करूं म्हणत होते. प्रायश्चित्ताच्या वेळस आपणांस कां बोलाविलें नाहीं म्हणून पुढें आनंदीबाईसाहेब बोलल्याच."

या मुद्यावर महमद इसुफ व तुळ्या पवार यांच्या जबान्या उलटसुलट तपासून पाहिल्या पाहिजेत. श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबांनीं दारणा सांगवीस[1] भावजईच्या आग्रहास्तव प्रायश्चित्त घेतलें त्या वेळचा पत्रव्यवहारहि छानला पाहिजे. विकारवश होऊन भागणार नाहीं. नारायणरावांचा खून चुलत्यानें बायकोच्या सांगण्यावरून करविला असल्या नाटकी रसभरित वर्णनावर काडीइतका विश्वास ठेवतां येत नाहीं.

## महंमद इसुफची जबानी.

इतिहाससंग्रह, ऐतिहासिक चर्चा, पृ. ८ वर लेखांक २ आहे. त्यांत सुमेरसिंगाचा साथीदार महंमद इसुफ ह्यास पकडून त्याचा कबुलीजबाब घेऊन त्यास देहान्त शिक्षा दिल्याची बातमी हरिपंत फडक्यांनीं नाना फडणवीसांस दिली आहे. नानांनीं लिहिलें होतें कीं श्रीमंत **नारायण-**

१. दारणेच्या कांठी नासिक रोडवरून सिन्नरास जातांना हें गांव लागतें.

**राव यांचे प्रकरणांत** कोण होते तें ( त्यास ) पुसोन गुप्तरूपें लेहून पाठविणें. हरिपंत लिहितात कीं **मजला मारणार नाहींत या अन्वयें सांगितलें.** म्हणजे त्याची जबानी तुला मारणार नाहीं या आशेनें घेतविली. "**इसुफाचे मतें मजला मारणार नाहींत;** मजपासून चाकरी घेतील." तो ताब्यांत हरिपंतांच्या. मुख्य पेशव्यांचे कारभारी नाना फडणवीस. तेव्हां महमद इसुफ **आपला जीव या दोघांच्या हातीं असतां यांचीं नांवें घेणें शक्य आहे काय** याचा विचार वाचकांनींच करावा. म्हणजे ही जबानी पुराव्यास सर्वस्वीं ग्राह्य नाहीं. या दोन व्यक्ती सोडूनच ती छाननीस घेतली पाहिजे. पत्रांतील एकंदर मजकुरावरून इतर व्यक्तींविषयीं ती ग्राह्य धरण्यास निदान प्रथमदर्शनीं हरकत दिसत नाहीं. यास्तव इतिहाससंग्रहांतील पत्र खालीं समग्र देणें अवश्य आहे. तें असें:—

श्री.

[1]"विज्ञापना:— 'महमद इसूफ धरून आणिला आहे. त्यास मायेंत घेऊन एकांती पुसावें कीं श्रीमंत नारायणराव यांचे प्रकर्णांत कोण होते. तें पुसोन गुप्तरूपें लेहून पाठविणें' म्हणोन आज्ञा. त्यास केसोपंत आणावयास पाठविलें. ते समयीं त्यास सांगितलें होतें कीं चौकशी करणें. मायेंत घेऊन पुसणें. त्यावरून त्याची गांठ पडतांच मायेंत घेऊन विचारलें. त्यानेंहि[2] **मजला मारणार नाहींत या अन्वयें सांगितलें कीं, प्रथम मनसुबा दादासाहेबांस काढून न्यावें अगर नारायणरावसाहेबांस कैद करावें.** यास प्रथम शिरोपस्थ शिवाजी कान्हो. वरकडांची नांवें मात्र सांगत असत. एक नाना फडणीस, मामा, हरिपंत यांस मात्र ठाऊक नाहीं. वरकडांस ठाऊक होतें. **मोरोबा दादांचे घरच्या सत्राशें पुतळया शिवाजी कान्होनें** मजला आणून दिल्या व सदाशिव रामचंद्र याजकडील दीड हजार मोहोरा ( आणून दिल्या ). मालोजी घोरपडे आपले घरीं एक वेळ आले होते. **त्यांचें बोलणें दादांस काढून न्यावें इतकेंच.** वरकड शिंधे आपले घरीं येत असत. कुणबिणी येत असत.

---

१ ऐतिहासिक चर्चा लेखांक २ पृ. ८.

२. मोठा टाइप आम्हीं घातला आहे.

उभयतांकडील ऐवज आम्हांकडे आला. याप्रमाणें वरकड गारद्यांस पावला आहे. परंतु प्रत्यक्ष भेट झाली नाहीं. बजाबाचें नांव केसोपंतांनीं बळेंच घेऊन पुसलें. परंतु त्यानें सांगितलें माझी भेट नाहीं. नांवें [1]**शिवाजी कान्हो सर्वांची घेत होता कीं सर्व संमतांत आहेत.** आबाजी महादेव[2] पुण्यास येऊन मोरोबा दादास भेटून रात्रीचा गेला. हें शिवाजीपंत मजजवळ सांगत होता. याप्रमाणें वर्तमान सांगितलें. **श्रीमंतांस मारावें हें मत कोणाचें नवतें. ऐते वेळेस सुमेरसिंगानें केलें.** याप्रमाणें वर्तमान सांगत होता. याहून अधिक खुलासा कांहीं निघाला नाहीं. जाबीतजंग दादांचे सूत्रांत आहेत हें बोलत होता. स्वामीस कळावें ह्मणोन लिहिलें असे. **इसुफाचे मतें मजला मारणार नाहींत; मजपासून चाकरी घेतील.** परंतु अशा चांडालास ठेवून फल काय! कुठार कामाचा नाहीं. याजकरितां मारून टाकिलें. घोर वारला. हे विज्ञापना."

या पत्रावर मिती नाहीं. परंतु महमद इसुफ यास २६ नोव्हेंबर १७७५ च्या पत्रांत दुसरे दिवशीं पांच पाट काढून डोईवर शेंदूर तेल घालून उंटावर बसवोन शेणमार करून तोफेच्या तोंडीं देऊन उडविला असा मजकूर जिवाजी रामचंद्रांनीं गंगाधररावांस धुळयास लिहिला आहे.[3] महमद इसुफनें दिलेली ही प्रत्यक्ष जबानी नाहीं. केसोपंतांचें सांगणें खरें धरून वरील पत्र हरिपंतांनीं नानास लिहिलेलें आहे. तेव्हां तें पुराव्यास अक्षरशः ग्राह्य धरितां येणार नाहीं. त्याचा मतलबच फार तर विचारांत घेतां येईल.

महमद इसुफानें आपण माफीचा साक्षीदार आहों अशा समजानें ही जबानी दिलेली आहे. प्रत्यक्ष कायदेशीर माफी दिली नसल्यानें शिक्षा देणारांस खुष ठेवावें. त्यांचीं नांवें गुंतवूं नये हें मुलासहि समजेल. मग

---

१. मोठा टाईप आम्हीं घातला आहे.

२. सोवनी.

३. ऐ. ले सं. भा. ५ पृ. २४३. म. रि. उ. वि. १ पृ. २१ वर इसुफ व त्याचा मामा तोफेच्या तोंडीं उडविल्याची तारीख २६-११-१७७५ दिली आहे. पण ती वरील पत्राची आहे. त्याअगोदर पांचसात दिवस तोफेच्या तोंडीं त्यास दिलें.

महमदास कळतच होतें. मामा कटांत असणें शक्यच नव्हतें. पेशव्यांचे ते जवळचे आप्त. उरले नाना फडणवीस व नारायणरावांस मारलें तेव्हां सडकेपलीकडेच असलेले हेरांचे हेर व हरिपंत रक्षणाच्या ताफ्यावरील मुख्य कांहीं तरी सबब सांगून निसटून गेलेले. पेशव्याच्या रक्षणाची जबाबदारी त्यांजवर ते सहज गेले म्हणणें कसें संभवेल ?

एकूण काय कीं नाना व हरिपंत यांजवर धरण्याच्या कटाचा गुन्हा न्यायासनांत शाबीत न झाला तरी ते भयंकर वहिमी निश्चित. परस्पर नारायणराव कैद होत असले तर होऊं द्या. अद्दल घडून द्या या मताचे वहिमी खास.

मात्र खुनाचे कटांत त्यांचें अंग नसलें पाहिजे. "श्रीमंतांस मारावें हें मत कोणाचें नव्हतें. ऐते वेळेस सुमेरसिंगनें केलें" असें महमद इसूफच म्हणतो. "दादासाहेबांस काढून न्यावें अगर नारायणरावसाहेबांस कैद करावें" हा घाट होता असें तोच सांगतो.

इतिहाससंग्रह, ऐतिहासिक चर्चा, पृ.६ ७ वर ले. १ चें पत्र हरिपंतांनीं नानास लिहिलेलें छापलें आहे त्यांत दादासाहेबांच्या भाषणाचा मजकूर आहे तो असा:—"ते समयीं त्यांनीं विचारलें कीं, न जाणों, [1]**धरूं जातां कलागत पडली** आणि त्यांत कदाचित् मारले गेले, तर दोष ठेऊं नये, असें त्यांनीं सोडवून घेतलें; आणि कर्मास प्रवर्तले. ते समयीं त्यांनीं येऊन कमरेस मिठी घातली. तेव्हां गलबल झा(जा)ली. फुरसत पडूं पावली नाहीं. **दोहींकडे हात लावून निवारण करितों, इतक्यांत घात करणारानी आपले जिवाचे बचावास्तव हात टाकला.** तो प्रथमच पुरा बसला. त्याचा पुढील ग्रंथ तुह्मां सर्वांस समजलाच आहे. **तेव्हां धरण्याचे संकल्पांत कलागती पडून मारला गेला तर दोष नाहीं हें बोलणें करणें.** तें सांप्रत प्रायश्चित्तास कारण वाजवी आहे. त्यापक्षीं प्रेऊं." या भाषणान्वयें प्रायश्चित्तास वाजवी कारण काय तर वर दिलें आहे तें ! पुढें असें आहे:— "गुह्य दोष होता, तो आपले मुखें उच्चारण करून, **मातुश्री सांगतील त्याप्रमाणें प्रायश्चित करूं** असें ह्मणतात. ही गोष्ट

---

१. मोठा टाइप आम्हीं घातला आहे.

पश्चात्तापाची असें दिसतें. सौभाग्यवती आनंदीबाई यांचे बोलण्यांतहि असेंच आहे कीं, **मातुश्रीजवळ जाऊन ती सांगतील तशी खातरजमा** करणें. परंतु श्रीमंतांची बोलण्याची जात निराळी; यांची निराळी. बोलणें ठास पडतें."

प्रायश्चित्त दारणासांगवीस घेतलें. या दारणासांगवीवरून सरकारी दौऱ्यावर असतां तेरा वर्षांमिळून सव्वीस वेळां मला जावें यावें लागलें. तेव्हां इतकीं वर्षें हा प्रायश्चित्ताचा विधि व आग्रह माझ्या अंतःचक्षूसमोर असे.

या प्रायश्चित्तासंबंधीं आप्पाजीराम सहस्रबुद्ध्यांचें पत्र[1] वाचण्यालायख आहे. ते म्हणतातः— "राजश्री दादासाहेब यांनीं प्रायश्चित्त घ्यावयाचीं मसलत ठरविली; तेव्हां तिकडील शिष्ट ब्राह्मण इकडील ब्राह्मणांचे संमतांत घेऊन, दहा पांच असामी मिळून, **उच्चार करावयाचा मसुदा राजश्री बापूंनीं ठरवून केला,** त्याप्रमाणें श्रीमंतांस सांगितलें. त्यावर **त्यांनीं दिक्कत घेतली कीं दोषाहून उच्चार फार!** मग राजश्री **विसाजीपंत बापूंनीं दहापांच ब्राह्मणांकडून अनुमोदनें देववून, असाच उच्चार असावा,** असें केलें. तेव्हां श्रीमंतही **सुज्ञ, त्यांनीं मान्य केलें**....उच्चार एक वेळ खाशांनीं स्वमुखें स्पष्ट केला, व तीन वेळ अनुवादकाकडून करविला....मसुदा **राजश्री बापूंनीं तिकडील शिष्टांस संमतांत घेऊन ठरविला;** त्याप्रमाणें उच्चार करावयाचा तो केला...."

यावरून काय सिद्ध होतें? **उच्चार करावयाचा मसुदा बापूंनीं ठरावून केला त्यावर दादासाहेबांनीं दिक्कत घेतली कीं दोषाहून उच्चार फार! म्हणजे दोष अल्प उच्चार अधिक जास्त.** दोष असल्याचा करण्यास फर्मावितां. नंतर अत्याग्रहें विसाजीपंत बापूंनीं **दहापांच ब्राह्मणांकडून अनुमोदन देववून, असाच उच्चार असावा** असें केलें. हें काय voluntary confession **झालें? हा काय स्वखुशीनें दिलेला कबुलीजबाब झाला?** यास कबुलीजबाब (confession) तरी म्हणतां येईल?

---

१. इतिहाससंग्रह, ऐतिहासिक चर्चा पृ. ७१८ पादटीप.

२. मोठा टाइप आम्हीं घातला आहे.

धरण्याचा हुकूम दिला व त्याचा हा असा परिणाम मारण्यापर्यंत झाला याविषयीं दादासाहेबांस वाईट वाटत होतें. आनंदीबाईचा आग्रह होता कीं गोपिकाबाईजवळ जाऊन **त्या सांगतील तशी खातरजमा करणें.** याचा अर्थ असा कीं कट धरण्याचा होता, मारण्याचा नव्हता, ही **त्यांची खात्री त्या सांगतील त्या रीतीनें करावी.** पण गुन्हा घडल्याखेरीज प्रायश्चित्त कसें घ्यावयाचें ? प्रायश्चित्तावांचून तर गोपिकाबाई दर्शन घेत नाहींत. त्याजोगा "थोडा प्रमादहि घडला" होता. तेव्हां धार्मिकरीत्या, शास्त्रीयरीत्या थोरल्या भावजईचा अत्याग्रह म्हणून, सुज्ञ म्हणून, प्रायश्चित्त घेण्यास काय म्हटलेंच पाहिजे, याचा मसुदा ठरविण्यांत आला इतकेंच. तो कांहीं आरोपीचा मारविल्याचा अथवा मारण्यास प्रवृत्त करण्याचा जबाब नव्हे. त्यास कायद्याच्या दृष्टीनें फारच थोडी किंमत आहे. नाहींच म्हटलें तरी चालेल.

विचार करण्यासारखा आणखी महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं दादासाहेबांनीं आपल्या मुलाचा प्रत्यक्ष खून करविला अशी त्या मानी, करारी सन्यस्त गोपिकाबाईची खात्री वा समजूत असती तर त्यांनीं प्रायश्चित्त घेऊन तरी दादासाहेबाचें तोंड पाहिलें असतें काय ? कधींहि नाहीं. जेव्हां त्यांची खात्री झाली कीं धरण्याच्या कटाचें पर्यवसान मारण्यांत झालें व आपल्या दीरांस त्याबद्दल पश्चात्ताप झाला आहे तेव्हांच त्या प्रायश्चित्त घेतल्यावर त्यांस भेटण्यास तयार झाल्या. ही गोष्ट इतकी स्वाभाविक आहे कीं तीसंबंधानें अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

## तुळ्या पवाराची जबानी.

या बाबतींत आणखी महत्त्वाचा आधार म्हणजे तुळ्या पवाराच्या जबानीचा. ही जबानी आपखुषीनें ( voluntary confession ) दिलेल्या कबुलीजबाबाच्या दर्जाची आहे का मारपीट वगैरे करून हल्लीं पोलीस लोक घेतात त्या लायकीची आहे हा मोठा बिकट प्रश्न आहे. या जबानीवरच पुष्कळ निर्णय अवलंबून आहेत. थोडा संशय आला तरी तुळ्या आरोपी असल्यामुळें त्याचा फायदा त्यास द्यावा लागेल. ही जबानी इ. सं. त छापली आहे. ती अशी:--

[ मेणवली दप्तर ]

'जबानी तुळाजी पवार सु॥ इहिदे समानीन मया व अलफ. कारणें जबानी लिहून दिली ऐसीजेः—— आपण महमद इसफ याचे घरीं हमेशा बसावयास जात होतों. त्यास महमद इसफ यानें मजपासून वचन घेतलें कीं, आम्ही श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस मिळोन रायांस कैद करून दादासाहेबांस बाहेर काढावयाची मसलत केली आहे. म्हणोन बोलला. मग मी बोललों कीं, त्यांचे नांव घेऊन मुलखावर पोट भरावयास बहुत जागा आहे. आम्हीं या कामांत पडत नाहीं. म्हणोन बोललो. त्याजवरून बहुतच गळा पडोन बोलला कीं, हाही बाजीराव यांचा लेक आहे. आण या मसलतींत बहुतजण आहेत. तेव्हां आपण पुसिलें कीं, कोण कोण ते मसलतींत आहेत, त्यांची नांवें सांगणें. त्याजवरून त्यांचीं नांवें सांगितलीं. ते बितपशीलः——

१ आबाजी महादेव (सोवनी)
१ शिवाजी कान्हो.
१ नूर महंमद.
१ सदाशिव रामचंद्र. (सुखटणकर)
१ भवानराव प्रतिनिधि.
१ छटू फरास
१ नरसिंगराव देशमुख.
१ तोफखाना आपणाकडेस आहे म्हणोन सांगितलें याचें नांव मोघम.
० प्याद्यामध्यें कोण होते हें आपणांस ठाऊक नाहीं.
० मोरो बाबूराव हे फितुरांत मुळीं नव्हते व आपणांस कोणी सांगितलें नाहीं.
१ हुसेन बेग
१ खरगासिंग
१ गोविंद गणेश निसबत महादाजी नीलकंठ.
१ सखाराम हरी.
१ सखाराम भगवंत याचेच सूत्रानें होते. त्याचा चोपदार आणून रुजु करून देऊं.
१ गोविंदराव गायकवाड.
१ नीलकंठराव रामचंद्र यांजकडील लोक त्या वेळेस वाड्याच्या चौकीस होते ते फितुरीच होते. त्यास दर रावती शंभर १०० रुपये दिले.
१ महमद इसफ
१ सुमेरसिंग.

सदरहू सतरा असाम्या ते समयीं होते हे खरें. थेवरापासून राजकारण चाललें. आपण पुण्यांतील कामांत होतों. ही जबानी मेणवली दप्तरांतील आहे. पेशवे दप्तरांतील नाहीं. म्हणजे नानांच्या ताब्यांतील (custody तील ) आहे. सरकारी दप्तरांतील नव्हे.

दुसरा मुद्दा ती नारायणराव मारले गेल्याबरोबर ताबडतोब घेतलेली नाहीं. पुढें बऱ्याच दिवसांनीं घेतलेली आहे.

तिसरा मुद्दा. "त्यांजवरून त्यांचीं नांवें सांगितलीं" असें तुळया पवार म्हणतो. "सांगतो" असें बोलत नाहीं. भूतकाळ वापरतो. वर्तमान-काळ घालीत नाहीं. म्हणजे हें मागें एके दिवशीं दिलेल्या जबानीचें नानांच्या खाजगी दप्तरांतील टिपण आहे.

चवथा मुद्दा. जबानींत नानांच्या विरुद्ध पक्षाचेच लोक गोवले आहेत. हरिपंत फडक्यांस शनिवारवाड्यांत येण्याचा नारायणरावांनीं आग्रह केला. पण ते क्षुल्लक कारण सांगून निसटून गेले. म्हणजे ते या कटांत असावेत. पुण्यास १००–१२० मंडळी या कटांत असल्याची बोलवा होती. पण नानांस तिची खबर नव्हती ? हें कोणास पटेल काय ? ज्या नानारावांस कलकत्त्याची बातमी तिसऱ्या दिवशीं कळत होती, नवरा-बायको काय बोललीं याची ज्यांस इत्थंभूत बातमी ताबडतोब कळत होती त्या कारस्थानी नानास शनवारवाड्यांस चिकटून असलेल्या एकूणीस खणींत त्या कटाचा सुगावा लागला नाहीं हें कोणास पटेल व कसें पटेल ? राजकारण चाललें तें थेऊरापासून चाललें, तुळया म्हणतो. मग नानारावांस पत्ता कसा नव्हता व कां नव्हता ?

पांचवा मुद्दा. मुख्य मारणार सुमेरसिंग. त्याचें नांव शेवटीं. त्याचेच अगोदर दुसरा अन्नदात्यावर उठलेला महमद इसफ ! त्यावर नीलकंठराव पागे. कां तर त्यांचे लोक चौकी पहाऱ्यास होते ! पण चौकी पहारा करणें त्यांचें कामच होतें त्यांस म्हणे दर रावतीं शंभर रुपये दिले ! त्यावरचें नांव तर प्रसिद्ध सरदार गोविंदराव गायकवाड ! कां तर ते नानारावांच्या विरुद्ध पक्षाचे ! ! त्यांजवर सखाराम भगवंत म्हणजे सखारामबापू पेश-वाईंतील एक पुरे शहाणे ! कां तर आतां नानांस त्यास शहिंगमध्यें काढा-

वयाचें होतें ! त्यांची रुजुवात कोण करणार ? तर त्यांचा चोपदार !! खासा न्याय ! खरी जबानी चोपदारानें देण्याचा किती संभव ? त्यावरचें नांव सखाराम हरींचें. ते तर नानांचे कट्टे अजात शत्रु ! आणि दादासाहेबांसाठीं अर्थे[1] प्राणें मरणारे ! मग काय ?

प्याद्यां मधल्यांच्या नांवाचें नानांस कौतुक नव्हतें. तुळयाहि सांगत नाहीं. एकूण तुळया हा बनविलेल्या माफीच्या साक्षीदाराप्रमाणें. सर्वांत घोर अपराध त्याचा. धन्यास पाय धरून ओढणारा बदमाष[2] तो ! तो जबानी साळसूद देणार ! त्याला नानारावांनीं माफी देऊन सोडणें शक्य होतें ! मोरोबास या वेळीं नानांस वांचवावयाचें होतें. तेव्हां त्यांनीं तुळयाकडून चांगली सोडवणूक करून घेतली आहे. तुळयाला म्हणे नारायणरावांनीं छड्या मारल्या होत्या ! तेवढ्यासाठीं तो त्यांस जिवें मारणार ? हें स्वाभाविक दिसतें काय ? खिजमतगारास चुकल्यास छड्या मारणें कांहीं गुन्हा नव्हे. कारण– खरें कारण– अंतस्थ निराळेंच असलें पाहिजे. जिव्हाळयाचें असलें पाहिजे.

सारांश काय कीं तुळया पवाराची मेणवली दप्तरांतील जबानी सर्वस्वीं विश्वसनीय नाहीं. एवढेंच नव्हे तर पुराव्यासहि ग्राह्य आहे कीं नाहीं याची वानवाच आहे.

बरें वादासाठीं ती विश्वसनीय मानली तरी तीवरून काय बाहेर आलें ? नारायणरावांस कैद करून दादासाहेबांस बाहेर काढण्याचा कट होता. त्यांच्या सर्व राज्य करण्याच्या पद्धतीवरून नारायणराव राज्य करण्यास अगदीं नालायक होते. याच्या नशीबीं राज्य नव्हतें हा निर्णय त्यांच्याच वडील बंधूंनीं– थोरल्या माधवरावांनीं– दिला होता. तो योग्यच होता!

१. राजवाडे म. इ. सा. खं. १२ पृ. ७६ लेखांक १२७.

२. “ त्या समयीं तुळाजीनें जाऊन श्रीमंतांस ओढून आणिलें आणि बोलतो ” आतां कां पळतोस ? असें म्हणून ओढिलें.” कृ. वि. सोहनी विरचित रा. ब. साने यांनीं संपादिलेली पेशव्यांची बखर (१९०३) पृ. ८८.

रा. ब.[1] सरदेसाई त्यास नालायक (incompetent)च म्हणतात.[2] राजपुत्राचा गर्व, अज्ञान व भित्रेपणा यांमुळें दरबारचा अनिश्चितपणा एवढा झाला आहे कीं त्याचे उद्देश काय आहेत, व त्यांनीं निश्चित केला तरी तो खरा मानावयाचा किंवा नाहीं, हें कळणें कठीण आहे असें मॉस्टिन म्हणतो. दादासाहेबांस कैद करण्यांत नारायणरावांनीं घोडचूक केलीच होती. मग त्यांस बाहेर काढण्याचा कट काय अस्वाभाविक होता? दादासाहेबांस कारभार करावयाचा होता. हो म्हटलें! ज्यांनीं अटकेस झेंडे लाविले, निजामास शरण आणलें, त्यांनीं कारभार करण्याची हांव धरली तर त्यांत विशेष काय? वडील घरानें राज्य हांकावयाचें व धाकट्यानें कारभार पहावयाचा हा शिरस्ता बाजीराव–चिमाजी आप्पा, नानासाहेब-सदाशिवरावांपासून चालूच होता. याहि पुढें जाऊन कोणी म्हणेल कीं, दादासाहेबांचा राज्य करण्याचा मानस होता. तरी पेशवा नालायक अथवा बाल असतां राज्यशकट चालविलें तरी काय मोठा अन्याय झाला? शत्रू जिंकले दादासाहेबांनीं. राज्य करावयाचें तर नारायणरावानीं व सवाई माधवरावांनीं! कां तर फक्त त्यांचा वडील घरचा मान! पण पेशवे छत्रपति नव्हते. राज्याचे मालक नव्हते. फक्त चालक होते. मुख्य प्रधान, पंतप्रधान होते! मग राज्य चालविण्यास वयोवृद्ध, अनुभवी, लढाया जिंकणारा पंतप्रधान पाहिजे एका पक्षानें म्हटलें तर काय गुन्हा झाला? एकूण दादासाहेबांस बाहेर काढण्यांत कांहीं प्रमाद नव्हता. त्या वेळच्या पेशव्यांच्या घराण्यांत ते सर्वांहून अधिक हक्कदार होते.[3] लायखहि होते.

१. Narayan Rao, proved so incompetent that in a short time he fell a victim to the hands of assassins. — Mostyn's Diary, Preface, p. iv.

२. "This Court is at present so very wavering and Changeable in its Resolutions, owing to the Pride, Ignorance and Pusillanimity of the Prince and Inveterate Disputes amongst the Ministers, that it's hardly possible to know for a Certainty what their Intentions are, or to Rely on any thing they Determine on. —Mostyn's Diary, p. 191.

३. नारायणरावास कैदेंत ठेवून दादानें स्वतः पेशवाई चालविली असती तर त्यास बहुधा कोणाचा विरोध झाला नसता. म. रि. म. वि. ४, पृ. ३६०.

नाना, सखारामबापू, हरिपंत फडके वगैरेंनीं त्यांस योग्य सल्ला देऊन परस्थांच्या आहारीं न जातील असें वागावयांस हवें होतें. यांतच त्यांची खरी करामत होती. पण त्यांस पाहिजे होता कारभार, अधिकार, मोठेपणा ! नवकोटनारायण होण्याची हांवहि नानांस पुरेशी नव्हती !

## धरावें—मारावें.

### "ध" चा "मा" कोणीं केला ?

"ध" चा "मा" कोणीं केला याविषयीं म. रि. म. वि. ४ पृ. ३३३–३४ वर असें आहे:— "'ध' चा 'मा' करण्यांत तिघांचा उल्लेख येतो. एक आनंदीबाई,[1] दुसरा तिचा दत्तक मुलगा साठे, आठ वर्षांचा अमृतराव आणि तिसरा आबाजी महादेव.[2] पैकीं आनंदीबाईला प्रकरण ठाऊक असलें तरी स्वतः तिनें हें काम केलें नसावें, आणि अमृतरावासारख्या अल्पवयी मुलाकडूनही तें तिनें केलें नसावें. दोघां मुख्य यजमानांपैकीं कोणाच्या तरी संमतीनें अगर माहितीनें हें काम तुळ्या पवार, शिवाजी कान्हो, किंवा आबाजी महादेव यापैकीं एकानें अगर सर्वांनीं संगनमतानें केलें असलें पाहिजे. कदाचित् गारद्यांनींही आपल्या बचावाकरितां तें केलें असणें शक्य आहे."

मुख्य यजमान म्हणजे रघुनाथराव दादासाहेब व आनंदीबाईसाहेब यांच्या संमतीनें अगर माहितीनें हें काम झालें असलें पाहिजे यास आधार काय ? "हें काम" म्हणजे 'ध'चा 'मा' करणें. धरण्याचा कट असून त्यांत १००–१२० लोक– बहुतेक सर्व मुत्सद्दी– राज्यरक्षण करण्यास फार तर स्वार्थाकरितां सामील झाले होते म्हणा. प्रश्न फक्त मारण्याचा आहे. 'बाळ म्हणून वाढविलेला नारायणराव' दादासाहेबासारखा उदार चुलता व आनंदीबाईसारखी धार्मिक, सच्छील व प्रेमळ चुलती पुतण्यास मारून

---

१. यादीचीं अक्षरें "ध" चा "मा" कोणीं केला याची चौकशी किमर्थ केली ? माझा दस्तऐवज किंवा निरोप कांहींतरी निवडावयाचें होतें असें आनंदीबाई आपल्या कोपरगांवच्या दिनचर्येंत म्हणतात. पे. द. भा. ४. पृ ९०.

२. याचें आडनांव सोवनी.

टाका म्हणतील हें प्रथमदर्शनींच असंभाव्य दिसतें. त्यांत त्यांचें रक्षण करीत असतांच दादासाहेबांस जखम झाली हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. परकीयास– युरोपियनासहि–ज्याच्या रक्षणार्थ राघोबांस जखम झाली त्याचाच त्यांनीं खून केल्याचा आरोप करणें म्हणजे त्यांची नालस्ती करणें वाटतें. ब्रिटिश आर्मीतील लेफ्टनंट कर्नल मार्क विल्क्स हा इ. स. १८१० मध्यें लिहिलेल्या आपल्या ग्रंथांत म्हणतो:—[1]

"But that it was a foul calumny to brand as a murderer Raghoba, who had actually received a wound in the defence of the person with whose murder he was charged."

मुंबईकर इंग्रज व हैदर यांची खात्री होती कीं दादासाहेबांचा नारा-रावांस मारण्याशीं कसलाहि संबंध नव्हता.

कोणी म्हणेल कीं धरण्याचा हुकूम गारद्यांस दिला नसता तर त्यांस मारण्याची संधि कां मिळती ? पण दुसऱ्याच दिवशीं दादासाहेब व सखा-रामबापू यांच्या हातांत बेड्या पडणार होत्या.[2] अशा प्रसंगीं त्यांस झटपट नारायणरावांस नजर कैद करणें भागच होतें. दुसरा उपाय नव्हता. धर-ण्याचा कट करण्यास बहुतेक मुत्सद्दी प्रवर्तले होते. अर्थात् धरण्याची लेखी वा तोंडी (कांहीं लोक म्हणतात कीं लेखी आज्ञाच नव्हती) आज्ञा करण्यास दादासाहेब जबाबदार आहेत. प्रश्न हा आहे कीं त्यांनीं ती निव्वळ स्वार्थाकरितां व स्वतःच्या जबाबदारीवर दिली का बहुतेक **मुत्सद्यांच्या सल्ल्यानें अथवा सांगण्यावरून दिली. त्यांचाच स्वार्थ होता का सर्वांचें हित होतें ?**

दुसरा मुद्दा. दादासाहेब एवढ्या कडेकोट बंदोबस्तांत होते तर गार-द्यांचा त्यांचा हुकूम घेण्यास जाण्यासाठीं शिरकाव झाला कसा ? **नाना फडणीस व सखाराम बापू उलट असते तर आंत जाण्याची त्यांची प्राज्ञा होती काय ?**

---

१. History of Mysore, p. 762.

२. Mostyn's Diary, p. 200.

पुण्यांत असे प्रवाद होते कीं नानांस नारायणरावांस सोडवून आपलें प्रस्थ माजवावयाचें होतें. बापूंस दादासाहेबांस सोडवून मुख्य कारभार करावयाचा होता.

## वामनराव पटवर्धनांस लिहिलेलीं पत्रें.

कै. वासुदेवशास्त्री खरेकृत ऐ. ले. सं. यांतील नं. १२५९–१२६० या विषयास प्रस्तुत आहेत. त्यांतील जरूरीपुरते उतारे खालीं देतों:—

## ऐतिहासिक लेखसंग्रह.

### नारायणराव साहेबांची कारकीर्द इ. स. १७७३

नं. १२५९ श्री भाद्र. वद्य

सेवेशीं[1] विज्ञापना. 'मकार[2] नामकाचा भरंवसा धरावयाचा नाहीं. नकार नामक यांचा भरंवसा पुरता आम्हांस आहे. याजकरितां त्यांचे विचारें कर्तव्य तें करावें.' म्हणून लिहिलें. त्यास आपण लिहिला प्रकार तो खराच. त्याप्रमाणेंच लक्ष आहे. (श्रीमंतांचें) निराळें बोलणेंचालणें नकारनामकासीं होतें. आमची खातरजमा नकारनामकांनीं निराळी केली. आणि पत्रांतहि भाव लिहिला आहेच. संकार[3] नामक मळमळीत बोलत होते...

नं. १२६० श्री [ ३१ आगष्ट १७७३ ]

[ पृ. ११९७ ]

साष्टांग[4] नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत भाद्रपद शुद्ध १३ भौमवार दीडप्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल इंदुवारचा मजकुर जासुदाबरोबर लिहिला आहे त्यावरून कळेल. आज प्रातःकालापासून

---

१. पत्र शिवाजीपंताचें वामनरावांस. २. मोरोबाचा आम्हांला विश्वास येत नाहीं, नाना फडणिसाचा विश्वास येतो. ३. सखाराम बापू.

४. पत्र शिवाजीपंताचें वामनरावास. नारायणरावसाहेबांचा खून झाला त्याच्या दुसरे दिवशीं लिहिलेलें.

मजकूर तर मकार नामक लेखक ( श्रीमंतांस ) रात्रौ सांगून पाठविलें होतें कीं, 'आम्हांस काय आज्ञा.' त्यास निरोप आला कीं, रात्रीची रात्र आपल्या जागां स्वस्थ असा. प्रातःकाळीं सांगूं तसें करावें. प्रातःकाळीं भेटीस बोलाविलें तेव्हां त्यांचें त्यांचें बोलणें झालें. तेथून निघून नकार-नामकाकडे येऊन त्यांची भेटी केली. ते नमस्कार करून घरास आले. मकार नामक तेथेंच होते. लोकांस तमाम सरदारांस पत्रें पाठविलीं कीं, "गोष्ट होणें ती झाली. तुम्हीं जागां कायम असावें. मागाहून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणें." तेहीं आंतून आतांच आले. ते नकार नामका-कडे गेले. आम्हीं जाऊन उभयतांची भेटी घेतली. पुढें आज्ञा काय म्हणून पुसिलें. त्यांणीं सांगितलें कीं, तुमच्या यजमानाकडे पत्रें गेलीजे, तुम्हीं आपले जागां कायम राहणें.' या अन्वयें सांगितलें आहे... मकार नामकास मुख्यार्थ ( आह्मीं ) पुसिला कीं, घोडें लगामीं आहे कीं नाहीं ? त्यानें सांगितलें कीं लगामींच आहे. तुह्मीं कांहीं चिंता करूं नका. हा आंतील जीव सांगितला आहे. एक दोन रोजांत कारभाराचा डौल कसा पडतो तोहि समजेल. प्रस्तुत मामा व हेच आजच्या बोलण्याचालण्यांत फार करून आहेत. वृद्ध बरें वाटत नाहीं म्हणून रात्रीस घरास गेला आहे तो आज कांहीं आला नाहीं. चिंतो विठ्ठल, बाजीराव बर्वे, सखाराम हरी वगैरे वळण सारें जमा झालें.... [1]हकार नामक माणसांसुद्धां परगृहीं कोठें गेले आहेत ते अद्याप भेटले नाहींत. उभयतां[2] हे भेटले तेव्हां त्यांसही आणून भेटवितील. कालचा प्रकार– दोन प्रहर तीन घटका वाजल्यावर दिवसास दंगा झाला. सुमेरसिंग व महमद इसफ यांचे सातआठशें गारदी होते. आंत शिरले. तसेच दरवाज्यावरील लोक मारले. चोपाचोप करीत आंत गेले तों यांजवळ[3] कोणी माणूस नव्हते. एक दोन पुर्व्यें होते ते तेव्हांच पळाले. नारोजी नाईक व इच्छारामपंत व चाफाजी खिजमत-गार व खासे इतकियांस दिवाणखानियांतच मारिलें. द्वाही फिरविली. शहाजण वाजले. दोन प्रहर रात्रपर्यंत आंतील भेद न कळे. दहनास

१. हरिपंत फडके.

२. नाना व मोरोबा फडणीस.

३. नारायणरावांजवळ.

नेल्यावर ठीक कळलें. पत्नीनें ( सती ) जाण्याचा आक्रोश केला, मस्तक फोडून घेतलें, तेव्हां खोलींत घालून कडी घातली. ब्राह्मण आसामी सात आठ, दोन गाई, दोन कुणबिणी, याखेरीज चौकीदार यांचा सुमार कळला नाहीं. लूट फार झाली. देवघर झाडून गेलें. स्वयंपाकांतील भांडीं देखील गेलीं....तमाम लोक भेटून नजराणें करतात. वाड्यांत तमाम चौक्या गाड्यांच्या आहेत व वाड्यावरूनही आहेत. जबरदस्ती प्रस्तुत गारद्यांची आहे....जमादारास बक्षीस कंठ्या व शिरपेंच व वस्त्रें व. लाख रुपये बक्षीस साऱ्या गाड्यांस मिळोन दिलें....भकार नामक प्रतिनिधी पहिलेच त्या पक्षांत होते ते सिद्धीस गेले. चौक्यांची गडबड त्यांचीच आहे. हे विज्ञापना.

हीं पत्रें शिवाजीपंतांनीं वामनराव पटवर्धनांस लिहिलेलीं आहेत. पहिल्यांत मोरोबाचा विश्वास येत नाहीं, नानांचा येतो, असें वामनरावाप्रमाणेंच शिवाजीपंतांचें मत नमूद आहे. सकार नामक म्हणजे सखाराम बापू मळमळीत बोलत होते यावरून ते कोणच्याच पक्षास सामील होण्यास तयार नव्हते.

दुसऱ्या पत्रांत श्रीमंत दादासाहेबांनीं मोरोबांस रात्रीं स्वस्थ असा प्रातःकाळीं सांगू तसें करावें अशी आज्ञा केल्याचा उल्लेख आहे. प्रातःकाळीं बोलणें होऊन नानांची भेट घेतली. लोकांस पत्रें पाठविलीं कीं गोष्ट होणें ती झाली. तुम्हीं जागा कायम असावें. मोरोबांस विचारितां घोडें लगामी आहे. चिंता करूं नका. म्हणजे दादासाहेब विचारानें काम करीत आहेत असा आशय आहे. चिंतो विठ्ठल, बाजीराव बर्वे सखाराम हरि वगैरे वळण सारे जमा झालें. अर्थात् गोष्ट तर वाईट झाली. पुढें काय कर्तव्य त्याचा विचार या मुत्सद्यांनीं केला. नंतर नारायणरावांस मारल्याची हकीकत दिली आहे. तींत गाड्यांची संख्या आठशें दिली आहे. मॉरिस्टन पांचशें देतो. पुढें वाड्यांत व वाड्यावरूनही गाड्यांच्या चौक्या असून त्यांची जबरदस्ती असल्याचें सांगितलें आहे. भवानराव प्रतिनिधि त्याच पक्षांत होते, म्हणजे दादासाहेबांचे पक्षास होते, व चौक्यांची गडबड त्यांचीच असल्याची बातमी वामनरावांस दिली आहे.

## दादासाहेबांचें पत्र व साठे घराण्यांतील आख्यायिका.

या बाबतींत दादासाहेबांनीं मद्रासकर इंग्रजांस लिहिलेलें पत्र त्यांस ता. १७ ऑक्टोबर १७७३ रोजीं दाखल झालें. त्याच्या तरजुम्यांत "सरकारी वाड्याच्या दिवाणखान्यांत कांहीं सैनिक शिरले आणि आमचा पगार द्या असा आरडाओरडा करून दंगा करूं लागले. नारायणराव तरुण त्यामुळें प्रसंग किती बाका आहे याची त्याला कल्पना आली नाहीं. आणि तो त्या सैनिकांच्या पुढें आला. तेव्हां त्या मूढ राजद्रोह्यांनीं त्याला तरवारींच्या घावासरशीं ठार केलें."[1] असें आहे.

याविषयींची एक आख्यायिका नमूद करणें अवश्य दिसतें. येथें पुण्यांतील मांत्रिक व ज्योतिषी गोविंदशास्त्री कृष्णाजी साठे– श्री. बिंदुमाधव साठे यांचे पूर्वज– यांच्या घरीं श्रीमंत दुसरे बाजीराव एक दिवशीं मुद्दाम गेले व मोकळ्या मनानें सांगूं लागले कीं आनंदीबाईसाहेबांचा नारायणरावांस मारण्याशीं कसलाहि संबंध नाहीं. ही तोहमत आहे. दादासाहेबांनींहि त्यांस मारविलें नाहीं. तथापि एक करतां एक होऊन ब्रह्महत्येचें पातक म्हणजे ब्राह्मण मारला गेल्याचें पातक लागलें आहे. त्यास दान काय करावें ? तेव्हां साठ्यांनीं सांगितलें कीं ब्रह्महत्येचें दान कोणी ब्राह्मण घेणार नाहीं. तेव्हां आपण आमराई लावून आंबे येण्याच्या सुमारास तें शेत व आंबे ब्राह्मणांस बक्षिस द्यावेत. त्याप्रमाणें श्रीमंतांनीं केलें. पर्वतीखालीं शेंकडों आंब्यांचीं झाडें लावून त्यानीं तीं मोफत सर्वांस खाण्यास दिलीं.

वरील आख्यायिका खरी मानली तर प्रा. पवार यांनीं सह्याद्रींत जो तरजुमा छापला आहे त्याच्याशीं हिचा उत्कृष्ट जम बसतो. नारायणराव एकेरीवर येऊन गारद्यांवर घसरले त्याचा हा परिणाम झाला असा हा अन्वय आहे.

## बखरी व पांडुरंग कवीचें काव्य.

नाराणराव मारले गेल्यानंतर पुष्कळ वर्षांनीं बखरी लिहिल्या गेल्या त्या विचारांत घेण्यांत अर्थ नाहीं. शिवाय ऐतिहासिक अस्सल कागदपत्रें आतां

---

१. सह्याद्री, फेब्रुवारी १९४५, प्रा. पवारांचा लेख.

विपुल उपलब्ध झाल्यानें गोष्टीरूपानें लिहिलेल्या बखरींचा इतिहास छाननीस फारसा उपयोग नाहीं. फक्त कांहीं मित्रमंडळींनीं पांडुरंग कवीनें पुणें मुक्कामीं आश्विन शु. ५ मंदवासरे शके १७३० विभवनाम संवत्सरे (ता. २४ सप्टेंबर इ. स. १८०८) रोजीं नारायणराव पेशव्यांच्या अंतावर लिहिलेल्या काव्यावर जोर दिल्यामुळें त्याचा थोडासा विचार केला पाहिजे. नारायणरावांनीं इहलोक सोडल्यावर फक्त तीस वर्षांनीं हें पुरें झाल्यानें यांतील माहिती कित्येकांस खरीशी भासते.

तथापि हें काव्य आहे. ऐतिहासिक कसोटीस तें उतरत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. चुलता-चुलतीनें निष्ठुरपणानें पुतण्याचा खून केला, मारेकऱ्यांस इनामें वांटलीं, लोकांना बोलावून रायाचें काम जाहालें म्हणून आरामानें बसून दादानें वर्तमान सांगितलें. आनंदीबाईच्या बुद्धीनें अघोर कर्म केलें वगैरे नाटकी हरदासी थाटाचें हें काव्य आहे. त्यांत दिलेलीं बरींच नांवें कवीनें दिलीं आहेत तीं तो समकालीन असल्यामुळें बरोबर आहेत. पण बाकी वर्णन नाटकी थाटाचें चमत्कृतिजन्य असेंच आहे. त्यांतील बहुतेक विधानें पडताळून पाहिलीं पाहिजेत. आज आपणापुढें बराच अस्सल पुरावा आहे. तो उपेक्षून कसें चालेल ? काव्यांत नारायणराव दादासाहेबांस म्हणतातः— न करावें अनुचित । तुम्ही आम्ही एकचित्त ।। करुनियां आपुलें हित । दोघे असूं एकत्र ।। ४३ ।। ऐसे सांगोनि अभिप्राय । गेले गंगापुरा राव ।। परी दादांचा भाव । राज्य मीच करीन ।। ४४ ।। हें म्हणणें इतिहासज्ञांस कितीसें पटेल ?

पुढें कवि म्हणतो कीं दादांनीं अनिवार तपश्चर्या केली. त्यास सांब अवतार संबोधूं लागले. पापाचा लवलेश राहिला नाहीं. तेव्हां देवास संकट पडलें व राज्य करण्याचा दादाचा हेत त्यानें पुरविला. पहाः—

तपश्चर्या अनिवार । केली दादांनीं ती फार ।।
म्हणती सांब अवतार । दादा तो हा क्षोमला ।।५०।।
तप केलें भोगोनी क्लेश । नाहीं पापाचा लवलेश ।।
पुण्य जाहलें विशेष । संकट पडलें देवासी ।।५१।।
होता दादांचा हेत । राज्य करीन हाच बेत ।।
म्हणोनि देवानां हेत । त्याचा तो कीं पुरविला ।।५२।।

६६७०२

हे दांभिक वा भोळसर विचार हल्लींच्या काळांत कोणास पटतील ?
आनंदीबाईसंबंधानें हा कवि काय मुक्ताफळें ओकतो तीं पहा :—

जाहला संध्याकाळ वेळ । होतें अवघें निश्चळ ॥
आनंदीबाई रायाजवळ । जाऊन तेथें बैसली ॥८८॥
कपट हें चित्तांत । ह्मणे लोककुळाचा घात ॥
दांभिक भक्ती जनांत । दावी राक्षसी माउली ॥८९॥
चरित्र हें स्त्रियेचें । न वर्णवे वेदवाचे ॥
कर्म केलें साचें । दादासी शिकऊनी ॥९०॥

हीं कवीचीं विधानें हल्लीं कितपत पटतील ?

नारायणरावाचें भूत दुसऱ्या बाजीरावसाहेबांस भेडसावीत होतें व त्यांनीं त्यामुळें बुधवार, शुक्रवार वगैरे वाड्यांत वास्तव्य केलें म्हणतात वा मानतात तर हा कविश्रेष्ठ बोलतो:—

जाहलें हें ऐका वर्तमान । आलें रायाला विमान ॥
रायासाठीं दिधले प्राण । गेले तेहि बसून ॥९॥

एकूण या नरपुंगवानें नारायणरावांस तुकारामबोवा बनविलें आहे !

त्यांची कीर्ति कां वर्णिली तर

धार्मिक बुद्धिवान् ते फार । जाणे विचार सारासार ॥
त्यांजकरितां वारंवार । कीर्ति रायाची वर्णिली ॥२१॥

रायांनीं कोणचीं मोठीं धार्मिक कृत्यें केलीं ? राजकारणांत बुद्धि तरी कोठें दाखविली ? सारासारविचार तो काय केला ? तसा केला असता तर राय मारले जाण्याचा तरी प्रसंग कां ओढवता ?

एकूण हें काव्य नाटकवजा आहे. हें ऐतिहासिक कसोटीस उतरत नाहीं.

इंग्रजांचा वकील मि. मॉस्टिन आपल्या रोजनिशींत म्हणतो:—
"...two Subedars (Mahomed Esoof and Sumersing) ...rushed in Bodily at two of the Gates and put the Chokeys to the Sword."[1]

१. Mostyn's Diary p. 201.

तर प्रस्तुत कवि लिहितोः—

चालले गारदी उतावेळ । होती जेवायाची वेळ ॥
दिल्लीदरवाज्याजवळ । येऊन ते ठेपले ॥७२॥

खुद्द रघुनाथराव दादासाहेबांच्या भाषणाच्या मजकुरांत "दोहींकडे हात लावून निवारण करितों, इतक्यांत घात करणारांनीं आपले जीवाचे **बचावास्तव हात टाकिला. तो प्रथमच पुरा बसला**" आहे तर आमचा कवि म्हणतोः—

मग न धरी कोणी धीर । पडली रायावरती मार ॥
हाणले वारंवार वार । त्या हो सुमेरसिंगानें ॥१५॥

दादासाहेबांस नारायणरावांस वांचवितांना वार लागला या गोष्टीचा उल्लेख तर हा कवि करीतच नाहीं. मि. मॉस्टिन म्हणतो...

"...five or six Sepoys followed Him (Narayan Rav) close, and told Ragobah if He did not let him go, they would cut them both Down, when Ragobah pushed Him from Him, and He was instantly killed with a servant who fell on Him to save Him."[१]

तर पांडुरंग कवि दादासाहेबांनीं बचाव केल्याचें अजीबात गाळतो. रा. ब. सरदेसाई मि. मॉस्टिनच्या रोजनिशीच्या प्रस्तावनेंत[२] नारायणराव नालायक ( incompetent ) होते सांगतात तर आमचा पांडुरंग कवि ते "राज्य करावया योग्य" सरटिफिकीट- शिफारसपत्र- त्यांस देतो.

या सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं हा कविश्रेष्ठ निखालस दादासाहेबांच्या विरुद्ध पक्षाचा लोकांच्या मनोरंजनार्थ वा आपल्या आश्रयदात्यास खुप करण्यास कवनें करीत होता. रघुनाथराव-दादासाहेबांसारख्या पेशवेकुलांतील शूर पुरुपांस तो 'दादा' 'दादा' संबोधितो. अरे जा रे म्हणतो. अनेकवचन योजण्यासहि तो तयार नाहीं. असल्या गृहस्थाचें काव्य ऐतिहासिकदृष्ट्या कुचकामाचें आहे.

---

१. Mostyn's Diary p. 201.

२. Preface, p. iv.

# नारायणरावांचा खून नानांनीं करविला काय ?

## त्यांनीं आत्महत्या केली काय ?

नारायणराव मारले गेले त्यांत नाना फडणीस, सखाराम बापू, राघोबा दादा, आनंदीबाई, नीलकंठराव रामचंद्र पागे अथवा सखाराम हरि गुप्ते यांचें कांहीं अंग होतें काय ?

प्रथमतः आपण नानांनीं नारायणरावाचा खून करविला काय या प्रश्नाचा विचार करूं. इतिहासभास्कर श्रीयुत डॉ. पां. गो. रानडे यांनीं नानांची पगडी नारायणरावांनीं उडविली त्याचा वचपा काढण्यासाठीं त्यांनीं नारायणरावांस मारण्याचें व सर्व सत्ता आपल्या हातीं यावी यास्तव त्यांचेबरोबरच रघुनाथरावांसहि नाहींसे करण्याच्या उद्देशानें कारस्थान रचलें असें प्रतिपादिलें आहे. निमचाचा व इतर प्रयोगाचे हात दाखवून आत्महत्या सिद्ध करायाचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. आम्हांस मल्लयुद्धाची व या प्रयोगाच्या हाताची माहिती नाहीं हें प्रांजळपणें कबूल केलें पाहिजे. हें सिद्ध झालें तर दादासाहेबांस अल्पस्वल्प दोष देण्याचें कारण रहात नाहीं. तथापि श्रीमंत रघुनाथरावांनीं मृत्यूनंतर मद्रासकर इंग्रजांस गारद्यांच्या खटखटींत नारायणरावांनीं बालिशपणाचें वर्तन केल्यामुळें त्यांनीं त्यांस मारलें असें लिहिलें आहे त्याची वाट काय ? ह्या पत्राचा इंग्रजी तर्जुमा डॉ. ए. जी. पवार यांनीं सह्याद्रीच्या स. १९४५ च्या फेब्रुआरीच्या अंकांत प्रसिद्ध केला आहे.[1] त्याचें कारणापुरतें भाषांतर वर दिलेंच आहे.[2] तथापि या मुद्यासाठीं तो समग्र दिल्यावांचून संगति लक्षांत येणार नाहीं. यास्तव खालीं देतों:—

" Received 17th October 1773.

The 30th of August last, a body of Sepoys came into the audience chamber of the circar's house, demanding

---

१. हें पत्र मद्रास सरकारच्या दफ्तरखान्यात मिलिटरी कॉरेस्पॉण्डन्सच्या २२ व्या खंडांत पृ. १५९-१६० वर लेखांक १२१ खाली नमूद आहे. मूळचें पत्र तेथें नसून त्याचा इंग्रजी तर्जुमा आहे. नारायणरावांचा खून ३० ऑगस्ट इ. स. १७७३ रोजीं झाला.

२. पृ. ४९.

their pay and making a disturbance when all at once Naranyanrao (not considering of the consequences owing to his youth) met them and was killed by the cut of a sword by that foolish traitorous crew. This event gave me great concern, but as there is no remedy nor recourse against the will of the Almighty, I have endeavoured to suffer it with patience."

आत्महत्या म्हटल्यास यांतील विधानांची संगति कशी लावावयाची ? नारायणराव आत्महत्या करते तर दादासाहेबांस आपल्यावरचा संशय घालविण्यास हें आत्महत्येचें कारण वरील पत्रांत नमूद करण्यास फारच नामी होतें. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. यावरून गारद्यांनीं त्यांस मारलें असें उघड होतें. दादासाहेब " that foolish traitorous crew " म्हणतात यावरून नारायणरावांस मारण्यांत त्यांच्या मतें मूर्खपणा झाला. राजद्रोह घडला. त्यांचें प्रतिपादन मारण्याची आवश्यकता नव्हती असें आहे. व तें खरें आहे. नारायणरावांच्या मृत्यूबद्दल आम्हीं संशोधक व. ११ अं. ४ पृ. ३६–३९ वर आपले विचार प्रगट केले आहेत.

या कामांत वर आलेंच आहे कीं कोणीच मुत्सद्दी नव्हते. ही गोष्ट दादासाहेब व सुमेरसिंग यांमधील गुप्त होती असें मि. मॉस्टिन म्हणतो. अर्थात् **मारण्याच्या कामांत** कोणीहि मुत्सद्दी नव्हते. असते तर त्यांस मुत्सद्दी तरी म्हणतां येईल काय ? प्रो. पोतदारांनीं टिळक स्मारक मंदिरांत कांहीं अखबार वाचून दाखविले. त्यांत 'सखाराम बापूंनीं' नारायणरावांचा खून करविला अशीहि एक बातमी दिली आहे. ती कां खरी मानावयाची ? सखाराम बापू पेशवाईतील एक सबंध शहाणे होते. ते असला मूर्खपणा करणें शक्य आहे ? तुळ्या पवारानें नारायणरावांस धरण्याच्या कटांत सखाराम हरींचें नांव घेतलें असलें तरी त्यांचा या मारण्याच्या कामाशीं कांहीं संबंध नव्हता. रा. ब. सरदेसाई म्हणतात[१]:— " नारायणरावाचे खुनांत सखाराम हरीचें प्रत्यक्ष अंग नव्हतें, तरी पुढील युद्धांत त्यानें दादाचा पक्ष कसून उचलून धरिला. "

---

१. म. रि. म. वि. ४, पृ. २९१.

नारायणराव मारले गेले तेव्हां नाना पुण्यांत असून नानावाड्यांत आपल्या दुसऱ्या मजल्यावर एकूणीसखणी[1] नांवाची जागा होती तेथें बसले होते. नारायणरावांचा अंत झाल्याचें कळतांच ते घाबरून बाहेर पडतात तों त्यांचें धोतर पायांत अडकून उंबऱ्यांत रस्त्यावर ते पडले. त्यांची पगडी पडली व त्यांस डोक्यावर थोडी दुखापतहि झाली. त्यांनीं नारायणरावांस मारविलें असतें तर बाहेर पडण्याची त्यांची छातीच झाली नसती. ते एक नंबरचे भित्रे होते. नारायणराव व रघुनाथराव खलास होते तरी पेशव्यांचें राज्य त्यांस मिळत नव्हतें. फार काय ? सर्व कारभारहि निदान या वेळीं हातीं आला नसता.

एक आख्यायिका अशी आहे कीं नारायणरावांस धरण्याचा हुकूम रघुनाथरावांकडून नाना व सखारामबापू यांनीं घेवविला व आपण निराळे राहिले. पुण्यांत दुसरा प्रवाद असा आहे कीं नारायणरावांस १००–१२० लोक नजरकैदेत ठेवीत आहेत, तर तूतं त्यांस तसें करूं द्या. मग नारायणरावांचे डोळे उघडतील. आपण त्यांची मोकळीक करूं व ते सर्वस्वीं आपल्या ताब्यांत येऊन आपल्या तंत्रानें चालतील असें नानांनीं ठरविलें. मृत्यु झाल्यानंतर सखाराम बापू तर दोन दिवस भ्रमिष्ट झाले होते. तेव्हां त्यांचें अंग मारण्याच्या कामांत असणें अशक्य आहे. सखाराम हरि वगैरे कारभारी शनिवार वाड्यांत जमले तेव्हां घडलेला हा विचित्र प्रकार पाहून त्यांची मति गुंग झाली. एकूण पुण्याच्या कारभारी मंडळाचा अथवा कोणाहि सरदाराचा नारायणरावांस मारविण्याचा घाट नव्हता. उलट ते मारले गेल्यामुळें दादासाहेब, नाना फडणीस, सखाराम बापू, सखाराम हरि यांची बाजू लंगडी पडली व त्यांचीं कारस्थानें बिनसलीं. बिचाऱ्या आनंदीबाईचा तर या कृत्याशीं बिलकुल संबंध नव्हता. गंगाबाईस दिवस गेल्यामुळें त्या सती जात असतांहि त्यांस जबरदस्तीनें त्यांनीं खोलींत कोंडून घातलें. आनंदीबाईस नारायणरावांचा निर्वंश करून राज्य दादासाहेबांस द्यावयाचें होतें तर ही गंगाबाईस सती जाऊन

१. श्री. ल. ना. जोशी यांचे आजोबा त्यांस सांगत असत ती हकीकत.

देण्याची संधि उत्कृष्ट नव्हती काय? कोंपरगांवची[१] त्यांची दिनचर्या पुण्यास लिहून जात होती. तींत एकहि अवाक्षर मारण्यांत त्यांचें अंग असल्याचें त्यांच्या तोंडून निघालें नाहीं. उलट नारायणराव बहुत[२] मर्यादशील होता असें त्या वदतात. "नारायणराव यास दगा जाला हेहि आम्हांस ठाऊक नाहीं. याविसीं **आमचे आंगीं लावणारानें लावावें.** आमचा विश्वास काय गेला असे किमर्थ बोलत नाहीं. उगीच हाल करावे हे काय असे बाई बोलत होती.[३] **माझी ममता विशेष** म्हणोन नारायणरायाची गर्दीचा मार मला सांगत नव्हते. **यांणीं चौकसी किमर्थ केली नाहीं?** यादीचीं अक्षरें "ध" चा "मा" कोणी केला याची चौकशी किमर्थ न केली? माझा दस्तऐवज किंवा निरोप कांहीं तरी निवडावयाचें होतें. कांहींच न करितां उगेच पेंचांत ठेविलें. दैवास उपाय नाहीं.[४]" असें त्या उद्गारितात.

## रघुनाथराव दादासाहेब नादान होते काय?

दादासाहेबांनीं उत्तरेंत स्वाऱ्या करून आपलें नांव अजरामर केलें आहे. अबदालीची दौड भारी. पण त्यासहि दे माय धरणी ठाय करून सोडणारे सेनापति दादासाहेब होते. यामुळेंच त्यांस 'राघो भरारी' हें नामाभिधान प्राप्त झालें होतें. पण आपल्याकडील इतिहासकार अथवा इतिहासज्ञ म्हणविणारांस याचा विसर पडून त्यांनीं स्वारींत कर्ज केलें म्हणून त्यांस नादान ठरविण्याची बुद्धि झाली. त्यांचा सर्व हिशोब कमाईवर, लुटीवर! या हिशोबानें कर्नाटकच्या, दक्षिणेच्या स्वाऱ्या केव्हांहि फायदेशीर होत्या. तथापि त्यांमुळें उत्तरेकडून येणाऱ्या परकीय स्वाऱ्यांवर पायबंद थोडाच बसणार होता? दिल्लीच्या बादशहाच्या वृक्षाच्या झाडावर कुऱ्हाड घातल्यावर फांद्या आपोआप खालीं येतील, या कल्पनेकरितां इंग्रज, मराठे व इतर लोक पहिल्या बाजीरावांचें कौतुक करितात व करणें

---

१. Reports about Anandibai, September 1786—October 1788. आनंदीबाईची दिनचर्या, पे. द. भा. ४.

२. आ. दि. पृ ४७.

३. आ. दि. पृ. ४५–४६.

४. पे. द. भा. ४ पृ. ९०.

युक्त होय. त्या वेळीं मराठ्यांची थोडी कल्पना आली. रघुनाथरावांच्या वेळीं तर मराठ्यांचें राज्य दिल्ली– लाहोरपर्यंत स्थिर होऊं लागलें होतें. त्यांचा त्या प्रांतांवर दाब बसला होता.[1] अबदालीच्या स्वाऱ्या चालू होत्या. त्यास सरहिंदपर्यंतचा मुलुख आपल्या राज्यास जोडावयाचा होता. लाहोरहि त्यांनीं ताब्यांत घेऊन आपला अम्मलदार आदिना बेग सूर मुलतान व लाहोरचा सुभेदार नेमिला होता.[2] दिल्लीच्या बादशहास कुमक करून अबदालीस पायबंद बसविल्याखेरीज मराठ्यांचा दरारा बसणें शक्य नव्हतें. उत्तरेंतील अफगाण वगैरे एकजात लोक कडवे होते. मराठ्यांची सेना हलतांच ते " फिसाद करीत होते " व त्यांचे डोळे फिरत होते. अशा वेळीं कर्जाचा विचार करावयाचा का राज्य राखण्याचा घाट घालावयाचा ? इंग्रजांचे वेळींहि अफगाण लोकांशीं लढाई ( Afgan War ) म्हटली कीं अगोदर लक्ष पैशांचें बजेट मंजूर करावें लागे. ही त्यांचें राज्य स्थिर झाल्याची वेळ ! राघोबांचे वेळीं तर मराठ्यांचा शह बसण्यास कोठें सुरवात झाली होती. अशा स्थितींत कर्जाखेरीज कसें भागेल ? कर्ज तरी पेशवाईच्या मानानें असें काय मोठें होतें ?

वर खं. १२ यात दिलेल्या उताऱ्यांत आपटण आलियावर आपटगनें म्हटलें कीं, मूल ( सवाई माधवराव ) तरी लहान **दौलत चालवावयास योग्य श्रीमंत दादासाहेब ते आहेत.... थोर कृतकर्मे... हजर आहेत ते दौलत करतील.** अर्थात् इंग्रजांचें मतें दादासाहेबानीं थोर थोर

---

१. बापूजी महादेव हिंगणे नाना व तात्या यांस ता. २ जानेवारी १७५७ रोजीं असें लिहितात:–" वकलात तों राहिली. येंशा संकटांत किमर्थ राहिले म्हणाल तर चिरंजीव दादानें मोठ्या शहाणपणें हे माहाल मेलविले. " हिंगणे-दप्तर भा. १ पृ. १३४ ले. १९३.

२. ...Raghunath Rao then at Delhi...met and totally defeated the Abdalee Governor of Sirhind, speedily overran the country, and entered Lahore as a conqueror in the month of May 1758. He appointed Adina Beg Soor–Soobehdar of Mooltan and Lahore—A History of the Marathas by James Grant-Duff. Vol. II. p. 132.

लढाया मारल्या असून तेच दौलतीस योग्य होते. सवाई माधवराव अर्भक; मूल. दादासाहेबांस नालायक ठरविण्यांत वा म्हणण्यांत बारभाईंचा डाव होता. त्यांस फिके पाडून आपण कारभार करावयाचा होता. निरुपायच झाला तर त्यांस एखादा छोटा जहागीरदार बनवावयाचें होतें. पण जहागीरहि मनासारखी व सोईची द्यावयाची नव्हती.

मॉस्टिन आपल्या पत्रव्यवहारांत म्हणतो कीं कारभाऱ्यांस ( बारभाई यांस ) पेशवाई लाटावयाची होती व गंगाबाई व त्यांचा पुत्र यांच्या नांवांखालीं ती चालवावयाची होती. हीं पत्रें त्यानें मुंबईकर व मद्रासकर यांस लिहिलेलीं आहेत मुंबईकरांस धाडलेल्या पत्रांत तो म्हणतो[१]:—

"However from what I could perceive and have since learnt it seems as if the Ministers meant to Grasp at the Peshwaship themselves and carry it on in the name of Gungabay and Her Issue ;" मद्रासकरांस पाठविलेल्या पत्रांत तो उद्गारतो:– "[२]but from Present appearances it seems to me as if the Ministers meant to Grasp at the Peshwaship themselves, or carry it on under the name of Gungabay and her Issue." हे उद्गार पुण्याच्या दरबारीं टेहळणीस ठेविलेल्या इंग्रजांच्या रेसिडेंटच्या वकिलातीच्या मुख्याचे. मॉस्टिनच्या रोजनिशीच्या पृ. ३१५ वरील पादटीपेंत असें आहे:— Raghoba's imprisonment or his death was for the ministers the shortest road to success

पृ. ३११ वर "...but [the Ministers] meant to seize the Government themselves under Cloak of Gungabay and Her Issue" असे रेसिडेंट मि. मॉस्टिन याचे ३० जानेवारी १७७४ रोजचे उद्गार आहेत.

दादासाहेबांच्या कर्तबगारीचा मासला मि. मॉस्टिनच्या २९-३-१७७४ च्या पत्रांत असा आहे:—

---

१. Mostyn's Diary. p.313.

२ Mostyn's Diary p. 314.

"Trimbuck Row Mamma with the Ministerial Army pursued him the next morning, when *Ragobah unexpectedly faced about* and attacked Mammas Army, which he totally defeated; and Mamma, after receiving several wounds, was taken prisoner...."[१]

आणखी एक उदाहरण खालीं पहा:—

"...and in consequence of all negociations being at an end between them is coming with 6,000 horse to assistance of *Hurry Pant, who appears to be in a very disagreeable situation, his people, many of them, leaving his Camp daily for that of Ragobahs*; and the Ministers who for a long while have promised to reinforce him, *have as yet only been able to levy about 4000 men.*"[२]

पुढें असें आहे:— "From the whole of the foregoing, unless affairs take a very sudden turn in favour of the Ministers, your Honor &ca may conclude it's more than probable Ragobah will succeed against them."[३]

परंतु कारभाऱ्यांनीं अनेक कंड्या पिकवून दादासाहेबांची नालस्ती केली. मि. मॉस्टिन आपल्या ता. १ ऑगस्ट १७७४ च्या पत्रांत म्हणतो:—

"Indeed Sacaram and those at Pronder do not scruple at this very time to give out that he [Ragobah] is coming in a manner a prisoner to them; however no one credits what they say on this head..."[४]

दादासाहेबांस त्यांच्या अम्मलदारांचीं मुलेंमाणसें कारभाऱ्यांच्या हातांत[५]

---

१. Mostyn's Diary pp. 341-342. २. Mostyn's Diary p. 368.

३. Mostyn's Diary p. 369. ४. Mostyn's Diary pp. 360–361.

५. पे. द. भा. ५ पृ. ६३-६४ पहा, सदाशिव रामचंद्र याची स्त्री व सासू व पुत्र, हरी रघुनाथ भिडे यांची स्त्री. सासू, कन्या व मेहुणा. रामचंद्र विठ्ठल (गुप्ते) निा चिटणीस याचीं माणसें, सखाराम हरी ( गुप्ते ) याची आई, मल्हार यशवंतराव ( पोतनीस ) पे. द. भा. ३६, नं. ९१. पृ.७९-८०. ता. २ जुलै १७७४ चीं पत्रें. शिंदे-होळकरांचीं. संशोधक व. १० अं. २. पृ. ७-८.

असल्यामुळें ( त्यांनीं कैद केल्यामुळें ) त्यांच्या निःसीम भक्तीविषयीं भीति वाटूं लागली व पैशांची अडचण पडली. पहा:—

"...and I cannot account for it (retreat) in any other manner than his apprehensions of the fidelity of some of his Officers, whose families are in the hands of the Ministers, and his want of money, both which are probable from his Officer's as above mentioned."[१]

इतकेंहि करून शिंदे होळकरांच्या वकीलांनीं ता. २८-१०-१७७४ च्या अगोदर दादासाहेबांच्या तर्फे माधवराव नारायणांच्या नांवानें शिक्का करावा, कारभार दादासाहेबांनीं करावा व त्यांच्या हाताखालीं कारभाऱ्यांनीं आपापलीं कामें करावींत; हें कबूल न झाल्यास थोरल्या माधवराव साहेबांच्या वेळीं ठरल्याप्रमाणें वीस लाखांची जहागीर व सुमार तितकेच किल्ले दादासाहेबांस द्यावेत व बाकीच्याची व्यवस्था कारभाऱ्यांनीं करावी अशीं बोलणीं केली असें दिसतें:—

"Scindy and Holkers Vackeels, mentioned in my last, arrived some time ago at Pronder; and it seems made the following proposals in behalf of Ragobah: That the Sicca should continue in the boy Madarow Narons name, and Ragobah to conduct the Government, the Ministers to act in their different departments under him; but if they did not approve of this, then to divide the country conformable to the partition agreed to in Mada Rows time, which was that twenty lacks of Jaghir and about the same number of forts should be ceded to Ragobah, the remainder to be under their management."[२]

दादासाहेबांचें पैशावांचून निभेना. त्यांच्या सरदारांचीं मुलेंमाणसें कारभाऱ्यांच्या हातांत. खेरीज़ इंग्रज दादासाहेबांच्या मनाप्रमाणें हालचालीच करीनात. म्हणून डाव फसला. कै. राजवाडेकृत खं. १२ लेखांक १३०

१. Mostyn's Diary p. 344.

२. Mostyn's Diary pp. 367–68.

शके १६९७ माघ शु।। ३ चा म्हणजे ता. २३ जानेवारी १७७६ इ. चा आहे. त्यांत असें आहेः—“ग्रहणाचे आधले दिवशीं धवशा व हरी फडके भेटले. शत्रूस ( बारभाईस ) बहुत आव आला. धवशा नव्हता तेव्हां मध्यम होते. लोक दृष्टीनें आमची बाजू हलकी दिसते.... आतां मुंबईहून कुमक यावयास दिवसगत पाहिजे, लढाई तरी दोनच्यार पांचा दिवसां अलीकडे पलीकडे होईल. धवशा आला नवता ते आम्हींच लढतों, ऐसी बराबरी होती. सांप्रत ते भारी दिसतात. इंग्रेज थोडे. कसें होईल तें पहावें. उपाय कांहीं सुचत नाहीं. जनरल व सारे अंगरेज शहाणे म्हणोन वाटत होतें....अद्यापि आठ च्यार दिवस लागले तरी तुमची कुमक आल्यास व कांहीं लक्ष दोन तरी खर्चास आल्यास शत्रूचीं पारपत्यें होतील. नाहीं तरी मगची गोष्ट पत्रीं कशास ल्याहावी ?... आमचें व अंगरेजी सामान बहुत थोडें. खर्चास नाहीं. याजवरून समजणें[1]”

## कासेगांवची लढाई, त्रिंबकराव मामांचा मृत्यु व पुढील हालचाली.

सखाराम हरींस जखम कांसेगांवच्या लढाईत झाली. ही [2]एप्रिल इ.स.१७७४ त झाली. त्रिंबकराव मामा जखमी झाले. ते पकडले गेले व जखमा विकोपास जाऊनच वारले. हरिपंत फडके दादासाहेबांचा पाठलाग करीत उत्तरेंत गेले. ब-हाणपुराहून दादासाहेब एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत इंदुरास गेले.[3] बरोबर सखाराम हरि, मानाजी फांकडे आदिकरून सरदार गेले. बाकी हरिपंतास मिळाले. महादजी शिंदे यांनीं एप्रिलअखेर दादासाहेबांची इंदुरासच गांठ घेतली. श्रीमंत धारेस गेले. घोरपडे, माने,

---

१. पृ. ८०.

२. म. रि. उ. रि. उ. वि. पृ. ३. म. रि. तींत कांसेगांवची लढाई मार्च–एप्रिल १७७४ त झाल्याचें लिहिलें आहे. पण भा इ. सं. मं. ऐ. सं. सा. खं. १ पृ. १९३ वर ले. १७५ चा ५–४–१७७४ चा आहे. त्यावरून ही लढाई एप्रिल-पूर्वी झाली नाहीं असें दिसतें. कांसेगांव पंढरपुरापासून आठ मैल आहे.

३. म. रि. उ. वि. १ पृ. ३.

पाटणकर अलग झाले. मानाजी शिंदे, सखाराम हरि गुप्ते, आबाजी महादेव व सदाशिव रामचंद्र श्रीमंतांसह गेले. आनंदीबाईसाहेब धारेस राहिल्या. शिंदे, होळकर बारभाईंच्या पक्षाचे. तथापि अगदींच दादासाहेबांच्या उलट नव्हते. श्रीमंत गुजराथेंत गेले व कारभारी (बारभाईंपैकीं) यांनीं पुरंधर गांठलें. मोरोबा दादा फडणीस व बजाबा पुरंधरे दादासाहेबांस उघड अनुकूल होते. नारो शंकराचें सैन्य फत्तेसिंगाचा पाठपुरावा करीत होतें. बाबुराव हरींचे पुत्र दौलत यांनीं इ.स. १७७४ च्या पावसाळ्याच्या सुरवातीस त्यास विरोध केला. सन १७७५ च्या प्रारंभीं दादासाहेब बडोद्यास आले.[1]

## सखाराम हरींच्या व कारखानीसांच्या माणसांस अटक.

सखाराम हरि यांचीं मुलेंमाणसें इ. स. १७७४ त उरवड्यास होतीं. त्यांस सिंहगडास पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवण्याविषयींचा खालील हुकूम Selections from the Satara Rajas and the Peshwa Diaries IV Sawai Madhavrao Peshwa. Vol I. पृ. ४७ वर असा दाखला आहे:—

सखाराम हरि यांचीं मुलेंमाणसें मौजे उरवडें तर्फ मुटे खोरें येथें आहेत, त्याची जप्ती करून जाबता हुजूर पाठविणें; व मुलें माणसें किल्ले सिंहगड येथें पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन शिधा मध्यम प्रतीचा देत जाणें; व मशारनिल्हेचे घरीं घोडीं व उंटे वगैरे असतील ते जलद हुजूर पाठविणें.

त्यांच्याच घराण्यांतील पुरंधरचे कारखानीस विठ्ठल दादाजीचे पुत्र रामचंद्र विठ्ठल गुप्ते निजबत चिटणीस यांच्या मुलांमाणसांसंबंधीं गाड्या-बरोबर नळयास यात्रा या न्यायानें तसाच आदेश निघालाः– "रामचंद्र विठ्ठल निजबत चिटणीस याचें घर जे मजकुरी आहे त्यास त्याची जप्ती करून व वस्तभाव वगैरे याचा जाबता हुजूर पाठविणें व मुलेंमाणसें किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यम प्रतीचा देणें म्हणोन आनंदराव जिवाजी याचें नावें. छ २० जिल्काद

---

१. ता. ३ जानेवारी १७७५.

सनद १ परवाना रुबरु." हा हुकूम आर्बा सबैन मय्या व अलफ छ २० जिल्कादचा म्हणजे २ फेब्रुआरी १७७४ चा आहे.

गंगाबाईस ता. १७ जानेवारी रोजीं पुण्याहून पुरंधरावर नेल्यावर 'दादांचे पक्षास जे लोक होते त्यांच्या घरीं चौक्या बसविल्या, आणि सर्व बाजूंनीं त्यांचा उच्छेद आरंभिला. त्यांचीं बायकामुलें कैदेंत टाकून मालमत्ता जप्त केली.'[1]

## हैदरवरील स्वारी व तह.

इ. स. १७७४ सालीं[2] दादासो हैदरवर स्वारीस गेले. बरोबर सखाराम हरि होते. हैदरचा पुत्र टिपू एका टोळीचा मुख्य होता. त्यानें चंगीजखान नांवाच्या आपल्या सरदारास तहाचें बोलणें करण्याकरितां श्रीमंतांकडे पाठविलें. त्या वेळीं ते सखाराम हरींशीं बोलत बसले होते. खानानें त्यांच्या सरदारांची स्तुति करून "सखाराम हरी शूरोंका शोकी"[3] असे उद्गार काढिले. नंतर तहाचें बोलणें झालें. तो झाल्यावर श्रीमंत पुण्यास आले.

## दादासाहेबांच्या व सखाराम हरींच्या हालचाली दौलतलोभ न धरतां दोघां रायांचेच नांवें चालविली. मर्जी उदास.

सरदार सखाराम हरि व बाबूराव हरि गुप्ते यांचीं नक्कल पत्रें आमचे मित्र श्री. कृ. वा. पुरंधरे यांनीं श्री. बापूराव पेशवे जेजुरीकर यांचे दप्तरांतून नकलून अम्हांस दिलीं. तीं संशोधक व. १० अं. २ पृ. १ ते १६ वर आह्मीं टिप्पणींसह प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं ले. १ हें पत्र शके १६९६ जेष्ठ शु। १३ चें म्हणजे ता. २२ जून इ. स. १७७४ चें असून इंदूर नजीकहून पाठविलेलें आहे. त्यांत

---

१. म. रि. म. वि. ४ पृ. ३६४.

२. ही स्वारी एप्रिल १७७४ इ. त झाली. A History of the Marathas, Duff, Vol. II. p. 268.

३. स. ह. गुप्ते आंबेगांवकर पृ. ९.

बऱ्हाणपुराहून पुढें जाऊन कसें कसें जालें कोठें आहांत[1] हें कांहींच कळत नाहीं.... श्रीमंत ( दादासो ) येथें येऊन दीड पावणेदोन महिने होत आले. शिंदे होळकरांचे विचारें तह ठरला. देशीं चलावें. खानदेशांत मुल्हेरचे सुमारें गेलों म्हणजे तिकडून सखाराम बापूस आणवितों. त्यांचे आपले विचारें तोड निघेल ती काढूं. आपले मर्जीनुरूप सर्व होईल. नच जालें तर माघारें आणून श्रीकाशीयात्रेस पोंचतें करूं. ऐशीं वचनें प्रमाणें जालीं. शिबंदी बारावी, फौजेस गाडदी यास वगैरे पोटास चालवावे. श्रीमंत सौ. आनंदीबाई गरोदर आहेत. त्यांस समाधान वाटत नाहीं म्हणून मुकाम जाले आहेत. फौजा बऱ्हाणपुरीं आहेत, त्या माघाऱ्या जाव्या तेव्हां खालीं उतरावें हा करार आहे. श्रीमंतांची[2] बोढ काशीयात्रेस जावें. परंतु सरदारांनीं[3] व आम्हीं मर्जी फिरविली आहे. दर मजल येणार. पुढील रंग नीट करून चालवणें बापूंकडे आहे. श्रीमंत रायांस (नारायणरावांस) पुत्र जाल्यास उत्तम.[4] नाहीं तर दत्तक पुत्र देऊन दौलत चालवावी हें वचन श्रीमंतांचें मातुश्री गंगाबाईस प्रथम रोजीं जाणीयाचे आग्रहांत गुंतलेंच आहे. हालीं पुत्र जाल[ा] फारच उत्तम जालें. दौलत मागें दोन तीन वेळां लोभ न धरितां उभयेतां रायांचेच नांवें[5] चालविली.

पुढेंहि इतका लोभ नाहीं ऐसे यापूर्वींहि श्रीमंतांचें बोलणें होतें हें आपणांसहि माहीत आहे. आलीकडे हा प्रकार घडला. यास बापू वचनास गुंतले असतां ऐसे करणार नाहीं हे खातरजमा फार, श्रीमंतांस कृष्णेपर्यंत माघारे येत तों होती. पुढें निग्रह जाणून वाईटहि फारच मानीत आले आहेत व मर्जी उदास दिवसेंदिवस फारच आहे... आपण गेले तेथील मर्जी आर्थ सर्व समजले आसतील. आह्मीहि इकडे नजरबखा

---

१. हें पत्र सखाराम हरींनीं बाबूराव हरींस लिहिलेलें दिसतें.

२. दादासाहेबांची.

३. शिंदे होळकरांनीं.

४. यावरून गंगाबाईचा गर्भपात वगैरे करविण्याच्या बातम्या निव्वळ उठविलेल्या होत्या हें सिद्ध होतें.

५. थोरले माधवराव व नारायणराव यांचे नांवें.

व वजीर यास पत्रें पाठवून खासगत उत्तर आणलीं आहेत. त्यांणी यावें सर्व प्रकारें घर तुमचें आहे म्हणून लिहिलें आहे... परंतु सर्व अर्थ तेथें नीट असल्या उत्तम. नाहीं तरी साफ निरोप घेऊन यावे. आम्ही श्रीमंताजवळ निरोप मागितला आहे. उलगडा जाला म्हणजे देतोसे मान्ये केलें आहे. आपणहि यावें इ. (हिं)दुस्तानांत जाऊं. यात्राहि घडल आणि पोटहि भरल. चिंता नाहीं. आमचा निश्चये श्रीयात्रेस जावे हाच आहे ...” या पत्रावरून श्रीमंत दादासाहेबांच्या व सखाराम हरींच्या हालचालीहि कळतात.

‘नजीबखान व वजीर यांचीं पत्रें पाठवून खाजगी उत्तरें आणवून ठेविलीच आहेत. तेथील अर्थ नीट असल्यास उत्तम. नाहीं तर साफ निरोप घेऊन यावें. आम्हीं श्रीमंत दादासाहेबांजवळ निरोप मागितला असोन उलगडा झाला म्हणजे तो देण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे,’ वगैरे मजकूर महत्त्वाचा आहे. त्या वेळच्या राज्यकर्त्यांस व मुत्सद्यांस आणि योद्ध्यांस कांहीं मनासारखें न झाल्यास यात्रेस जाण्याची बुद्धि होई त्याचा दाखला या पत्रांत आहे.

यांत पुत्र न झाल्यास दत्तकपुत्र घेऊन चालविण्याचें वचन दादासाहेबांनीं गंगाबाईस प्रथम रोजींच दिलें असून दौलत दोनदां उभयतां रायांच्याच नांवें– थो. माधवराव व नारायणराव यांच्याच नांवें– चालविली असें स्पष्ट आहे. बापू वचनास गुंतले असतां यैसे करणार नाहीं हें खातरजमा फार दादासाहेबांस होती. बापूंचा निग्रह जाणून ते फारच वाईट मानीत आले. मर्जी दिवसेंदिवस फारच उदास झाली आहे वगैरे मजकुरावरून बापूंवर श्रीमंतांचा फार भर होता हें उघड दिसतें. त्यांच्या मुत्सद्दीपणावरच त्यांचा राज्य थाटावयाचा विचार होता. पण ते अनुकूल न झाल्यामुळें त्यांस कांहीं सुचेना.

गुप्ते...५

## बाबूराव व सखाराम हरि यांच्या घरीं चौक्या बसविल्यानें काम बिनसतें अशी शिंदे होळकरांची सल्ला.

[1]लेखांक ३ हें पत्र ता. २ जुलई १७७४ रोजीं महादजी शिंदे यांनीं नाना फडणीसांस पाठविलें आहे. त्यांत ते म्हणतात कीं बाबूराव व सखाराम हरि श्रीमंतांसमागमें आहेत... येशास त्यांच्या घरच्या चौक्या उठवाव्या म्हणजे आम्हीं श्रीमंतास विनंति करितों. ते मान्य होतील कांहीं पेंच पडणार नाहीं म्हणोन एक दोन वेळां लिहिलें असतां चौक्या उठल्याचें वर्तमान येत नाहीं. तेव्हां आमची विनंति श्रीमंताजवळ प्रमाणांत कशी पडती. या पत्रांत चौक्या सखाराम हरि व बाबूराव हरि यांच्या घरीं बसवून काम बिनसतें व दादासाहेबांचें मन वळवितां येत नाहीं हें महादजी शिंद्यांनीं नानांस स्पष्ट करून सांगितलें आहे.

[2]लेखांक ४ हें त्याच तारखेचें पत्र तुकोजी होळकरांनीं सखाराम बापूंस लिहिलेलें असून त्याहून स्पष्टतर आहे. त्यांत लिहिलें आहे कीं 'दादासाहेबांपाशीं सखाराम हरी आहेत. याजकरितां याचें घर वतन व वस्तभाव झाडून जप्ती केली म्हणून कळल. ऐसियासी यासी श्रीमंतास[3] **येथें सामाचें बोलणें बोलतों तेथें लोकांचे घरीं वगैरे जप्ती करितां यांत श्रीमंताचे चितांत किंतू पडतात** यास्तव मार निळेचें घर वतन जें जप्त केलें असेल तें जप्ती उठऊन त्याचे घरचें पत्र इकड पाठवावे. ज्या श्रीमंतापासी आमच्या बोलण प्रमाण पडे ते करावे. हे[4] **आपले ममतेचे. प्रस्तुतचे कामांत फार उपयोगी पडले यास्तव याजवरी ममता करावी**. वस्तभाव झाडून देवावी.'

या पत्रावरून सखाराम बापू व अर्थात् नाना फडणीस यांनीं सखाराम हरींचें घर वतन व वस्तभाव झाडून जप्त करण्यांत व त्यांचें मन दुखविण्यांत कसा प्रमाद केला हें तुकोजी होळकरांनीं दाखविलें आहे.

---

१. संशोधक व. १० अं. २ ऐ. ले. च. पृ. ७.

२. संशोधक व. १० अं. २ पृ. ८.

३. रघुनाथराव दादासाहेबांस.

४. यावरून सखाराम हरीचा गोडवा स्वभाव कळून येतो.

जप्ती उठवून त्यांच्या घरचें पत्र इकडे पाठवावें लिहिलें आहे. अर्थात् ती उठवितील ही होळकरांस खात्री नव्हती. सारवासारव करतील म्हणून त्यांस खुद्द त्यांच्या घरचें पत्र हवें होतें. आपले ममतेचे प्रस्तुतचे कामांत सखाराम हरि फार उपयोगी पडल्यामुळें त्यांजवर ममता करून झाडून वस्तभाव देवविण्यास होळकर लिहितात. पण बारभाई कसले खमंग! त्यांस विनाशकाले विपरीतबुद्धिः झालेली. ते शहाणपणाची सल्ला ऐकतात!

[1]क्रमांक २ हें पत्र खरगोणहून शके १६९६ श्रावण शु ३ म्हणजे ता. १० ऑगस्ट इ. स. १७७४ रोजीं लिहिलेलें आहे. त्यांत असें आहे:— "आपण (देशीं) गेलेत ही गोष्ट गमावली. येथें असतां तरी मोठा उपयोग पडला असता. आज राज्यात आपणासारखे कोणी नव्हतो. आपली हाणी. जगाचे वाईट. श्रीमंतांचा[2] नाश. ऐसे नेऊन बसले आहे. आह्मी आपण येथें असतों तरी चिरंजीवांनीं[3] मोठा उपयोग तिकडोन पाडिला असता. पैकाहि पाठवीत (ते)... **घरीं जाऊन स्वस्त बसावें यांत जीव नाहीं व स्वरूपहि नाहीं... आपण फसले! काये म्हणावें.** मीं चुकलों. आपणांस रवाना केलें... जातांच खानदेशांत भलते जागीं अगर गोदा-तीरीं राहून महिनाभर दम खाऊन जाबसाल पके आगर चिरंजीवाकडील वर्तमान आणावयाचें होतें आगर तिकडेच आपण गेले असते तरी ते आपण मिलोन मोठा उपयोग श्रीमंताचा योजिला असता. **आज वेसणच त्यास लागली असती.** फौज पांच हजार जमा करोन मारून मुलुक तातडी करून गकारे व आपण गंकार[4] प्रांते मोठे जमले असते तेहि न जाले... हे दिवस गरीबांचे आगर कोणी खावंद राज्याचा आला ऐसे राहिले नाहीं. हातास गुडा लावी धामधूम करावी आपले आंगेजणीनें राहवे हे दिवस आहेत... हरिश्चंद्र रामचंद्र यासारखी याची गत समज-

---

१. संशोधक व. १० अं. २ पृ. ५–७ हें सखाराम हरींनीं आपले बंधु बाबुराव हरि यांस लिहिलेलें आहे.

२. रघुनाथराव दादासाहेबांचा. ३. दौलत बाबूराव व महिपत बाबूराव यांनीं पेशवे रोजनिशी भा. ८ पृ. ७५ पहा.

४. गंगथडी प्रांत

लीच आहे. तेथे आपले दुःख किती? परंतु हिमत धरावी आणि विश्वास दाखवून प्रेत्न करून जेणेंकरून निकाल पडोन निभावणी होये ते गोष्ट करावी... आपण आहेत तेथेच भेदभाव जाला आगर खाली उतरोन दिल्हे तरी पाहावे. माणसे येणे जाणे सरल दाखवावे आणि भलते समई माणसासारिखे चोंगडी डोईवर असे निघावे. तजविजी बहुत आहेत. सुत्र-तील तैशा हिमत धरून गेलियास होतील. परंतु सर्व हिंमत सा(सो)-डल्यास ठीक नाहीं. हे दिवस नाहींत. पूर्वी आपण सरलता धरली त्यास श्रीमंत रायांसारिखा[1] धणी होता. आतां केवळ मात्रागमनी यासी गाठ आहे. परिणामहि नाहीं. विदेसी जाऊन पोट भरूं आपण त्रिवर्ग++ चौथे[2] एक जालिया आसमानास हात लाऊं.... श्रीमंतांवर वक्त कोण आणि समये कसा... श्रीमंतांचे मसलतीचा फडशा दसरियापरेंत कोणता तरी होईल. तह जाला तरीहि आपले सुटकेचे होईल. मसलत बिघडली तरी श्रीमंताचें कल्याणांत आपले कल्याण आहे. ए समई आपण असते तरी मोठा उपयोग असता... शरीर केवळ दुखणेकरी या पेक्षां अधिक जाले आहे. कंबरच बसली आहे. हिंमत मात्र धरितों. असो. शेवट जहराचा प्याला द्यावा हें मजला प्राप्त आहे. का कीं मजमुले सर्वा तुह्मांस पेच पडेल येसा दैवहीन मी आपले वौशीं जन्मोन सर्वास दुख दाखवावें हें प्राप्त जालें. आज आपण आसते तरी एथे सारे आम्हीच दिसतो. लौकिकहि मोठा होता. जिवानी तिकडे शर्त केली होती. आसो दैव पूर्ण उणे. विलाज नाहीं. हे विनंती."

या पत्रांत सखाराम हरींचा स्वभाव चांगलाच चित्रित झालेला आहे. आपल्यामुळें सर्वो मुलांमाणसांस पेंच पडून आपले वंशीं जन्मून सर्वास दुःख दाखविणें प्राप्त झालें! केवढी ही घराण्याविषयीं आस्था!

सखाराम हरींच्या मतें बाबूराव हरि देशीं गेले हीच मोठी गोष्ट गमा-वली. ते त्यांजबरोबर असते तर मोठा उपयोग झाला असता. राज्यात

---

१. बहुधा पहिले बाजीराव. थोरले माधवरावांसहि अनुलक्षून हे विधान असणें शक्य आहे; कारण ह्यांचा बाबूराव हरीवर लोभ होता.

२. त्रिवर्ग म्हणजे बाबूराव हरि, सखाराम हरि व दौलत बाबूराव. चौथे म्हणजे हे [illegible] व आणखी महिपत बाबूराव.

आज आपणांसारखे कोणी नव्हतो. आपली हानी. जगाचें वाईट. दादासाहेबांचा नाश असें झालें आहे. आपण फसलेत. खानदेशांत अथवा गोदातीरीं महिनाभर दम खाऊन जाबसाल पक्के करावयाचे होते. अथवा तिकडेच आपण गेलां असता तरी ते आपण मिळोन मोठा उपयोग दादासाहेबांचा झाला असता. त्यास आज वेसणच लागली असती. फौज जमा करून गकारे व आपण गंगथडी प्रांतांत जमला असतां तेंहि न झालें. पूर्वीं आपण थोरल्या बाजीरावांच्या वेळीं ( किंवा थोरल्या माधवरावांच्या वेळीं[1] ) सरळपणें वागलात तेव्हां ते तसेच धनी होते आतां केवळ यात्रागमनीसी गाठ आहे. आपण त्रिवर्ग एक झाल्यास आसमानास हात लावूं अशी धमक सखाराम हरींत होती. पण दैव पूर्ण उणें, इलाज नाहीं, अशी त्याची विचारसरणी होती.

इतिहाससंग्रह ऐतिहासिक टिपणें भा. १ पृ. ८३–८४ वर महादजी शिंदे यांनीं सखारामपंत बापूंस ता. २९ सप्टेंबर इ. स. १७७४ रोजीं लिहिलेलें पत्र दिलें आहे. त्यांत असें आहे. "आपणही आम्हांवर भार ठेऊन लिहित गेलां व लिहिता. त्यापक्षीं येथून लेहूं त्याप्रमाणें घडावें. म्हणजे येथें यांसीं बोलूं तें प्रमाण पडून पुढें श्रीमंतास ( दादासाहेबास ) विनति करूं. तीस पच पडणार नाहीं. श्रीमंतांची मर्जी वहकविगार चवघे आहेत. त्यांचीं मुलेंमाणसें सुटल्याचें वर्तमान येत नाहीं. तेव्हां ते मर्जीत अंतर पाडतात. याजकरितां वारंवार लिहितों. परंतु कोण्हा एकाचींही मुलेंमाणसें सुटल्याचे वर्तमान येत नाहीं... तरी समागम मंडळी आहे. त्यांचीं मुलें माणसें मोकळीं जाहल्याचें पत्र यावें..."

यावरून हें दिसून येईल कीं शिंदे होळकरानीं सखाराम हरि आदिकरून मंडळींचीं मुलेंमाणसें सोडून देण्याची नाना व बापू यांजकडे शिकस्त करून पाहिली. तथापि या दीडशहाण्या म्हणवून घेणाऱ्या दोघांस सुबुद्धि सुचली नाहीं व शिंदे होळकराची सल्लामसलत त्यास पटली नाहीं. हा असा बिघाड होत गेला व बारभाईविरुद्ध तेढ वाढत गेली.

---

१. हें बहुधा थोरले बाजीरावास अनुलक्षून असावें. सखाराम हरींचा त्याचें ठायीं पूज्यभाव होता. पण थोरल माधवरावांस बाबूराव हरीहि प्रिय होते.

## गायकवाडांचें प्रकरण.

सखाराम हरि श्रीमंत दादासाहेबांस गोविंदराव गायकवाडाविषयीं स्मरण देत होते. या अन्यायाबद्दल त्यांची खात्री झालीच होती. तेव्हां ता. १५-१२-१७७३[1] रोजीं गोविंदरावांस थाटाची मेजवानी देऊन व त्यांस सेनाखासखेल करून श्रीमंतांनीं कडलूरहून गुजराथेंत रवाना केलें.

एप्रिल १७७४ त फत्तेसिंग गादीवर असल्यामुळें गोविंदरावांस त्यांच्या-बरोबर दोन हात करून अंमल बसविणें भाग पडलें. फत्तेसिंगाची बाजू बारभाईंनीं घेतली होती. नारो शंकरनीं त्यांची साथ केली. सखाराम हरींचे पुतणे दौलत बाबुराव यांनीं त्यांस विरोध केला. बारभाईंनीं नारो आनंद-रावांस आणखी कुमक देऊन रवाना केलें.

वर उल्लेखिलेली रा. ब. गुप्त्यांनीं छापलेली सनद गोविंदराव गाय-कवाडाची ता. २४ नोव्हेंबर[2] १७७४ ची आहे. उपकाराची अंशतः फेड म्हणून श्रीमंतांच्या परवानगीनें वीस हजार रुपये उत्पन्नाच्या मौजे वांझ, वेसू, वणेसा, लिंगड व कानडी या पांच गांवच्या मोकाशाची ती आहे. श्रीमंतांच्या फौजेच्या खर्चासाठीं व नजराण्याबद्दल दोन लक्ष रुपये गोविंदरावांनीं दिले. सखाराम हरींच्या चरित्रांत संवत् १८८२ दिला आहे. पण तो चुकला आहे. वरील सनदेंत सुरू सन खमस सबैन मया अलफ छ. १९ माहे रमजान तारीख आहे. तेव्हां संवत् १८३१ हवा.

ता. १२-१२-१७७४[3] रोजीं राजाराम खंडेराव तात्यास म्हणजे हरिपंतास लिहितात कीं ( दादासाहेबांची ) दाहा हजार फौज आहे. सर-दार मानाजी फाकडा व सखाराम हरि व मानाजी गाईकवाड वगैरे आठ दहा हजार आहेत. इंग्रज दोन हजार आहे. खासा इंग्रज सुरतेस गेला आहे. लग्नाचे निमित्त करून सुरतेस जाऊन बसला आहे. हे त्याचा मार्ग

---

१. म. रि. म. वि. ४ पृ. ३६५.

२. सखाराम हरि गुप्ते यांचें चरित्र पृ. ७-८. पृ. ७ वर रा. ब. गुप्ते यांनीं इ. स. १७७२ दिला आहे. पण तो सनदेंतील तारखेशीं विसंगत आहे.

३. पे. द. भा. ३६ नं. ७४ पृ. ६१-६२.

पाहातात... फौजेंतील बोलवा कीं इंग्रजांचे याचे अंतःकरण शुध नाहीं, म्हणौन लग्नाचे निमित्य करून सुरतेस गेला...

[1]ता. २७–१२–१७७४ च्या पत्रांत महादजी विश्वनाथ पेशव्यांस लिहितोः– "येथें आज्ञा कीं सखाराम हरी यांची मातुश्री व रामचंद्र विठल ( कारखानीस ) कारकून निसबत चिटणीस यांचीं मुलें माणसें देखील भावाच्या बाइका व मल्हार येशवंतराव, विठल येशवंतराव यांचे बंधु यांची बाइको व मुलें मौजे उरवडे ता। मुटे खोरे येथे आहेत त्यास किले मजकुराहून लोक व शहाणा कारकून पाठऊन कैद करून किले मजकुरीं पके बंदोबस्तानें अटकेंत नेऊन ठेवणें आणि पोटास सिधा मध्यम प्रतीचा देत जाणें... म्हणोन आज्ञा त्याजवरून मौजे मजकुरास लोक व कारकून पाठविले आहेत कैद करून आणून किल्यावर आज्ञेप्रमाणें ठेऊन बंदोबस्त करितों... घरीं वस्तभाव जे असेल ते पाटील कुलकर्णी मौजे मजकुर यांचे हवाला करून यादी घेऊन येणे म्हणोन कारकुनास सांगोन बंदोबस्त करविला आहे."

मल्हार व विठल यशवंतराव पोतनीस यांस देखील बायको व मुलें यांसुद्धां कैद करून पक्क्या बंदोबस्तानें ठेवावयाचें होतें.

Selections from the Peshwa Dafter, 5, The League of the Barbhais, p. 63, No. 71 (1774-75). वरील यादीवरून कळतें कीं " राजश्री दादासाहेब यांचे समागमें मंडळी गेली त्यांचीं मुलें माणसें अटकेंत ठेवावयास पाठविली.[2] पृ. ६४ वर १ रामचंद्र विठल नि॥ चिटणीस याचीं माणसें २ सखाराम हरि याची आई.[3] बायका मशारजिल्हेच्या पूर्वीच पळोन मुंबईस गेल्या, आई आहे. ती किल्ले मारी ठेविली " असें आहे. बायकांनीं नानांच्या हातावर तुरी दिल्या ! आई बिचारी सांपडली !! तीस सिंहगडाची हवा खावी लागली. मुंबईस

---

१. पे. द. भा. ३६ नं. ९१ पृ. ७९-८०. ता. २ फेब्रुवारी १७७४ ची Selections from the Satara Rajas and the Peshwa Dairies IV Sawai Madhavrao Peshwa, Vol. I p.47 वरील आज्ञा पाळल्याचें कळविलें आहे. २. सिंहगडावर. ३. बयाबाई.

वरळीस श्रीमंत दादासाहेबांचा वाडा होता. शेजारीं कांहीं मुत्सद्दी मंडळीच्या माणसांची रहाण्याची सोय केलेली होतीच.

वरील यादी ता. २७-१२-१७७४ नंतरची आहे; कारण त्या तारखेच्या पत्रांत महादाजी विश्वनाथास सखाराम हरींची मातुःश्री वगैरे पकडण्याचा हुकुम आहे.

ता. ३ जानेवारी १७७५ रोजीं श्रीमंत दादासाहेब बडोद्यास आले.[1]

ता. ८-१-१७७५[2] च्या पत्रांत हरि उमाजी नारो आनंदरावांस गोविंदराव गायकवाडांच्या स्वारीच्या मुक्कामांत आपली व दादासाहेबांची भेट झाल्याचें लिहितात. त्यांत असें आहे:– "... त्याचे मुत्सद्दी रा। सखाराम हरि व आबाजी माहादेव व सदाशिव रामचंद्र वगैरे कितेक ग्रहस्त समागमें आहेत ते भेटले, आमचें समाधान केलें." प्रथम हरि उमाजीस कैद करण्याचा दादासाहेबांचा घाट होता. पण गोविंदरावांपासून बाहदर ( जामीन ) घेऊन ते गेल्यामुळें ते स्वस्थ होते. समाधान केल्याचें वृत्त आहे. त्यावरून हे मुत्सद्दी गोडव्या स्वभावाचे होते असें दिसतें. कडवे नव्हते. सखाराम हरि तर श्रीमंतांस अष्टौप्रहर जवळ हवे होते; कारण त्यांचा स्वभाव त्यांस 'वाकफ' होता.

हरी उमाजी नारो आनंदरावांस आपण बहुत सावध रहावें. यांचा व इंग्रजांचा विश्वास किमपि न धरावा. बहुत सावध रहावें असें त्याच पत्रांत लिहितात.

नं. १२८[3]. माधवराव नारायणांनीं नारो आनंदरावांस ता. २१-१-१७७५ रोजीं लिहिलेलें हें पत्र असून त्यांत "सखाराम हरि यांचें पत्र बालाजी येमाजी यांस आलें तें पाठविलें तें पावलें. तुह्मी चहूंकडील बातमी राखोन सावधगिरीनें राहात जाणें" असें आहे.

तारीख १७ [4]फेब्रुआरी १७७५ रोजीं आनंदमोगरीच्या लढाईत

---

१. म. रि. उ. वि. पृ. ३४.

२. पे. द. भा. ३६, नं. ११३ पृ. ९९–१००.

३. पे. द. भा. ३३ पृ. ११०.

४. म. रि. उ. वि. १ पृ. ३२.

फत्तेसिंगानें तलवार गाजविली. दादासाहेबांचें निशाण मिळालें. सखाराम हरींस जखमा झाल्या. श्रीमंत अमृतरावांस घेऊन खंबायतेस आले. सैन्य शिताफीनें हालवून सखाराम हरि कपडवंजेस सावधगिरीनें राहिले. आरबांनीं आयत्या वेळीं लढण्याचें नाकारून दगा दिल्यामुळें या आनंदमोगरीच्या लढाईत दादांची ही अशी स्थिति झाली. परकीयांच्या पलटणी या अशा घात करीत असत.

पे. द. नं. १४८[1] भा. ३६ ता. १८-२-१७७५ चें असून त्यांत "च्यार घटका लढाई चांगली जाहाली त्यांचा (दादासाहेबांचा) मोड जाहाला. तोफा दाहा व हत्ती दाहा घोडीं उंटे सुरतानला घेऊन आले. मानाजी फांकडा व सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांस जखमा भारी लागल्या. ठार जाहल्याचें वर्तमान आहे. त्यास येथून श्रीमंत पळून मागें बुणग्यात गोविंदराव खंडेराव, हरि भिडे वगैरे गेले. मेले गेले धरले सर्वहि समजेल. मग उदयिक लेहून पाठवूं..." असें आहे. ठार झाल्याचें वर्तमान अर्थात् खोटें होतें.

हरिपंत फडक्यांनीं दादासाहेबांचा पाठलाग केला. खंबायतच्या किल्ल्यात जागा मिळेना तेव्हां इंग्रज वखारींतील मि. चार्लस मॅलेट यांनीं दादासाहेबांस[2] ता. २३-२-१७७५ रोजीं सुरतेस पोहोंचविलें. पुढें पांच दिवसांनीं कर्नल कीटिंग त्याचे मदतीस येऊन थडकलें.

नं १५८[3] हरी बलाल म्हणजे हरिपंत फडके यांनीं नानापंत नानांस ता. २-३-१७७५ रोजीं लिहिलेलें असून त्यांत "इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा सलूक सिंदे होलकर यांचे विद्यमानें येक महिना पावेतों बोलणें होऊन होत होता, परंतु ठरावात येऊन फडशा न जाला. तेव्हां छ १६ जिल्हेजीं लढाई संध्याकालपर्यंत होऊन श्रीमंताचा मोड जाला आणि पलोन गेले. पाठलाग करावा तो अंधारी रात्र त्याजमुळें न केला. श्रीमंत से दोनसे लोकानसी खंबायतावरून घोग्या बंदरास जाऊन

---

१. पे. द. भा ३६ पृ. १२६.

२. म. रि. उ. वि. १ पृ. ३५.

३. पे. द. भा. ३६ पृ. १३२-१३३.

तेथें पंनास पाऊणशानिशीं गलबतांत बसोन मुंबईकडे गेले याप्रमाणें वर्तमान आहे....बाबूराव पाटणकर व गणेश विठल जखमी होऊन पाडाव जाले. सखाराम हरि व मानाजी सिंदे व सदाशिव रामचंद्र वगैरे मंडली व सरकारचे कारखाने राजश्री गोविंदराव व खंडेराव गायकवाड या समागमें आहेत.

नं. १८०[1] मार्च १७७५ चें बातमीपत्र आहे. त्यांत गुप्ते मंडळीच्या खालील हालचाली दाखल आहेत.

"रा दौलतराव[2] हरि रा गोविंदराव गायेकवाड या समागमें श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे निसबतीनें बडोद्याचे मसलतीस तेथोन रुसवा तलावे मुलें करून श्रीमताकडेस जावे या उदेश नर्मदा उ(त)रून तापी तीरास आले. पुढे श्रीमंताकडस जावे, त्यास दक्ष(ण) दिशेहून श्रीमंताचे पत्र माार निलेस पहिले आलेच होते. तिकडस जावे, तों उतर दिशेस श्रीमंताकडेस चुलता सखाराम हरि आहेत त्यास प्रतिबंध होऊन येईल यास्तव दक्षणेस जातां नये. उतर दिशस जावे तर बाबुराव हरि दक्षणस अटकस आहेत त्यास उपद्रव होईल यैसा प्रकार दौलतरायास घडला आहे.

---

## गायकवाड प्रकरण

## राजापुरकरांची वकिली. खंडो जिवाजींच्या जागीं रावजी आप्पाजी फणसे यांची नेमणूक.

ता. ३ जानेवारी १७७५ त श्रीमंत दादासाहेब बडोद्यास आले तेव्हां फत्तेसिंग गादी बळकावून बसले होते. गोविंदराव गायकवाडांतर्फे श्रीमंतांनीं त्या शहरास वेढा दिला. शिंदे, होळकर व हरिपंत फडके शह देण्यास प्राप्त झाले. गोविंदरावास वेढा उठवून मही नदीपलीकडे वासदऱ्याजवळ

१. पे. द. भा. ३६ पृ. १५१-१५२.

२. दौलतराव बाबूराव हरीचा पुत्र होता.

१७ फेब्रुआरी १७७५ रोजीं माघार घेणें भाग पडलें. ग्रँट डफ साहेब म्हणतातः—

According to a plan suggested by the local knowledge of Futihsing the ministerial army on the afternoon of the same day, suddenly crossed the river in three divisions at separate fords: and whilst Raghunathrao's army was preparing to repel the centre-attack, before Govindrao and Khande Rao Gaekwar who were encamped on the plain at a short distance in the rear, could come to his assistance, the other divisions took him in both flanks: a body of Arabs whom he had lately entertained, refused to fight without pay : Manaji Fakde and Sukaram Hurry, two of his best officers, were wounded in the commencement...—A History of the Mahrattas by James Grant Duff. Vol.II, p.287.

या लढाईस मराठी ग्रंथकार आनंदमोगरीची संबोधितात.

"...या वेळीं इंग्रेजांची मदत घ्यावी अशी मसलत गोविंदराव गायकवाड यांनीं सखाराम हरींस सुचविल्यावरून त्यांनीं आपले शालक (मेहुणे) रामचंद्र नारायण राजापूरकर यांस सुरतेस मिस्टर गिब्रट साहेब यांजकडे पाठविलें आणि गिब्रट साहेबांचे मार्फत त्यांनीं मुंबई सरकारांत मदतीविषयीं बोलणें चालविलें. त्यांत आम्हीं इंग्रज सरकारास पुण्याचे गादीवर परत गेल्यानंतर सहा आणे देऊं असें दादासाहेबांचें बोलणें आहे असें रामचंद्रराव यांनीं सांगितलें. सदर्हु तहनामा मुंबई सरकारनें मान्य करून कर्नल कीटिंग व मेजर स्टुअर्ट या उभयतांस सैन्य घेऊन रघुनाथराव यांचे मदतीस गुजराथ प्रांतीं जाण्याचा हुकूम दिला. हुकुमाप्रमाणें ते उभयतां सरदार कांहीं सैन्यासह दादासाहेबांचे मदतीस गुजराथ प्रांतीं आले. परंतु दादासाहेब या उभयतां सरदारांच्या येण्यापूर्वींच खंबायतेस गेले होते, तेथून लगेच ते मुंबईस गेले. तेथें सन १७७६ त रघुनाथराव दादासाहेब यांनीं मुंबईचे गव्हर्नराशीं प्रसिद्ध पुरंधरचा तह केला."[१]

---

१. सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांचें चरित्र पृ. १०.

या हकीकतींत रा. ब. गुप्त्यांची चुकीची समजूत झाली आहे. पंचवीस रावतांनिशीं दादासाहेब अमृतरावासह खंबायतेस आले. त्यांस किल्यांत घेतलें नाहीं. तेव्हां मि. मॅलेटनें त्यांस भावनगरास पोहोंचविलें. तेथून धंदुकेवरून घोघो बंदरांतून त्यांनीं ता. २३ फेब्रुवारी रोजीं सुरत गांठलें.[१]

इंग्रजांची फौज घेऊन कर्नल कीटिंग ता. २८ फेब्रुआरी रोजीं सुरतेस दादासाहेबांच्या मदतीस गेला.

आनंदमोगरीच्या लढाईनंतर उरलेल्या सैन्याची व्यवस्थित रीतीनें जमवाजमव करून सखाराम हरि कपडवंजेस श्रीमंतांच्या आज्ञेची वाट पहात होते.

६ मार्च १७७५ रोजीं कर्नल कीटिंग व दादासाहेब यांचा एकोणीस कलमांचा तह झाला त्यांत श्रीमंतानीं इंग्रजांस साष्टी, वसई, मुंबईजवळचीं लहान बेटें आणि जंबुसर व ओलपाड हे तालुके कायमचे देण्याची एक अट होती. यास सुरतेचा तह म्हणतात. पुरंधरचा तह पुढें ता. १ मार्च १७७६ रोजीं झाला.

पुढें रा. ब. गुप्ते म्हणतातः– "हें बोलणें मान्य करून मुंबई सरकारनें रघुनाथरावांचे मदतीस कांहीं सैन्य पाठविलें. परंतु अशा तऱ्हेच्या मदतीचें वर्तमान कलकत्त्यास गेल्याबरोबर तिकडून मुंबई सरकारास ताबडतोब हुकूम आला कीं, तुम्हीं पाठविलेलें सैन्य परत बोलवावें. ह्याचें कारण, ते म्हणाले दादासाहेबांचे विरुद्ध पक्षकारासहि इकडून मदत पाठविण्यांत आली आहे. रामचंद्रराव यांचे सांगण्यात आलें कीं, ही गोष्ट सखाराम हरींचे कानीं पडतांच त्याचा क्रोधाग्नि इतका खवळला कीं, त्याच क्षणीं त्यांचे डोळे इंगळाप्रमाणें लाल झाले आणि त्यांच्या आंगरख्याचे बंद त्वेषाच्या जोरानें तटातट तुटले. ह्या असह्य अपमानानें त्या शूर वीरास देहाचें भान नाहींसें झालें व ते लागलेच दादासाहेब यांचेजवळ जाऊन म्हणाले कीं, ह्याच वेळेस ह्या अपमानाचें पारिपत्य करण्याची मला आज्ञा मिळाली पाहिजे. परंतु दादासाहेब यानीं त्यांस पुष्कळ प्रकारें उपदेश करून शेवटीं त्याचें शांतवन केलें."[२]

---

१. म. रि. उ. वि. २. पृ.३४.

२. सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांचें चरित्र पृ. १०.

९८०१८ दा ६०८ ९८/१०/५१

आणखी एक महत्त्वाची कामगिरी सखाराम हरि गुप्ते यांनीं केली ती अशी कीं इ. स. १७७६ त पुन्हा अधिकारप्राप्तीसाठीं गोविंदराव गायकवाड पुण्यास खटपट करीत असतां त्यांचें कामकाज खंडो जिवाजी तांबेकर पहात असत. त्यांची वर्तणूक नीट नसल्यामुळें त्यांच्या जागीं सखाराम हरींनीं रावजी आप्पाजी प्रभु फणसे यांची नेमणूक करविली. पेशवेदरबारीं गोविंदरावांचें काम हे पहात व श्रमसाहसहि करीत. गोविंदराव स्थानापन्न झाल्यावर हे बडोद्यास त्यांचे दिवाण झाले.

तारीख ६ मार्च १७७५ रोजीं सुरतेचा तह कायम झाला. ता. २० मार्च रोजीं दादासाहेबांस खंबायतेस पोहोंचविण्यांत आलें. सुमारें एक महिन्यानें सखाराम हरि, मानाजी फांकडे, आबाजी महादेव व सदाशिव रामचंद्र धर्मज येथें येऊन मिळाले. गोविंदराव गायकवाड आले. पैशाची टंचाई. खंडेराव गायकवाडांसहि हरिपंतानें फोडलें. महादजी शिंद्यांस तुंबलेले हिशोब देण्यास सखाराम बापूंनीं पुण्यास बोलाविलें. तेव्हां पाटीलबावा रुसून परत गेले. भोळ्या सांबास– दादासाहेबांस– वाटलें कीं ते आपल्या पक्षात आले. इंग्रजांसहि त्यांनीं तसें कळविलें. तथापि तसा प्रकार कांहीं नव्हता. खाजगी भांडणांत शिंदे होळकरांस मनापासून पडण्याची इच्छा नव्हती. मराठी राज्यावर बेतण्याचीच वेळ इंग्रज चालून आल्यावर दिसली तेव्हांच ते युद्धास उभे राहिले. त्यांच्या वागण्यास फारसा दोष देतां येत नाहीं. दादासाहेब धनीच होते. ते शूर सेनापति. सखाराम हरि सारखे प्राण पणास लावणारे सरदार त्याच्यासाठीं लढत होते. तेव्हां दादासाहेबहि केव्हां घाला घालतील याचा काय भरंवसा होता ? आनंदीबाई प्रतिपक्षाची मनें गोड शब्दानीं दादासाहेब युद्धास कां उभे राहिले आणि त्यांस विरोध करण्यानें राज्यनाश कसा होईल हें कधीं गुप्त तर कधीं उघड पत्रें पाठवून समजावीत होत्या. अशेरीच्या किल्ल्यावरील लोकांस त्यांनीं आपल्या बाजूस वळविलें. तेव्हा विश्वासराव रामचंद्र सांवत व आणखी दहा पंधरा इसम यांस किल्लेदारानें १६-४-१७७५ रोजीं देहान्त प्रायश्चित्त दिलें. बारभाईनींहि दादासाहेबांच्या पक्षाचे लोक फितविण्यास कमी केलें नाहीं. पुढें इंग्रजानीं श्रीमंत त्यांचीं सात आठ अंगवस्त्रें

अमृतराव व बरोबरचे लोक यांची व्यवस्था सुरतेस महंमुदी बागांत केली.[1] गोविंदराव गायकवाडांची स्थापना बडोद्यास करून हरिपंतास रेटीत पुणें गांठावें असा संकल्प दादासाहेबांच्या पक्षाचा होता. इंग्रज अर्थात् चढून गेले होते. तरी श्रीमंतांस तूर्त मुंबईस आणण्याचा त्यांचा विचार नव्हता.

पण दादासाहेब निर्धन होते. दाम करीसो काम. बारभाई पडले पैसेवाले. नवकोटनारायण त्यात. तेव्हां भोळ्या सांबाचा निभाव कसा लागतो ? कर्नल कीटिंगनें थोडें कर्ज दिलें. त्यानें कसें भागतें ! तरी याहि कर्जाबद्दल कर्नलास मुंबईहून थप्पड बसली. पैशाची निकड लागली तेव्हां दादासाहेबांस नडीयादवर पट्टी बसवावी लागली.

पे. द. मा. ३६ नं. १८५ पृ. १५५-१५८ वरील पत्र ता. ९-४-१७७५ रोजीं हरि बलाल अर्थात् हरिपंत फडके यांनीं नारोपंत नाना म्हणजे नारो आनंदराव यांस लिहिलेलें आहे. त्यांत सखाराम हरि, आबाजी महादेव, भोंसले, गायकवाड, होळकर, सखाराम हरींची स्त्री, त्यांचा पुत्र वगैरेंच्या हालचालींचें वर्णन केलेलें आहे. श्रीमंत खंबायतेस गेले त्या वेळेस-उरपाड, हासोट व आक्लेस्वर (अंकलेश्वर) हे तीन परगणे इंग्रजांस जहागीर देऊन सनदा करून दिल्या. इंग्रजांनीं तूर्त कुमक करावी. खर्चास मागों नये, आपली लढाई फते करून पुणियासी नेऊन बसवावे... उपरांतिक सुरत आठाविसी झाडून घ्यावी असें ठरलें. मुधोजी भोंसले मुलुख मारणार... आह्मांपासी फौज किती, काम मातबर, **इंग्रजासीं संमध (संबंध)** स्वदेश समीप, येथें वाकडी गोष्ट पडली म्हणजे ठीक नाहीं. बापूजी जनार्दन परभु, थोपटे, सूर (?) वगैरे पथके दिा फत्तेसिंगराव गायकवाड याजकडे होती. त्याची कारकुनी करीत असतां सखाराम हरि याजकडे सूत्र सुरतेहून केले. कागदपत्र सांपडले त्याजवरून कैद केला.. सखाराम हरी याची स्त्री व चिरंजीव मुंबईहून सुरतेस आली. मुंज चैत्र शुद्धांत होणार. आज छ १ सफरी सुरतेंतील सरंजाम बाहेर निघणार. निघाला. उरपाडास जाणार किंवा आम्हांवर येणार पाहावें. श्रीमंतांचीं पत्रें पुरंदराहून येतात कीं बंदी करून इंग्रजास व मोगलांस तंबी पोहोचवणें. **आमचा भ्रम आजपावेतों या प्रांतीं आहे**... सिंदे होळकर निरोप

---

१. राजवाडे, म. इ. सा. खं. १९ पृ. ९७ हि पहा.

घेऊन जाणार ऐसे ऐकतो. गायकवाड व सखाराम हरि वगैरे उदेपुराकडे गेले म्हणौन ऐकतो. म्हणून वर्तमान तपसिलें लिहिलें तें कळलें असें हरीपंत म्हणतात व आपल्या बाजूची बातमी लिहितात कीं श्रीमंत (दादासो) सुरतेहून खंबाइतेस दाखल झाले... गायकवाड व सखाराम हरि वगैरे यांस पत्रें पाठविलीं.' त्यांत येकंदर सलूख न करणें आह्मांपासीं येणें लिहिलें. तेव्हां हरीपंतानीं कूच करून साबरमतीवर ढवलक्यानजीक मुक्काम करून राहिले.

पे. द. नं. २०२[1] हरि बलालांनीं ता. ३-५-१७७५ रोजीं नारोपंत नानांस लिहिलेलें असून त्यांत "... श्रीमंत राजश्री दादासाहेब व गोविंदराव गायकवाड, सखाराम हरि वगैरे मंडली येकत्र होऊन इंग्रज सुधा कूच करून साबरमतीवर आले... ते साबरमती टाकून वात्रा नदीच्या पाण्यानें खेड्यानजीक आले. छ १ रोवली त्याची आमची लढाई जाली. ते नदीपलीकडेस होते. आम्हीं आलीकडेस होतो. त्याणी तोफा व पायेचे माणूस व फौजा या प्रा सरंजाम घेऊन आलीकडे आले. तेव्हां त्यांची आमची लढाई होऊन त्यास मोडून नदीपलीकडे घातले.... नदीपलीकडे जावे तरी नदी फार अवघड" आहे. यावरून सखाराम हरींस वगैरे माघार घ्यावी लागली एवढेंच दिसतें.

ता. २८ मे १७७५ रोजीं नापार– आडास– आरास येथें दादासाहेबांच्या व इंग्रजांच्या आणि हरिपंताच्या– बारभाईंच्या– सैन्याची लढाई धुमश्चक्रीची झाली. दोन्ही पक्ष आपला विजय झाला मानतात. या लढाईत सखाराम हरींची निष्ठा अनुभवास आली. तीबद्दल 'ईश्वर तुमचें ऊर्जित करील' असें आनंदीबाईनीं ता. ९ जून १७७५ च्या पत्रांत लिहिलें आहे. हें सारेंच पत्र जिव्हाळ्याचें असून त्या आपले सरदारांस कशा प्रकारचें उत्तेजन देत होत्या तें निदर्शनास येतें. उगीच ते दादासाहेबांसाठीं जीव देण्यास तयार नव्हते. जखमा झाल्या तर बाईसाहेब किती चौकशी करीत. पथ्यपाणी करण्यास सांगत. मुलाच्या लडिवाळपणाच्या गोष्टी लिहीत. पण त्यांस बारभाईंचें पारिपत्य होऊन दादा-

१. भा. ३६ पृ. १७२-३.

साहेबांची व दुसऱ्या बाजीरावसाहेबांची गांठ कधीं पडेल याचा ध्यास लागला होता. हें पत्र असें:—

श्री

" राजश्री सखाराम हरि यांसी:-

सौभाग्यवती आनंदीबाई आशीर्वाद. उपरि. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सर्व कळलें. तुमची निष्ठा उत्तम आहे हे अनुभवास आली त्यास हे गोष्ट उत्तम आहे. तुम्हांस हें योग्य आहे. ये निष्ठेनें ईश्वर तुमचें ऊर्जित करील. चिंता नाहीं. तुम्हांस जखम लागली होती ती बरी जाली कीं नाहीं हें लिहिणें. पथ्य उत्तमप्रमाणें करीत जाणें. बहुत रक्षीत जाणें. चिरंजीव राजश्री बाजीराव सुखरूप आहेत. **फितुरीयांचे पारपत्य होऊन हुजुरची व चिरंजीवाची** भेट कधीं होईल हें लिहिणें, रबिलाखर. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद. पैवस्ती चंद्र २८ रोज मंगळवार माहे रबिलाखर.[1]

दादासाहेब व इंग्रज हे छावणीस डभईस राहिले. मुंबईचे इंग्रज व फ्रीटिंग पुण्याच्या मुत्सद्यांशीं तडजोड करूं लागले. पुणेंकरांनीं कलकत्ते-करांशीं स्वतंत्र तह करण्याचा प्रयत्न चालविला. दादासाहेबांशीं सख्य करण्याच्या उद्देशानें वकील मुंबईस धाडले. पण हेस्टिंग्जनें पुण्यास युद्ध तहकुब करण्यास लिहिलें व मुंबईकरांनीं वकील परत बोलाविले.

हरिपंत फडके १७७५ च्या पावसाळयांत नानांस लिहितात कीं, 'फ्रेंचाशीं राजकारण करून त्यांस आणलें तर तो इंग्रजांस भारी आहे. काम करील. हें होत नसल्यास इंग्रजांस कांहीं देऊं करून त्यांशीं सख्य करावें. फ्रेंच व हबशी यांसीं नीट असावें. पाण्यांतील कामांत सांप्रतकाळीं इंग्रज अधिक आहे. ... दादांनीं इंग्रजास गुजराथचे पंधरा लक्षांचे महाल व वसई साष्टी लिहून दिली म्हणून ते जोरांत आहेत. शेवटीं एक वेडेपणाचा

१. इतिहास संग्रह ऐतिहासिक टिपणें भा. २ पृ. ९०. हें पत्र आमचे आने-सासरे कै. नारायण रघुनाथ देशपांडे यांनीं रा. ब. द. ब. पारसनीस यांस त्यांच्या संग्रहीत लेखांतून काढून दिलें.

विचार मनांत येतो तो लिहितों. **साष्टी इंग्रजांस देऊन दादांस हातीं देत असले तर खामखा करावें.**"[1]

वॉरन् हेस्टिंग्जनें ३ फेब्रुआरी १७७५ रोजीं मुंबईकर इंग्रजांस दोष दिला. पूर्वीच्या पेशव्यांशीं झालेल्या करारार्शी तुमचें वागणें विसंगत असल्यामुळें मराठी राज्याशीं चालू असलेलें युद्ध अन्यायाचें, राजनीतिविरुद्ध, धोक्याचें व अनधिकृत असल्यामुळें राघोबाचा पक्ष तात्काळ सोडावा. मराठ्यांचें राज्य जिंकण्याचें तुम्हीं निष्कारण अंगिकारलें आहे. तुमच्याजवळ सैन्य नाहीं आणि पैसाहि नाहीं. एवढ्याकरितां युद्ध बंद करा म्हणून हेस्टिंग्जनें कळविलें. ही हकीकत पुण्यास कळली तेव्हां सखाराम बापूंनीं ता. २९-७-१७७५ रोजीं पत्र पाठवून त्याची अवास्तव स्तुति केली व **प्रथमच नारायणरावांस राघोबांनीं ठार मारलें,** हा आरोप त्यांजवर केला. जवळ जवळ **दोन वर्षांनीं हें विधान करण्याची बारभाईंची छाती झाली.** तथापि मुंबईकर इंग्रजांनीं सर्व चौकशी करून कलकत्त्यास कळविलें कीं राघोबादादांनीं खून केला नाहीं.

शके १६९८ ज्येष्ठ[2] शुद्ध १४ म्हणजे ता. १२ जून १७७५ च्या अगोदर सखाराम हरि गुप्ते यांस बारभाईंचा[3] अंदाज काढण्याकरितां त्यांजकडे पाठविण्यांत आलें होतें तेव्हां दादासाहेबांनीं साहा सात लक्ष रुपये खेरीज किल्ले करून देशी जहागीर देतों ते त्यांनीं कबूल करावेत आणि सर्व बंदोबस्त बारभाईंनीं करावा असें बोलणें लागलें होतें. पण दादासाहेबांच्या मतें त्यांचा इतबार कोणत्याहि गोष्टीचा नव्हता. वरील लेखांकांत एक कलम आहे. तें नमूद केल्याखेरीज परिस्थिति लक्षांत येणार नाहीं. हें कलम असें:—

राजश्री सखाराम हरी फितुरियांकडे गेले. त्यास फितुरी म्हणतात कीं, श्रीमंतांनीं साहा सात लक्ष रुपये **खेरीज किल्ले करून देशी** जहागीर देतों ते

---

१. कै. वासुदेवशास्त्री खरे, नाना फ. च. पृ. ४३.

२. खं. १२ ले. १६२ पृ. १०८.

३. आनंदीबाईची दिनचर्या (पे. द. भा. ४) पुण्यास लिहून जात होती. पृ. ४७ वर आहे:— "पहिले पंचभाई नांव होतें. मग बारभाई जालें." (!)

कबूल करावा (वें) आणि सर्व बंदोबस्त फितुरियानें करावा म्हणोन मशारनिलेनीं लिहिलें होतें. ऐशास सखाराम हरि तेथें गेले. तेव्हां ते सांगतील त्याप्रों त्यास लिहिणेंच. परंतु फितुरियांचा[1] इतबार काय ? यांचा इतबार कोणत्याही गोष्टीचा नाहीं. निदानी आठ नऊ कबूल होतील. परंतु ते बेइतबारी. याजकरितां भडोच सुरतेस राहूं. हाच पक्ष मशारनिल्हेस लिहिला आहे. कलम १

दादासाहेब इतके चिडलेले होते कीं बारभाईस ते 'फितुरी' खेरीज दुसरें नामाभिधान देण्यास तयार नव्हते. साहा सात नव्हे तर आठ नऊ (लक्ष) पर्यंत किल्ले सोडून देण्यासहि ते कबूल होतील. किल्ले मात्र देणार नाहींत. तथापि या फितुरियांचा इतबार काय ? ते बेइतबारी. याजकरितां भडोच सुरतेस राहूं. असें श्रीमंत उद्गारतात. ते लढवय्ये ! शूर ! त्यांचेपुढें त्यांस किल्ले दिले असतां बारभाईचा टिकाव लागणें कठिण होतें. सबब प्रथमपासूनच किल्ले देणार नाहीं ही त्यांनीं अट घातलेली होती. दादासोस त्यांचा इतबार कोणत्याहि गोष्टीचा वाटत नव्हता. त्यांचेपेक्षां त्यांचा विश्वास परदेशी लोकांवर जास्त होता. पण पोर्तुगीजाचें सामर्थ्य "बल" बेताचेंच–"थोडें", "प्रामाणिकताहि कमीच असेल"[2] असें त्यास वाटत होतें. इंग्रज समुद्रावर वरचढ होते.

रा. ब. सरदेसाई लिहितात:— "बारभाईस याप्रमाणें कलकत्त्याहून पाठबळ मिळालें नसतें तर राघोबाचे विरुद्ध त्यांचा टिकाव बहुधा लागला नसता." हें त्यांचें मत बरोबर आहे. मग दादासाहेब कमी होते काय ? त्यांचे सरदार शेर होते. पण बारभाईचें नशीब जोरावर होतें. राघोबा दादासाहेब दैवयोग म्हणून उगीच बसले.

इ. स. १७७५ च्या पावसाळ्यांत हरिपंत खानदेशांत होते. दसऱ्यानंतर सोनगडाकडे निघाले. निजामाचें सैन्य मदतीस येण्याचा करार होता.

---

१. आनंदीबाईच्या दिनचर्येंतच त्याच पृष्ठावरील पुढील वाक्य असें आहे:— श्रीमंत (साहेब, राघोबा दादासाहेब) तर 'फितुरी' असें पत्रांत लिहीत होते असे बाई बोलली. (!)

२. राजवाडे, म. इ. सा. खं. १२ पृ. ११९.

तथापि सवाई माधवराव खरे खोटे समजत नाहींत म्हणून अमृतराव पेशवे करण्याचा घाट घालून दादासाहेबांशीं पत्रव्यवहार चालू केला. गांडापूर, वैजापूर, जालना, पैठण, आंबेड, औसा, आळंद गुजोटी हे प्रांत त्यानें बारभाईकडून परत मागितले. ते हातीं येतांच धौशास[1] हरिपंताच्या कुमकेस पाठविण्याचें ठरलें.

पे. द. नं. २५७[2] ता. १६-८-१७७५ चें असून हरि बलालांनीं नारोपंत नानांस लिहिलेलें आहे. त्यांतील मजकुर कीं 'गोविंदराव गायेकवाड याचे जाबसालांत मानाजी फांकडा व सदाशिव रामचंद्र व आबाजी माहादेव, सखाराम हरि होते ते रुष्ट आहेत. गोविंदराव कूच करून छाणीचे तलावरी गेले. महीपार जाणार. आमदाबाद सुरत आठाविसी मिरज याच्या सनदा देत होते त्या त्याणी घेतल्या नाहीं म्हणौन लिा ते कळले... धारेस मातुश्री आनंदीबाई आहेत. त्याणीं खंडेराव पवार याची सिबंदी तेथील बाहेर काढून आपला बंदोबस्त केला. यामुळे खंडेराव श्रमी आहेत. सरकारांत संधान करतील म्हणून लिहिले ते कळले" आहे.

दादासाहेबांचीं दोन पत्रें वरसोलीचे आमचे मित्र रा. बा. स. कुलकर्णी यांनीं विविधज्ञानविस्तार मार्च १९२६ च्या अंकांत प्रसिद्ध केलीं. तीं आम्हीं रा. ब. सरदेसाई यांस पाहण्यास पाठविलीं होतीं. तीं त्यांनीं म. रि. उ. वि. १ पृ. ४४—४५ वर छापलीं आहेत. तीं सखाराम हरीस ऑक्टोबरांत लिहिलेलीं आहेत.

एकांत "... ऐशियास तुम्हीं लिहिलें तें सर्व यथार्थ आहे. त्याच अन्वयें कारभारास लागलों आहों. परंतु तुम्हीं उगेंच जाऊन बाळा (अमृतरावा ?) सुद्धां बडोद्याजवळ राहिला, याचें कारण नव्हतें... तुम्हांसी व गोविंदरायांसीं (गायकवाडांसीं) बोललें पाहिजे... जर फत्तेसिंग बहुत ओढितो तरी बडोदें घेऊं असें इंग्रज बोलतात. काम भारी आहे. गाडे तयार होत आहेत. दारू वाळत आहे. ... देशास लौकर पोंचलें पाहिजे. नारो गणेशास पाठविणें. तुमचीं पत्रें येतात तीं जाहीर

१. इब्राहीम जाबीत जंग निजामाचा सरदार.

२. पे. द. भा. ३६ पृ. २१८-२१९.

**करीत नाहीं.** मजकुर थोडाबहुत सांगतों. **आमचीं पत्रेंही जाहीर न करणें ...** जलदीनें बडोद्यास लागतों.'' असें दादासाहेबांनीं सखाराम हरींस लिहिलें आहे. यावरून या दोघांचा पत्रव्यवहार बराच होत असला पाहिजे व कांहीं गुप्त असावा हें सिद्ध होतें.

दुसऱ्यांत दादासाहेब म्हणतातः– " राजश्री सखाराम हरि यांसीः उपरि. येथें कित्येक कामें आहेत. **बारीक मोठे मनसुब्याचे पीळ पेंच पडतात, याजमुळें अहर्निश तुम्हीं जवळच असावें अशी आमची मर्जी, हें तुम्हांसहि विदित आहे.** तूर्त दोन दिवसांचे कामास गेलां, पंधरा दिवस लांब राहिलां. कामही दूर जाऊन विशेष नाहीं. **जवळही लहान मोठी मसलत पुसावयास तुम्हीं जवळ नाहीं...** आमचें **विचारें, आगत्यास कदाचित् एक दोन दिवस दूर** जावें, नाहीं **तरी अष्टौ प्रहर जवळ असावें. तुम्हांस** आमची **मर्जी बहुत वाकीफ,** ह्मणोन जवळ चहातों.... **लौकरच जवळ यावें हें बरें** आहे. परंतु मनसुबियाची चाल सोडूं नये. जाणिजे. शनिवार संध्याकाळ.'' यावरून श्रीमंत दादासाहेबांस सखाराम हरींचें किती अगत्य वाटत होतें याची चांगली कल्पना येईल. "अहर्निश तुम्हीं जवळच असावें अशी आमची मर्जी हें तुम्हांस विदित आहे" असें दादासाहेब बजावितात. " जवळही लहान मसलत पुसावयास कोणी नाहीं " ही त्यांची मुख्य अडचण ! " आमचें विचारें अगत्यास कदाचित् एक दोन दिवस दूर जावें, नाहीं तरी **अष्टौ प्रहर जवळ असावें.** " हें त्यांचें सांगणें. परवानगी घेऊन एखादा दुसरा दिवस दूर जावें नाहीं तर अष्टौ प्रहर आमचे सहवासांत असावें ही त्यांची आज्ञा. कारण काय ? तुम्हांस आमची मर्जी बहुत वाकीफ. म्हणूनच चहातो म्हणतात. देह दोन पण जीव एक असा हा प्रकार होता.[1]

हीं पत्रें आमच्या सासुरवाडचीं आहेत. आमचे आजेसासरे मयत आहेत. त्यांच्या नातवांस तेवढें अगत्य नाहीं. नाहीं तर आणखी कितीतरी महत्त्वाची इतिहाससामग्री बाहेर येण्यासारखी आहे.

---

१. मातुःश्री आनंदीबाईंचा सखाराम हरींविषयीं असाच जिव्हाळा होता.



सौ. मालतीबाई यशवंत गुप्ते

सौ. मालतीबाई यशवंत गुप्ते यांच्या माहेरीं सखाराम हरींचीं
महत्त्वाचीं कागदपत्रें मिळालीं. तीं रा. ब. पारसनीस,
रा. ब. गो. स. सरदेसाई व श्री. बा. स.
कुलकर्णी यांनीं प्रसिद्ध केलीं.

स. ह. चरित्र पृष्ठें ८४, ८५ व १२३ पहा.

पाऊस कमी झाल्यावर मुंबईकरांनीं कीटिंग यास सुरतेस परत बोलाविलें. रघुनाथराव दादासाहेब व कीटिंग यांचें जमेना. तेव्हां मि. मॉस्टिन् यास सुरतेस पाठविण्याचा विचार होता. तथापि जुलईचे सुरवातीस अप्टण याची नेमणुक पुण्यास झाली. हेस्टिंग्जनें आम्हांस युद्ध करणें नाहीं, कर्नल अप्टण तह करीत आहे, त्याजपाशीं बोलणें करावें, म्हणून दादासाहेबांस कळविलें.

मुंबईकरांचा व आपला तह मोडता तर तुमचीं वचनें खरीं कशीं समजावीं याविषयीं ता. २७-१०-१७७५ रोजीं दादासाहेबांनीं हेस्टिंग्ज् साहेबास विचारलें. पण त्यानें त्यांची व पुण्याच्या लोकांची कशीतरी समजूत केली.

दादासाहेब सुरतेहून सोनगडाकडे हरिपंतांच्या सैन्याच्या रोखाप्रमाणें येऊं लागले. सोनगडापलीकडे दादासाहेबांची फौज १०,००० व सोनगडाअलीकडे पंचवीस कोसांवर हरिपंतांचें सैन्य ३०,००० होतें. अप्टण थाटानें पुण्यास २८ डिसेंबर रोजीं आला. ३१ डिसेंबर १७७५ रोजीं श्रीमंत सवाई माधवरावांची व त्याची पुरंदराखालीं कऱ्हा नदीवर भेट झाली.

दादासाहेबांचे सरदार त्रिंबक सूर्याजी प्रभु चौबळ[1] यांनीं सर्व प्रांतांत त्रिंबकपर्यंत गडबड उडवून दिली. त्यास तेथील किल्ल्याचे हवालदार नेमलेले होते. खानदेशांत गुलजारखानानें झोड उडवून दिली. हरिपंत मालेगांवांजवळ होते. तनख्यासाठीं त्यांचे लोक नोकरी सोडूं लागले. निजामाचा सरदार मदतीस न आल्यामुळें ते हतबल होऊन गप्प बसले.

आमचे आजेसासरे कै. ना. र. रघुनाथ देशपांडे यांनीं दिलेल्या एका पत्रांत[2] सौ. आनंदीबाई यांनीं सदाशिव रामचंद्र, आबाजी महादेव व सखाराम हरि यांस लिहिलें आहे कीं होळकराकडील वकील रामचंद्र धोंडदेव आपले लष्करांत आहे. तो आपले लष्करची बातमी होळकर यांजकडे

---

१. कै. नामदार म. भा. चाबळ याच घराण्यांतील. हें घराणें मूळ चौलचें रहाणारें.

२. इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें भा. १-६०.

लिहीत असतो. ऐशियास बजावा वगैरे[1] कोणी सरदार पत्र लिहीत असतील. तो मजकुर बजिन्नस नांवनिसीवार होळकरास लिहीत असतात. होळकराजवळ फितुरीयांचे[2] वकील आहेत. तो फितुरीयांकडे ज्याचें पत्र आलें त्यांचीं नांवें लिहितो. तेथें होळकर व शिंदे यांचे कारकून आहेत. त्यांस ताकीद करणें कीं वर्तमान लिहिणें तें मोघम लिहीत जाणें ... **कलह आपसांमध्यें करावयाचा हा काल नाहीं. हे दिवस कोण ?** ... अमृतराव यास तुम्हीं शिकवीत जावें कीं हुजूरची मर्जी रक्षावी आणि पत्रें पाठवीत जावीं. दिवस सोई धरावयाचे हेच आहेत. हे दिवस पुढें येणार नाहींत.

या पत्रावरून सखाराम हरि वगैरे मंडळीस सावध रहाण्याचे व अमृतरावांस वडिलांची मर्जी संपादण्याचे धडे त्यांचे मार्फत बाईसाहेब कसे देत होत्या याची कल्पना येईल. पुढें घरगुती लडिवाळपणाच्या बाबीहि त्या लिहितातः चिरंजीव बाळ सुखरूप आहेत. खेळत असतात. रांगत असतात. खुप मर्जी आहे. नंतर शिंदे होळकरांचा भरवंसा येत नसल्याचें कळवितात. पहा या कारमारी मंडळीवर त्यांचा किती विश्वास होता तो !

रा. ब. पारसनीसांनीं हें पत्र ता. १४-२-१७७५ चें असल्याचें दिलें आहे. पण त्यांत मूल रांगत असल्याचा उल्लेख असल्यामुळें तें ४-२-१७७६ चें असावें असें म. रि. उ वि. १ पृ. ३६ वर प्रतिपादिलें आहे. तथापि त्यांतील इतर हालचालींवरून या प्रतिपादनाची खात्री होत नाहीं. जास्त पत्रव्यवहार प्रसिद्ध झाल्यावर तारीख निश्चित करितां येईल.

ता. २० जानेवारी १७७६ रोजीं सखाराम हरींनीं लक्ष्मणपंत आंब्रेकरांस लिहिलेल्या पत्रांत 'गोविंदरायांचें बोलणें आम्हीं बोलतो. यामुळें त्याचे मनांत विक्षेप वाढत आला... वकिलीस बोलणार त्यांणीं त्यांस मन मानेसें चिडविलें आणि तुफान उठविलें कीं सखाराम हरीचे राऊत जाऊन कही मारितात... तूर्त वोढीस लाख पन्नास हजार रुपये घेतले.

---

१. पुरंधर.

२. बारभाईंचे. दादासाहेबांचा पक्ष बारभाईंस फितुरी म्हणतो व बारभाई त्या पक्षाचे लोकांस फितुरी म्हणतात !

यामुळें इंग्रज आह्मांवर फारच रुष्ट, आम्हींच घडों देत नाहीं म्हणोन जाले. आणि हे निमित्त मुद्दा पत्ता नसतां नाहक ठेऊन मारूं, हल्ला करूं, श्रीमंतानीं आम्हांस निरोप द्यावा किंवा सखाराम हरी घालवावें, पारपत्य करावें. नाहीं तरी आम्हीं करितों, ऐसें अटीस आलें. विलाज नाहीं. श्रीमंतही लाचार जाले ! निरुपाय जाला[1] !' असें आहे. यावरून सखाराम हरींचें व कर्नल कीटिंगचें मोठेंच वितुष्ट आलें होतें हें उघड आहे. पण या कामांत गुप्त्यांचा काडीइतका दोष नव्हता. सांगावांगीचा प्रकार होता. कही बारभाईचे लोक मारीत होते.

लेखांक १२९ ता. २२ जानेवारी १७७६ चा असून गुप्त्यांनीं लक्ष्मणपंतांसच लिहिलेला आहे. त्यांत त्यांनीं बेमालुम उपाय सुचविला आहे:– " मूल ( सवाई माधवराव ) खरें, याजवर भांडण भांडतील. **तरी मुलाविसीं इंग्रजांनीं खातरजमा करून श्रीमंतांचे** ( दादासाहेबांचे ) **वोटींत घालावें त्यास दगा पेच नाहीं. परंतु फितुरियांचें पारपत्य जालें पाहिजे.** त्याणीं मूल नसतां विनाकारण फितुर केला व **दौलत गारद करून मोगलास दिली.** पुढेंहि लबाडी करतात. **वचनें प्रमाणें देऊन श्रीमंतांसीं बेमानी केली.** पुढेंहि इतबार नाहीं."[2]

## कर्नल कीटिंग व सखाराम हरि यांचें वितुष्ट. सखाराम हरींचा कृतनिश्चय.

राजवाडेकृत खं. १२ लेखांक[3] १३२ शके १६९७ माघ वा। ८ म्हणजे ता. १२ फेब्रुआरी १७७६ चा असून त्यावरून इंग्रज म्हणजे कर्नल कीटण (Keating) सखाराम हरींवर रुष्ट झाल्याचें उघड आहे. त्यास संबोधनास आपले थोरले ग्रहस्थ सकार बावा ( सकार बावा ) म्हणजे सखारामपंत बोकील अनुकूल असें सखाराम हरींनीं लक्ष्मण आप्पाजी आंबेकरास लिहिलेलें आहे. 'नारो गोपाळ गोदादर्शनीं एकत्र

१. राजवाडे, खंड १२ ले. १२७ पृ. ७६–७७.

२ सदर ,, ले. १२९ पृ. ७९

३. पृ. ८१-८२.

होऊन खलबतें करितात'– आम्हीं येथें मुलें माणसेंसुद्धां आहों... इंग्रजी स्थळें सुरत भडोच यांशिवाय कोठें जागा नाहीं... त्यामुळें नारिंगांची मसलतैक्य होऊन इंग्रज आह्मांवर चिडविले. **इतकेहि सोसून आमचा निश्चय जो आहे तोच खंबीर प्राण जाईतों सुटणार नाहीं. प्राणाचा संकल्प घालोन श्रीमंतांची सेवा आरंभिली आहे.** त्याचा शेवट करावा. एक वेळ फितुरीयांचें पारपत्य व्हावें.' म्हटलें आहे.

यावरून सखाराम हरि अगदीं शेवटींच हट्टास पेटून "My strength is gone and my life is going but when voice and breath fail, my fleshless bones shall still shout Rugonath Rao! Ragonath Rao!" [१] ओरडलें नसून त्यांनीं आपले प्राण दादासाहेबांच्या सेवेस १७७६ पासूनच किंबहुना त्याहिपूर्वीपासून पणास लाविले होते व एकवेळ फितुरियांचें (बारभाईंचें) पारिपत्य व्हावें म्हणजे कृतकृत्य झालों अशी त्यांची इच्छा होती हें सिद्ध होतें.

## बाबूराव हरि फुटतात.

नं. ३२० इ. स. [२] ( १७७६ ? ) चें बाबूराव हरींच्या राजकारणाचें आहे. ते आपले बंधु सखाराम हरि यांच्याएवढ्या खंबीर मनाचे नव्हते. त्यांनीं आपण सखाराम हरींकडील रदबदली करणार नाहीं आपला बचाव करावा असें सूत्र बारभाईकडे लाविलें. हें पत्र समग्रच वाचण्यासारखें आहे. तें असें:—

"श्री

विनंती. राजश्री बाबूराव हरी गोविंदराव गायकवाड यांचेबा। आहेत. त्याजकडील राऊत असतील ते व वरकडही कारस्तानी तजवीजीनें होईल ते करून फौज फोडावयाची तजवीज करून यावे, याप्रा। त्यांजकडील राजकारण आले आहे. त्यांचा बच्याव करावा, सखाराम हरि यांजकडील रदबदल करणार नाहींत याप्रा। आहे. मर्जीस आल्यास मध्यस्थासी

---

१. A History of the Marathas by James Grant Duff. Vol. II. p. 353.

२. पे. द. भा. ३६ पृ. २७६-२७७.

बोलून ते उठोन येत व फौजहि फुटे असे मध्यस्तासी बोलून करू. उतर पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. बहुत काये लिहिणें. कृपा केली पाहिजे. हे विनंती."

बाबूराव हरि याप्रमाणें फुटून आले. पण पुढें त्यांसहि कैद झालीच. तरी त्यांजवर सखाराम हरि एवढा करडा रोष नानांचा नव्हता. याचें कारण या वेळची ही धरसोड असावी.

इ. स. १७७६ पुढें रा. ब. सरदेसायांनीं प्रश्नचिन्ह[1] घातलें आहे. नं. ३२० हें पत्र ता. २४-६-७५ नंतरचें असलें पाहिजे; कारण बाबूराव हरींस त्यानंतर बारभाईंच्या हवालीं करण्यात आलें.[2]

## पुरंधरचा तह

१-३-१७७६ रोजीं पुरंधरचा तह कायम झाला. दादासाहेबांतर्फें मानाजी फाकड्यांनीं नवापूर जाळलें. तह न होता तरी हरीपंताचा जोर कमी नव्हता. ते इंग्रजांसहि भारी होते.

तहाच्या वाटाघाटींत बारभाईंतर्फें इंग्रजांस मुख्य स्थान सखाराम बापूंसच द्यावयाचें होतें कारण राज्यांत त्या वेळीं त्यांच्याएवढें वजन इतर कोणाचें नव्हतें. रघुनाथरावांची गोडीनेंच कांहीं व्यवस्था लावून द्यावयाची होती. पेशवाईचा मालक कोण व लायख कोण याचा विधिनिषेध असण्याचें त्यांस कारण नव्हतें. त्यांस आपला स्वार्थ साधावयाचा होता. आप्टण यास त्यांनीं याची जाणीव करून दिलीच होती.

पुरंधरच्या तहांतील दादासाहेबांच्या पक्षापुरतीं कलमें म्हणजे १ साष्टी किल्ला इंग्रजाकडे रहावा, २ दादासाहेबांस तीन लक्ष पंधरा हजार रुपये द साल देऊन त्यांनीं गंगातीरीं रहावें, ३ आबाजी महादेव (सोवनी), तुळाजी पवार, खरगसिंग व गारदी जमादार नूरखान यांस दादासाहेबांनीं

---

१. पे. द. भा. ३६ पृ. २७६.

२. म. रि. उ. वि. पृ. ४७.

आश्रय देऊं नये आणि ४ दादासाहेबांस इंग्रजांनीं साहाय्य करूं नये हीं होतीं.[1]

" आपटणानें तह केला. हा शेवटास जाणार नाहीं. श्रीमंतांचा तह पडल्याशिवाय साऱ्या दौलतीस चैन नाहीं. बारभाई थकले. फौजेस द्यावयास रुों नाहीं. बहुत हैराण जाहाले. यास्तव कांहीं तह पाडावा, ऐसें हरीपंत कडके व आपा बळवंत वगैरे फौजे समीप आहेत, या सरदारांचे मनांत आलें आहे. बातमी खरी आहे. अमदाबाद द्यावी, निदानी सारी गुजराथ द्यावी, आणि तह पाडावा, ऐसें आंत घाटतात. येविसीं त्याणीं पुणियाकडेहि लिहिलें असेल. अपटणाचें संमत घेऊन आह्मांसी बोलतील, ऐसें तहकीक बातमींत वर्तमान आलें."[2] असें लक्ष्मण आपाजी यांस मार्च १७७६ त लिहिलेल्या पत्रांत आहे.

पुरंधरचा तह १ मार्च १७७६ रोजीं झाल्यावर सखाराम हरि पुण्यास आले. ते व मानाजी फांकडे हुजुरांतील परत आले. पुरंदरचे तहावर सखाराम हरि गुप्त्यांची सही होती असें फॉरेस्ट व किंकेड सांगतात.[3]

" अपटणचे तहानंतर ( पुरंधरचे तहानंतर ) दादानें माधवराव नारायणाचें नांव पत्रव्यवहारांत दाखल केलेलें आढळतें. म्हणजे त्यापूर्वी त्यांचें

---

१. पुरंधरच्या तहांतील ९ वे कलम असे होतें :—" It is agreed that Raghunathrav is to disband his army within one month of this date, his followers and adherents (except the servants about his persons) are to separate also within the same time; and proclamation is to be made by the Maratha Government granting a full pardon to all the adherents and followers, and all such as have been in arms with Raghunathrav; the four following excepted, viz, Abaji Mahadev, Nurkhan Gardi, Tula Khidmutgar, and Karigsing Chokidar, who for crimes and misdemeanors committed against the State are for ever banished from the Maratha dominions"—Selections from the Letters, Despatches and other State Papers preserved in the Bombay Secretariat, Maratha Series Vol. I, Edited by G. W. Forrest, p. 278.

२. राजवाडे खं १२ ले. १४० पृ. ८८.

३. म. रि. उ. वि. पृ. १४१.

अस्तित्वच त्यास मान्य नव्हतें. मात्र पंतप्रधान किताब दादा स्वतःचे नांवास लावी." असें रा. ब. सरदेसाई लिहितात.[१]

सखाराम हरींस अटक २५ सप्टेंबर १७७६ रोजीं होईपर्यंत ते मोकळेच होते.

## अप्टणच्या गुंत्यामुळें मोंगल अनुकूल करणें प्राप्त.

लेखांक १४२[२] शके १६९८ चैत्र शु २, ता. २१ मार्च इ. स. १७७६ रोजीं लक्ष्मण आप्पाजी आंबेकर यांस लिहिलेला असून त्यांत "आपटणनें गुंता पाडला म्हणून मोगल अनुकूल करून घेणें प्राप्त जालें व मोगल मागेल तें प्राप्त " असें आहे.

## अप्टणनें आमची अब्रूच घेतली.

लेखांक १४५[३] शके १६९८ चैत्र शु ६ ता.२५ मार्च इ.स.१७७६ चा लक्ष्मण आप्पाजी आंबेकर यांस लिहिलेला आहे. त्यांत "आपटणानें आमची व जनरलाची व कौशलदारांची आबरुच घेतली. आम्ही तरी सर्वस्वें बुडालों. गुजरात अमदाबादेखेरीज सोडविली होती तेहि हातची गेली....पुढें आम्ही तेथें राहिलो तेव्हां दुसरा हुकूम आला कीं यास चौकी माणसें देऊन पुण्यास पाठवणें. तेव्हां याणीं (जनरलानीं) त्यास साफ ल्याहावें कीं आमचे घरीं जो येईल त्यास दुसऱ्याचे हातीं देणेंच नाहीं. हा दस्तुर इंग्रजी नाहीं. तरी आमचा बच्याव होऊन भडोचेसच चारसहा महिने विलायतेचा हुकूम येईतोंपर्यंत पोटाची बेगमी करून ठेवावी...परंतु शत्रूचे हातीं परिच्छिन्न देऊच नये. निदानीं यांचा उपायच नाहीं लक्ष दोन लक्ष निदानीं कर्जवाम तरी देऊन हैदराकडे तऱ्ही पोहचते करावें... दहा लक्ष सिबंदीसुद्धां बारमाई देतात. इतक्याचेच परगणे डवाई वगैरे रेवातिरीं द्यावें...निदानीं काशीप्रयागाकडे लाऊन द्यावें...पण शत्रूचे कबजात राहणें यापेक्षां जीव जाईल तर बहुत उत्तम !" असें आहे.

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. ८१.

२. राजवाडेकृत म. इ. सा. खं १२ पृ.८९.

३. राजवाडे, खं.१२ पृ.९१-९२.

पहा बारभाईच्या कारस्थानांस व जाचास श्रीमंत दादासाहिब कसे कंटाळले होते. हैदर इंग्रज पुरवले पण ह्या बारभाईचा संबंध नको. या घरच्या शत्रूंच्या कबजांत राहण्यापेक्षां त्यांस 'जीव जाईल तर बहुत उत्तम' वाटत होतें.

## बाबूराव व सखाराम हरींचें मारणे देशमुखांस पत्र.

बाबूराव व सखाराम हरींचें एक पत्र, मारणे देशमुखांस लिहिलेलें आम्हीं संशोधक, धुळें, व. १० अं. २ पृ. १६-१७ वर प्रसिद्ध केलें आहे. पण ते सबंध बाबूराव हरींच्या हातचें आहे तें श्री. गोपीनाथराव पोतनीस यांचें संग्रहांतील आहे. त्यात दिनांक छ१३ असून महिना सफर दाखल आहे. वर्ष दिलेलें नाहीं. पण शके १६९८ असावा. म्हणजे हें पत्र १० एप्रिल १७७६ चें दिसतें. त्यांत कांहीं गुप्त कारस्थानाचा उल्लेख आहे. हें कारस्थान श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबासंबंधाचें अथवा त्यांजसमेत बारभाईशीं दोन हात करण्याचें असण्याचा संभव आहे. तें असें:— "आपण घरास आले म्हणून वर्तमान यैकून परम समाधान जालें. फार दिवस तिकडेच कर्मिले (क्रमिले). आसो. पूर्वी आपला करार आम्हांसी आहे त्याजप्रमाणें आजपर्यंत आपली मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहों. हालीं आपण आले आहेत. तरी चार दिवसाचा अवकाश करून येऊन मौजे मजकुरचे साक्षीचा व गावगनाचे पाटलाचे वगैरे सर्व खानगीचा गुंता उरकावा. करारप्रों निभावावें हेंच उचित आहे. पत्राचें उत्तर आलें म्हणजे आम्हीं उभयतां[1] येतो. वरकड इकडील सर्व परस्पर कललेच असेल."

## ज्याचा हात इंग्रजांनीं धरला तो सोडला नाहीं.

लेखांक १५३, ता. १७ एप्रिल इ. स. १७७६ चा असून त्यांत असें आहे:-"आजपर्यंत ज्याचा हात इंग्रजांनीं धरिला तो सोडला नाहीं. ऐसा यांचा लौकिक ऐकत आलों ऐसें असतां, सांप्रत आम्हांस पटका बसविली. केवळ विश्वासघात, मोठे दगाबाजहि बेइमानी होत गेले, त्याच्यानेंहि कोणाचा जाला नसेल ऐसा जाला आहे...."

---

१. सखाराम व बाबूराव हरि यांचा उरवड्यास मारणे देशमुखांस भेटण्याचा उद्देश दिसतो.

इतकें झालें तरी शेवटीं दादासाहेब म्हणतातः—"परंतु सर्व भार इंग्रजावर आहे. ज्या तरेचें आमची कुमक होय ते गोष्ट त्यांनीं करावीं. त्यांचे घरींहून दुसरे जागां गेलों, ऐसें न समजावें."

याचा अर्थ काय ? याचा मतलब इतकाच कीं निरुपाय म्हणून इंग्रजांच्या आश्रयास जाणें भाग आहे. पण इतक्या निर्वाणीच्या उपायापर्यंत बारभाईंनीं प्रकरण कां येऊं द्यावें ?

## बाबूराव हरींची मातुःश्री व आप्पा बळवंत.

लेखांक ८ शके १६९८ चा म्हणजे इ.स. १७७६ चा असून तो कृष्णराव बळवत अर्थात् अप्पा बळवंत यांनीं सखाराम हरि व बाबूराव हरि यांची मातुश्री बया यांस लिहिलेला आहे. त्यांस आप्पा बळवंत मातुश्रीसमान लेखीत. बाबूराव हरीस किल्यावर घालतांच रघूस त्यांच्याकडे व हरीपंत तात्यांकडे पाठविण्यांत आले. दोघांनीं पुरंधरच्या कारभाऱ्यांस— नानांस व सखाराम बापूंस— मीड घातली कारण आप्पांचा व गुप्ते घराण्याचा फार लोभ होता. सुटका करतील अशी त्यांची अपेक्षा होती. पण मुत्सद्दी काय ऐकतात ? ते परम दुराग्रही. आप्पा बळवंतांचें समग्र पत्रच फार चित्ताकर्षक आहे. सबब तें खालीं देतों.

"गंगाभागिरथीसमान मातुश्री बया यासीः—

प्रति कृष्णराव बलवंत कृतानेक विनंति. येथील क्षेम आपले कृपेकरून सुखरूप आसों. राजश्री बाबूरावदादांस किल्ल्यावर[1] घातले म्हणून रघूस इकडे पाठविलें. त्यास रघूचे येण्यापूर्वीच आम्हांस कलतांच दादाचे सुटकेस्तव येथून पत्रें तात्याची[2] व आमची गेली आहेत त्यावरून त्याची सुटका जालीच आसेल. आसेहि करितां न सुटले आसले तर हाली पत्रें परभारा पुरंधरास पाठविली आहेत, त्याजवरून त्यांची सुटका सत्वर होईल. त्याजविसी आपण कोणे गोष्टीची कालजी न करावी. **आम्ही व बाबूराव कोणी दोन नाहीं. त्यास श्रम जाले ते आम्हांस जाले** आसेच जाणून त्याची सुटकेचा प्रकार केलाच आहे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

---

१. सुमार डिसेंबर १७७५ त मावळांतून आणून.

२. हरिपंततात्यांची.

केवढें गुप्त्यांचें आप्पा बळवंतास अगत्य ! खूस बयानें पाठविण्यापूर्वीच पुरंधरच्या मुत्सद्यांस त्यांनीं व हरिपंतांनीं परस्पर बाबूराव हरींविषयीं भीड घातली होती.

लेखांक[1] ९ शके १६९८ चा म्हणजे इ. स. १७७६ चा रबिलावलनंतरचा अर्थात् एप्रिल-मे नंतरचा असून त्यांत बकार पूर्वेकाकडून म्हणजे बापूकडून बिऱ्हाडास आल्याचा व **बकार केवळ रांड माणूस[2] कोणास भीड घालीत नाहीं. कोणी ऐकत नाहीं** हें कळवून रामचंद्ररावासह कैदेंत असल्याचे नानाप्रकार शब्दद्वार छळणूक केल्याचें लिहिलें आहे. तसेंच भाऊचा चौकडा वस्तभाव, कापड, घोडीं, उंटे सर्व विदित आहेत. लिहून देणें. नाहीं तर हाणमार होईल. बेअब्रु होऊन तुम्हांस किल्ला प्राप्त होईल (कैदेंत पडाल) वगैरे बोलल्याची हकीकत आहे.

या लेखांकावरून बाबूराव हरींस अडकविण्यांत महादजी शिंदे व नाना फडणवीस अथवा नाना फडणवीस यांचेंच अंग मुख्यत्वें होतें असें दिसून येतें. पण बापू भीड घालण्यास तयार होईनात. छळणूक राजकीय कैद्यांची कशी करीत याची कल्पना या लेखावरून येते. वस्तभाव कापड उंटे लिहून द्या नाहीं तर बेअबरु होऊन किल्ला दाखवितील म्हटलें आहे !

दादासाहेबांस स्वाधीन करून घेण्यास हरिपंत सोनगडास गेले. दादासाहेब मागें सुरतेजवळ आले; कारण कर्नल कीटिंग तेथें होता पुढील व्यवस्थेसंबंधानें दादासाहेबांच्या वतीनें सखाराम हरि व बारभाईंचे (हरिपंताचेहि) बाजूनें आपा बळवंत यांचें बोलणें सुरू झालें. (खरे १८४०, १८४२, १८४६, १८४९, १८५३)

ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ५ वा नं. १८४० ता. २७ एप्रिल १७७६ चें असून तें वासुदेव धोंडदेव यांनीं गुजराथच्या स्वारींतून गंगाधर गोविंद बाळासाहेब यांस लिहिलेलें आहे. त्यांतील मजकूरः—
"...श्रीमंतांनीं (दादासाहेबांनीं) व्याऱ्याहून कूच करून आश्विनी सुमारास

---

१. संशोधक व.१० अं.२ ऐतिहासिक लेख चर्चा—भा.२ पृ.१०.

२. एका पत्रांत असें आहेः— "बापू व नाना या उभयतांतून एकहि धिटाईचा नाहीं. मात्र उभयतांचें आपसांत ठीक आहे." —खरे, ऐ. ले. स. नं.१४०५ पृ. २२०२.

सुरतेपासून दोन कोसांवर मुक्काम केला आहे. कर्नेल कीटण सुरतेस राहून मौजे डोब्रसचे उतारास सामान लावून दिलें. कारकून इंग्रजांकडील बोलावयास आले. इकडील तिकडे गेले. राजश्री आपा बळवंत यांस सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र यांचीं पत्रें हमेश येत असतात. परतु फलितार्थ कांहींच नाहीं ! इंग्रजांचें सामान उतारास गेलें होतें तें माघारें सुरतेस आलें. त्यांचें कृत्रिमसें दिसतें. सदाशिव रामचंद्र यांस श्रीमंतांनीं दिवाणगिरीचीं वस्त्र दिलीं ! जें करणें तें मशार निल्हेनीं करावे. आठ लक्ष रुपये सदाशिव रामचंद्र याणीं श्रीमंतास दिलें..."

ले. १८४२ ता. १० मे १७७६ चा असून शिवाजी बाबाजींनीं पांडुरंगरावांस ( पटवर्धनांस ) लिहिलेलें आहे. त्यांतः— " किटण वगैरे सुरतवाले याणी राजश्री हरीपंतांस लिहिलें कीं, अतःपर लढा नाहीं. आठ दिवस वायदा आहे तों पावेतों झा(जा)ल्यास उत्तम. नाहीं तर आहीं तुम्हांस अनुकूल होतों. त्यांचें (दादासाहेबाचें) पारपत्य करूं....पंधरा दिवसांत मनसबा आटोपून फौजा देशास येतात, याप्रमाणें उभयतांनीं (कारभाऱ्यांनीं) सांगितलें."

लेखांक १८४६ ( वैनस्ती छ १९ रबिलाखर सुरू सन सबां सबैन मय्या व अलफ ) ता. २७ मे १७७६ चा असून पांडुरंगरावांस शिवाजी बाबाजींनीं लिहिलेला आहे. तो भिवडीहून पाठविलेला आहे. त्यांत असें आहे:— " राजश्री हरीपंत तात्याकडे राजश्री सखाराम हरी व मानाजी फांकडे घेऊन भेटले. सर्वत्रांस घेऊन येतों म्हणून करार करून गेले होते. ते कराराप्रमाणें लहान मोठे सरदार फौजसुद्धां आणिले ते आपल्या फौजेनजीक येऊन भेटले. श्रीमंत राजश्री **दादासाहेबांस आणावयाविसी सखाराम हरी** यांणीं खटपट फार केली. परंतु **त्यांस विश्वास न पुरून जिवास नाश होईल याजकरितां** सात आठ हत्ती व कांहीं उंटे व शागीर्द पेशाचीं माणसें व शागीर्द व आबाजी महादेव व तुळाजी पवार, खरकसिंग व नूरखान गाडदी येणेंप्रमाणें अजमासे घोडीं दोनसें व पाईचें माणूस ब्राह्मण मंडळी सात आठशें सुद्धां सुरतेंत रघुनाथपुरा म्हणोन हिंदूच तेथें राहतात त्या पुऱ्यांत जाऊन राहिले आहेत. याजउपरि इंग्रजांचे विचारें भलता ठराव जाहला तरी होईल..."श्रीमंत राजश्री नाना पुण्यास गेले

आहेत. पंधरा दिवस तेथें राहणार होते" या पत्रावरून सखाराम हरींचा विश्वास हरिपंत फडक्यांवर होता. सबब ते वकील म्हणून म्हणा मध्यस्ती करीत होते. त्यांनीं सर्वत्रांस घेऊन येण्याचा करार केला होता त्याप्रमाणें लहानमोठे सरदार आणून त्यांनीं भेटविले. दादासाहेबांस आणावयाविषयींहि त्यांनीं फार खटपट केली. परंतु त्यांस विश्वास न पुरून **जिवास नाश** होईल याजकरितां लवाजम्यानिशीं ते सुरतेस रघुनाथपुऱ्यांस जाऊन राहिले. हरिपंत व सखाराम बापू जिवास नाश करणारे नव्हते. तेव्हां त्यांचा संशय नानांवर होता असें दिसतें. गुप्ते घराण्यांत अशीहि आख्यायिका आहे कीं दादासाहेबांनीं सखाराम हरींसहि विश्वास टाकून पुण्यास जाऊं नये म्हणून सुचविलें होतें. तथापि त्यांनीं तो टाकला व ते पुढे पुण्यास व पुरंधरास गेले. पुढें परिणाम काय झाला तो जगजाहीर आहे. एकूण दादासाहेबच या बाबातींत तरी जास्त धोरणी ठरले. पुढें काय होईल त्याचा अंदाज त्यांस पाच वर्षें अगोदर करितां येई म्हणत तें खोटें नाहीं!

सदाशिव रामचंद्र[1] सुखटणकरांनीं दादासाहेबांस आठ लक्ष रुपये दिले. गोविंदराव गायकवाडाशीं संधान होतेंच. कीटिंगनें हरिपंतास लिहिलें कीं दादांची बाजू आम्हीं उचलून धरीत नाहीं. ते सुरतेहून १०।१२ मैल होते. होळकर चांदवडास आपल्या महालांत आले. दादासाहेबांचा विश्वास सखाराम हरि गुप्त्यांवर. ते हरिपंतास भेटले. श्रीमंतांस बारभाईचा भरंवसा येईना. तोतयाची गत व्हावयाची. जीव सुरक्षित नव्हता. भटकून तरी काय करणार? तेव्हां सखाराम हरि व मानाजी फांकडे यांनीं हरिपंताबरोबर बारभाईकडे जावें असें ठरलें. पण गुप्त्यांनीं ही जोखीम घेऊं नये असें शेवटपर्यंत दादासाहेब सांगत होते. पण बुद्धिः कर्मानुसारिणी! बारभाईकडे येऊन कारागृहवास भोगावयाचा होता व प्राण त्यांचे पायींच जावयाचा होता. उपाय काय? असो.

हरिपंत फडके, सखाराम हरि गुप्ते व मानाजी शिंदे (फांकडे) यांनीं मेच्या शेवटीं शेवटीं गुजराथ सोडली. पुरंदरास येण्यास ता. १८ जून १७७६ उजाडली.

---

१. सुप्रसिद्ध रामचंद्र बाबा सुखटणकर यांचे पुत्र.

सखाराम हरीमार्फत दादासाहेबांचें मन वळवून त्यांस पुण्यास आणण्याचे हरप्रयत्न हरिपंतांनीं केले. तथापि दादासाहेबांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. सुरतेंत रहाणें त्यांनीं नाइलाजानें पत्करिलें. हत्ती, घोडे, उंट, शागीर्द घेऊन त्यांनीं ८०० लोकांसह ज्या ठिकाणीं वास केला त्यास अद्याप "रघुनाथपुरा" म्हणतात. इंग्रजांनीं फक्त दोनशें माणसांची बेगमी केली.

मानाजी फांकडे, सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र सोडून बाकीच्या सरदाराच्या भेटी श्रीमंतांनीं पुरंधर किल्ल्याखालीं ता. १९ जून रोजीं घेतल्या. या तिघांस श्रीमंत मागून भेटले. बारभाईस यांची फार भीति वाटत होती. पण आपण सर्वांबरोबर आलों असतां कारभाऱ्यांनीं पंगतीप्रपंच केला याची चीड या तिघांस आली व दादासाहेबांनीं कां जाऊं नका सांगितलें व ते कां आले नाहींत याची जाणीव त्यांस पुरेपूर झाली.

बारभाईस वाटलें आपला वचक चांगला बसला. दादासाहेबांनीं दाद दिली नाहीं. तथापि त्यांचा हक्क शाबीत झाला नाहीं व ते पडले असें वाटणें साहजिक होतें.

दादासाहेबांस आपल्या तावडींत हे बारभाई सांपडविण्याची खटपट करीत आहेत व मुंबईकर कलकत्तेकर नव्हे विलायतेपर्यंत पत्रें सारखीं पाठवीत आहेत तेव्हां त्यांच्या जिवास हे अपाय करणार असा समज सर्वत्र पसरला. तसें पाहिलें तर मोरोबा फडणीस, सखाराम बापू, बजाबा पुरंदरे हे तरी कोठें खूष होते ? व यांचें तरी कोठें जमत होतें ? यांचीं कारस्थानें चालूच होतीं. नानांस कोठें यांचीं मनें वळवितां आलीं ? त्यांस पाहिजे होती सर्व सत्ता आपल्या हातीं.

लेखांक १८४९ शिवाजी बाबाजींनीं पांडुरंगरावांस ता. ५ जून इ. स. १७७६ रोजीं (पैवस्ती तारीख २३ रबीलाखर सुरू सन सबा सबैन मय्या व आल्लफ) लिहिलेला असून त्यांत कांहीं माणसांशिवाय वरकड झाडून लावून दिल्याचें वृत्त आहे. सलुखाचें राजकारण लावून बंदोबस्त करून घेणार.... आतां दरमहा घेऊन कोठें स्वस्थपणें रहावें असा विचार होईल... हरीपंततात्या कूच करून सोनगडास आले. आतां राजश्री

हरीपंताकडील फौज येण्याच्या लक्षावर सारा मनसबा आहे" असा मजकुर आहे.

लेखांक १८५३ शिवाजी बाबाजीनींच पांडुरंगरावांस ता. २३ जून इ. स. १७७६ रोजीं ( पैवस्ती छ. १२ जमादिलावल सन शीत सबैन. आषाढमास) भिवडीहून लिहिलेला आहे. त्यांत राजश्री हरिपंत तात्या शुद्ध द्वितीयेस किल्ल्याखालीं– अर्थात् पुरंधर किल्ल्याखालीं– आले. श्रीमंत राजश्री नाना तृतीयेस प्रातःकाळींच नारायणाजवळ म्हणजे नारायणेश्वराचे मंदिराजवळ आले. किल्ल्याखालीं श्रीमंताचे डेरे दिले. श्रीमंत खासा व मातोश्री व राजश्री सखारामपंत तृतीया बुधवारीं दोन प्रहरीं किल्ल्याखालीं आले. डेऱ्यांत सरकारच्या भेटी झा(जा)ल्या. श्रीमंतांनीं लहान मोठ्यांस आपल्या हातीं विडे दिले. मुजरा सर्वांचा घेतला... राजश्री मानाजी शिंदे आदिकरून लहान मोठ्यांच्या भेटी जाल्या... राजश्री सदाशिव रामचंद्र व सखाराम हरी या उभयतांच्या भेटी जाल्या. **अशा दाटींत त्यांच्या भेटी ठीक नाहीं हें चित्तांत आणून समजोन राहविले.** उभयतांची भेट एक दिवस स्वतंत्रपणें करूं म्हणोन राजश्री हरिपंत तात्यांस सांगितले. उभयतांस फार वाईट वाटले जे लष्करासमागमें आपण आलों असतां समारंभाचे वेळीं निवड झाली म्हणोन फार श्रमी झाले या दोघाचा हा मोठाच उपमर्द करण्यांत आला. तो त्यांस कसा सहन होणार! अशा अनेक तऱ्हेनें सखाराम हरींस दुखविण्यांत आलें.

## सखाराम हरींच्या मातुःश्रीची मोकळीक.

पे. द नं. ३०६ ता. ११९।१७७६ च्या गोविंदराव मोरे मुतालिक हवालदार [व] कारकून किले सिंहगड यास माधवराव नारायणांनीं लिहिलेल्या पत्रांत मल्हारराव भगवंत याचे बाइकोची व बाबूराव आणि सखाराम हरींची मातुश्री यांची मोकळीक झाल्याचा उल्लेख आहे तो असाः– "रा। मल्हारराव भगवंत याचे बाइकोविसी व बाबूराव हरी व सखाराम हरी याचे मातुश्रीस हजीर जामीनकीचे राजश्री विठल येसवंतराव खासनिसी याचे कागद लेहून किले मजकुरी घेतले आहेत, त्यास उभयतांचे मुलामाणसांची व वस्तभावेची मोकलीक जाहली. सा। मारनिलेचे जामीन कतबे तुम्हांजवल किले मजकुरी असतील ते याचे यास माघारे देणें"

९८९८ डॉ. ५. ९७१९०

## सखाराम हरींची अटक (पुरंधरावर).

ऐ. ले. सं. भा. ६ लेखांक ८९४ हें पत्र शिवरामपंतांनीं पांडुरंगराव पटवर्धनांस ता. २७ सप्टेंबर १७७६ रोजीं मिरजेस लिहिलें आहे:[१]—विज्ञापना. आम्हीं काल पुण्याहून आलों. परवां संध्याकाळीं जाहलें वर्तमान: शिंदे[२] दोन प्रहरीं भोजनास किल्यावरी[३] आले. ते चार घटका रात्र पावेतों किल्यावरच होते. बोलून चालून खालीं गेले. सखाराम हरींस श्रीमंतांचीं[४] पत्रें आलीं होतीं. त्यांचीं उत्तरें लेहून दिल्हीं. त्यांत फितवा फौजेंत केल्याचा व फौज नवी ठेवितों असे व कित्येक प्रकार लिहिले तें पत्र सांपडलें. त्याजवरून मशारनिल्हेस किल्यावरी बोलावून आणिलें. 'श्रीमंताचें पत्र आलें होतें कीं काय' म्हणून पुसिलें. त्यांनीं 'पत्र आलें' म्हणून सांगितलें. 'उत्तर काय दिलेंत ?' 'उत्तर दिलें नाहीं' म्हणून सांगितलें. तेव्हां पत्र त्यांच्या हातचें दाखविलें. हें कोणीं लिहिलें ? तेव्हां जाब काय करितात ! तेच समयीं बेडी घातली. गोट त्याचा खालीं होता तेथें चौक्या पाठविल्या. पुतण्या[५] खालीं होता तो धरून आणून कैद केला. बाबूराव हरीकडील माणसें धरावयासी जनार्दन राम वगैरे सात आठशें राऊत मावळांत[६] गेले आहेत. आणखी कोण कोण फितव्यांत आहेत न कळे. शोध करितात. ठिकाण लागल्यास पारिपत्य करितील. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. किल्ल्यावरी बोलावूं आलें[७] आहे याजकरितां तांतडीनें किल्ल्यावरी गेलों. आपण सहस्र पत्रांच्या जागां हें पत्र मानून त्वरा करून आंब्या घांटास यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. हाच मजकूर म. रि. म. वि. ४ पृ. २९२ वर आहे.

या पत्रांत ता॥ २५ सप्टेंबर सन १७७६ रोजीं पुरंधरावर सखाराम हरींस बोलावून आणून फौजेंत दादासाहेबांच्या वतीनें फितवा केल्याबद्दल व नवी फौज ठेवितों असें त्यांस लिहिल्याचें त्यांच्या हातचें पत्र सांपडल्यावरून महादजी शिंद्यांनीं बेडी घालून पुरंधराखालीं त्यांचा गोट होता तेथें

१. पृ. २६७५–२६७६. २. महादजी शिंदे. ३. पुरंधरावर. ४. रघुनाथराव दादासाहेबांचीं. ५. बाबूराव हरीचा पुत्र. ६. उरवड्यास वगैरे. ७. शिवरामपंत पुरंधराखालीं सासवडास वगैरे असावेत.

चवक्या पाठवून पुतण्यास धरून आणल्याचा उल्लेख आहे. तसेंच पांडुरंगराव पटवर्धनांस दादासाहेबांच्या भीतीनें आंब्या घांटास त्वरेनें बोलाविल्याचें दिसतें.

पुरंधराखालीं श्रीमंत सवाई माधवरावांच्या भेटी करविल्या त्या वेळीं सखाराम हरींस वगळून त्याचा अपमान केल्याचा हा असा परिणाम झाला ! त्यांस बारभाईंच्या फौजा आपल्या बाजूस वळवून व नवीन ठेऊन दादासाहेबांस पुण्यास आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटूं लागलें.

## लक्ष्मण आप्पाजी आंबेकर व सखाराम हरि यांचा पत्रव्यवहार. आंबेकरांचे वंशज.

लक्ष्मण आप्पाजी आंबेकरांशीं सखाराम हरि गुप्ते यांचा पत्रव्यवहार झाला तो व्यवस्थित रीतीनें १२ व्या खंडांत प्रसिद्ध करण्याचें श्रेय कै. वि. का. राजवाडे व भा. इ. सं. मं. चे चिटणीस आमचे मित्र श्रीमंत तात्यासाहेब मेहेंदळे, आप्पा बळवंतांचे वंशज, यांस आहे. हे सर्व कागद चिंतो विठ्ठल रायरीकरांच्या दप्तरांतील आहेत. श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांची मदत प्रकाशनाचे बाबतींत झालीच आहे.

लक्ष्मण आप्पाजी आंबेकर हे देशस्थ ब्राह्मण. चिंतो विठ्ठल रायरीकरांच्या वशिल्यानें रघुनाथराव दादासाहेब यांच्या नोकरींत आले.[1] ते दोन वर्षें मुंबईकर इंग्रजापाशीं त्यांची वकिली करीत होते. पुढें ते त्यांचे कारभारी होते. त्याचे वंशज आपल्या इनामगांवीं, पारनेर तालुक्यांत साकोरें येथें, राहतात. त्यांच्यापैकीं एक रेजिस्ट्रेशन खात्यांत होते. आतां ते सेवानिवृत्त आहेत. आम्ही रेजिस्ट्रेशन इन्स्पेक्टर असतां ते राहुरीस कामावर होते. मध्यें पुण्यासहि भेटले होते. त्यांचे संग्रहीं थोडेबहुत कागद आहेत. ते तपासावयाचे आहेत.

## कारागृहवासास राजापुरकरांची मदत.

रावबहादुर गुप्ते आपल्या सखाराम हरींच्या संक्षिप्त चरित्रांत लिहितात :

After accomplishing this feat for diplomacy, and finding that Sakharam was a powerful man who would

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. ८२.

६४४२

some day be a danger to himself, he (Nana Phadnavis) decided on capturing him, but it was no easy task to lay hands on so brave and undaunted a character. "From the known bravery of the General he could not be taken without desperate resistance and meet blood-shed." He therefore resorted to treachery. Sukharam was one evening invited to dinner by one of the creatures of Nana and given opiates in his food. While asleep under the influence of the drug, he was captured and confined in a strongly guarded fortress, placed in a dungeon, given the coarsest of food to eat and clothes to wear, and ill treated

मादक पदार्थ सखाराम हरींस अन्नांत घालून त्याचा अम्मल असतां त्यांस पकडून देणारा गृहस्थ नानांचा हस्तक दुसरा तिसरा कोणी नसून सखाराम हरि गुप्त्यांचा अत्यंत जवळचा नातेवाईक शालक भास्करराव नारायण राजापुरकर नांवाचा होता ! त्याची काय ही अधम बुद्धि ! ! सखाराम हरींची पुण्यतिथि साजरी करण्यास आम्ही १९३९ सालीं जमलों होतों. आम्ही त्या वेळीं अध्यक्ष होतों. ही पुण्यतिथि साजरी करण्याची पुष्कळशी खटपट याच राजापुरकरांच्या सत्त्वशील वंशजानें केली होती. तेव्हां हजर असलेल्या एका इसमानें असे उद्गार काढिले कीं, सखाराम हरि गुप्ते यास नाना फडणीसास पकडून देण्याचें जें पाप या राजापुरकरांच्या पूर्वजांस लागलें होतें त्याचें परिमार्जन आज त्यांच्याच एका वंशजानें ही तिथि साजरी करून केलें ही खरोखर आनंदाची व कुतूहलाची गोष्ट होय. ज्याप्रमाणें चंद्रराव मोऱ्यांचे वंशज पुढें राजाराम छत्रपतींस मिळाले त्याप्रमाणें ही गोष्ट झाली.

## राजापुरकरांनीं केलेला विश्वासघात.

सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांच्या चरित्रांत असें दिलें[१] आहे:— "पुढें थोडयाच दिवसांनंतर म्हणजे सन १७७६–७७ चे सालीं तो

१. कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें, सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांचें चरित्र पृ. १२.

**उदार, प्रामाणिक व गंभीर पुरुष जो रघुनाथराव** त्याच्या उत्कर्षांचा लय झाल्यानंतर सन १७७८ सालीं त्या दुष्ट व कपटी नाना फडनविसानें त्याची बहुतेक मंडळी मोरोबादादा फडनवीस, बजाबा पुरंधरे वगैरे सर्वांस कैद करून निरनिराळ्या किल्ल्यावर ठेविलें. ह्याच वेळेस सखाराम हरींसही कैद करण्याचा विचार होता. परंतु सखाराम हरि हे शूर व आपल्या जिवावर उदार असल्याकारणानें जिवंत हस्तगत होणें अगदीं अशक्य समजून त्या दगलबाज अविश्वासू नाना फडनविसानें आपल्या कृत्रिमाच्या योगें सखाराम हरी यांचे शालक भास्करराव राजापुरकर यास लालूच दाखवून सांगितलें कीं सखाराम हरींस तुम्हीं कैद करून आम्हांस द्यावेत. आम्ही तुमचें कल्याण करूं. यावरून भास्करराव नारायण यांनीं सखाराम हरींस मेजवानी केली. तींत निशा येण्याचे ( म्हणजे पदार्थांत भांग वगैरे घालून ) पदार्थ तयार करविले व ते त्याजकडून आग्रहानें खावविले. जेवण झाल्यानंतर सखाराम हरींस त्या निशेच्या पदार्थांमुळें निद्रेची गुंगी आली व ते तेथेंच एका खोलींत निद्रिस्थ झाले. त्या निशेच्या पदार्थांच्या योगें ते अगदींच बेफाम झाले आहेत असें पाहून भास्कररावानें नानास सुचविलें कीं, आम्हीं आमचें काम केलें, आतां आपणांस काय तजवीज करणें असेल ती करावी. तेव्हां नानानें पांच चार लष्करी अधिकारी बोलावून त्यांस सांगितलें कीं सखाराम हरींस तुम्हीं या वेळेस जाऊन कैद करावेत. हें बोलणें ऐकून ते पाच चार बांड लष्करी लोक म्हणाले कीं, सरकारी हुकुमाप्रमाणें आम्ही जाण्यास तयार आहोंत. आम्ही आमचे जिवाविषयीं भितों असें नाहीं, परंतु एवढेंच कीं सखाराम हरीसारख्या शूर धैर्यशील व प्राणासहि तुच्छ मानणाऱ्या वीरास जिवंत हस्तगत करणें हें कार्य सिद्धीस जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. याउपर आपली मर्जी. हे त्यांचें बोलणें ऐकून नानानें त्यास धीर देण्याकरितां सांगितलें कीं याबद्दलचा आम्हीं उत्तम रीतीनें बंदोबस्त केला आहे. तुम्ही आपले भरवंशाचे कांहीं लोक घेऊन जाऊन त्यांस एकदम कैद करावें म्हणजे झालें. तेव्हां त्या लोकांनीं ज्या ठिकाणीं सखाराम हरी निशेच्या गुंगींत बेफाम निद्रिस्थ होते त्या ठिकाणीं जाऊन एकाएकीं छापा घातला आणि त्यांस कैद केलें. आपण गफलतीनें त्याचा

हस्तगत झालों हें पाहून सखाराम हरी त्यांस म्हणाले, तुम्हीं शूरत्वाचें काम न करितां दगलबाजी केलीत. असो. श्रीची इच्छा."

श्री. वि. स. वाकसकर आपल्या "अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रां"त म्हणतात कीं, 'सखाराम हरींस त्यांचें शालक भास्करराव राजापुरकर यांनीं नाना फडणीसाच्या म्हणण्यावरून विश्वासघातानें पकडविलें अशी एक समजूत प्रचलित असून चांद्रसेनीस कायस्थ प्रभूंच्या इतिहासाच्या साधनांत ती नमूद केलेली आहे. परंतु ती अगदींच निराधार आहे.' परंतु ही समजूत राजापुरकर घरण्यांत आजहि प्रचलित आहे. ऐ. ले. सं. भा. ६ ले. ८९४ त "मशारनिल्हेस किल्यावही बोलावून आणिले. ... गोट त्याचा खालीं होता. तेथें चौक्या पाठविल्या पुतण्या खालीं होता तो धरून आणून कैद केला" असें आहे. किल्ला म्हणजे पुरंधर. गोट नारायणेश्वराच्या देवळाच्या आसपास होता. तेथें पकडून पुरंधर किल्यावर नेलें. तेथें पत्र दाखवून बेडी घातली. हा प्रकार रात्रींच झाला. बेहोष-स्थितींत रात्रींच सखाराम हरि होते. मग प्रचलित समजूत अगर शालक राजापुरकर गोटांत असणें अशक्य होतें काय? शिवाय केतवळेकर, पुरंधरे, वडवाथरकर गुप्ते यांचीं घरें केतवळ्यास व सासवडास होतीं. ते सखाराम हरींचे अगदीं जवळचे भाऊबंध. त्यांचे घरीं सखाराम हरि असणें शक्य आहे. खेरीज रा. ब. सरदेसाई म्हणतात कीं मोरोबांच्या[1] हातीं सत्ता येतांच त्यांनीं दादांचे साथीदार सखाराम हरि वगैरे यांस मोकळें केलें. त्यांस पुन्हा मोरोबास धरलें त्या वेळीं कैद केलें असल्यास त्यांत राजापुर-कराची मदत घेणें शक्य आहे. मात्र येथें हें नमूद करणें भाग आहे कीं सखाराम हरींस बंधमुक्त केल्याचा दाखला अथवा आख्यायिका आंबे-गावकर अथवा पुरंधरे—केतकावळेकर-वडवाथरकर घराण्यांत नाहीं.

## सखाराम हरींस बेडी घालून नगरच्या किल्ल्यांत पाठविलें.

अटक केल्यानंतर सखाराम हरि, बाबूराव हरि, त्याचे पुत्र दौलत बाबूराव व महिपत बाबूराव आणि कारखानीसांपैकीं रामचंद्र विठ्ठल

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. १२९.

यांची रवानगी निरनिराळ्या किल्ल्यांवर करण्यांत आली. पण त्यांतल्या त्यांत नानांचा कटाक्ष सखाराम हरींवर विशेष होता. त्यांस खाऊं का गिळूं असें नानांस झालें होतें. त्यांस थोरले बाजीराव, थोरले माधवराव यांनीं नांवारूपास आणून भ्रातृवत् पुत्रवत् त्यांजवर प्रेम केलें. रघुनाथ-रावदादांनीं त्यांस सरदारी दिली व त्यांनीं व आनंदीबाईनीं त्यांस एका कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागविलें, जखमा झाल्या तर त्यांचा गौरव करून काळजी घेण्याविषयीं पत्रें लिहिलीं, निष्ठेबद्दल पाठ थोपटली. पण नानांनीं काय केलें? तर ते आपल्या पक्षास येईनांत तेव्हां खालील महाभयंकर हुकूम महादाजी नारायणाचे नांवें काढिला. तो पे.शे. Vol. VIII. सवाई माधवराव पेशवे भा. ३ पृ. ७४ वर दाखल असून जनार्दन आप्पाजीच्या कीर्दीपैकीं आहे. हा सबा सबैन मया व अलफ साबान २० म्हणजे ता. ४ ऑक्टो-बर इ. स. १७७६ चा आहे. तो असा:—सखाराम हरी फितुर करीत होते. सबब बिडी घालून तुम्हांकडे किल्ले नगर येथें अटकेंत ठेवावयास पाठविले आहेत, त्यास पोहोंचवावयास कृष्णाजी मैराळ कारकून, व स्वार व गाडदी दिल्हे आहेत. त्यांस पक्क्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेऊन भोजन घालीत जाणें. परभू कारकून त्यांजवळ जाऊं न देणें. चौकीस माणसें ठेवाल तीं वरचेवर बदलीत जाणें. मराठा एक माणूस खिजमतगारीस ठेऊन देणें. धोत्रें अगर शेलापागोटें लागल्यास देणें. जेवणाची व वस्त्रपात्राची आबळ न करणें. बेडी नेहमीं असों देणें. सखाराम हरी खळ्या **राजकारणी आहे.** कोणे गोष्टीस चुकणार नाहीं. याजकरितां एक कोठडी करून त्यांत घालून बाहेरून कुलप घालीत जाणें! एकास त्याजवळ जाऊं न देणें! याचे गुण तुम्हांस ठाऊकच आहेत. याकरितां फार चांगला बंदोबस्त करणें म्हणोन, महादाजी नारायण यांचें नावें.

परवानगी रुबरू सनद

या मानानें हल्लींच्या राजकीय कैद्यांस दिलेल्या शिक्षा किती सौम्य? हल्लीं परकीयांचें राज्य व त्या वेळीं स्वराज्य! श्रीमती आनंदीबाईनीं म्हट-ल्याप्रमाणें 'तस्मात् दैवयोग!' हल्लीं अनेक माणसें तैनातीस मिळतात.

तर नानांनीं या एकनिष्ठ सरदारांस एकच माणूस नेमून देऊन त्यांस एका कोठडींत घालून तीस बाहेरून कुलुप घालविलें. एकानें त्यांचेजवळ जावयाचें नव्हतें. जणूं काय हे सरदार त्यास मारून टाकितील. प्रभुकारकुनानें नानें तर त्यांजवळ फिरकावयाचेंच नव्हते.

आपल्या पक्षास मुत्सद्दी न येई तर वागव त्यास गुराप्रमाणें ती नानांची नीति ! हल्लींचा काळ फार चांगला. श्री. तात्यासाहेब करंदीकरच आम्हांस एकदां सांगत होते कीं तुरुंगांत आम्हांस (तात्यासाहेबांस) साधा चहा टाकवून स्पेशल चहा करवून देत असत. तसा घरींहि मिळत नाहीं.

रा. ब. सरदेसाई लिहितात —"...परंतु बारभाईनीं कारभाराच्या व्यवस्थेपेक्षां बंडखोरावरच मुख्य शिस्त धरली, त्यामुळें सर्व राष्ट्रांत नऊ वर्षें भयंकर गोंधळ माजून अनेक पेंच व फसगती झाल्या, आणि बाकीचा कारभार बंद पडल्यामुळें वसुलाचें नुकसान होऊन पैशाची अडचण वाढली. ... पूर्ण राजनिष्ठ असा बहुधा कोणी राहिलाच नाहीं. एकंदर वातावरण भीतिप्रद व क्षुब्ध राहिलें. मोरोबा, सखाराम बापू, बजबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल, सखाराम हरि, मानाजी फाकडे, धायगुडे, आनंदराव गोपाळ, विसाजी कृष्ण, रघुनाथ नारायण असल्या अनेक कर्तबगार माणसांवर वहीम आलेला पाहून जनतेस इकडे आड आणि तिकडे विहीर असें होऊन गेलें; आणि नानांस सुद्धां केवळ महादजीचीं आर्जवें करून रहावें लागलें."[1]

## बाबूराव हरि, दौलत व महिपत बाबूरावांसहि किल्ले दाखविले.

बाबूराव हरींस–सखाराम हरींच्या वडील बंधूस–ज्यांस 'एकांडे'[2] म्हणत त्यास– बिडी घालून किल्ले सिंहगडावर विठ्ठल यशवंत कारकून व स्वार व गाडदी यांजबरोबर पाठविलें. त्यांजवळहि प्रभु कारकुनाने जावयाचें नव्हतें. चौकीचीं माणसें वरचेवर बदलावयाचींच होतीं. शेलापागोटें लागेल तें लिहून पाठवावयाचें होतें. कोठडींत कोणाचा प्रवेश होऊं द्यावयाचा

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. ८.

२ बाबूराव हरींस एकांड्या म्हणत.—म. रि. म. वि. ४ पृ. २७

नव्हता व त्याचा विश्वास धरावयाचा नव्हताच. यांजवर नानांची मेहेरबानी म्हणजे बाहेरून कुलूप लावावयाचें नव्हतें ! आणि त्यांस जेवावयास ब्राह्मणाकडून घालवावयाचें होतें. म्हणजे जवळ जवळ प्रभुतऱ्हेचें जेवण त्यांस द्यावयाचें होतें. हीच नानांची कृपादृष्टि ! !

दौलत बाबूरावांस बिडी घालून किल्ले चाकण येथें अटकेंत ठेवलें. प्रभु कारकुनानें जवळ जावयाचें नव्हतेंच ! चौकीची माणसें बदलावयाची होती. खिजमतगारीस एक मराठा माणूस पण वतनदार ठेवावयाचा होता.

महिपत बाबूरावास बिडी घालून त्रिंबकचा किल्ला दाखविला. प्रभु कारकून जवळ जाऊंच दिला नाहीं ! वस्त्र पात्र कार्याकारण दिलें.

पुढें सखाराम हरीस पुरंधर किल्ल्यावर पोहोंचविलें. तेथून त्यांस धनगड दाखविला.

धनगडीं सखाराम हरीस मोकळें करण्याचा मनसबा रामचंद्र गोविंद कारखानीस व इतर लोक यांनीं केला त्याबद्दल चौघांस तोफेच्या तोंडीं उडवून देण्याचें फर्मान निघालें व चौघांचे उजवे हात तोडविले.[1] याबद्दलची आज्ञा पेशवे रोजनिशी VIII Sawai Madhavrao Peshwa, Vol. III. p.77 वर मुतालकी रोजकीर्दीपैकीं दाखल आहे ती अशीः—८७६ ( ६२२ ) मौजे धनगड येथील लोक रामचंद्र गोविंद, माजी, कारखानीस यांनीं इंग्रजांचे गडबडेंत सालगुदस्ता फिताऊन सखाराम हरी अटकेस होता, त्यास मोकळा करून किल्ला बदलावा असा मनसबा करून बाहेरील लोक बीरदीचे रानांत आणून लबाडी करीत होता तो इंग्रजाचा मोड जाहला तेव्हां रानांतील लोक पळून गेले. पुढें फितुराचें वर्तमान तुम्हांस कळल्यावर तुम्हीं चौकशी केली. तो आठ आसामी फितुरी. त्यांपैकीं कारखानीस मजकूर व जावजी मापारी वरदेकर हे दोघे लष्करांत जाऊन येऊन बातमी नेत होते, त्यामुळें पळून गेले. बाकी सहा असामी फितुरी तुम्हांस सांपडले, ते हुजूर पाठविले. त्याचे अपराध मनास आणून शासनाविशीं कलमें.

---

१ म. रि. म वि ४ पृ. २९२.

किता आसामी

.......................

१. खंडोजी सेजवळकर, सयाजी सुर्वे याचा भाऊ, मयाजी मजकुराचे ऐवजीं चाकरीस होता, त्यास सखाराम हरी यास मोकळा करावयाच्या मनसुब्यांत तूं आहेस कीं नाहीं असें जैतोजी जांबुळकर व देवजी महाडीक यांणीं पुशिलें असतां तुम्हांस कळविलें नाहीं. सबब शासनास योग्य. परंतु भावाचे मुबदला नव चाकरीस आला, सबब न सांगितलें. परंतु कारखानिसाचे निरोप लोकास सांगत होता, असा फितुरीचा मिलाफी, सबब उजवा हात तोडणें.

——

२

असा हा एकजात गुप्ते मंडळीचा छळ नानांनीं केला. गुप्ते घराण्यांतील गृहस्थ पाहिला कीं बाळाजी विश्वनाथांपासून तहत राघोबा दादासाहेबां-पर्यंत— नव्हे दुसऱ्या बाजीराव साहेबांपर्यंत—प्रथम कारखानिशी द्यावयाची, सरकारी नोकरी द्यावयाची, घर बांधून द्यावयाचें, त्याजवर मेहेरनजर ठेवावयाची तर पाषाण हृदयी नानांनीं हे असे हाल त्यांचे केलें ! कां तर ते दादासाहेबांस सोडून नानांस मिळेनात !! बारभाईचा पक्ष स्वीकारीनात !!!

नगरच्या किल्ल्यातहि सखाराम हरींचे मनस्वी हाल करण्यांत आले. त्या वेळीं नगरचे किल्लेदार नगरकर होते. कान्हूर ( पारनेरचें पुढें ) हेंहि त्यांचें गांव. त्यांचे वंशज बारामतीस शिक्षक आहेत. आपल्या घराण्याचा इतिहास ते लिहीत आहेत. सखाराम हरींस नगरच्या किल्ल्यांत कशा प्रकारें वागविलें याबद्दल सुटलेले आणखी हुकूम त्यांच्या दप्तरांत आहेत. ते हुडकून काढून श्री. नगरकर आमचेकडे पाठविणार होते. तथापि ते अद्याप हातीं आले नाहींत. आल्यावर त्यांविषयीं अधिक लिहितां येईल. [महाराष्ट्र मासिक व. १० अं. ७ सप्टेंबर १९४५, पृ. २८ हि पहा.]

रा. ब. सरदेसाई म. रि. उ. वि. १ मध्यें पृ. ८१ वर लिहितात— "सखाराम हरींस प्रथम सन १७७६ च्या सप्टेंबरांत कैद झाली. ता. ४-१०-१७७६ रोजीं त्यास नगरचे किल्ल्यावर पोंचाविलें. तेथून एक

वर्षानें ता. १८-१०-१७७७ रोजीं त्यास पुरंदर येथें रवाना केलें व तेथून लवकरच घनगडास पोंचविलें. हा घनगड किल्ला मुळशीपासून आठ मैलांवर एकान्तांत अवघड जागीं आहे. सखाराम हरीनें वरील सर्व ठिकाणीं दादाशीं अनुसंधान ठेवून कांहींना कांहीं फितुर केला, त्यामुळें त्याची फिरवाफिरव करावी लागली. ता. २५-७ १७७८ रोजीं घनगडावर त्यास मातुश्रीच्या श्राद्धाची व्यवस्था करून देण्यांत आली. पुढील सालीं तळेगांवावर दादा कबजांत आल्यावर सखाराम हरीची सुटका करण्याचा निश्चय ठरला होता, इतक्यांत दादा पळून सुरतेस गेला, आणि त्याच वेळीं सखाराम हरीनें घनगडावर फितवा करून पळून जाण्याची सिद्धता केली. तेव्हां ता. ८-५-१७७९ रोजीं त्यास नवीन भारी बेडी व कदान्न देण्याची कडक शिक्षा झाली. त्यायोगें तो तत्काळ हैराण होऊन मरावयास टेंकला. त्याच्या बायकोनें ही स्थिति ऐकून बारा हजारांचा जामीन देऊन भेटीची परवानगी मिळविली. ता. २४—१०—१७७९ रोजीं परवानगी मिळाली व बेडी काढण्याचा हुकुम झाला. पण बायको जाऊन भेटण्यापूर्वीच त्यानें पायांतील बेडीवर कपाळ आपटून प्राणत्याग केला; बायकोची गांठ पडली नाहीं. ”

सखाराम हरीसारख्या स्वामिनिष्ठ सरदारानें पैशाकरितां, जहागिरीसाठीं, फार काय प्राणासाठीं, रघुनाथराव दादासाहेबांचा पक्ष सोडून बारभाईच्या कटांत येणें अशक्यच होतें. त्यांस बाहेर येऊं द्यावयाचें नव्हतें तर किल्ल्यावर चालावयाचें होतें व नीट वागवावयाचें होतें. असे जनावरासारखे हाल करावयाचे नव्हते. छळाच्या भीतीनें वश होण्याच्या वर्गांतील हे सरदार नव्हते. यांनीं शिद्दी रहिमानावरील स्वारींत लढाईची शर्थ केली होती. हैदरची त्रेधा उडविली होती. अटकेपार झेंडे लाविले होते.

## ‘ फितुर ’ ‘ फितुर केला ’ याचा अर्थ. बारभाईस पेशवाई गुंडाळावयाची होती.

‘ फितुरी, ’ ‘ फितुर केला ’ हे शब्द तारतम्ययुक्त आहेत. नारायणराव मारले गेले नसते व रघुनाथराव दादासाहेब यांचा जय झाला असता म्हणजे हाच राजपक्ष झाला असता आणि नाना, हरिपंत आणि

इतर नानांचे साक्षीदार फितुरी ठरले असते. राघोबा दादा, आनंदीबाई, सखाराम हरि आपल्या खाजगीच[१] नव्हे तर इंग्रज, शिंदे, होळकर, निजाम वगैरेंस लिहिलेल्या राजकीय पत्रांत सखाराम बापू, हरिपंत फडके, इतर बारभाई यांस 'फितुरी'च उल्लेखितात.[२] त्यांस दादासाहेब गादीवर नको होते व सर्व सत्ता गंगाबाईच्या अवगुंठनाखालीं अथवा त्यांच्या मुलाच्या नांवावर आपल्या हातीं ठेवावयाची होती. इंग्रजांच्या वकिलातीचा मुख्य ( Resident ) म्हणतो कीं त्यांस पेशवाईच गुंडाळावयाची होती.[३] मग थोरले बाजीराव व दादासाहेब यांच्या निस्सीम सरदारांस तें कसें पहावेल ?

चिंतो विठ्ठल रायरीकरांकडे बातमीकरितां माणसें पाठविलीं होतीं. त्यांचें बातमीपत्र कै. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या म. इ. सा. च्या १२ व्या खंडांत लेखांक २८७ म्हणून छापलें आहे. त्यांत काय म्हटलें आहे पहा:—

रा. चिंतो विठ्ठल यांजकडे बातमीकरितां माणसें पाठविलीं होतीं त्यांतून एक माणूस त्यांनीं आपलेजवळ ठेवून घेतला. ते सासवडानजीक आणि एक माणसासमागमें निरोप सांगून पाठविला कीं माचीवाल्यांनीं बंगालेवाल्यास समजाविलें कीं हा मूल जो आहे हा **वडील घरचा टिक्याचा खावंद आहे.** श्रीमंतास पेशवाईचा संबंध नाहीं. त्यावरून येथें आफटण आलियावर आपटणानें म्हटलें कीं **मूल तरी लहान दौलत चालवावयास योग्य श्रीमंत दादासाहेब ते आहेत. थोरकृत-कर्मे हजर आहेत ते दौलत करितील.** बारभाईनीं उत्तर केलें कीं **त्यांनीं नारायणरावांस चांगलें न पाहिलें.** ते या मुलास आम्हांस

---

१. राघो केशवांस दादासाहेबांनीं लिहिलेलें पत्र पहा. पे. द. भा. ३६ पृ. २५३.

२. Reports about Anandibai. आनंदीबाईची दिनचर्या श्रीमंत[दादासाहेब] तर फितुरी असें पत्रांत लिहीत होते असे बाई बोलली. पृ. ४७ राजवाडे खं. १२ पृ. ११२-११५ ही पहा.

३ ...but [ the ministers ] meant to sieze the Government themselves under Cloak of Gangabay and Her Issue—Mortyn's Diary p 311.

चांगलें काय पहातील ? याची पाठ आम्हीं घेतली. यांणीं मुलूक घेऊन असावें. राज्याची गोष्ट तो घडणार नाहीं. त्यांसीं गुजराथेचा मुलूख देतों तेथें त्यांनीं असावें. किल्ला देणार नाहीं. किल्ला दिल्यानें खूळ करितील. ...येथें रा. **सखाराम बापूचे मनांत श्रीमंत ( दादासाहेब ) नसावे ऐसें नाहीं. परंतु पुण्यांत कामाचे** नाहींत. येथें असल्यानें आपणांस दगा करतील. बाहेर मुलुख घेऊन असावें. परंतु हरएक प्रकारें सलूख करून बखेडा तोडावा ऐसें मानस आहे.[1]

## ढमाल्यानें रोजचे रोज बेडी तपासावयाची.
### बोलूं न देण्याची ताकीद.

रा. ब. सरदेसाई म. रि. म. वि. १, पृ. ८० वर म्हणतात कीं तेथून (नगरहून) एक वर्षानें ता. १८-१०-१७७७रोजीं त्यास (स. ह. स) पुरंदर येथें रवाना केलें व तेथून लवकरच घनगडास पोंचविलें. पण Selections from the S. R's and the Peshwa Diaries VIII S.M.P. Vol. III p. 143 यावर त्यांची बदली याच तारखेस पुरंधराहून घनगडास झाल्याचा दाखला आहे. अर्थात् पुरंधरावर त्यांची रवानगी याअगोदरच झालेली असली पाहिजे. या तारखेस घनगडचा राक्षसी हवालदार अर्जोजीराव ढमाला यास खालील **बेडी स्वतहा दृष्टीनें रोजचे रोज पहात जाण्याचा**, रखवाली बहुत खबरदारीनें करण्याचा व रखवालीस लोक रहातील **त्यांस सखाराम हरींशीं बोलूं न देण्याचा** करडा हुकूम येऊन धडकला तो असा[2]:—

" अर्जोजीराव ढमाले, हवालदार व कारकून किल्ले घनगड यांस सनद कीं, सखाराम हरी हे किल्ले पुरंदर येथें अटकेस होते, ते हल्लीं येथून तुम्हांकडे बेडीसुद्धां पाठविले आहेत, तरी किल्ले मजकुरीं **बेडीसुद्धां पक्क्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन** पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. **याची बेडी तुम्हीं आपले दृष्टीनें रोजचे रोज पाहत जाणें.** याचे चौकीस लोक ठेवाल ते एका दो रोजीं हेरफार करून दुसरे लोक चौकीस नेमीत जाणें;

१. राजवाडे खं १२ पृ. १६८.

२. पृ. १४३, ९७८ (४९७) समान सबैन मया व अलफ रमजान १५ = १८ आक्टोबर १७७७ इ.

आणि याची रखवाली बहुत खबरदारीनें करणें. सखाराम हरी याचे रखवालीस लोक राहातील त्यांणीं त्याशीं बोलूं नये. याप्रमाणें लोकांस चांगली ताकीद करणें. याजबरोबर रखवालीस स्वार दिंमत सदाशिव धोंडो व गाडदी दिल्हे आहेत, हे किल्ले मजकुरीं पोहोंचऊन हुजूर येतील म्हणोन सनद.

परवानगी रुबरू[1]

इ. स. १७७८ च्या मे महिन्यांत मोरोबा फडणिसांच्या हातीं कारभार आला.[2] "तो येतांच त्यानें एकदम तो राजविण्यास सुरवात केली. नरसिंहराव गोविंद, सखाराम हरि वगैरे दादांच्या हस्तकांस त्यानें बंधमुक्त केलें.[3]" असें रा. ब. सरदेसाई म्हणतात. परंतु खरेशास्त्री लिहितात:— 'तारीख १८ एप्रिल १७७८ रोजीं दादाचे कित्येक पक्षपाती सरदार नानांनीं कैदेतून सोडविले. सखाराम हरींस लौकरच सोडण्याचा विचार होता.[4]' यावरून त्यांची सुटका झाली नसावी. रा. ब. सरदेसाई यांस पुन्हा विचारितां "मला वाटतें मोरोबानें सखाराम हरींस कैदेतून सोडण्याचा प्रयत्न केला, पण तो सिद्धीस जाण्यापूर्वींच त्याची उचलबांगडी झाली" असें ते लिहितात. गुप्त्यांच्या आंबेगांवकर अथवा पुरंधरे-कारखानीस-वडवाथरकर शाखांत सुटका झाल्याचा दाखला मिळत नाहीं.

## सखाराम हरींच्या मातुःश्रीच्या वर्षश्राद्धास पांच पांच रुपये देणगी.

सखाराम हरींची मातुःश्री प्रथम किल्ले सिंहगडीं तुरुंगांत होती. नंतर तीस जामीन घेऊन सोडली. पुढें ती वारली. तेव्हां ता. २५ जून १७७८ इसवी रोजीं तिचें वर्षश्राद्ध (श्रावण शु॥ अष्टमीस) आलें. त्याविषयीं

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. ७९.
२. म. रि. उ. वि. १ पृ. १२९.
३. ले. २३०८, भाग ६.
४. ता. २३-९-४५ चें पत्र.

खालील आज्ञा निघाल्या. सरदारांच्या वर्षश्राद्धास पांच पांच रुपये मिळाले.

आज्ञा अशा :—बाबूराव व सखाराम हरी अटकेस आहेत. त्यास त्यांचे मातुश्रीचें वर्षश्राद्ध श्रावण शु॥ अष्टमीस आहे, त्यास श्राद्धाबद्दल खर्चास दर असामीस रुपये ५ पांच प्रमाणें देविले असेत. ते देऊन श्राद्धाचे दिवशीं पायांतील बिडी काढून श्राद्ध करवणें. श्राद्धाचे दिवशीं एक दोन ब्राम्हण व एक ग्रहस्थ व दोन माणसें येतील. त्यांस किल्यावर घेऊन श्राद्ध जालियावर दुसरे दिवशीं खालीं उतरुन देणें; आणि पूर्ववत्प्रमाणें उभयतांस बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन सनदा.

किल्ले प्रतापगड

१ जयराम कृष्ण यास सनद कीं, बाबूराव हरी यास श्राद्धास पांच रुपये खर्चास देणें म्हणोन.

१ अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड[1] यांस सनद कीं सखाराम हरी यांस श्राद्धाबद्दल खर्चास रुपये पांच देणें म्हणोन.

२

धार्मिक कृत्यांस त्या वेळीं विशेष महत्व असल्यामुळें या सरदारांच्या आईचें श्राद्ध मोठ्या उदारबुद्धीनें वरप्रमाणें करूं दिलें ! शाबास ! !

नाना सखाराम हरींस नागलीचें पीठ देववितात. उपवास करूं द्या म्हणतात.

पुढें एक वर्षाच्या आंतच सखाराम हरींवर नाना भयंकर क्रुद्ध झाले. त्याचा मासला याच रोजनिशींत पृ. १४९ वर आहे, तो असा—

९८६ ( ६०४ ) किल्ले मजकुरीं सखाराम हरी अटकेस आहेत, त्यास पोटास शिधा पावत आहे तो मना करून, जुन्या नागलीचें पीठ दर रोज वजन पक्के ०८१ एक शेर प्रमाणें देत जाणें. पिठाशिवाय आणखी कांहीं न देणें. उपास करूं लागल्यास करूं देणें. मनास न आणणें. नवी बेडी येथून पाठविली आहे. ही सखाराम हरी यांचे पायांत घालून पक्के बंदोबस्तानें ठेवणें. बिडीचा खिळा तुम्हीं पाहत जाणें,

१. पुण्याचे पश्चिमेस ३० मैलांवर मुळशीजवळ.

म्हणोन अर्जोजीराव ढमाले, हवालदार व कारकून किल्ले धनगड यांचे नांवें सनद[१]

परवानगी रूबरू

मध्यमप्रतीचा साधा शिधाहि दिलेला नानांस पहावेना! तेव्हां त्यांनीं तो मना करून जुन्या नागलीचें पीठ, कोंबड्यास घालतात तसलें, दररोज एक शेर देण्याचें फर्मान काढलें! पण सखाराम हरि असल्या छळास भिणार! यावर तोड म्हणून ते उपास करूं लागले तर खुशाल करूं देणें मनास न आणणें असा आदेश दिला. कोणीकडून सखाराम हरि मरोत! जड बेडी नवी पाठविली ती घालावयाची होती व या ढेरपोट्यां अर्जोजीराव ढमाल्यानें तिचा खिळा रोज तपासावयाचा होता. त्यापेक्षां एकदम कडेलोटाची शिक्षा दिली असती तर काय वाईट होतें! पण नाना, सखाराम हरींच्या केवळ पंधरा सतरा वर्षांच्या नारायणराव नांवाच्या पुत्रासहि डरत होते!

## बारा हजार रुपयांचें आमिष दाखवितांच नाना थंड पडले!

पुढें सखाराम हरींची स्त्री आवई हिनें बारा हजार रुपये चारण्याचें आमिष दाखवितांच सखारामपंत राजकीय कैदी असले तरी नाना कसे थंड पडले पहा! ही सनद या गोष्टीची साक्ष देते. ती अशी:—

९८८ (६४१[१])— सखाराम हरि किल्ले मजकुरीं अटकेस आहेत.

**समानीन मया व अलुफ सवाल १३ [= २४ ऑक्टोबर १७७९ इ.]**

त्यांचे पायांत बिडी थोर आहे ती काढून, लहान बिडी घालणें, व महिना पंधरा दिवशीं हजामत करवीत जाणें; बायको व लहान पुत्र, व कुणबीण एक लहान पोरगी, अशीं तिघें पुण्याहून जातील. त्यांस किल्ल्यावर घेऊन मशारनिल्हेजवळ ठेवणें आणि मशारनिल्हेस, व बायकोस शिधा मध्यमप्रत, व कुणबीणीस शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. औषध वगैरे लागल्यास तुम्हांजवळ सांगतील त्याप्रमाणें चौकशीनें आणून देत जाणें म्हणोन, अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले धनगड यांचे नांवें. सनद १

---

१. P.S. 150 from the Satara R. & P. Diaries VIII Sawai Madhavrao Vol. III.

पूर्वी हजामत अजीबातच करवीत नव्हते कीं काय न कळे ! आतां औषध लागल्यास चौकशीनें आणून देण्याची सनद आली. मग प्रथम औषध लागल्यास या राजकीय कैद्यास देतच नव्हतेसें दिसतें.

एकूण पेशवाईतील ही राजकीय कैद मरणापेक्षां भयंकर होती ! कडेलोट पुष्कळ चांगला !

## बाबूराव हरींची रवानगी प्रतापगडाहून सुयारगडास. स्त्रीस सवलत.

बाबूराव हरी किल्ले प्रतापगडास अटकेंत होते. त्यास किल्ले सुयारगड, तालुके सुवर्णदुर्ग ( जिल्हा रत्नागिरी ) येथें पाठवावयाचें ठरून पन्नास माणूस व शहाणा कारकून यांजबरोबर धाडून पक्कया बंदोबस्तानें अटकेस ठेवण्याची सनद मोरो बापूजी[१] यांचे नांवें ता. १० मे इ. स. १७७९ रोजीं निघाली.

या वेळीं बाबूराव हरींच्या स्त्रीसंबंधीं हुकूम झाला तो असा—

" मशारनिल्हेची ( बाबूराव हरीची ) स्त्री प्रतापगडास आहे. ते त्याजबरोबर आल्यास घेऊन जाऊन दोघास एक जागा ठेवणें म्हणून मोरो बापूजी यांचे सनदेंत लिहिले असे; व जयराम कृष्ण यांचे सनदेंत मशारनिल्हेची स्त्री किल्ले मजकुरीं आहे, ते त्याजबरोबर जात असल्यास सुयारगडास रवाना करणें, जात नसल्यास तिचे घरास ( उरवड्यास ) पोहोंचाऊन देणें म्हणोन लिहिलें असे. [२]"

वर दिलेल्या, अल्प कां होईना, सवलतीवरून असें मानण्यास हरकत नाहीं कीं सखाराम हरि एवढा नानांचा रोष बाबूराव हरींवर नव्हता. नाहींतर कां जबर दंड उकळल्याखेरीज नाना त्यांच्या स्त्रीस जवळ राहूं देते ? घरीं पोहोंचवून देण्याची तर गोष्टच काढावयास नको !

सखाराम हरींच्या स्त्रीस मात्र त्यांस भेटूंहि दिलें नाहीं !

## गोविंद रामचंद्रास जामीनावर सोडण्याची सनद.

याच अपराधाबद्दल माजी कारखानीस ( घनगड ? ) यास विसापुरास अटकेंत ठेविलें होतें. हें विसापुरचें ठिकाण किती वाईट आहे याची कल्पना

---

१; p. 150.

२. Sel from the S. R & P.; Diaries VIII Sawai Madhavrao Vol. III, p. 150.

आम्हांस रेजिस्ट्रेशन इन्स्पेक्टर या नात्यानें दौरा करीत असता येतां जातां चांगली आली आहे.

रामचंद्र गोविंदाचा लेक गोविंद रामचंद्र बारा वर्षांचा धनगडीं कैदेंत होता. त्याच्या आईनें हुजूर रदबदली केल्यामुळें त्यास पोटखर्च रुपये २७।≥ व जामीन घेऊन सोडून देण्याची सनद अर्जोजीराव ढमाल्यास सादर झाली. कारखानीसास कैची लावून मिळणार होतेंच काय ?

## बखरकार मल्हार रामराव यांचेनिमित्त चिटणिसांचा सरंजाम जप्त.

सखाराम हरींस अटक प्रथम पुरंधर किल्ल्यावर ता. २५ सप्टेंबर इ. स. १७७६ रोजीं झाली. त्यानंतर कांहीं काळानें त्यांचे जांवई सुप्रसिद्ध बखरकार मल्हार रामराव यांची कांहीं वस्तवानी, कापड व दागिने रामराव जिवाजी यांजकडे असल्यामुळें हीं निमित्यें ठेवून सर्व चिटणिसांचा सरंजाम नाना फडणिसांनीं जप्त केला होता, तो पुढें गोविंद खंडेरावांनीं सरकारांत पैसे भरून सोडविला, याचा उल्लेख श्री. बा. स. कुलकर्णीकृत ऐतिहासिक जुने लेख, पु. २ रें. 'चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व यादी, सनदा, पत्रें' पृ. ३ वर आला आहे, तो असा:—"ते समयीं गोविंदराव बावांहि लग्नास पुण्यास आले होते. कारण सखाराम हरी संबंधें कांहीं **निमित्य ठेऊन सरंजामाची जप्ती**[1] **एकंदर केली होती.** सखाराम हरी किल्ल्यावर बंदांत होते.[2] त्यांची वस्तवाणी व कापड रामराव जिवाजी यांजकडे रामराव याचे चिरंजीव मलारीराव हे सखाराम हरीचे जांवई सबब यांजपासी दागिने वगैरे होते ते निमित्य ठेऊन सरंजामाची जप्ती केली, त्यांचे मोकळीकेकरितां व लग्नाकरितां पुण्यास आले होते. त्यासमयीं सरंजामाचे मोकळीक करणेबद्दल सरकारांत च्यार रुपये ठराऊन मोकलीक करून घेतली, आणि लग्न जाल्यानंतर चैत्र मासीं घरास गेले. आणि आषाढ शुद्ध द्वितीयेस कांहीं शरीर विकृत

---

१ "...शत्रुपक्षांत सामील झालेल्या इसमांच्या तमाम जिंदग्या या सर्व उत्पन्नाच्याच बाबी होऊन बसल्या." म. रि. उ. १ पृ. ९८.

२. यावरून ही जप्ती २५ सप्टेंबर १७७६ नंतर झालीसें दिसतें.

होऊन गोविंदराव बावा याचा काल जाला." ते ता. १३–८–१७८४ रोजीं वारले.[१]

रा. ब. सरदेसाई लिहितात : "रामरावाचा मुलगा मल्हारराव छत्रपतींच्या बखरीचा लेखक, हा सखाराम हरीचा जांवई, म्हणून त्याचेंहि उत्पन्न नानानें जप्त केलें !"[२]

## सखाराम हरींचा अंत कसा झाला ?

सखाराम हरींचा अंत कसा झाला हा एक प्रश्नच आहे. रायबहादुर पुर्दें आपल्या स. ह. च्या चरित्रांत लिहितात—

"Fourteen months passed in this wretched state, and seeing no hope of escape, the brave man sent word to Nana that if he wanted to get rid of him the best plan would be to send him to fight a powerful enemy where he was likely to meet with a more noble death. Nana misunderstood the meaning of this message, and full of hope of securing Sakharam to his side, went to the prison to offer him his release with high hopes of prosperity in official life on sworn condition that he would abjure the cause of Raghunathrao. That, however, was impossible in the case of such a model of unshaken constancy." ग्रांट डफ साहेब म्हणतात— "The unshaken constancy of Sakharam Hari to his master Raghoba deserved a better fate. He was chained in irons so heavy that, although a very powerful man, he could scarcely lift them; his food and water were insufficient to allay his hunger or to quench his thirst, but he survived fourteen months, and when so imaciated that he could not rise— "My strength is gone, my life is going," said the dying enthusiast, "but when voice and breath fail, my fleshless bones shall still shout Rugonath Rao ! Rugonath Rao !" रा. ब. पुर्दें लिहितात—"The last act of Nana Phadnavis was simply inhuman ! He received from his wife a petition to permit her to see her dying husband. It was favourably considered on the acceptance of a present of Rs. 15,000 with some valuable jewelry. The permission was apparently granted, but before the devoted creature could reach the jail, her noble husband was hurled down a precipice !"

१. म. रि. उ. वि. पृ. १०७. २. म. रि. उ. वि. १ पृ. १०७.

इतिहाससंग्रहांतील उताऱ्यावरून असें दिसून येईल कीं मोलभीक मागून सखाराम हरींची बायको द्रव्याभिलाषी नानांस १५००० रुपये व जवाहीर नसून बारा हजार रुपये देणार होती.

एक आख्यायिका अशी आहे कीं ग्रँट डफ साहेबांनीं नमूद केलेले उद्गार नानांनीं ऐकून घेतले न घेतले तों सखाराम हरि नानांचे तोंडावर थुंकले. त्या त्वेषानें चिडून जाऊन सखारामांचा कडेलोट करण्याची शिक्षा त्यांनीं त्यांस फर्माविली. त्यांचा कडेलोट घनगडाहून करण्यांत आला. पण नानांनीं कोठडींतहि एकस्यास न जाऊं देण्याचा हुकुम काढिला असतां ते सखाराम हरींच्या थुंकून घेण्याइतक्या जवळ गेले असतील किंवा नाहीं याची शंका येते. आणखी अशी एक आख्यायिका आहे कीं, मोकळीक होण्याची सर्व आशा नष्ट झाल्यामुळें व अन्न-पाणीहि न मिळूं लागल्यामुळें सखाराम हरींनीं 'रघुनाथराव, रघुनाथराव, रघुनाथराव' म्हणून बेडीवर डोकें आपटून प्राणत्याग केला.

महादजी शिंदे, पाटीलबावा, यांनीं सखाराम हरींची स्त्री आवईसंबधीं नानांस लिहिलेल्या पत्रांतील शब्द असे आहेत:– "ज्यापक्षीं अपराधी **मरण पावला**, त्यापक्षीं सरकारांतून माफ करून, ऐवज न घ्यावा." निर्भीड पाटीलबावा या वेळीं तरी नानांच्या कच्छपीं नव्हते. त्यांचा प्रमाद त्यांस दाखविण्यास ते डरत नव्हते. "वरकड बारा हजारांनीं सरकार किफायत होती ऐसें नाहीं" एवढें नानांस उघड सांगण्याचा अधिकार त्यांस आला होता. तेव्हां नानांनीं सखाराम हरींचा कडेलोट केला असता तर ते एखादा शब्द लावून लिहिण्यास नानांस भ्याले असते असें वाटत नाहीं. सखाराम हरि सरदार होते ! कारकून नव्हते. पाटीलबावाहि सरदार होते. निव्वळ रघुनाथरावांस पाण्यांत पाहात होते असेंहि नाहीं. तेव्हां एका सरदाराचा कडेलोट नानानें केल्यावर शांतवृत्तीनें ते कसे रहाते ? शालजोडींतले बारा हजारांसाठीं मारले, तर कड्यावरून भिरकावण्याबद्दल गप्प कसे बसतील ? एकूण बेडीवर डोकें आपटून सखाराम हरींनीं प्राणत्याग केला असावा, किंवा त्यांस अपघातानें मरण आलें असावें असें मानण्याकडेच मनाची प्रवृत्ति होते. रा. ब. सरदेसाई व विद्यानिधि चित्रावशास्त्री यांनीं, बेडीवर डोकें आपटून त्यांनीं प्राणत्याग केला असें लिहिलें आहे. रा. ब. त्यानंतर कळवितात कीं

सखाराम हरींस मृत्यु कसा आला हें कळणें कठिण आहे. जास्त पुरावा मिळाल्यास या मुद्यावर प्रकाश पडेल.

पण आंब्रेगांवकर गुप्ते घराण्यांत अशी आख्यायिका आहे कीं नाना फडणिसांनीं सखाराम हरींचा अत्यंत निर्दयतेनें कडेलोट केला. किल्ल्यावर ते कैदेंत असतांना त्यांच्या पत्नींनीं त्यांना भेटण्याची परवानगी मिळविली. ती हातीं आली तेव्हां त्या मंगळागौरीच्या पूजेस बसल्या होत्या. ती तशीच टाकून त्या पतिदर्शनास धांवल्या. परंतु त्या गडावर चढतात तों सखाराम हरींचा कडेलोट करण्यांत आला. तेव्हांपासून आजपर्यंत आंब्रेगांवकर गुप्त्यांच्या घराण्यांत स्त्रिया मंगळागौरी पूजित नाहींत. कडेलोट[१] केल्याचा हा एक पुरावा देण्यांत येतो.

पाटील बावांच्या पत्रांत "...त्यास सनद तिच्या हातास[२] पोहोचोन ती किल्यावरी न जातां सखाराम हरी मृत्यु पावला" असें आहे.

गद्रे घराण्यांत अशी आख्यायिका आहे कीं सखाराम हरींच्या पत्नी घनगड चढावयास लागल्या तेव्हां सुवासिनी होत्या व परत आल्या त्या विधवा स्थितींत आल्या !

## सखाराम हरींवर कारभाऱ्यांची इतराजी होण्यास कारण मोरोबाच काय ?

रा. ब. सरदेसाई म्हणतात कीं अनिश्चित[३] स्वभावामुळें मोरोबास यश आलें नाहीं. सखाराम हरींवरसुद्धां कारभाऱ्यांची एवढी इतराजी होण्यास कारण मोरोबा. आम्हांस हें सर्वथैव खरें दिसत नाहीं; कारण नाना फडणीसांनीं त्यास आपल्या पक्षास ओढण्याची पुष्कळ खटपट केली. पण त्यचा निर्धार कायम ! त्यांनीं दादासाहेबांस दौलतीवर बसविण्यासाठीं अर्थ व प्राण पणाला लाविलेले ! कारभाऱ्यांस तर दादासाहेबांच्या हातीं सत्ता द्यावयाचीच नव्हती. फार तर किल्ला न देतां जहागिरीवर त्यांची स्थापना करावयाची होती. सखाराम हरींस बारभाईचें पारिपत्य करावयाचें होतें. मग ते आपल्या ध्येयाचे उलट मोरोबासाठीं अथवा नानासाठीं वागणें

---

१. श्रीमती सौभाग्यवती इंदिराबाई नारायणराव आंब्रेगांवकर यांचें ता. ८-७-४५ चें पत्र. २. इ. स., ए. टि. भा. २ अ. नं. १५. ३. म. रि. उ. वि. १ पृ. १४१.

कालत्रयीं शक्य नव्हतें. एवंच, बारभाईच्या इतराजीचें खापर एकट्या मोरोबाचे कपाळावर फोडण्यांत अर्थ नाहीं.

## सखाराम हरींसारखा मोहरा फुकट घालविला.

" कर्तबगार पुरुष कायद्याचे सपाट्यांत सांपडून फुकट गेल्याचीं उदाहरणें त्या वेळींसुद्धां पुष्कळ होतीं" हें रा. ब. सरदेसाई यांचें म्हणणें खोटें नाहीं. पण अशीं कर्तबगार माणसें लगामीं लावून थोरले शिवछत्रपतींप्रमाणें त्यांचा स्वराज्यास उपयोग करून घेण्यांत मुत्सद्देगिरी आहे. नाहीं तर छळ करून त्यांचा नाश केल्यानें नाकर्ते लोकांचा सुळसुळाट होऊन राज्यनाश होतो.

म. रि. म. वि. १, पृ. २७ वर रा. ब. सरदेसाई लिहितात:— " सखाराम हरीसारखा मोहरा भलत्याच कामीं फुकट गेलेला पाहून वाईट वाटतें. नुसतें साहस कामास येत नाहीं. काळवेळेचेंहि तारतम्य पाहिजे." नानासारखा बुद्धिमान् मुत्सद्दी दादासाहेबांच्या पक्षास यश मिळूं देणार नाहीं हें उघड उघड दिसत होतें. सवाई माधवरावांस गादीवर आणल्यावर तर तो राजपक्ष दिसूं लागल्यामुळें लोकमताचा थोडाफार पाठिंबा बारभाईस सहज मिळाला. पुढें त्या पक्षाचें पर्यवसान डिक्टेटर नानांत झालें. पण नानांस लोकांचीं मनें आपणांकडे आकर्षण करून घेण्याचें कौशल्य नव्हतें. त्यांचा लढण्याचा भर हरिपंत फडके, त्रिंबकरावमामा, परशुरामभाऊ पटवर्धन यांवर होता. कांसेगांवच्या लढाईत त्रिंबकरावमामा पेठे खपले. परशुराम-भाऊंसारख्या शूर सरदारांसहि नानांनीं उलटविलें. मिळून त्यांची खरी सर्व मदार हरिपंत फडक्यांवर अखेरपर्यंत राहिली. सखाराम हरींस त्यांस लगामीं लावतां आलें नाहीं. एकदां अमृतरावास, पुन्हा चिमाजी आप्पांस व शेवटीं बाजीरावांस महाडचें कारस्थान इंग्रज निजामाचे जोरावर रचून आपल्या घरसोडीचें प्रायश्चित्त नानांस घ्यावें लागलें. दौलतराव शिंद्यासारख्या नवशिक्या ऐन ज्वानींतील सरदारांपुढेंहि त्यांस हात टेंकावे लागले. त्यांस प्रतिकार करणारे सरदार त्यांनीं ठेवले नाहींत. त्यांनीं खूप शर्तीनें राज्य कांहीं काल राखलें. परंतु त्यांच्या कर्तृत्वांत तें चिरकाल टिकविण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्यांनीं योजिलेले उपाय देखील तशा कसोटीस उतरत नाहींत. मात्र त्यांच्यामागून तेवढीहि करामत दुसऱ्यांत राहिली नाहीं.

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. १४२.

"With him," Says Colonel Palmer, "departed all the wisdom and moderation of the Maratha Kingdom" असें म्हणणें युक्त आहे.[१]

## नारायण सखारामांचा अपघातानें मृत्यु

रायबहादुर बी. ए. गुप्ते आपल्या सखाराम हरींच्या चरित्रांत म्हणतात—

"And this was not all! Sakharam's eldest son Narayanrao was poisoned at Nana's instigation simply because that child, only 15 years of age, had the courage and the daring to speak to Nana's face that he would avenge his father's death one day."[२]

प्रथमदर्शनीं, रायबहादुरांनीं सखाराम हरींच्या नारायणराव या मुलास सर्वांत वडील मुलगा दर्शविला आहे तें बरोबर नाहीं. तो सर्वांत धाकटा म्हणजे तिसरा पुत्र होय. हें सरदार आंब्रेगांवकरांच्या वंशावळीवरून दिसून येतें.

नारायणरावांच्या मृत्यूविषयीं दोन प्रवाद आहेत. एक वर रायबहादुरांनीं दिलाच आहे. दुसरा असा आहे कीं नारायणरावांची वडिलांचा सूड उगविण्याची ही भीमप्रतिज्ञा ऐकून नाना फडणविसांनीं ते शिकारीस गेले असतां निबिड अरण्यांत मारेकरी घालून त्यांस मारविलें. [श्रीमंत सरदार दत्ताराव अमृतराव आंब्रेगांवकर यांनीं पुरविलेली माहिती.] खरें कांहीं असो, नारायणरावांचा मृत्यु अपघातानें झाला हें निश्चित आहे.

रायबहादुर गुप्ते यांनीं सखाराम हरींचें इंग्रजींतील चरित्र इ. स. १८८६ सालीं लंडन येथें प्रसिद्ध केलें. परंतु त्यानंतर रा. ब. पारसनीस यांनीं इ. सं. ऐ. टि. भा. २, अ. नं. १५ यांत वरील हकीकतीस एकंदरींत पुष्टि देणारें, पण तींतील किंचित् दोषांत दुरुस्ती करणारें, महादजी शिंद्यांचें, नाना फडणिसांची कानउघाडणी करणारें पत्र दिलें आहे. तें अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें समग्र खालीं देतों:—

---

१. Quoted by James Grant Duff. in Vol, III p. 188, Calcutta, Published by R. Cambray & Co.

२. Reprint p. 1.

श्री

" राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस,

दंडवत विनंति उपरी—सखाराम हरी कैदेंत घनगडीं होते. त्यांस **बेडी मातबर व भोजनाचेंहि यथास्थित नव्हतें.** यामुळें प्राणांतिक अवस्था झाली होती. त्यावरून यांचे स्त्रीनें सरकारांत रदबदली केली कीं, बेडी हलकी करून, अन्नपाण्याची व औषधें उपाय करावयाची मोकळीक करवून मजला किल्ल्यावर जावयाची परवानगी द्यावी. त्याजवरून उत्तर आलें कीं बारा हजार रुपये द्यावे म्हणजे परवानगी दिली जाईल. तेव्हां त्यांनीं मोलभीक[1] मागोन घरोघर फिरोन, बारा हजार रुपये द्यावयाचा करार करून किल्यावरी जाऊन पोंहोचेन अशी सनद द्यावी; म्हणजे कराराप्रमाणें एका महिन्याचे मुदतीनें ऐवजाच्या भरणा करीन. त्याजवरून तीजवळून आपण ऐवजाचा हमीदार[2] घेतला. त्यास सनद तिच्या हातास पोंहोचोन ती किल्यावरी न जातां, सखाराम हरी मृत्यु पावला. हल्लीं हमीदारास ऐवजाकरितां सरकारचा तगादा लागला आहे. हमीदार तिजला तगादा करितो. ऐशियास जो अन्यायी तो मृत्यु पावला; व बायकोची त्याची भेटही न जाली. यास्तव बायकोस तगादा ऐवजाचा, हमीदाराचा नसावा; व हमीदारासहि सरकारांतून न व्हावा. ज्यापक्षीं अपराधी मरण पावला, त्यापक्षीं सरकारांतून माफ करून ऐवज न घ्यावा. यांचे मुलामाणसांचे चालवून आजात[3] करावें. वरकड बारा हजारांनीं सरकार किफायत होती ऐसें नाहीं. तशांत त्यांजवळ ऐवज आहे नाहीं हें कळलेंच आहे. मोल मागोन ऐवज जमा करणार ! तोही सखाराम हरी यांचे मरण्यामुळें कोणी ऐवज देईल हेंही नाहीं. सारांश, मुलांमाणसांची मुक्तता होय तें करावें. हमीदारास सरकारांतून तगादा जाल्यास हमीदार बायकामुलांस तगादा करील. घरचें सर्व जप्तींत आलें असतां त्यास ऐवज मिळणें कळतच आहे. याकरितां लिहिले असे. रवाना चंद्र ७ जिल्काद हे विनंति. "

यावर रा. ब. पारसनीस समतोल दृष्टीनें लिहितात, " हा द्रव्यदंड भर-

---

१. मोलभीक = मोलमजुरी व भिक्षा.

२. हमीदार = जामीन.

३. आजात = आजात + करणें = मोकळें करणें; जप्ती खुली करणें.

ण्यास सामर्थ्य नसल्यामुळें सखाराम हरीची व त्याच्या प्रिय पत्नीची भेट झाली नाहीं, ही अत्यंत हृदयद्रावक गोष्ट होय ! आणि द्रव्यदंड देण्यापूर्वीच सखाराम हरी मृत्यु पावले, तरी द्रव्यदंड वसूल करण्याचा तगादा त्याच्या बायकोमागें चालू रहावा ही अन्यायाची गोष्ट होय !! तथापि अशा स्थितींत पाटीलबावांस दया येऊन त्यांनीं मध्यस्थी केली, हें त्यांस भूषणास्पद होय ह्यांत शंका नाहीं. ''

पाटीलबावा उदार होते. त्यांनीं "स. ह. च्या घरचे सर्व जप्तींत आले असतां त्यास ( बायकोस ) ऐवज मिळणें कळतच आहे. याकरितां लिहिले आहे." हें स्पष्ट करून नानांस अशक्य गोष्टीचा आर्थिक ध्यास धरण्यांत अर्थ नाहीं हें विशद करून सांगितलें. त्यांचा दुसरा मुद्दा असा कीं ज्यापक्षीं अपराधी मरण पावला, त्यापक्षीं सरकारांतून माफ करून ऐवज न घ्यावा हें त्यांस न्यायाच्या दृष्टीनें पटवावें. तिसरी गोष्ट पाटीलबावांच्या सरदारी उदार धोरणास अनुसरून होती. ते सल्ला देतात कीं "याचे ( स. ह. चे ) मुलामाणसांचें चालवून आजात करावें." जप्ती खुली करून गुप्ते घराण्याची सहानुभूति मिळवावी व त्यांचे हातून स्वराज्याची सेवा घडवावी. तथापि दूरस्थ सरदारांस जी दया आली ती खुनशी दीर्घद्वेषी नाना व बारभाईपैकीं कर्ते पुरुष यांस आली नाहीं हें देशाचें दुर्दैव होय. यांनीं सखाराम हरीचा नाश करून त्यांचे पुत्रांस गोविंदराव गायकवाडाकडे रातोरात पळून जावयास लाविलें. तथापि रघुनाथराव दादासो यांनीं गुप्ते घराण्यास दिलेली सरदारी परमेश्वराच्या मनांत आजतागायत कायम टिकवावयाची होती. सबब त्यानें गोविंदराव गायकवाडाच्या मनांत प्रेरणा करून स. ह. च्या दोन पुत्रांस सरदार बनविलेंच ! नानांचें कांहीं चाललें नाहीं ! सखाराम हरींस त्यांनीं कैदेंत घातलें पण देवनाथासारख्या साधूंच्या म्हणण्याप्रमाणें "आखर नाना जा शिंदे के कैद पडे !" त्यांचें प्रेतहि त्यांनींच पोसलेल्या अरबांनीं तनख्याचा जामीन दिल्याशिवाय उचलूं दिलें नाहीं. परमेश्वराची लीला अगाध आहे !

सखाराम हरी यांचे परोक्ष नाना फडनवीस यांणीं त्यांचा वाडा लुटविला[1].

---

१. रायबहादुर बा. आ. गुप्तेकृत सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर यांचें चरित्र, पृ. १, फाऊटीप २.

## सखाराम हरि कधीं मृत्यु पावले ?

आतां सखाराम हरींचा कडेलोट नानांनीं कधीं करविला अथवा त्यांनीं बेडीवर डोकें आपटून प्राण कधीं दिला याचा विचार करूं.

"मूल गंगाबाईचा खराच असल्यास निम्मे दवलतीचे खाविंद" वगैरे मजकुराच्या पत्राच्या खालीं १० रबिलाखर असल्यामुळें तें सवाई माधव रावाच्या जन्मानंतर व पुरंधरचा तह झाल्यावर थोड्याच दिवसांत लिहि-लेलें आहे. यावरून तारीख २९ मे १७७६ येते. अर्थात् सखाराम हरींचें मृत्युवर्ष अबाधित- १७७९ रहातें.

महादजी शिंद्यांनीं बारा हजार रुपये वसूल न करण्यास लिहिलें त्या पत्राची तारीख छ ७ जिल्काद आहे. बारा हजार देण्याचा करार ऑक्टोबर १७७९ त झाला. त्यानंतरचा ७ जिल्काद नोव्हेंबरांत येतो. स्त्रीस भेटण्याची परवानगी २४ ऑक्टोबर १७७९ रोजीं मिळाली. तथापि सनद हातांत येण्यापूर्वींच सखाराम हरि मृत्यु पावल्याचें कळलें. अर्थात् सखाराम हरि सन १७७९ च्या ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यांत केव्हां तरी मरण पावले. हें श्री. वाकसकरांचें प्रतिपादन आहे व तें बरो-बर दिसतें. त्यांनीं आपल्या "अप्रसिद्ध चरित्रा"तील सन १७७९ च्या जून महिन्यापूर्वीं ते मृत्यु पावल्याचें विधान परत घेतलें आहे.[1]

## सरदार सखाराम हरि गुप्ते यांचे गुणदोष.

सखाराम हरि गुप्त्यांचे प्रमुख सद्गुण म्हणजे स्वामिभक्ति, अलौकिक शौर्य, सेनापतित्व, धडाडी, मुत्सद्दीपणा, चिकाटी, पवित्र आचरण, सचोटी, कुलाभिमान, देशाभिमान व खाजगी वर्तनांतील आकर्षकता हे होत. त्यांची स्वामिभक्ति एवढी ओजस्वी होती कीं तीस तुलनेस उदाहरणेंच मिळणें कठिण. अर्थ, प्राण पणास लावून स्वामिसेवा करणारे पुरुष महाराष्ट्रांतच काय पण जगांत तरी किती सांपडतील ! माझी शक्ति गेली, माझे प्राण चालले तथापि जेव्हां माझा आवाज नष्ट होईल, श्वासोच्छ्वास बंद पडेल तेव्हां देखील माझ्या मांसरहित अस्थि राघोबा दादा, राघोबा दादा

१. वि. ज्ञा. वि. जून १९२६ पृ. २४९.

ओरडतील म्हणून अखेर धन्याचे नांवाचा जयघोष करणारे किती पुरुष जन्मास येतील ?

गुप्त्यांच्या कुलांत दादाजी नरसप्रभूंनीं थोरल्या शिवछत्रपतींची बाजू धरण्याबद्दल विजापुरीं नेऊन गर्दन मारण्याचा आदिलशाही हुकूम घेतला. तथापि पक्ष सोडला नाहीं. रंगो बापूजी गुप्त्यांनीं सर्वनाश झाला तरी छत्रपति प्रतापसिंहांची बाजू सोडली नाहीं. वडवाथर गुप्त्यांचे पूर्वज पानिपतीं धारातीर्थीं पतन पावले. खंदकांतून गांवीं कार्णिक नांवाच्या सैनिक उचलून आणीत असतां त्यांनीं शत्रूस पाठ दाखविल्याचें नाकारिलें. सदाशिवराव भाऊंचा पक्ष त्यांनीं सोडिला नाहीं. अशी एकंदरींत या कुलाची करडी चिकाटी असली तरी स्वामिभक्तींत व पक्षाभिमानांत सखाराम हरींच पहिला क्रमांक गांठतील यांत संदेह नाहीं.

शिद्दी रहमान यावर इ. स. १७३३ त केलेल्या हल्ल्यांत, थोरल्या माधवरावांच्या वेळीं, हैदरच्या सैन्याशीं मेलकोटे मोतीतलावाजवळ वगैरे आघाडीवर लढतांना, इ. स. १७५८ व अटकेस झेंडे लावतांना व अन्य कित्येक प्रसंगीं सखाराम हरींनीं आपल्या शौर्याची शर्थ केली आहे. कादंबरींत वर्णन करण्यासारखे हे हल्ले होते.

गुप्ते निव्वळ शौर्य गाजवीत नसून हिकमती व दूरदर्शी सेनानी होते हें पंजाबांत अबदालीच्या सेनापतीबरोबर १७५८ त झुंजतांना व आनंद-मोगरीच्या लढाईत आरबांनीं दगा दिल्यामुळें दादासाहेबाचा पराजय होऊन सैन्याची पांगापांग झाली असतां आणि स्वतःस जखमा झाल्या असतां तें शिताफीनें हालवून कपडगंजेजवळ व्यवस्थित आणून सावधगिरीनें रहाण्यांत[1] स्पष्ट रीतीनें दृष्टोत्पत्तीस आलें.

कंबर बसली तरी हिंमत धरतों असें सखाराम हरींच्या एका पत्रांत आहे. अशक्तता आली तरी हिंमत खचणारे मुत्सद्दी व सेनापति ते नव्हते.

गुप्त्यांचे वंशीं येऊन सर्वांस दुःख द्यावें त्यापेक्षां शेवटीं विष प्राशन करणें प्राप्त आहे असें ते म्हणतात. घराण्याविषयीं एवढी आस्था त्यांस होती. पण कुलापेक्षां धनी दादासाहेब त्यांस अधिक होते. त्यासाठीं सर्वस्व

१ म. रि. उ. रि. १ पृ. ३२ सहि पहा.

देण्यास ते तयार होते. 'प्राणाचा संकल्प घालोन त्यांनीं श्रीमंतांची सेवा आरंभिली होती.'[1]

अखेर माझ्या अस्थि राघोबादादा राघोबादादा वदतील बोलून ते अर्पण केलेहि. पण त्यांचा पक्ष सोडला नाहीं ! केवळ्या चिकाटीचे वीर पुरुष सखाराम हरि होते !

समजाविशी, समाधान करण्यांत यांचा हातखंडा होता. याचें एक उदाहरण पे. द. भा. ३६ नं. ११३ त आहे. प्रथम हरि उमाजींस कैद करण्याचा दादासाहेबांचा घाट होता. परंतु जामीन घेऊन गेल्यामुळें ते स्वस्थ होते. त्याचे मुख्य मुत्सद्दी सखाराम हरि आणि आबाजी महादेव सोवनी व सदाशिव रामचंद्र सुकटणकर यांनीं हरि उमाजींचें समाधान केलें. तें न करते नर निष्कारण वैर वाढतें.

मुत्सद्दी व वकील म्हणून सखाराम हरींस बारभाईकडे १७७५ च्या जूनच्या अगोदर पाठविलें होतें. त्या वेळीं सहा सात लक्ष रुपये खेरीज किल्ले करून देशीं जहागीर देण्यास ते तयार होते. तेव्हां आठ नऊसहि कबूल पण ते किल्ले देणार नाहींत ही श्रीमंतांची खात्री होती. शिवाय या "फितुरी यांचा इतबार काय ? ते बेइतबारी याकरितां भडोच सुरतेस राहू" असें त्यांचें म्हणणें पडलें व काम फिसकटलें.

त्यांस परिस्थितीची जाणीव चांगली झाली होती हें त्यांनीं लक्ष्मणपंत आप्पांस लिहिलेल्या ता. १२ फेब्रु. १७७६ च्या पत्रावरून विशद होतें. ते म्हणतातः—"इंग्रज दाब धरूं लागले आहेत...मसलत बिलग...त्यांत हे प्रकार बनले आहेत....नानाप्रकारचे पेंच व कटकटी ! कोणांत कोणी नाहीं ऐसी गोष्ट जाली आहे. इतकेंहि सोसून आमचा निश्चय जो आहे तोच खंबीर प्राण जाईतों सुटणार नाहीं. **प्राणाचा संकल्प घालोन श्रीमंतांची** सेवा आरंभिली आहे."

दादासाहेबांस व सखाराम हरींस वाटत होतें कीं सखाराम बापू धुरीण पत्करून राज्य आंवरतील. 'एकवेळ फितुरीयांचें पारिपत्य' करूं. कारस्थानांत बापू वरचढ होते. पण त्यांस मुत्सद्देगिरींत मदत करून शत्रूंशीं झगडा करण्यास सखाराम हरि समर्थ होते.

---

१ राजवाडेकृत खं. १२ ले. १३२ ता. १२-२-१७७६

ते मुरलेले मुत्सद्दी होते हें त्यांच्या अजातशत्रूंनीं– नाना फडणवीसांनीं महादजी नारायणांचे नांवें काढिलेल्या त्यांस नगरच्या **किल्ल्यांत कोठडी करून बाहेरून कुलूप घालण्याच्या फर्मानांत** चुकून कां होईना कबूल केलें आहे. पहा यांत काय आहे तें:–" सखाराम हरि खेळया राजकारणी आहे. कोणे गोष्टीस चुकणार नाहीं." तथापि सखाराम बापू जेव्हां दादासाहेबांच्या पक्षास प्रत्यक्ष येऊन मिळेनात तेव्हां मात्र त्यांची कंबरच बसली. कलकत्तेकर बारभाईस उचलून न धरते तर दादासाहेबांचा पक्ष कांहीं डगमगला नसता. बारभाईचा टिकाव लागणें कठिणच होतें. पण त्यांचें नशीब जोरावर होतें.

संशोधक व. १० अं. २ लेखांक ४ वरून सखाराम हरींच्या मैत्रींत किती मोहकपणा होता याची अल्पशी कल्पना येते. श्रीमंत दादासाहेबांस अष्टौप्रहर ते जवळ असावेतसें वाटे. आनंदीबाई त्यांस लडिवाळपणाच्या गोष्टी मोकळ्या मनानें लिहीत. तुकोजी होळकरांच्या ते ममतेंत होते.[1] युद्धांत व सामन्यांत ते अत्यंत कठोर होते. परंतु खाजगी घरगोती मैत्रीच्या व्यवहारांत त्यांची वागणूक फारच प्रेमळ असे.

सखाराम हरींच्या चारित्र्याचा कोणी वर वर आढावा घेतला तरी प्रामाणिकपणा त्यांच्या ठायीं किती उत्कट रीत्या वसत असला पाहिजे याची सहज कल्पना होते. एकच उदाहरण पुरेल असें वाटतें. सखाराम हरि लक्ष्मणपंत अण्णा ( आप्पा ) आंब्रेकरांस लिहितात कीं ' आपला ऐवज देवलाबाबत बेदरचे तलावरील गुतऊन ठेविला आहे. सांगाल, त्याहाल, तेथें पावता करूं. ' असे कित्येक दाखले देतां येतील.

कायद्याच्या कक्षेंत सांपडून व रघुनाथराव दादासाहेब नको नको सांगत असतां हरिपंतांबरोबर पुण्यास येऊन व बारभाईच्या कचाट्यांत सांपडून सखाराम हरींच्या आयुष्याचें मातेरें झालें. बहुतेक सरदारांनीं स्वार्थ साधून जहागिरी कायमच्या मिळविल्या. पण गुप्त्यांनीं आपल्या

---

१ ता. २ जुलई १७७४ च्या पत्रांत तुकोजी होळकर लिहितातः – हे (सखाराम हरि) आपले ममतेचे. प्रस्तुतचे. कामांत फार उपयोगी पडले. यास्तव याजवरी ममता करावी.

घराची होळी केली. आपण तुरुंगवास पत्करला. कित्येक वेळां सुटका होत असतां दादासाहेबांचा पक्ष धरून अखेरपर्यंत अनन्वित छळ करून घेतला. पण त्यांनीं 'उदार भोळ्या सांबा'चा पक्ष सोडला नाहीं. नारायणराव मारले गेले नसते तर व पुढें कलकत्तेकर इंग्रजांनीं बारभाईस पाठबळ दिलें नसतें तर दादासाहेबांचाच पक्ष विजयी होऊन सखाराम हरींचें कर्तृत्व अधिक उज्ज्वल दिसतें. तथापि हिंदूंच्या भावना या मृत्यूनें दुखावल्यामुळें व दादासाहेब व आनंदीबाई यानीं खून केल्याची प्रतिपक्षानें बुद्धिपुरःसर अफवा पसरविल्यामुळें पारडें फिरलें. दिल्लीस का खरोखर राजकीय खून थोडे झाले ? पण त्यायोगें राजकारणावर फारसा परिणाम कधींच झाला नाहीं. पण आम्हां हिंदु लोकांनीं अफवांवर व प्रतिपक्षाच्या डावांवर फसून रघुनाथराव व त्यांचे कर्ते सरदार यास मागें सारून स्वार्थी व नादान सरदारांच्या हातीं सत्ता देऊन राजकारण बिनसविलें. नाहीं म्हणावयास अन्यायानें कां होईना पण कर्त्या महादजी शिंद्यांस नानांनीं पुढें आणलें ही त्यातल्यात्यांत शहाणपणाची गोष्ट त्यांनीं केली, म्हणून कांहीं काल मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष झाला. पण त्यांच्या जोडीस सखाराम हरींसारखे सेनापति नाना हयात ठेवते, त्यांचा उत्कर्ष करते, दादासाहेबांस पेशवे दुय्यम पेशवे अथवा कारभारी करते निदान त्यांच्या म्हणण्याप्रमाणें चांगली जहागीर देते, तर मराठे, इंग्रज, फरासीस, निजाम या सर्वांसच ते भारी होते यांत शंका नाहीं.

सखाराम हरींसारखे सरदार कैदेंत हालअपेष्टेंत मेले. त्यांचें साहस वायां गेलें. फिरलेल्या काळाची जाणीव त्यांस झाली नाहीं. देशाचें अनन्वित नुकसान झालें.

## सखाराम हरींची स्वामिनिष्ठा व ध्येय

सखाराम हरींची स्वामिनिष्ठा व ध्येय यांचें चित्रण त्यांनीं स्वतःच लक्ष्मण [1]आप्पाजी आंबीकर यांस लिहिलेल्या दोन पत्रांत सुंदर केलेलें आहे. त्यांतील या मुद्यांवरील जरूरीपुरते उतारे खालीं देतों:—

---

१. राजवाडे, म. इ. सा. खं. १२ पृ. ७६ ले. १२७.

श्रीशंकर

१६९७ पौष वद्य १४ (२० जानेवारी १७७६)

"राजश्री लक्ष्मणपंत अण्णा(प्पा) स्वामीसः—

पोष्य सखाराम हरि साष्टांग दंडवत प्रा विनंति ...... विशेष. आपण पत्रें विस्तरें मजकुरचीं श्रीमंतास[1] वद्य तृतीयेचीं पाठविलीं तीं एकादशीं पावलीं.... सारांश, तूर्त सर्व मसलत, आपटण आले, त्याजवर आहे. येविसीचें साधन जनरलापासून वगैरे जसे पडेल तिकडोन पाडून अण्णा (प्पा) मसलत, सिद्धीस जाई, तुमचे आमचे मनोदयें व श्रीमंताची इच्छा पूर्ण होय, ते गोष्ट हरप्रेत्नें, अर्थें, प्राणें, खर्च तुमचा आमचा जाला तरी करून लढाईचाच ठरून, फितुरियांचीं पारपत्यें घडेल ते गोष्ट, अण्णा(प्पा) ! करावी." पहा शक्य ते प्रयत्न, पैसे, फार काय प्राण खर्चीं श्रीमंताची इच्छा पूर्ण होण्याकरितां तुम्हीं आम्हीं घालावें असें सखाराम हरि विनवीत आहेत. त्यांनीं स्वतः तर ते अखेर खर्चीं घातलेच. बारभाई त्यांचे मतें फितुरी. पेशवाईचें खरे मालक दादासाहेब. बारभाईचें पारिपत्य झालेंच पाहिजे ही गुप्त्यांची इच्छा, नव्हे ध्येय म्हटलें तरी चालेल.

लेखांक १३२ पहा.[2]

श्रीशंकर

१६९७ माघ वद्य [=१२ फेब्रुवारी १७७६ ]

" राजश्री लक्ष्मणपंत आण्णा(प्पा) स्वामीचे सेवेसीः—

पोष्य सखाराम हरी कृतानेक प्रो विनंति.

इंग्रज दाब धरूं लागले आहेत. मसलत विलग. त्यांत हे प्रकार बनले आहेत.... नाना प्रकारचे पेंच व कटकटी ! कोणांत कोणी नाहीं ! ऐसी गोष्ट जाली आहे. इतकेंहि सोसून आमचा निश्चय जो आहे तोच खंबीर प्राण जाईतों सुटणार नाहीं. प्राणाचा संकल्प घालोन श्रीमंताची सेवा आरंभिली आहे. त्याचा शेवट करावा. एक वेळ फितुरियांचें पारपत्य व्हावें श्रीमंत दौलतीवर बसले म्हणजे कृतकृत्य जालों.

---

१. दादासाहेबांस.

२. राजवाडे, म. इ. सा. खं. १२ पृ.८१-८३.

पुढें इच्छा दुसरी नाहीं, यांत संशय नाहीं. **कसेंहि गुजरलें तरी श्रीमंताचे चरणांचें लक्ष व मसलतीचे शेवटास जाणियाचें** ध्यान दुसरें कदापि होणार नाहीं, हे खातरजमा तुमची आहे व माझा निश्चय हाच यांत गुंता नाहीं. ”

## दादासाहेबांचे गुणदोष.

श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबांचा सर्वोत्कृष्ट गुण म्हणजे त्यांचें अलौकिक शौर्य होय. ते पहिल्या प्रतीचे घोडेस्वार होते. त्यांच्या नेतृत्वाखालीं दौडा मारण्यांत– मराऱ्या मारण्यांत– सखाराम व बाबूराव हरि भूषण प्राचीन असत

वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनीं गुजराथेंत चौथाई बसविली ! आनंदीबाई आपल्या कोपरगांवच्या वाड्यांत काय उद्गारल्या त्याचें टिपण त्यांच्या २२।७।१७८८ च्या दिनचर्येंत असें आहे:—

“ १[1] साहेब ( दादासाहेब ) यांचे पुण्य शरीर पंधरावे वर्षी गुजराथ प्रांतीं गेली (लें) आणि चौथाई बसविली. मोठी लढाई इतके दिवसांत यासिवाय कोणी केली नाहीं. ”

छ ७ रमजान १२ जून १७८८ च्या दिनचर्येंत बाई म्हणतात कीं, नाना, व भाऊ व साहेब म्हणजे रघुनाथराव दादासाहेब यांचे अलीकडे कोणी पराक्रमी नाहीं.[2]

इ. स. १७२३ ऑक्टोबर ते डिसेंबर १७५४ पर्यंत बापूजी व दामोदर महादेव हिंगणे यांस लिहिलेल्या पत्रांत दादासाहेबांची तडफ चांगलीच दिसून येते. पैसे न दिल्यास ताकीद करण्यास ते सांगतात. ऐसा कारभार न करण्यास हिंगण्यास बजावतात. धमक्या देतात. रुपया हातास ये ते करण्यास निक्षून सांगतात. उठोन येणें उपरांतीक तो (वजीर) जाणे आम्हीं जाणों असें धमकावितात. प्रहराप्रहरास वर्तमान लिहिण्यास सांगतात. कारभार सुस्त करता म्हणतात. ‘गाजदीखान माजोरीपणच

१. Reports about Anandibai आनदींबाईची दिनचर्या पृ. ७४.

२. सदर पृ. ६०–६१.

करील तर पाहतच आहों' म्हणून गुरकावितात. वजीराचे मतें चित्तापासून लाहोर द्यावें ऐसे नाहीं.''[1] असा त्रागा करितात. या सर्व धमक्याचा जोर दादासाहेबांच्या बाहुबलावर होता.[2] बाळाजी बाजीरावांचा मनोदय त्यांजपासून कित्येक उमदीं उमदीं कामें करून घेण्याचा होता हें त्यांनीं बापूजी महादेव हिंगण्यांस लिहिलेल्या ता. १४।१०।१७५६ च्या पत्रावरून दिसून येतें.[3]

दादासाहेबांचे मुख्य सद्गुण औदार्य, दातृत्व, उमदा स्वभाव, सरळवृत्ति. ज्यांवर विश्वास टाकला त्यास त्यांनीं कधींहि दगा दिला नाहीं. याच त्यांच्या गुणांमुळें त्यांच्या जिवास जीव देणारे सरदार व मित्र त्यांस लाभले. त्यांचे दोष त्यांस दिसत असून त्यांचें सर्वस्व गेलें, प्राण गेला, तरी त्यांस सोडावयास ते तयार नव्हतें. एकमेकांच्या सांनिध्यांत एकमेकांस स्वर्गसुखाची प्राप्ति होत आहेसें वाटे. पुष्कळ वेळां दादासाहेबांस " भोळा सांब[4] " म्हणून संबोधीत. डावपेंचांची जाणीव त्यांस असावी तेवढी नव्हती. त्यांनीं जय मिळवूनहि थो. माधवरावांनीं जोडे उचलून त्यांस क्षणांत चकविलें.[5] स्वारींत यश मिळूनहि निजामानें वाटेल तो मुलूख ठेवा

---

१. हिंगणे दप्तर खं. १ ले. ९४, ९७, ९८, १०३, १०७, १११, ११२, ११४, ११७, ११८, ११९, १२७.

२. "नवाब लबाड करीत आलिले तरी आम्ही आज बिगाडास तयार येक्या पायावर आहो.' —हिंगणे दप्तर खं. १ पृ ९७.

"नवाबानीं गर्व मनांत न आणावा. ... नवाबाचा मुलूक मारितो. त्याच्यानें जे होईल ते करीत. आजच्च विघाड करितो." —हिंगणे दप्तर खं.१, पृ. ९८.

"आम्हास मलमलीत पुरवत नाहीं. वजिराची खुशामत व तुमची होत नाहीं. तोंडावर मारूनच कामें करितों. —हिंगणे दप्तर खं.२, पृ.१०३.

३. हिंगणे दप्तर खं.१, पृ.१३२-१३३.

४. पे. द. भा.३६, पृ.२४६.

५. दादासाहेबांचा जोडा उचलून डोईवर घेतला, बहुतच अजमात जाले. तेणेंकरून दादासाहेब ममतावादांत पडले. आणि रायांस आज्ञा केली की **तुमचें चितांत दुसरा अर्थ दिसत नाहीं**; तरी सर्व तुमचेंच आहे. मजला कांहीं लागत नाहीं. ... शेवटीं दादास कळलें कीं जीव काढून निर्माल्यवत केलें. निरोपाय जाणून स्नानसंध्या मान्य केली. पे. द. भा. १९, पृ.१५.

व वाटेल तो घ्या म्हणून शिक्का पुढें ठेवतांच त्यांनीं बहुतेक प्रांत परत दिला. त्यांस वाटलें कीं या उपायानें निजाम आपला कायमचा मित्र होऊन आपल्या फार उपयोगी पडेल. पण तो इतका खुळा नव्हता. बारभाईचे- विशेषेंकरून नानांचे- डाव त्यांस उमगले नाहींत. तरी बारभाई दादासाहेबांएवढे उदार बुद्धीचे असते, त्यांस स्वार्थापेक्षां मराठ्याचें राज्य टिकविण्यांचें शहाणपण सुचतें, तर त्यांनीं पेशव्यांच्या अस्सल कर्त्या वंशजास पाठिंबा दिला असता. पण अधिकार लालसेनें त्यांस पछाडलें होतें. रेसिडेंट मि. मॉस्टिन तर म्हणतो कीं कारभाऱ्यांस- बारभाईस- गंगाबाई व तिचा पुत्र यांच्या अवगुंठताखालीं पेशव्यांचें राज्यच गिळंकृत करावयाचें होतें "but (the ministers) meant to seize the Government under Cloak of Gaugabay and Her Issue." (Mostyn's Diary p. 311.)

मराठ्यांचा इ. स. १७६१ त पानिपतीं पराभव झाला; तरी [१]अब्दाली इ. स. १७६३ त श्रीमंतरावां ( माधवरावां )पेक्षां दादासाहेबांस दीडपट किंमतीचा पोषाख नजर पाठवितों यांतच त्यांची करामत दिसून येते.

विद्यमान ग्रंथकार रा. ब. गोविंदराव सरदेसाई म्हणतातः- " कसेहि प्रसंग किंवा अडचणी आल्या तरी नाना तऱ्हेच्या हिकमतींनीं त्यांस तोंड देऊन प्रतिपक्षास गोत्यांत आणण्याची दादाची करामत एकट्या शिवाजीच्या अंगीं आढळते. "[२]

" ... दादा विलक्षण चपळ व हिकमती होता. योषिता व शिशु यांचे मार्फत त्याचीं अनुसंधानें चालत. कशाही अडचणींतून निसटून जाणारा असल्यामुळें त्यानें आठ वर्षेंपावेतों सर्व विरोधकांस पुरेंपुरें करून सोडलें[३]. "

दादासाहेबांस ज्या बारभाईचे आत्मा नाना फडणीस होते त्याहून मराठी राज्याची आस्था खात्रीनें अधिक होती. याचें उत्कृष्ट उदाहरणः-

Appendix No. 12 to the Third English Embassy to Poona comprising Mostyn's Diary and Mostyn's

१. इतिहाससंग्रह, ऐ. टि. भा. १-५६ पृ.८४.

२. मराठी रियासत उ. वि. १ पृ.११८.

३. म. रि. म. वि.४ पृ.३६४.

Letters यांत आहे तें असें[1]:- Furthermore in comparing and contrasting Nana Furnavis and Raghoba, it should be borne in mind that in that contest, which broke out after Narayan Rao's murder, Raghoba was rather less prepared to make territorial concessions to the English (Mostyn, Letters, the 13th April, 1774) than the ministerial party— of whom Farnavis was the soul —were ready to win over the Nizam by promises of grants of forts and jaghirs. (Mostyn's Letters, the 24th April, the 28th May, the 24th June, the 23rd July, the 10th August and the 1st November, 1774).

दादासाहेबांची दूरदृष्टि नांवाजण्यासारखीच होती. पांच वर्षांनीं काय होणार तें ते अगोदर सांगत असत. आनंदीबाईचे त्यांच्या दिनचर्येंत असे उद्गार आहेत:—

"...साहेबाची द्रष्टी पुढें पाचा वर्षी काय होईल ते सांगत होते आणि हे ( दुसरे बाजीराव ) कसे आहेत[2]!

दादासाहेब फार मोठे सेनापति[3] होते. केव्हां हिंय्या करून हल्ला करावा, केव्हां मर्दुमकी गाजवावी व केव्हां जरूर पडल्यास माघार घ्यावी याची पक्की जाणिव त्यांस होती. पंजाबांत[3] व कर्नाटकांत त्यांनीं आपलें नांव चिरस्मरणीय केलेलें आहे. गिलचे, दुराणी, हैदर, देशी मोगल यांची खोड त्यांनींच मोडावी. आपलें सैन्य फितुर झालें तेव्हां त्यांनीं माघार घेतली. अविचारानें मनुष्यहानि केली नाहीं. १७६१ त पानिपतीं ते जाते तर दौंडी करून गिलचांस एक तर गांठून त्यांचा फन्ना उडविते नाहीं तर त्यांस परत जाण्यास संधि देते.

---

१. पृ. ३८४

२. पे. द. भा. ४. पृ. ४४.

३. "ह्यानंतर रघुनाथराव ह्यानें १७५३-५५ मध्यें एक व १७५६-१७५८ मध्यें दुसरी अशा दोन मोहिमा उत्तर हिंदमध्यें केल्या. **रणभूमि विशारद** म्हणून लौकिकहि मिळविला. दिल्लीचा पातशहादेखील मराठ्यांची मदत याचूं लागला." —मराठा शाहींतील उत्तर-दक्षिणवाद : कृ. पां. कुलकर्णी, विविधवृत्त, दिवाळी अंक १९४५, पृ.८९.

दादासाहेबांनीं आनंदवल्लीस तोफांचे गोळे तयार करण्याचा नवीन कारखाना सुरू केला. अशाच प्रकारचा कारखाना पूर्वीं नागोठण्यास होता.[१] ( २५-९–२४-१०–१७६७). दादासाहेबांनीं दारू करणार कारीगर मागविल्याचा दाखला आहे.[२]

दादासाहेब कारभार शहाणपणानें व न्यायानें करीत. पण तसें चालतें तर स्वार्थसाधूंचें कसें फावतें ? दादासाहेबांकडून कारभार काढून घेण्याच्या अनेक शकली त्यांनीं काढिल्या. गोपीकाबाईहि महाकारस्थानी होत्या.

यामुळें त्यांच्यांत व दादासाहेबांत प्रथम वितुष्ट आलें, चुलत्या-पुतण्याचा बेबनाव झाला व दादासाहेबांस थोडीफार कैदहि भोगावी लागली. मि. डब्लू. टेलरसाहेब ता. ९ ऑक्टोबर १७७५ रोजीं दि ऑ. वॉरन हेस्टिंग्जला लिहिलेल्या सरकारी पत्रांत म्हणतातः—

*The wise and just administration of Raghoba* would have totally defeated the views those men had formed of benefitting themselves by the minority of Madhavrao. They therefore exerted every artifice and intrigue to deprive Raghoba of Power. Gopikabai, the widow of Nana, was a woman deeply given to intrigues of every kind ... Hence arose the bitter ha'red of Gopikabai to Raghoba. The ministers availed themselves of this circumstance and of her influence with her young son, to breed a coldness between the uncle and nephew, which ended in a declared breach, the total deprivation of power and at length in some degree in the confinement of Raghoba[३]."—

१. प. द. भा. २२, पृ. ११८.

२. राजवाडे खं.१२. पृ.१४३, ले. २३४.

३. Selections from the Letters, Despatches and other State Papers, preserved in the Bombay Secretariat, Maratha Series, Vol. I, edited by George W. Forrest, B. A., Deccan College.

बारभाईकडे गेलेल्या– दादासाहेबांच्या शब्दांत बोलावयाचें तर– मालसिकारे वगैरे मंडळींस माफी देऊन आपल्या बाजूस वळवून घेण्याचें औदार्य त्यांत होतें. एक मासला देतों:—

श्री

राजश्री मालसिकारे मंडली गोसावी यांसीः—

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव प्रधान आर्सीर्वाद सु सीत सबैन मया व आलफ. तुम्ही पुरातन सरकारचे सेवक बहुत दिवस निष्ठेनें सेवा करीत आला. कालवशात् आडचणीस्तव फितुऱ्याकडे राहिला. आसो. जाले ते जाले. याउपरी तिकडे राहणे उचित नाही. तरी कोणेविसी वसवस न धरिता खातरजमेने निघोन येणें. सर्व प्रकारे तुम्हावरी कृपा करून चालविले जाईल. जाणिजे छ १४ राखर बहुत काय लिहिणे.[1]

श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांनीं पाठ थोपटून पुढें आणलेले व त्यांचे चिरंजीव रघुनाथराव यांनीं सरदार पदवीनें विभूषित केलेले सखाराम हरि मरणाच्या द्वारांत उभे असतां काय उद्गारले पहा. मृत्युसमयीं जिवाची आशा सोडल्यावर इहलोकींची काय मातबरी ? त्या वेळचे व्यक्तीचे उद्गार मनन करण्यासारखे असून विचार सत्य असतात.

"Nana tried his best to induce Sakharam Hari to leave Raghunathrao and to join the Ministerial party. But "Sakharam Hari nobly declared that nothing should ever induce him to abjure the cause of a *generous master who had been his protector from youth to manhood, that Raghunathrao was a soldier and Nana a cunning cowardly courtier*"— (Grant Duff's History of the Marathas, Indian Reprint. Vol II p. 250)

ता. १९ सप्टेंबर १७५४ रोजीं बापूजी व दामोदर महादेव हिंगणे यांस लिहिलेल्या पत्रांत (ले. १०५ हिंगणे दप्तर खं. १ पृ. ८४) सरकारच्या तसबिरा नीट करावयास दिल्या असून त्या अद्यापि आल्या

---

१. पे. द. भा. ३६. पृ. २६१.

नाहींत तरी त्या ताकीद करून पाठविण्यास तंबी दिलेली आहे. यावरून दादासाहेबांस कलेची आवड असून; तसबिरा नेहमीं जवळ असाव्यात असें त्यांस वाटे हें उघड दिसतें. परंतु या हल्लीं आहेत कोठें ? खेडास असतां आम्हीं चौकशी केली. तीवरून निदान कांहीं कडूसचे श्री. गोडसे यांजकडे गेल्या असाव्यातसें वाटतें. माणकोजी चित्रकार यास त्रिंबकचीं चित्रें काढावयास नेहमीं आज्ञा केली होती.[१]

इंग्रजांकडून नजर आलेल्या जिनसांत दर्यांच्या चोवीस चित्रांचा समावेश होतो.[२] यावरूनहि दादासाहेबांस चित्रकलेंतील रंगांची चांगली कल्पना असावीसें दिसतें.

छत्रपति प्रतापसिंह महाराजांनीं ज्याप्रमाणें विजापुर वगैरे ठिकाणांहून कैक चित्रें आणवून सातारचा राजवाडा सुशोभित केला त्याप्रमाणें दादासाहेबांनीं आपला दिवाणखाना सजविला होता.

त्यांचीं दोन पुस्तकालयें (libraries) म्हणजे महाराष्ट्राचा एक अपूर्व ठेवा होता. तंजावरच्या सरस्वती महालानें जशी आपली कीर्ति अजरामर करून ठेविली त्याप्रमाणें या पुस्तकालयांनीं महाराष्ट्रास महत्त्व प्राप्त करून दिलें.

श्रीमंत दादासाहेबांनीं शेंकडों अमूल्य हस्तलिखित ग्रंथ पैदा करून व अगणित नकलून आपलीं वाचनालयें विभूषित केलीं. हजारों नव्हे लक्षावधि रुपये खर्चून हा ठेवा जतन करून ठेवला.

पे. द.त एके ठिकाणीं दादासाहेबांच्या स्वारींतील खरेदी पुस्तकांचा खर्च ८६००० रुपयांचा[३] दिलेला आहे. त्यांत विज्ञानेश्वर, अध्यात्मनारायण, अग्निपुराण, काशीमाहात्म्य, गीतगोविंद सटीक, गयामाहात्म्य, केदार माहात्म्य, नीलकंठी सटीक, शूद्रकमलाकर वगैरे ग्रंथ आहेत. पुढें रुपये ४२६१६+६४८८०+३५०० खर्ची पडले असून मत्स्यपुराण, रत्नावलि

१. पे. द. भा. ३२, पृ. २७.

२. पे. द. भा. २२, पृ.१२०.

३. आमचा सह्याद्रि डिसेंबर १९४३ तील श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांची विद्याभिरुचि हा लेख पहा. पत्रव्यवहार म. पृ.२. पे. द. भा.२२, पृ.९४.

पंचोपनिषद्, काव्यप्रकाशटीका, योगसूत्र प्रास्य (ष्य) टीका, बृहदारण्योपनिषद्, मानसोल्लास, सनत्सुजात सटीक, काव्यप्रदोष, लिंगपुराण, योग तरंगिणी, बृहत्कथा[१] वगैरे ग्रंथांचा उल्लेख आहे. नंतर स्वारी दादासाहेब यावर खर्च ७४५८० पडला असून वाक्यसुधा सटीक, बालबोधिनी, वेदान्तसार टीका, वेदान्तार्थविवेक, मुक्तावली टीका, कुवलयानंद, मैत्रेयुपनिषद्-दीपिका, लीलावतीची टीका, सांख्यतत्त्व, कौमुदी, अष्टाध्यायी, मकरंदसारिणी वगैरे ग्रंथांचीं नांवें आहेत. खरेदीपुस्तकांत आणखी द्वारकामाहात्म्य, जैमिनीअश्वमेध यांचीं नांवें दिलीं आहेत. ही यादी कितीतरी वाढवितां येईल ! हे ग्रंथ आजच्या पुस्तकालयांत असतात तसलीं गोष्टींचीं पुस्तकें नव्हेत, चटोर नाटकें नव्हेत. डोकें खाजवावयास लावतील असे ग्रंथ, टीका, प्रदीप, दीपिका व प्रसिद्ध स्थल माहात्म्यें आहेत. यावरून दादासाहेबांची अभिरुचि व्यक्त होते.

पण वरील ग्रंथ आज कोठें आहेत ?

यांपैकीं कांहीं आनंदवल्लीस असून कांहीं शनिवारवाड्यांत होते. शनिवारवाड्यांतील भां. ओ. रि. इ. च्या पुस्तकालयांत संग्रहीत झाले असावेत. तथापि प्रा. गोडे यांना विचारितां अद्याप त्यांचा थांग लागत नाहीं. आनंदवल्लीचे बरेच ग्रंथ पुण्यास आले असतील. पण कांहीं नासिकांतहि असावेतसें वाटतें.

दादासाहेबांचे दोष म्हणजे त्यांचा रखेऱ्यांचा परिवार, त्यांची सुरतेस इंग्रजांकडे गेलेली तक्रार व त्यांस झालेला बाहेरचा रोग हे दाखविण्यांत येतात.

तथापि रखेल्या, स्त्रिया ठेवण्याचा रिवाज त्या वेळीं सार्वत्रिक होता; नव्हे त्या नसल्यास उलट मोठे म्हणविणाऱ्या गृहस्थांस नावें ठेवण्यांत येत असत. थोरले शिवछत्रपति एवढे आदर्शभूत छत्रपति. तथापि यांच्याहि दोन उपस्त्रिया होत्याच.[२]

---

१. सदर पृ.९७.

२. म. रि. २ शककर्ता शिवाजी पृ.२०९. शिवाजी निबंधावली– श्रीशिवाजीमहाराजांची कौटुंबिक माहिती.

पेशव्यांच्या घराण्यांत कटिशूलाची व्यथा एकट्या दादासाहेबांसच होती काय? थोरले बाजीरावसाहेब याबाबतींत पुष्कळच चांगले. एका मस्तानीखेरीज कोठें वाकडी नजर त्यांनीं टाकल्याचा दाखला आहे काय? पुणें जिल्ह्याचे आम्ही मॅरेज रजिस्ट्रार होतों. तेव्हां बाजीराव व मस्तानी यांचा काशीबाई हयात नसत्या तर सिव्हिल विवाह लागता तरी आम्हांस कांहीं भयंकर प्रकार वाटला नसता. ती हिंदु होऊन समशेरबहाद्दरची मुंज जाली असती तरी वावगें झालें नसतें. मस्तानीस पतिव्रतेहून अधिक गुण सामान्यतः पडतील. मस्तानीच्या वंशजांचा मराठी राज्यास मोठाच उपयोग निःसंशय झालेला आहे. विरहदुःखानें होरपळून पाबळचे आसपास ती मृत्यु पावलीसें दिसतें. तिचें थडगें पाबळास आहे. ती अलौकिक स्त्रीच होती. तीस कैद करणारे नानासाहेब यांचा परिवार मोठा होता याची वाट काय? ते उत्तर हिंदुस्थानांतून सुंदर पोरी मागवीत होते त्याचें समर्थन कसें करावयाचें? नाना फडणीसांचें वर्तन काय होतें[1]! आपल्या आत्मचरित्रांत ते स्वतःच काय लिहितात[2]? मग एकट्या रघुनाथराव दादासाहेबांवर इतिहासतज्ञ म्हणविणाऱ्यांनीं तुटून पडावें यांत काय अर्थ? ते उत्तर हिंदुस्थानांत होते. तेथें मोठमोठे जनानखाने असत. ती पद्धत त्यांनीं उचलली. आनंदीबाई कोणा रखेल्यांस फसवीत नव्हत्या. उलट बाईसाहेब त्यांची फार उत्तम व्यवस्था ठेवीत होत्या. त्यांस बहिणी-प्रमाणें वागवीत होत्या.

या उपस्त्रिया व रखेल्या ठेवण्याचा रिवाज चांगला होता असें कोणी प्रतिपादित नाहीं. पण काय? त्या वेळीं तो प्रचारांत होता हें खरें!! त्यावरून राज्यकर्त्या पुरुषांस नादान ठरवितां येत नाहीं. त्यांची रवानगी पाताळांत करितां येत नाहीं इतकेंच आमचें म्हणणें.

---

१. ए. मॅकडोनल्ड कृत नाना फडणीसांची बखर पृ.६. भा. इ. सं. म. त्रै. व.२४. अं. १. पृ.१०. लक्ष्मण हा नाना फडणीस यांजपासी गुलाची कल्वातीण होती तिचा हा साजिंदा. सबब वसाहातीपासून पटी नाहीं. —पुणें नगर संशोधन वृत्त. खं.२.

२. काव्येतिहाससंग्रह. [३१] ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे [५३] पृष्ठें ३४-३५.

पेशव्यांच्या स्त्रियांची नीतिमत्ता मात्र एकंदरींत अखेरपर्यंत दांडगी होती. त्यांनीं महाराष्ट्रांतच काय पण नेपाळातहि आपली कीर्ति अजरामर केली आहे. दु. बाजीरावसाहेबांच्या पत्नी महाराणी सईबाई किती थोर होत्या ? आम्हीं दिल्लीस व पंजाबांत असतां कित्येक काश्मिरी पंडितांनीं महाराष्ट्रांतील स्त्रियांची आमच्यासमोर थोरवी गाइलेली आहे.

दादासाहेबांचा मुख्य दोष म्हणजे मनाची अस्थिरता, चांचल्य हा होय. आणि तो खरा होता. त्याचे योगानें कित्येक कामें बिनसत होतीं.

उशापायित्राशीं लोक बसलेलेच असत. ज्यांनीं जें सांगावें त्यावर श्रीमंतांचा कांहीं काळ तरी विश्वास बसावा. यामुळें शत्रूंस न कळून एक प्रकारची फूस मिळाल्यासारखें होई.

हरि गिरमाजींनीं ता. १३-७-१७७४ च्या पत्रांत हरिपंत फडक्यांस लिहिलें:— " बोध करणार बहुत, एकाचा विश्वास नाहीं. सरदारांपैकीं एकाचा भरंवसा, एकाचा संशय. त्यांचाहि परस्परांत संशय."[१]

खुद्द सखाराम हरि लक्ष्मणपंत आंबेकरांस शके १६९७ माघ व. ८ स म्हणजे ता. १२ फेब्रुआरी १७७६ रोजीं असें लिहितातः—– "परंतु आढळले अर्थ लिहिले आहेत. **श्रीमंतांचे** मर्जीत दुसरा प्रकार नाहीं, हे माझी खातरजमा. परंतु ज्यार्णी **जे समजवावे तें ऐकावें, हा प्रकार प्रारंभापासून आहे तो मात्र आहे.** त्यास विलाज नाहीं ! श्रीकृपेनें मसलत मात्र सिद्धीस जावी. हेच काळजींत आहे. परंतु ऐशा बखेडीयांनीं दुष्मन शेर होतात व कितेक येणारांसहि संशय पडतो. गोविंदराव गायकवाडामुळें लोक दोष ठेवितील. **आम्हांसी इंग्रज असें चालल्यानीं श्रीमंताचा व इंग्रजांचा इतबार लोक कसा धरितील.** हे मसलतीस विरुद्ध समजोन **श्रीमंतांनीं आज्ञा निक्षून करावी, ते मात्र घडत नाहीं.**"

दादासाहेबांस सर्व जुन्या मंत्र्यांविषयीं अविश्वास उत्पन्न झाला व तो त्यांनीं प्रदर्शित केला ही त्यांची मोठीच चूक झाली. ब्राह्मण कारभारी सर्वच अविश्वासू नव्हते. परंतु श्रीमंतास त्यांचा विश्वास येईना तेव्हां आत्म-संरक्षणार्थ त्यांनीं पक्ष निर्माण केले. त्यांनीं कांहीं कारभारी पूर्ण विश्वासांत घेऊन

---

१. म. रि. उ. वि. पृ. ११ वगैरे.

मार्ग आंखला असता तर त्यांस खात्रीनें यश आलें असतें. या ब्राह्मण मुत्सद्यांकडे दुर्लक्ष करून भागण्यासारखें नव्हतें; कारण राज्ययंत्र चालविण्यांत ते मुरलेले होते. निव्वळ गारदी लोकांवर अवलंबून चालणार नव्हतें. ते शूर असले तरी राज्यकारभाराचा त्यांस यत्किंचित अनुभव नव्हता. हुकुमाच्या बाहेरहि ते स्वच्छंदानें जात. हाच अनुभव नारायणरावांस श्रीमंत दादासाहेब बचावीत असतां निष्कारण मारण्याचे वेळीं आलाच कीं नाहीं? त्यानें सर्व काम बिनसलें.

चंचल स्वभावामुळें श्रीमंतांचे अत्यंत विश्वासू सरदार सखाराम हरि यांचाहि मार्ग बराच कुंठित झाला.

मि. मॉस्टिननें जुन्या कारभाऱ्यांविषयीं श्रीमंतांनीं अविश्वास दाखविला व गारद्यांवर ते विसंबले त्यासंबंधानें खालील उद्गार काढले आहेत:--

[१] Ragobah, from what I can learn, at present places His Chief safety in the Guards, who still have Charge of the Palace and are the Principal People about His Person. Should He continue to Distrust all the Old Ministers, it is the Current Opinion this Government will not long remain in the Bramins Hands, as they are the only Persons that can support Him; and in that case they will be Drove to the necessity of forming Parties for their own safety."

पैशाची अडचण तर मनस्वी होतीच. दिवाण लौकर न नेमल्यामुळें अविश्वासांत कांहींशी भरच पडली. मि. मॉस्टिनसाहेबांनें आपल्या दिनचर्येंत पुढें असें नमूद केलें आहे :—

[२] "From all I can learn, Money is so Scarce in the Morattah Camp, that only a part of the Troops are allowed Provisions, the rest get it as they can, on a promise of being repaid on their return to Poonah; this, added to Ragobahs continuing to Distrust all the old Ministers, with their withdrawing from Him and

---

१. Mostyn's Diary, September 1773 p. 204.

२. Mostyn's Diary, November 1773 p. 273.

his not having yet appointed a Duan make mnay People even at this time doubtful of His Success.

दादासाहेब थोडे स्तुतिप्रिय असत. संधिसाधू या अल्प दोषाचा प्रसंगपरत्वें फायदा घेत.

दादासाहेबांचें तेज पुढें पुढें कमी दिसूं लागलें याचें मुख्य कारण त्यांस बारभाईंचीं कारस्थानें हाणून पाडण्यांत व आपला बचाव करण्यांत बुद्धिसामर्थ्य खर्चीं घालावें लागलें. कारस्थानांत ते तरबेज नव्हते. नानासाहेब पेशव्यांनीं त्यांस शौर्य दाखविण्यास जशी संधि दिली तशी बारभाईच्या वेळीं केव्हांहि मिळाली नाहीं. तत्पूर्वींहि निजामावर जय मिळवून पुढें मागें तो उपयोगी पडेल यास्तव त्यास सवलती देणें त्यांस भाग पडलें होतें.

दादासाहेब सर्वगुणसंपन्न होते असें कोणी इतिहासज्ञ प्रतिपादित नाहीं. तथापि नारायणरावानंतर पेशव्यांच्या कुलांत त्यांच्याएवढा कर्तबगार व शूर पुरुष राहिला नाहीं. त्यांस अजीबात बाजूस सारून निभणार नाहीं हें बारभाईस कळावयास हवें होतें. त्यांनीं सत्तेचा अभिलाष धरला हा त्यांचा निव्वळ स्वार्थ होता. देशहिताच्या व मराठी राज्याच्या हितास्तव दादासाहेबांची समजूत घालून त्यांस अधिकारी करून त्यांस मदत करण्यावांचून देशहित साधणार नव्हतें. त्यांचा अजीबात पाडाव करून थोरल्या माधवरावांनीं दिलेला मुलूखहि त्यांजकडून हिसकून घेण्यांत त्यांचे हातून प्रमाद घडला. एकदां छत्रपतींनीं त्यांस पेशवेपदावर अधिष्ठित केल्यानंतर ते व त्यांचे सरदार यांची व्यवस्था लावणें भाग होतें. दु. बाजीरावांस गादीवरून काढल्यावर परकीयांनीं देखील ते मरेपर्यंत त्यांचा इतमाम ब्रह्मावर्तीं ठेवला. त्यांच्या सरदारांची व त्यांवर अवलंबून असलेल्या लोकांची व्यवस्था लावून दिली. परंतु बारभाईनीं त्यांच्या सरदारांची व हस्तकांची मालमत्ता लुटून आणिली ! हे देशी कारभारी ! !

## दादासाहेबांची[1] सावधगिरी

शेट्याजी आइतोळ्यांस ता. २७–७–१७६६ रोजीं श्रीमंत रघुनाथराव दादासाहेबांनीं लिहिलेलें पत्र पेशवे दसरांत आहे. त्यांत त्यांची

---

१. बाकी दादासुद्धां अत्यंत सावध व हिकमती होता; तो सहसा पकडला गेलाच नसता. म. रि. उ. वि. १ पृ. १०.

सावधगिरी चांगली दृष्टोत्पत्तीस येते. गृहकलह होऊं नये, पेंच पडोन नुकसानी होऊं नये, चिरंजीवा– थोरल्या माधवरावा–प्रमाणें आंत एक व बाहेर जाहिराणा एक दर्शवावा, आपलें अंग न दाखवावें, गृहकलहामुळें मागें नास झाले, दौलत खराब झाली तशी होणार यास्तव शहर (बऱ्हाणपुर) हवालीं करावें वगैरें मजकुर त्यांत आहे. त्यांतील कारणापुरता उतारा असा:—

"हाली येविसींची पैरवीं हालीं हुजरून व्हावी तर सध्याच ग्रहकलह होणार; जाला म्हणजे मातबर पेंच पडोन बहुत नुकसानी होऊं सकणार. परंतु आमचा पुस्तपन्हा आहेसा कोणास कलो न देतां जसे चिरंजीवांनीं पुरंधरचे आंत येक व बाहेर जाहिराणा येक दर्शविला होता तसें करावें ... परंतु आमचें आंग येकंदर न दाखवावें....ते संभाळून गुप्त कुमक होईल तर करणें...येथून कुमक करावी तरी ग्रहकलहामुळें मागें नास जाहाले, दौलत खराब जाहाली तसी पुढें होणार, यास्तव तूर्त शहर हवाली करावे हेच उतम आहे."[1]

श्रीमंत दादासाहेबांची राजनीति व सावधगिरी दर्शविणारें आणखी एक पत्र रा. खं. १२[2] मध्यें तोतया प्रकरणासंबंधीं आहे. त्यांतील उतारा या मुद्यांच्या आविष्करणास चांगला उपयोगी पडेल. पहा ते काय लिहितातः–

" तिकडे भाऊचें बंड बळावलेंच आहे तिकडे येखादा शाहाणा मनुष्य पाठवणें, म्हणोन पेसजी लिहिलेंच आहे. त्यास तुम्हीं ज्यास पाठवाल त्यांणीं जाऊन, चरित्र काय आहे तें मनास आणावें. केवळ **हुजुरूनच पाठविलें, हाही भाव दर्शऊं नये. असें मधेचें बोट तोंडाजवळ न्यावें, तोंडांत सांपडूं देऊं तर नये.** दाखवावें तर खरें...त्यास कांहीं **आशा उपजे असें बोलावें, परंतु दस्तऐवज सांपडूं न देणें.**' हे विचार नादानी दर्शवितात काय ? तोतयाचें चरित्र काय आहे याचा तर विचार करावा. श्रीमंत दादासाहेबांकडूनच आलों हें दाखवूं नये. मधेचें बोट तोंडाजवळ न्यावें पण त्यांत सांपडूं देऊं नये. आशा उत्पन्न होईलसें बोलावें पण लेखी सांपडूं नये. हें वागणें मुत्सद्यांस शोभणारें आहे कीं अविचार दर्शविणारें आहे याचा विचार वाचकांनींच करावा.

---

१. पे. द. भा. १९ पृ. ५४–५५ नं. ५२.

२. लेखांक १६६ पृ. १०९. १६९८ आषाढ वद्य ६ ता. १० जुलई १७७६.

पुढें त्याच पत्रांत श्रीमंत लक्ष्मण आप्पाजी आंग्रेकरांस लिहितात- " आम्हांजवळ नारो गोपाळ हा सर्वही मजकूर सांगतो व सुचवितातः- इष्टोराचे मैत्र बहुत आमचे ममतेचा त्यासी बोलत जाणें. कार्नेलीसी ( कीटिंगासी ) कार्याकारण बोलावें. वरकडही अंगरेज ममतेंत राखावे मेवा. वांटावा. हरतऱ्हेनें कोसलदार वगैरे ममतेंत घ्यावे. लक्ष्मणरावांस खुलविण्या-साठीं दादासाहेब लिहितात कीं ' सर्व मुछदी गेले तुम्ही राहिलां तरी सर्वो-पेक्षां अधिक करून दाखवाल हा भरंवसा आहे.' आणि 'हा कागद दोन तीन वेळां वाचण्यास' सांगतात. इष्टुर फांकडा दादांच्या ममतेंतील होता. मेवामिठाई वांटून इतर इंग्रजांची मर्जी संपादून कर्नेलशीं ( कीटिंगशीं ) मात्र जरूरीपुरतेंच बोलावें अधिक कळूं देऊं नये सुचवितात. यावरून दादासाहेबांस मनुष्याची परीक्षा अगदींच नव्हती असें प्रतिपादितां येईल काय ?

रा. खं. १२ ले. २२९ पृ. १४२ हा शके १७०१ श्रावण वद्य १२ म्हणजे ता. ३१ ऑगस्टास १७७९ चा असून त्यांत श्रीमंत दादा-साहेब सदाशिव धोंडदेव यांस असें बजावतातः—" पकी बातमी लिहिली येईल तितकीच लिहित जाणें. बाजारी बातमी न लिहिणें. त्यांतहि जरूर असल्यास लिहिणें परंतु ही बाजारी बातमीं असें लिहीत जाणें. कलम १" अर्थात् वाटेल त्या गप्पांवर ते विश्वास ठेवीत नव्हते.

तोतयाप्रमाणें आपली कांहीं तरी स्थिति होईल या भीतीनें दादासाहेब मुंबईस वरळीस इंग्रजांचे मुलखांत राहिले. ते १७७८ पर्यंत तेथें होते. त्यांनीं तोफांचा स्वतःचा कारखाना काढिला. राजवाडेकृत खं. १२ ले. २३४, १७०१ आश्विन व. ७ ३१ ऑक्टोबर १६७९ इ. रा. रा. सदाशिव धोंडदेव यांस लिहिलेला आहे. त्यांत दारू करणाऱ्या कारागिरांस आपल्या नोकरींत येण्यास्तव दादासाहेब काय काय खटपटी करीत याचें चांगलें दिग्दर्शन केलें आहे. त्यांत ते म्हणतातः-" सरकारांत दारू करणार कारागीर यांचा दरकार आहे. त्यास तुम्ही जनराल यास हटकून दोन कारीगर त्याजवळ मागणें. शेवटीं त्याणीं येकच दिल्यास त्यास हजूर पाठ-विणें. जर जनराल यांणीं द्यावयास आनमान केल्यास तेथें कारीगार असतील त्याचा शोध करून **त्यांस फोडून तेथें त्यांचा** दरमहा असेल त्याहून

जाजती च्यार पांच रुपये सरकारांतून केले जातील हा लोभ दाखवून आणि येथें घरीं जातो म्हणून निरोप घेऊन हुजूर तुम्ही त्यास पाठवून देणें."

पहा कसा लोभ दाखवून व काय बहाणा करून दारूगोळा करणारांस दादासाहेब आपल्या नोकरींत ओढून घेण्याची खटपट करीत !

दुसरे एक उत्कृष्ट उदाहरण पे. द. भा. २९ नं. १७२ पृ. १७०-१७१ वरील पत्रांत आहे. हें ( दादासाहेबांनीं ) राजश्री महिपतराव लक्ष्मण, सखाराम हरि व कुकाजी शिवराम या त्रिवर्गास ज्यान्युअरी इ. स. १७६७ त लिहिलेलें आहे. त्यांतील उतारा:—"भेलशाचे गांवांत सरकारचें निशान (ण) दाखल जाले. तोफा वगैरे वस्तभाव समसेरखान नेऊं म्हणतात, त्यास तोफा दारुगोलीविसीं आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करूं म्हणौन लिा त्या(स) जे आज्ञा करणें ते सविस्तर नागोराव विठ्ठल याजपासी केली आहे. ते सांगतील त्याप्रो वर्तणूक करणें. तोफासिवाय वस्तभाव त्यास नेऊ देणें. तोफाचा प्रकार तरी पठारी वगैरे तीन ठाणीं आहेत ती सरकारचे लोकाचे हवाली होऊन कबजे आली म्हणजे तोफा घेऊन जाणें. तरी तिन्ही ठाणीं हस्तगत होत कबजा येत तोपर्यंत तोफा देत नाहीं ऐसे सांगणें. परंतु ठाण्यास आडथळा न होय ते करणें. तिन्हीं ठाण्याकरितां तोफा अटकवून ठेविल्या वरकड कांहीं गुंता नाहीं. तिन्ही ठाणीं सरकारांत दाखल जालीयावर तोफास गुंता नाहीं. ऐसे त्यास भासेसे करणें. तिन्ही ठाणीं हस्तगत जाहालियावर तोफाविसी आज्ञा होईल त्या प्रो करणें. तोफा व चांगल्या जेजाला असतील त्या तिन्ही ठाण्याचें निमित्येकरून अटकऊन ठेवणें. नागोराव विठल याजपासी जो प्रकार सांगितला आहे, तो जाहिराणा होऊन न देणें. जाहिराणा जालियानें ठाण्यास हिसका बसेल ते फटकाल. याजकरितां ठाणें हस्तगत करून तोफा व जेजाला तिन्ही ठाण्याचे निमित्तानें अटकाविणें. नाकारी तोफा असेल त्यांस नेऊ देणें. दारूगोलीहि नेऊं देणें, चांगल्या तोफा असतील त्या मात्र लिहिल्याप्रों तिन्ही ठाण्याचे निमित्यानें अटकावणें. हा मंत्र गुप्त राखणें..... तोफा वगैरे वस्तभाव नेऊ देणें म्हणौन त्याचे मारफ-

तीनें तुम्हांस पत्रें सादर होत आहेत. परंतु या पत्रप्रो वर्तणूक करणें. आंतून गुप्तपत्र पाठविलें हे किमपि जाहीर होऊं न देणें. सारांश ठाणें हस्तगत व्हावयास दिकत न पडतां जितकी तजवीज तोफा विसी होईल ते करणें. दिकतच देऊ लागली तरी जाऊ देणें. सोमवार मध्यान रात्र. ”

या पत्रावरून अनेक बाबी स्पष्ट होतात. महत्त्वाच्या प्रसंगीं नागोराव विठ्ठल सारख्यांची नेमणूक विश्वासू माणसास नाजूक बाबी प्रत्यक्ष सांगण्यास दादासाहेब करीत, त्यांस तोफा व जेजाला यांची अत्यंत जरूरी होती. सबब ज्या चांगल्या असतील त्या हरहुन्नरें जाऊं न देण्याचा ते प्रयत्न करीत. ठाणीं राखण्याचें वा मिळविण्याचें वगैरे वरकरणी निमित्त करून तीं काबीज झाल्यावर तोफास गुंता नाहीं असें भासविण्यास त्यांनीं सांगितलें. तोफाशिवाय दादासाहेबांस अनवश्यक वस्तभाऊ जाऊं देण्यास त्यांनीं आज्ञा केली. अर्थात् क्षुल्लक निरुपयोगी सामानाकरितां लोकांस दुखविण्यास ते तयार नव्हते. पण अत्यावश्यक गोष्टी ते बावळटपणानें जाऊं देत नव्हते: युद्धकलाविशारद असल्यामुळें कोणत्या जिनसांची आपणांस जरूरी आहे हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें व त्या जिनसा होतां होईल तो ते हातच्या जाऊं देत नसत. गुप्त पत्रें जाहीर होऊं न देण्याची ते फार खबरदारी घेत; कारण तसें केल्यानें ठाण्यास हिसका बसेल हें ते जाणत होते. जरूरीच्या वेळीं मध्यरात्रीपर्यंत ते काम करीत. अर्थात् ते आळशी, ऐदी, सुखावलेले नव्हते.

## श्रीमंत दादासाहेब आनंदीबाई व त्यांचा पक्ष यांस इंग्रजांकडे जाण्याची अवश्यकता कां भासली ?

### त्यांच्याच शब्दांत त्यांचें समर्थन.

इतिहाससंग्रह ऐ. टि. भा. २ पृ. ४९–५० वर आनंदीबाईचीं दोन पत्रें छापिलीं आहेत. त्यांत सवाई माधवराव जन्मास आल्याचें वृत्त हुजुरांस ( दादासाहेबांस ) लिहिलें पण आपणांस न कळविल्याबद्दल नाना फडणीस व सखाराम बापू यांस चिमटे घेऊन नानांस चुणुक

दाखविण्यांत चमत्कार आहे बहुत वेढूं नये ही थोरपणाची रीत आहे असें समजावून, बापूंस पत्रें घेऊन येणाऱ्या खिजमतगारास सोन्याचीं कडीं आपलेवरचीं द्यावींत असें कळविलें आहे. हीं दोन्ही एकाच तारखेचीं ता. २९ एप्रिल इ. स. १७७४ चीं असून बऱ्हाणपुराहून लिहिलेलीं आहेत म्हणजे या वर्षी आनंदीबाईनीं आपल्यापरीनें नाना व बापू या दोन्ही मुत्सद्यांस चार गोष्टी सांगून एकी करण्याचा प्रयत्न करून पाहिलेला आहे. यांतील जरूरीपुरते उतारे दिल्यावांचून बाईचा समंजसपणा व कर्तृत्व लक्षांत येणार नाहीं. नानांस पाठविलेल्या पत्रांत असें आहेः— " चिरंजीव नारायणराण यांस पुत्र जाहल्याचें वर्तमान तिकडे हुजूर ल्याहावें आणि आह्मांस न ल्याहावें, असा तुमचा आमचा ऋणानुबंध आह्मांकडून नाहीं. तुह्मांकडूनही नसेल असें आह्मांस वाटतें. किल्याची ( पुरंधरची ) हवा बहुत सरद आहे. लेंकरूं लहान, यास्तव तुह्मीं व राजश्री सखाराम बापू उभयतां विचार करून, ज्या जाग्यास या गोष्टीनें लेकरांस सुख पडे तें करावें... **थोरपणाची रीत हीच आहे कीं कोणासी कोण्हाही गोष्टीविसीं बहुत वेढूं नये. चुणुक दाखविण्यांत चमत्कार आहे** असें आम्हांस वाटतें. परंपरा पाहोन योग्य असेल तो अर्थ समजून घ्यावा...."

बापूंच्या पत्रांत जरा निराळ्या तऱ्हेनें शब्दरचना करून त्यांस वडीलपणाचा मान देऊन दुर्लौकिक न होईल तें करण्यास विनविलें आहे. बाई म्हणतातः—" तुमच्या **नांवास व वयास जें योग्य असेल तें याउपरि तरी करीत जावें. ...तुम्हांकडेस वडीलपण आहे.** योग्य असेल ते करा. दुर्लौलिक न होता काय करणें हें तुम्हांसारख्यास योग्य असें असून अधिक जाहले. अतःपर जें करणें तें समजून करावें......"

विद्यमान ग्रंथकार रा. ब. सरदेसाई मार्मिकपणें लिहितातः—" **इंग्रजांची मदत घेतल्यानें मराठी राज्य खास बुडेल हें दादा पक्कें जाणून होता. त्याच वेळीं ठाण्याचा किल्ला** इंग्रजांनीं घेतलेला पाहून

तीनें तुम्हांस पत्रें सादर होत आहेत. परंतु या पत्रप्रों वर्तणूक करणें. आंतून गुप्तपत्र पाठविलें हे किमपि जाहीर होऊं न देणें. सारांश ठाणें हस्तगत व्हावयास दिकत न पडतां जितकी तजवीज तोफा विसी होईल ते करणें. दिकतच देऊ लागली तरी जाऊ देणें. सोमवार मध्यान रात्र. ”

या पत्रावरून अनेक बाबी स्पष्ट होतात. महत्त्वाच्या प्रसंगीं नागोराव विठ्ठल सारख्यांची नेमणूक विश्वासू माणसांस नाजूक बाबी प्रत्यक्ष सांगण्यास दादासाहेब करीत, त्यांस तोफा व जेजाला यांची अत्यंत जरूरी होती. सबब ज्या चांगल्या असतील त्या हरहुन्नरें जाऊं न देण्याचा ते प्रयत्न करीत. ठाणीं राखण्याचें वा मिळविण्याचें वगैरे वरकरणी निमित्त करून तीं काबीज झाल्यावर तोफास गुंता नाहीं असें भासविण्यास त्यांनीं सांगितलें. तोफाशिवाय दादासाहेबांस अनवश्यक वस्तभाऊ जाऊं देण्यास त्यांनीं आज्ञा केली. अर्थात् क्षुल्लक निरुपयोगी-सामानाकरितां लोकांस दुखविण्यास ते तयार नव्हते. पण अत्यावश्यक गोष्टी ते बावळटपणानें जाऊं देत नव्हते: युद्धकलाविशारद असल्यामुळें कोणत्या जिनसांची आपणास जरूरी आहे हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें व त्या जिनसा होतां होईल तो ते हातच्या जाऊं देत नसत. गुप्त पत्रें जाहीर होऊं न देण्याची ते फार खबरदारी घेत; कारण तसें केल्यानें ठाण्यास हिसका बसेल हें ते जाणत होते. जरूरीच्या वेळीं मध्यरात्रीपर्यंत ते काम करीत. अर्थात् ते आळशी, ऐदी, सुखावलेले नव्हते.

## श्रीमंत दादासाहेब आनंदीबाई व त्यांचा पक्ष यांस इंग्रजांकडे जाण्याची अवश्यकता कां भासली ?

### त्यांच्याच शब्दांत त्यांचें समर्थन.

इतिहाससंग्रह ऐ. टि. भा. २ पृ. ४९–५० वर आनंदीबाईचीं दोन पत्रें छापिलीं आहेत. त्यांत सवाई माधवराव जन्मास आल्याचें वृत्त हुजुरांस ( दादासाहेबांस ) लिहिलें पण आपणांस न कळविल्याबद्दल नाना फडणीस व सखाराम बापू यांस चिमटे घेऊन नानांस चुणुक

दाखविण्यांत चमत्कार आहे बहुत वेढूं नये ही थोरपणाची रीत आहे असें समजावून, बापूंस पत्रें घेऊन येणाऱ्या खिजमतगारास सोन्याचीं कडीं आपलेवरचीं द्यावींत असें कळविलें आहे. हीं दोन्ही एकाच तारखेचीं ता. २९ एप्रिल इ. स. १७७४ चीं असून बऱ्हाणपूराहून लिहिलेलीं आहेत. म्हणजे या वर्षी आनंदीबाईंनीं आपल्यापरीनें नाना व बापू या दोन्ही मुत्सद्यांस चार गोष्टी सांगून एकी करण्याचा प्रयत्न करून पाहिलेला आहे. यांतील जरूरीपुरते उतारे दिल्यावांचून बाईचा समंजसपणा व कर्तृत्व लक्षात येणार नाहीं. नानांस पाठविलेल्या पत्रांत असें आहे:—"चिरंजीव नारायणराण यांस पुत्र जाहल्याचें वर्तमान तिकडे हुजूर ल्याहावें आणि आह्मांस न ल्याहावें, असा तुमचा आमचा ऋणानुबंध आह्मांकडून नाहीं. तुह्मांकडूनही नसेल असें आह्मांस वाटतें. किल्याची ( पुरंधरची ) हवा बहुत सरद आहे. लेकरूं लहान, यास्तव तुह्मीं व राजश्री सखाराम बापू उभयतां विचार करून, ज्या जाग्यास या गोष्टीनें लेकरांस सुख पडे तें करावें... **थोरपणाची रीत हीच आहे कीं कोणासी कोण्हाही गोष्टीविर्सी बहुत वेढूं नये. चुणुक दाखविण्यांत चमत्कार आहे** असें आम्हांस वाटतें. परंपरा पाहोन योग्य असेल तो अर्थ समजून ध्यावा...."

बापूंच्या पत्रांत जरा निराळ्या तऱ्हेनें शब्दरचना करून त्यांस वडीलपणाचा मान देऊन दुर्लौकिक न होईल तें करण्यास विनविलें आहे. बाई म्हणतात:—"तुमच्या **नांवास व वयास जें योग्य असेल तें याउपरि तरी करीत जावें. ...तुम्हांकडेस वडीलपण आहे.** योग्य असेल ते करा. दुर्लौलिक न होता काय करणें हें तुम्हांसारख्यास योग्य असें असून अधिक जाहले. अतःपर जें करणें तें समजून करावें......"

विद्यमान ग्रंथकार रा. ब. सरदेसाई मार्मिकपणें लिहितात:—"**इंग्रजांची मदत घेतल्यानें मराठी राज्य खास बुडेल हें दादा पक्कें जाणून होता. त्याच वेळीं ठाण्याचा किल्ला** इंग्रजांनीं घेतलेला पाहून

**तो इंग्रजांची मदत घेण्यास अत्यंत नाखूष होता.** जिवावरच बेत-लेली पाहून तो इंग्रजांचे आश्रयास गेला.[1] ”

मुरारराव घोरपड्यांनीं ता. ८-५-१७७४ रोजीं बारभाईंस स्पष्ट सांगि-तलें होतें कीं[2] 'दादांशीं वांकडे सर्वथा योजूं नये. माधवरावांनीं पूर्वी करार केल्याप्रमाणें त्यांस मुलुख द्यावा.”

रा. ब. गोविंदराव सरदेसाई म्हणतातः– “ हा सल्ला अत्यंत पोक्त-पणाचा असून, सूड घेण्याच्या इच्छेनें दादास उगाच चिडवूं नये, त्याची सुव्यवस्था लावून व त्यास अभय देऊन स्थिर करावें, अशी मुराररावाची सूचना आहे. शिंदे होळकरांची भावनाहि अशीच दिसते....परंतु पटवर्धन, नाना फडणीस वगैरे मंडळीचे विचार अगदीं उलट दिशेस वाहत होते, आणि त्यांचेच कारभारांत पुढें प्राबल्य झाल्यामुळें अनेक प्रकरणें विकोपास जाऊन अखेर राज्यांस बाधक झालीं. ”[3]

राजवाडे कृत म. इ. सा. खंड १२ लेखांक[4] १३७ यांत ' बारभाई ( फितुरी ) **लबाड कृत्रिमी आह्मांस इंग्रजांचे स्वाधीन करून कैद करवितात.** बाह्यात्कारें दाहा लक्षांचा खर्च चालवितों म्हणतात. **पण इंग्रज गेले कीं ते आपले खेळांस चुकणार नाहींत** ' असें आहे. इंग्रजांकडे जाण्याचें प्रयोजन या पत्रांत स्पष्ट केलें आहे. त्यांतील जरूरीपुरता उतारा देणें अवश्य होय:--फितुरी लबाड, कृत्रिमी, आह्मांस कैदेदाखल ठेवावयाची योजना करून अपटणास अनेका प्रकारें समजा-विलें आहे. तूर्त अपटणांनीं लिहिले हें तरी प्रत्यक्ष डौल कैद करावयाचा आहे. तेव्हां इंग्रजांचे घरीं आम्हीं आलों असतां त्याचे श्वाधीन आम्हांस करून कैद करवितात हें गोष्ट त्यांचे अभिमानास उचित कीं काय ? फितुरीयांनीं कृत्रिम करून बाह्यात्कारें दाहा लक्षांचा खर्च चालवितों, ऐसें समजाविलें. **इंग्रज आह्मांपासून गेले म्हणजे ते आपले खेळांस चुकणार नाहींत....”**

---

१. म. रि. उ. वि १, पृ. ३१    २, खरे शास्त्री, ऐ, ले. स. १३६६.

३. म. रि. उ. वि. १ पृ. ७.

४. पृ. ८६, १६९७ फाल्गुन वद्य ६ = ११ मार्च १७७६ इ.

खं. १२ लेखांक १३८ शके १६९७ फाल्गुन वा। ६ चा म्हणजे ता. ११ मार्च १७७६ इ. चा आहे. तो असा:— पुरवणी रा। लक्ष्मण आपा...कैदेचा मजकूर आहे हा आपटण समजला असेल किंवा नसेल... खर्च ते चालवणार म्हणून उपकार. दाहा लक्षातच सारें. परंतु त्यांची माणसें म्हणजे कैद हे ते समजलेच नसतील. त्यांचे मतें **इंग्रेजी काइद्याप्रो तीं माणसें आमचे हुकुमांत राहतील. तरी तसें नाहीं. कैदेचा प्रकार स्पष्ट दिसतो.** दरमहा पंचवीस हजार ते धर्मादायाप्रो देतील तेव्हां देतील.ऐसा सलूख करून आह्मास काय कर्तव्य आहे? **दौलत करावी म्हणोन अंगरेजांचा आश्रय धारिला.** त्यांस कैद! तेव्हां दैव म्हणावें. तेव्हां हा प्रकार आम्हीं कबूल करीतच नाहीं. जनरालही करणार नाहींतच!... वरकड त्यांनीं लिहिला प्रकार नर होणेंच नाहीं **याबद्दल मरण कबूल! परंतु कैद पुरवत नाहीं.** निदानीं दहा लक्ष अंगरेज जनरालांनीं घेऊन आह्मांस **रेवातीरीं भडोचजवळ ठेवावें. रणगड** बहुत मर्जीची जागा. तेथें राहून दाहाच घेऊं. **परंतु त्यांचे कैदेंत राहणें नको.** भडोचजवळ रणगडास राहूं. तेथें वर्ष दोन वरीस स्नानसंध्या करून काल नेऊ."

दादासो म्हणतात कीं आपटणास वाटत असेल कीं इंग्रजी कायद्याप्रों बारभाईंचीं माणसें आमचे हुकमात राहतील. पण तसें नाहीं. कैदेचा प्रकार स्पष्ट दिसतो. मरण कबूल. पण बारभाईंची कैद पुरवत नाहीं.

इंग्रजी मुलखांत स्नानसंध्या करून रणगडास राहूं.

दादासाहेबाचें म्हणणें खोटें नव्हतें. बारभाईंच्या कैदेचा अनुभव पुढें लवकरच कोपरगांवीं बिचाऱ्या धार्मिक वृत्तीच्या आनंदबाईस आलाच कीं नाहीं! त्यांचे उद्गार पे. द. त नमूद आहेतच!!

आनंदीबाईचे उद्गार त्यांच्या दिनचर्येंत दाखल आहेत. त्यापैकीं काहीं नमूद करितों:—" आह्मीं केवढीं माणसें होतों आणि कोणत्या योग्यतेस आलो. आन्याय कोणी पाहात नाहीं. उगेच निष्कारण कैदेंत ठेविले आहे."[१]

" आह्मीं पूर्वीं केवढीं होतों! सिंदे होलकर सुधां आमचे तेजाखालीं होते तींच माणसें आतां आह्मीं कसीं जालों!"[२]

---

१. पे. द. भा. ४ पृ. २.

२. सदर पृ. ४७.

"गेल्याचें घर मेल्याची बायको असें केलें. यात अधिक काय केलें असें बाई बोलत होती."[1]

" सुतेंत आपले स्वाधीन होतो. तेथून या प्रांतीं येऊन ही दशा व्हावी हें मनांत देखील नव्हतें."[2]

" पूर्वीं सुरतेमध्यें इंग्रजानें आह्मांस बहुत सुख दिलें....आणि ब्राह्मणी राज्यामध्यें न्यायच नाहीं; असें बाई बोलत होती."[3]

" **माधवराव यांणीं वडिलांस कैद केलें म्हणोन आतां कारभारी धन्यासच कैद करितात.**"[4]

" त्यांत आम्हीं याचे कैदेंत आहों, त्या पक्षीं कसें होईल."[5]

राजवाडेकृत म. इ. सा. खं. १२ लेखांक १४५[6] शके १६९८ शुद्ध ६ चा म्हणजे ता. २५ मार्च १७७६ इ. चा असून त्यांत आहे कीं ' पण शत्रूचे कबजांत राहणें यापेक्षां जीव जाईल तर बहुत उत्तम !' शत्रू म्हणजे बारभाई.

दादासाहेबांचा पोर्तुगीजाशीं संबंध नव्हता असें नाहीं. वरील खंडांतील लेखांक १४६[7] शके १६९८ चैत्र शुद्ध १० म्हणजे ता. २९ मार्च १७७६ इ. चा आहे. त्यांत " फिरंगी गोवेकर याजकडील राजकारण आहे. बनलें तर करतो हाहि मजकुर त्यांचे कानावर घालावा " असें आहे. तथापि सर्व परदेशी लोकांमध्यें दादासाहेबांच्या मतें इंग्रेज उत्तम : कारण याच लेखांकाचें पुढील वाक्य "परंतु सर्वांत श्रेष्ठ अंगरेज" असें आहे.

इंग्रजांच्या मुलुखांत राहिल्यानें पेंच पडत नव्हता. राजवाडेकृत खं. १२ लेखांक १५९ शके १६९८ वैशाखची अर्थात् एप्रिल-मे १७७६ इ. ची यादी आहे तींत दादासाहेब काय म्हणतात तें पाहा :—

यादी

.............

१ कंपनीच्या जाग्यांत राहिल्यास **पेंच न पडे** तें जनरलानीं करावें. आम्हीं येऊं अथवा सुरत भडोचेस राहूं आणि बाळास ( दुसऱ्या बाजीरावांस ) व सदाशिव रामचंद्रास पाठऊं.

---

१. सदर पृ. ४२. २. सदर पृ. ४९. ३ सदर पृ. ५८. ४. सदर पृ. ६१. ५. पे. द. भा. ४ पृ. ४६ ६. पृ. ९२. ७. पृ. ९३.

१ जनरालाखेरीज दुसरा आश्रय भूमंडळीं नाहीं.

१ धवशाचें[1] राजकारण न जाल्यास मुंबईस येतों.

१ कोंकणचे मार्गें हैदराकडे जावें तरी वाट अवघड; फौज न निभावे, तथापि विचार करून पहातों.

राजवाडे खंड १२ ले. १८० शके १६९८ भाद्रपद सु॥ सबा सबैन मया व अलफ छ १२ ( सप्टेंबर–ऑक्टोबर १७७६ ) चा असून त्यांत "... फिरंगी तरी लबाड व नाकुवत. अंग्रेज तरी बंगाल्याचा अथवा विलायतेचा हुकूमच्या हातात तेव्हां कसें करावें" असें आहे. त्यांतच "फितुरीयांकडून राजश्री बाबूराव बल्लाळ काणे आले... पांच सात लक्षाचे परगणे घ्यावें. रेवातीरीं रहावें. निदानी दाहाचेहि कबूल करितील व सुरळीतपणें घ्यावे आणि होळकर शिंदे दरम्यान देतों त्याचें विद्यमानें रेवतीरीं रहावें. बहुधा अमदाबाद वगैरे मर्जीचेप्रमाणें पंधरावीस लक्ष पावेतों देतील असें तर्फानें दिसतें. आम्हांस अंग्रेज दर्म्यान घेतल्याशिवाय भरवंसा पुरवत नाहीं. अंग्रेज घेतले तरी येक दोष आहे" असें म्हटलें आहे. आनंदीबाईंना शिंदे होळकरांच्या फितुरीपणाचा संशय आलेलाच होता. दादासाहेबांस इंग्रेज दर्म्यान हवे होते. त्यांचा एक दोष त्यांस उघड दिसतच होता. मग ते दुधखुळे होते काय ? नाहीं. निरुपायास्तव त्यास इंग्रजांचा आश्रय लागला हेंच खरें.

पुढें २ सप्टेंबर १७७८ रोजीं पहिलें मराठी युद्ध होण्याचे सुमारास आनंदीबाईंनीं स्वहस्तें दोनपत्रें– एक नानांस व दुसरें बापूंस – लिहिलीं. नानांच्या पत्रांत तुम्ही तीन पिढ्यांचें फडणीस असून यवनाक्रान्त ब्राह्मणी दौलत फितुरांनीं होऊं पहाते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी ( तेढ ) जात नाहीं वगैरे मजकुर आहे. बाई लिहितात:—वर्ष दीड वर्ष पावेतों जाहालें, तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं...हल्लीं पत्राचें कारण कीं तुम्हीं तीन पिढ्यांचे दौलतेंतील फडणीस असोन दौलतेची तों गति झाली ती झाली. हल्लीं यवनाक्रान्त ( इंग्रज, निजामक्रान्त ) ब्राह्मणी दौलत फितुरांनीं होऊं पहाते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी ( तेढ ) जात नाहीं. आणि ब्राह्मणी तों बुडत चालेला ! या दौलतेंत पूर्वीं कार-

---

१ निजामाचा सरदार इब्राहीम धोशा जा(झा) बीतजंग.

भारी जाले त्यांणीं ब्राह्मणी स्थापली व दौलतेची वृद्धि केली. हा काळ प्रस्तुत सत्तेनें असा जाला !... आम्हांस म्हणाल तर आपला जीव कोणास नकोसा नाहीं. त्यापक्षीं दोनी गोष्टींचा आदेशा करून ब्राह्मणपण राहे तें करणें. आम्ही येथें तुमच्या स्वाधीन. पावणेदोन वर्षें जाहालीं. कार्यसिद्धि तुमची कांहींच न जाहाली ... तुमची फौज गुंतून. आमचा धन्याचे पायांसी वियोग... तर आम्हांस मुंबईस जाण्याविपयीं वोढेंकरांस ( म्हणजे धार संस्थानचे कारभाऱ्यांस ) पत्र लिहिणें.

याच तारखेस बापूंस जरासें मोकळेपणानें स्पष्ट शब्दांत त्यांनीं पत्र लिहिलें. त्यांतील आशय असा:— " हुजुरचीं ( दादासाहेबांचीं ) पत्रें इंग्रेजांस जाऊन इंग्रेज आले. जबरदस्त आहेत. दौलत आपणांस घेऊन देतो. आह्मांस कोठीस आपल्याजवळ जागा द्यावा व आमची फौज नेहमीं दहा हजारपर्यंत ठेवीत जावी. ही गोष्ट हुजूर ( दादासाहेबांस ) कठीण असें समजलें. परंतु, ज्यापक्षीं रानोमाळ हिंडावें, त्यापक्षीं कबूल करावें, हें समजोन श्रम करून कबूल केलें. हल्लीं इंग्रेज घरांत येऊं पहातात. तमाम अंमल उठवून आपले अंमल बसवितात. आमचें निमित्य करून सर्व दौलतीस गिराईक होतील. मुजादौलें व महमदअल्ली याच्या घरांतून प्रथम चाकरीस येतो ह्मणून नम्रतेनें पायरव (प्रवेश) करून घेतली, आणि आतां उभयतांस पोटापुरें देऊन सर्व दौलतीचे धनी जाले आहेत ... तसेंच आमच्या घरांत होईल. ते जातीनें खबरदार व मनुष्यें जवळ चांगलीं, असें असोन उभयतांच्या गती याप्रमाणें जाल्या. आमचे येथें तों कारभारीजवळ मातबर कोण आहे व पायरव कोणाची आहे व मर्जीही कोणत्या तऱ्हेची आहे, ह्या सर्व गोष्टी तुह्मास ठाऊक असोन, तुम्ही तिहीं पिढ्यांचे कारभारी, ही ब्राह्मणी-दौलत बुडायाजोगी करितां, हें तुम्हास करणें ठीक दिसत नाहीं. ... पहिल्यापासून आम्हांकडील दिमतीचे तुम्हीच कारभारी.... हें कालचक्र विपरीत आलें. परंतु आम्हांस हाच भरंवसा आहे कीं, तुम्हीं कालचक्रासही फिरवाल हें जाणून तुम्हास पत्र लिहिलें आहे. तरी ब्राह्मणी दौलत नीट राहून, हुजुरचाही संतोष राहून सर्व गोष्टी बऱ्या होतील त्या कराव्या. न केल्यास जन्मभर चांगलें केलें

आणि शेवटीं ह्मातारपणीं इंग्रजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातली हें अपेश येई तो अर्थ न करावा. हुजुर ऐकत नाहीं असें ह्मणाल तर ज्या पक्षीं तुह्मी प्राण घेतां किंवा पेचांत आणतां त्यापक्षीं काय होईल तें हो. परंतु तुमचे हातीं नच लागावें हा निश्चय आहे. तो वाजवी आहे. ... विशेप लिहावें तरी तुमचे दशांसहि आम्हांस समजत नाही. परंतु यश अपेश याचे धनी तुम्ही. ही गोष्ट लहान माधवराव पाळण्यांत आहेत त्यांसही समजते. मग दहा वर्षांवर जें मनुष्य असेल त्यास न समजे असा पर्याय नाहीं. आम्हीं लिहून विशेष तों नाहीं. तुम्हीं मोजीतही नाहीं. परंतु आकार दिसत चालला. यास्तव सूचना लिहिली आहे ...... ''

या पत्रावरून आनंदीबाई (अर्थात् दादासाो व सखाराम हरि) यांस दुहीनें ब्राह्मणी राज्य बुडत चाललें होतें हें पक्कें कळून चुकलें होतें. परंतु पत्र लिहून नाना बापूच्या डोळ्यांत हें अंजन घालून शेवटचा प्रयोग त्यांनीं गुप्त रीतीनें करून पाहिला. तथापि त्यास यश आलें नाहीं. बारभाईच्या कैदेंत रहाण्यास दादासाहेब तयार नव्हते. त्यापेक्षां त्यांस मरण बरें वाटत होतें. इंग्रजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातल्याचें अपेश घेऊं नका असें बाईनीं नाना बापूंस विनविलें. प्राण घेतां किंवा पेचांत आणतां त्यापक्षीं तुमचें हातीं नच लागावें हा निश्चय आहे तो वाजवीं आहे, यश अपेश याचे धनी तुम्ही होवे असें त्यांनीं उघड करून सांगितलें.

खं. १२ लेखांक १७६ शके १६९८ अ. भाद्रपद व. ७ चा ता. ४ सप्टेंबर १७७६ इ. चा असून लक्ष्मण आप्पाजी यांस लिहिलेला आहे. त्यांत "... ऐशास दवणेकडे आलों. फिरंगीयासी सिलसिला लाविला. याचें कारण कीं सुरतेंत राहिल्यानें पुढें बारभाईच्या फौजा येऊन उभ्या राहतील. मग मसलतीस बल पडणार नाहीं. याचकरितां जलदी करून इकडे आलों. परंतु अंगरेजाचा भरंवसा पक्का. घोर तरांडे, पल्यासहि याच तरांड्यांत पोहोंचावयाचें हें समजोनच त्यास तोडावयाचे नाहींत.''[१] असें आहे.

---

१. पृ. ११७-११८.

राजश्री लक्ष्मण आपाजी आंबेकरांस लिहिलेला खं. १२ क्रमांक १७८ शके १६९८ अ. भाद्रपद व. ९ म्हणजे तारीख ६ सप्टेंबर इ. स. १७७६ चा आहे त्यांत असें आहे:—"आम्ही फिरंगियास सामील करून मसलत करणार; परंतु याचा ऐवज थोडा, बल थोडें. प्रामाणिकताही कमीच असेल. हत्तीवर बसलों होतों ते सांप्रत लहानशा घोड्यावर बसलों. याचें कारण कीं, हत्ती मातबर खरा, परंतु पायास आजारी. मार्ग न चालते. तेव्हां घोड्यावर बसणें प्राप्त आहे. इतक्यांत हत्तीचे पाय शाबूत जाहाले, मार्ग चालतो असें समजल्यास फिरोन हत्तीचीच स्वारी मंजूर होईल." [पृ. ११९] ही दादासाहेबांची उपमा त्यांच्या वागण्याची द्योतक आहे. याच धोरणानें त्यांची कृति होती.

बारभाईनीं दादासाहेबांची साथ केली असती किंवा त्यांस मनापासून मदत केली असती त्यांस संशयास जागा ठेवली नसती तर त्यांस इंग्रजांचेंहि काम न पडतें हें त्यांनीं मोरोबा फडणिसास[1] ता. ७-५-१७७७ त लिहिलेल्या पत्रावरून सिद्ध होतें. "खासा स्वारी येण्याचा गुंता नाहीं... राजश्री काशीबा होळकर व चिंतो विठ्ठल[2] व गोपाळ नाईक तांबवेकर यांस कांहीं फौजसुद्धां इकडे पाठविणें...सर्व मजकुर दादो भास्कराजवळच आज्ञा केली आहे. खर्चाचें जबानी कळेल. सारांश अर्थ तुम्ही होळकर, केवळ एकनिष्ठ वर्तत असल्यास येण्याची दिक्कत नाहीं. मग बहुत इंग्रजांचेंही काय काम ? संशयानें संशय वाढतात. निखालसतेनें निखालसता होतें. ...परंतु तेथील मंडळी (इतर बारभाई, नाना) आहे ते तुम्हांस व आम्हांस वाकीफ आहे. याजमुळें हजार दिक्कती येतात.[3]

१ इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें ५-१२ ले. २ पृ. १६

२ रायरीकर.

३ म. रि. उ. वि. १ पृ. ९५-९६ यांवर घेतलेला उतारा किंचित चुकला आहे.

# गुप्ते घराण्यापैकीं सखाराम हरींच्या शाखेचा वंशवेल

मराठी रियासत म. वि. ४ मध्यें हरिराव गुप्ते, रा. उरवडें, मुठें खोरे पासून व म. रि. उ. वि. ३ मध्यें बडोद्याचे गुप्ते म्हणून बाबूराव हरीपासून आंबेगांवकर शाखेच्या वंशावळी दिल्या आहेत. त्यांत कांहीं दोष राहिले आहेत, ते गुप्ते घराण्याच्या वंशावळीवरून दुरुस्त करितां येतात. सखाराम हरींचे प्रत्यक्ष ( direct ) वंशज सरदार दत्ताराव अमृतराव गुप्ते आंबेगांवकर यांनीं ती आम्हांस दिली. तींत नारायणराव (सखारामपंतांचे पुत्र ) यांचें नांव दिलेलें नाहीं; कारण उघड आहे कीं त्यांस अवघे पंधरा वर्षांचे असतांच निजधामास चालविल्यामुळें त्यांस संतति नव्हती, म्हणजे त्यांचें नकल झालें होतें. बाबूराव हरींचें नांव दर्शविलें आहे. पण त्यांची संतति दाखविली नाहीं. तरी त्यांच्या नातवांपर्यंतचीं नांवें म.रि.उ. वि. ३ पृ. ६२५ वर दिलीं आहेत तीं अशीं:—


गुप्ते बडोद्याचे

बाबूराव हरि (सखाराम हरींचा बंधु)

- दौलतराव
  - कृष्णराव
  - माधवराव
- महिपतराव

नानांनीं कैद केलेल्या लोकांत बाबूराव हरि, दौलत बाबूराव व महिपत बाबूराव यांचीं नांवें आलीं आहेतच.


सखाराम हरींचा वंशवेल रा. ब. सरदेसाई यांनीं म. रि. म. वि. ४ पृ. २९३ वर त्यांच्या वडिलांपासून दिला आहे तो असा:—




वरील वंशावळींत नारायणराव
सर्वांत धाकटे म्हणजे तिसरे होते.
रा. ब. गुप्ते म्हणतात. आख्यायि
घराण्यात आहे. कांहीं असो.
आनंदरावास चिंतामण व नारायण
आहेत. त्यांस तीन पुत्र : १ चिं
होते. चिंतामणचीं दोन मुलें बरो
पुत्र : १ केशवराव, २ पांडुरंग, ३ सदाशिव, ४ पुरुषोत्तम व ५ विनायक असे होते. केशवरावाचे तीन पुत्र बरोबर दर्शविले आहेत. जनार्दनास १ कल्याण २ माधव ३ मल्हार व ४ त्र्यंबक असे चार पुत्र होते. पण रा.ब.च्या वंशावळींत १ माधव व २ मल्हार असे दोनच दिले आहेत. काशीनाथास

**सखाराम हरि गुप्ते (आंबेगांवकर)**

- आनंदराव
  - सखाराम
    - चिंतामण
      - खंडेराव
        - सखाराम
        - विश्वनाथ
          - भालचंद्रA
          - सदाशिव
      - वामन
        - कमलाकर
    - यशवंत
    - मोरेश्वर दत्तक नारायणरावास
- बाळकृष्ण
  - केशवराव
    - मार्तंड
      - भीमराव
        - केशव
          - श्रीकृष्ण
          - राजाराम
          - राघवेंद्र
          - शरच्चंद्र
        - प्रभाकर
          - शशिकान्त
          - आनंद
        - शांताराम
          - सुरेन्द्रनाथ
          - चैतन्य
        - मधुकर
          - अरुण
        - सुधाकर
      - गजानन
        - आनंदराव
        - वसंत
        - हेमंत
        - सुमंत
      - श्रीनिवास B
        - दिलीप
        - जगदीश
    - शंकर
      - नरहर
        - श्रीधर
        - दिनकर
      - परशराम
      - गणेश
    - गोविंद
      - गोपीनाथ
        - श्रीराम
        - अजित
  - पांडुरंग
  - सदाशिव
    - रघुनाथ
      - जयवंत
        - अंबालाल
      - बलवंत
  - पुरुषोत्तम
    - वासुदेव
    - भास्कर
    - लालजी
    - सुंदरराव
      - प्रभाकर
      - रमेश
  - विनायक
- गोपाळ
  - श्रीपतराव (दत्तक)
    - गणपतराव C
- जनार्दन
  - कल्याण
    - आनंदराव
  - माधव
    - दामूराव D
      - जयराम
        - रामराजा
      - सीताराम
      - रघुनाथ
    - व्यंकट
    - गंगाधर
      - यशवंत
  - मल्हार
    - यादवराव
    - दिनकर
    - कृष्णराव
    - आत्माराम
  - त्र्यंबक
    - बाजीराव
- काशीनाथ
  - विठ्ठलराव
    - अमृतराव
      - दत्तात्रय E
      - छोटूराव
      - मुकुंद
  - नीलकंठ
    - गंगाधर
    - लक्ष्मण
    - जयवंत
    - कुमुदचंद्र
    - प्रतापचंद्र
  - श्रीपतराव (दत्तक गोपाळरावास)
- रामराव
  - नारायणराव
    - रामचंद्र (दत्तक)
      - नारायणराव
        - शिवकुमार
      - कृष्णराव
        - अरुण




वरील वंशावळींत नारायणराव सर्वांत वडील पुत्र दाखविले आ[illegible] सर्वांत धाकटे म्हणजे तिसरे होते. "त्यांस नानांनीं विष घातलें." [illegible] रा. ब. गुप्ते म्हणतात. आख्यायिका मारेकरी घातल्याची आंब्रेगांवक[illegible] घराण्यात आहे. कांहीं असो. नारायणरावांचें नकल झालें. सखे[illegible] आनंदरावास चिंतामण व नारायण द.असे दोन पुत्र रावबाहदुरांनीं दाखवि[illegible] आहेत. त्यांस तीन पुत्र : १ चिंतामण, २ यशवंत, व ३ मोरेश्वर नांवांचे होते. चिंतामणचीं दोन मुलें बरोबर दाखविलीं आहेत. बाळकृष्णांस पांच पुत्र : १ केशवराव, २ पांडुरंग, ३ सदाशिव, ४ पुरुषोत्तम व ५ विनायक असे होते. केशवरावाचे तीन पुत्र बरोबर दर्शविले आहेत. जनार्दनास १ कल्याण २ माधव ३ मल्हार व ४ त्र्यंबक असे चार पुत्र होते. पण रा.ब.च्या वंशावळींत १ माधव व २ मल्हार असे दोनच दिले आहेत. काशीनाथास



सरदार मेजर नारायणराव रामचंद्र आंबेगांवकर



श्री. सौ. इंदिराबाई नारायणराव आंबेगांवकर



शिवकुमार नारायणराव आंबेगांवकर

पृ. १५४

१ विठ्ठलराव, २ नीलकंठ, व ३ श्रीपतराव असे तीन पुत्र होते. पैकीं मधल्या नीलकंठरावांचेंच नाव दिलें आहे. रामराव, नारायणराव व रामचंद्र हीं वंशावळींतील नांवें बरोबर दिलीं आहेत. आनंदराव व रामराव यांस गोविंदराव गायकवाड यांनीं (सखाराम हरींस रघुनाथरावांनीं सरदार केलें होतें त्याप्रमाणें ) बडोद्यास सरदारपद दिलें. हल्लीं कागदावर सरदार व सरंजामदार म्हणून १ भालचंद्र विश्वनाथ, २ श्रीनिवास मार्तंड, ३ गणपतराव श्रीपतराव, ४ दामूराव माधवराव, आणि ५ दत्तात्रव अमृतराव अशा पाच पुरुषांच्या सह्या करण्यांत येतात. आम्हांपुढें सब्‌रजिस्टार, हवेली, (पुणें) यांपुढें गायकवाड वाड्यासमोरील सखाराम हरि पटांगणाचा कागद झाला त्यावरहि याच्याच सह्या होत्या.

सखाराम हरि गुप्ते ( आंब्रेगांवकर ) यांची सरदार दत्तात्रव अमृतराव यांनीं दिलेली वंशावळ सोईची असल्यामुळें खालीं देतों. सखाराम हरींची मुलगी बखरकार मल्हाररावांस दिलेली होती. तिचें सासरचें नांव [1]म्हाळसाबाई. माहेरचें नांव चिमणाबाई. तीस पुत्र दोन : १ बळवंतराव व २ यशवंतराव. बळवंतराव छत्रपति महाराजांचे चिटणीस व सुमंत होते. यशवंतरावांचें छायाचित्र आह्मीं भा. इ. सं. मं. त्रै. व. २२ अं. १ पृ. १४ समोर दिलें आहे.

सौ. इंदिराबाई नारायणराव आंब्रेगांवकर[2] गुप्ते लिहितातः– "बडोदें येथील राज्यप्राप्ति करून घेण्यास श्रीमंत गोविंदराव गायकवाड यांना बऱ्याच अडचणी आल्या. त्यांचेविषयीं पेशव्यांचें मन कलुषित झालें होतें. अशा प्रसंगीं सखाराम हरींचे पुत्र रामराव सखाराम याचे पेशवेदरबारीं वजन मोठें होतें. तें खर्च करून गोविंदराव गायकवाडासाठीं पेशव्यापाशीं रदबदली त्यांनीं केली. पुढें राज्यप्राप्तीनंतर गोविंदराव गायकवाड यांनीं रामराव सखाराम यास बडोदें येथील श्रेष्ठ सरदारी दिली."

मराठी रियासत मध्यविभाग ४ पृ. २९३ वर असें आहेः—"त्याचे (सखाराम हरीचे) पश्चात् हें गुप्ते कुटुंब बडोद्यास येऊन नांदूं लागलें; आणि अद्यापपर्यंत गायकवाडींत या घराण्याचा लौकिक कायम आहे."

---

१. गं. भा. यमुनाबाई कै. मल्हार खंडेराव चिटणीस यांच्या पत्नीनी सांगितलेले.
२ ता. ८-७-४५ चें पत्र.

सखाराम हरींचा हृदयद्रावक शेवट झाल्यानंतर त्यांचे वडील बंधु बाबूराव हरि यांस उपरति होऊन ते उरवडे आंबेगावासच राहूं लागले. तेथें बेहड्याचे झाडाखालीं सांबाची पिंडी आहे. तिची ते पूजा करीत व पोथ्या नकलीत. एक पोथी लिहीत असतां हृदयक्रिया बंद पडून त्यांचा एकाएकीं अंत झाला. त्यांच्या हातच्या पुष्कळ पोथ्या आहेत. त्यांचा ग्रंथसंग्रह बराच होता व आजहि थोडा आहे.

लढायांत भाग घेणारे बाबूराव हरीचे शेवटचे वंशज तात्या आंबेगांवकर उजवे पायानें लंगडे होते. खर्ड्यांच्या स्वारींत ते उपस्थित होते. पुढें ते आंबेगांवास आले.

## आख्यायिका

श्रीमंत थोरले रावसाहेब म्हणजे थोरले माधवराव साहेब पेशवे यांस एकदां सखाराम हरि गुप्त्यांची परीक्षा पहावयाची होती. एक किल्ला पहावयास दोघे गेले. एकांतीं कांहीं बोलणें झालें. पुढें श्रीमंतांस गुप्ते कशी व्यवस्था ठेवतात, त्यांच्याच विश्वासावर किती लोक अवलंबून आहेत व वेळ पडल्यास ते श्रीमंतावर किती विसंबून आहेत व काय व्यवस्थेनें आहेत याची चांचणी करावयाची होती. दोघेच एका बाजूस किल्ल्यावर बोलत असतां सखाराम हरींस थो. माधवरावांनीं प्रश्न केला कीं याच स्थळीं तुम्हांस पकडण्यांत आलें तर काय कराल व कसे वागाल? गुप्ते म्हणाले, 'खरोखरीच श्रीमंतांनीं येथेंच यावेळीं तसा हुकूम सोडून पहावा म्हणजे काय होतें तें निदर्शनास येईल. माझा बचाव होईल कीं नाहीं याचीहि प्रतीति पहावी. लोक श्रीमंतांचा मान राखतील कीं नाहीं याची परीक्षा घेऊं नये. तो न राखल्यास अपमान माझा न होतां श्रीमंतांचा होऊं नये अशी परमेश्वर-चरणीं प्रार्थना आहे. श्रीमंतांचा बोज श्रीमंतांनींच राखून घ्यावा.' हें ऐकतांच श्रीमंत थोडे गडबडलेच. पण प्रसंगावधान राखून सखाराम हरींचे हाता-खालील लोक कह्यांत ठेवण्याचें कसब पाहून त्यांची श्रीमंतांनीं पाठ थोपटली!

केव्हां केव्हां टिपू सुलतान कर्नाटकच्या स्वारीच्या वेळीं[1] घोड्यावर बसून नदी वगैरे ठिकाणीं घोड्यास पाणी पाजीत असतां घोड्यानें पाणी पिण्याचें

---

१. रा. ब. गुप्ते कृत सखाराम हरींचें चरित्र, पृ. ९.

सोडून तोंड वर केलें म्हणजे टिपूनें घोड्याकडे पाहून म्हणावें, "पानी में क्यौं सखाराम हरी बेदडा दिखता है ?"

## सखाराम हरि गुप्ते यांचीं स्मृति स्थानें

नगरचा पुराणप्रसिद्ध किल्ला, पुरंधरचा अजस्नगड व वनगडचा दुर्लौकिक झालेला कोट यांचें दर्शन होतांच सरदार सखाराम हरींची आठवण आल्यावांचून रहात नाहींच. हीं झालीं सार्वजनिक ठिकाणें.

आतां खाजगी स्थलांविषयीं लिहूं. पुण्यांतील सुप्रसिद्ध गायकवाड वाड्यासमोर सखाराम हरींचें मूर्तिमंत स्मारक आहे. या वाड्यासमोर त्यांचा वाडा असून कबूतरखान्यांत त्यांची पागा होती. गोविंदराव गायकवाड व सखाराम हरि यांचा इतका लोभ होता कीं एकमेकांकडे एकादा खाण्यापिण्याचा उत्कृष्ट पदार्थ झाल्यास तो दुसऱ्याकडे गेल्याशिवाय रहात नसे. वाडे समोरासमोर असल्यामुळें असें करणें सुकर होई. हल्लींचें सखाराम हरि गुप्ते—आंबेगांवकरस्मारक, एवढीच जागा त्यांची नव्हती. या स्मारकाचा स. नं. व घ. नं. ४ नारायण ' असा आहे. पण आजूबाजूचे नंबर त्यांचेच होते. स्मारकाच्या ठिकाणचा पूर्वींचा वाडा बहुतेक पडलेलाच होता. आम्हीं हवेलीचे (पुण्याचे) नं. १ चे सब्-रजिस्ट्रार असतां याची भाडेचिठ्ठी झाली तीवर आमची सही आहे. "सरदार सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर स्मारक" उभारण्याच्या कामीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभु संघानें पुष्कळच मेहनत घेतली. काम फार कमी खर्चांत केलें. या स्मारकाचा उपयोग **चां. का. प्रभू व इतर जातींचेहि समाज यांस चांगलाच होतो.** लग्न-मुंजीस ही जागा फार सोयीची आहे. ही सोय होण्यास सखाराम हरींची पुण्याईच कारणीभूत झाली असें कां न म्हणावें ? त्यांचा संगमरवरी दगडाचा पुतळा मोफत करून देणारे एक शिल्पकार आमचेकडे आले होते. त्याची त्यांत स्थापना होईल तो सुदिन !

उरवड्याजवळच्या आंबेगांवीं सरदारांनीं श्रीशंकराचें देवालय बांधिलें. एक पिंडी बेहड्याचे झाडाखालीं आहे. ती हलवूं नका, असा दृष्टांत झाल्यामुळें त्यांनीं काशीहून बाण आणून देवालयांत बसविला.

आंब्रेगांवचा त्यांचा वाडा जवळ जवळ जमीनदोस्त झाला आहे. त्याचे चिरेबंदी दगड गांवकऱ्यांनीं लांबविले आहेत. आतां फक्त पायाच काय तो शिल्लक राहिला आहे. त्याचें तरी संरक्षण सखाराम हरींचे वंशज करतील काय? बाबूराव हार, त्यांचे वडील बंधु, यांचा वाडा त्यांच्या वाड्यास लागूनच होता. त्याचीहि स्थिति तीच आहे.

आंब्रेगांवासहि सखाराम हरींची मोटी पागा होती.

उरवडयाच्या त्यांच्या वाड्याचा पाया नामशेष झाला असून तेथें ताल बांधण्यांत आली आहे.

## सख्या हरीची खंडी

विठ्ठल यशवंतराव व यशवंतराव महादेव यांस साताऱ्यास छत्रपति महाराजांच्याकडे रहावें लागे. तेव्हां उरवडयास म्हणजे त्यांच्या इनामी गांवीं त्यांच्या घराण्यांतील अथवा नातेवाईकांपैकीं एक मुलगा त्यांचे हक्क मानपान घेण्यास राही. चिंतो विठ्ठल रायरीकर यांचाहि वाडा. उरवडयास होता. तेथेंच त्यांचें वास्तव्य होतें. वरील मुलगा एके दिवशीं गादीवर बसला असतां चिंतो विठ्ठलांस संताप येऊन त्यांनीं फाडकन त्या मुलाच्या थोबाडांत मारिली. हा पोतनीसांस मोटाच अपमान वाटला. असा अपमान पुन्हां होऊं नये म्हणून त्यांनीं चिंतो विठ्ठलाच्याच तोडीचा गृहस्थ आपल्या तर्फेनें उरवडयास ठेवण्याचें ठरविलें. सखाराम हरि गुप्ते हे शूर व मानी असल्यामुळें पोतनीसांनीं त्यास आपल्या वतीनें नेमून एक शेत व रुपये २५० चें वर्षासन करून दिलें. या शेतास अद्याप सख्या हरीची खंडी म्हणतात. कारण त्यांत एक खंडी भात पेरा असे. १०।१२ खंडी धान्य अद्याप पिकतें. हें शेत उरवड्याच्या बारा वाड्यांपैकीं बोचरवाडींत आहे.

## हलविता येण्यासारख्या जिनसा

सखाराम हरींची एक तलवार उरवडयास असून ती दसऱ्याच्या दिवशीं पूजण्यांत येत असे. ती दुधारी, खांडा जातीची होती. तिची लांबी सुमारें ३½ फूट असून रुंदी ४ इंच असे. तीन खुंट्यावर ती ठेवलेली असे. साधारण माणसास ती पेहलत नसे असें श्री. गोपीनाथराव पोतनीस सांगतात.

दुसरी एक तलवार हल्लींचे सरदार मेजर नारायणराव रामचंद्र आंब्रेगांवकर यांनीं श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांस त्यांच्या राज्यारोहणप्रसंगीं अर्पण केली. ती त्यांच्या शस्त्रागारांत ठेवलेली आहे. ती संबंधीं ता. २६-७-१९४५ च्या पत्रासोबत महाराज साहेबांच्या शस्त्रागारांतील नोंदणी-पुस्तकाचे आधारें सौ. इंदिराबाई नारायणराव गुप्ते आंब्रेगांवकर यांनीं पाठविलेली माहिती अशी:—

कै. सरदार सखाराम हरी यांची पट्टापान तलवार. हें पट्टापान ऐतिहासिक असून कै. सेनापति सरदार सखाराम हरी गुप्ते—आंब्रेगांवकर—यांनीं वापरलेलें आहे.

श्री. मेजर सरदार नारायणराव रा. आंब्रेगांव यांनीं श्रीमंत सरकार प्रतापसिंह महाराज साहेबांना राज्यारोहण प्रीत्यर्थ भेट दिली आहे. हें पट्टापान श्रीमंत प्रतापसिंह महाराजांच्या शस्त्रागारांतील त्यांच्या खास बैठकीच्या हॉल--मध्यें ठेवलेलें आहे.

या तरवारीला पट्टादान—धोप—अथवा सेफ असेंहि म्हणतात. या पट्टापानाचें पोलाद 'चंद्रवट' जातीचें आहे. मुठीची जात कर्नाटकी ओढेदार असून तिच्यावर चांदीच्या वर्खाचें काम केलेलें आहे. मुठीवरील फूल मोठें असून कटोरी खोल आहे. पानाच्या मध्यावर तीन नळ आहेत. पिंवळा दुधारी असून धारेची जात मसुरी आहे. या पट्टापानाची लांबी ४७½ इंच असून खजान्यांतील रुंदी १½ इंच आहे. या पट्टापानाचें वजन मुठीसह ११८½ तोळे आहे. याच्यावरील म्यान लाल मखमलीचें असून तेनाल व मोनाल चांदीची आहे. खजान्याच्या वरच्या बाजूस एका अंगाला दोन चंद्र, व दुसऱ्या अंगाला तीन चंद्र आहेत. पुतळ्यावर हिरव्या मखमालीची गादी बसविली आहे."

या तलवारीचें छायाचित्र या चरित्रांत प्रसिद्ध करण्याची परवानगी श्री. सौ. महाराणी साहेब बडोदें यांचे खाजगी कारभारी ले. क. मो. है. राणे यांचेकडून खालील पत्रानें आली आहे.

वि. १०२ $\frac{१०२}{४५-४६}$ खानगी मु. कचेरी
बडोदें

श्री. सौ. इंदिराबाई आंबेगांवकर यांसी,

वि. वि. आपलें ता. ७ चे पत्राचे उत्तरीं कळविण्याचें कीं श्री. सौ. महाराणी साहेब यांहीं तरवारीचा फोटो सखाराम हरींचे चरित्रांत प्रसिद्ध करण्याची परवानगी आपणांस दिली आहे.

कळावें ही वि.
तारीख ८ माहे आगस्ट सन १९४५
(सही) मो. है. राणे
ले. कर्नल,
खानगी कारभारी


या परवानगीबद्दल सर्व गुप्ते मंडळी श्री. सौ. महाराणीसाहेबांचे खानगी कारभारी ले. कर्नल राणे यांचे ऋणी आहेत. छायाचित्र श्री. सौ. इंदिराबाई नारायणराव आंबेगांवकर यांचेकडून प्रकाशनार्थ आलें.

" पट्टापान " ही तलवार विशेष लांबीची असून ती घोड्यावर बसून वापरावयाची असते असें राजमित्र प्रो. माणिकरावजी कळवितात.


हिचें छायाचित्र आम्हीं श्रीमंत राजेसाहेब औंध यांस ता. ८-९-१९४५ रोजीं दाखविलें. हीस ' पट्टापान ' म्हणतात असें त्यांनींहि सांगितलें. याच तऱ्हेची तलवार त्यांच्या पूर्वजांनीं वापरलेली त्यांच्या संग्रहीं आहे. मात्र हिच्या व तिच्या मुठींत फरक आहे.

सखाराम हरींच्या दोन ढाली सरदार नारायराव रामचंद्र गुप्ते—आंबेगांवकर यांच्या संग्रहीं आहेत. एक सिलेटची असून तीस दोन लहान खोबणी आहेत. दुसरी गेंड्याच्या चामडीची आहे. दोहींचा परिघ २६ इंच आहे. यांचीं छायाचित्रेंहि श्री. सौ. इंदिराबाईच्या कृपेनें मिळालीं.


बडोद्यास सखाराम हरींचें एक चिलखत होतें. त्याचे तुकडे तुकडे झाले होते. ते लहानपणीं सरदार दत्ताराव अमृतराव आंबेगांवकर खेळावयास घेत असत. चिलखताच्या कड्या बारीक व सुंदर पण मजबूत असत. तें छातीपासून ते गुडघ्यापर्यंतचें होतें असें दत्ताराव सांगतात.




सरदार मेजर ना. रा. आंबेगांवकर यांच्या संग्रहांतील गेंड्याच्या चामड्याच्या ढालीचें छायाचित्र. पृ. १६०.




सरदार मेजर ना. रा. आंबेगांवकर यांच्या संग्रहांतील सिलेटच्या ढालीचें छायाचित्र. पृ. १६०




सरदार सखाराम हरि गुप्ते यांनीं वापरलेल्या पट्टापानाचें छायाचित्र. पृ. १५९.

झाला, जोडा, अंगरखा वगैरे सखाराम हरींचीं स्मृतिचिन्हें आज अस्तित्वांत नाहींत.

१ "खूप शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना—" बाळाब्रहिरूकृत नानाफडणीसांवरील पोवाडा.

२ "क्या है उसकी अक्कल दौलत? पेशवेंकी डुबा दिई
देवनाथ कहे मुझे गरज नहि, राज्य डुबाया बम्मनका." देवनाथ.

या दोन परस्परविरोधी मतांपैकीं खरें कोणतें? हा प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो.

याच्याच जोडीस "...and with him has departed all the wisdom and moderation of the Maratha Kingdom."[1] हें पाहिल्या प्रश्नास पोषक कीं काय? असाहि सवाल करण्यांत येतो.

खेरीज रघुनाथराव दादासो, आनंदीबाई व दुसरे बाजीराव सो यांनींच मराठ्यांचें साम्राज्य निदान ब्राह्मणांचें—पेशव्यांचें—राज्य इंग्रजांच्या घरांत घातलें असेंहि प्रतिपादण्यांत येतें.

रघुनाथरावाचा उजवा हात—लढण्याचें मुख्य अंग—सखाराम हरि गुप्ते असल्यामुळें, जो गुण दादांचा व आनंदीबाईचा तोच गुप्त्यांचा हें म्हणणें प्रथमदर्शनीं बरोबर वाटतें. जे दोष या दोघांत तेच गुप्त्यावर लादणें हेंहि सकृद्दर्शनीं भुरळ पाडण्यासारखें आहे. यांत तथ्य तरी काय? नानांस व बारभाईस वाटत होतें कीं मराठ्यांचें राज्य राखावें व रघुनाथराव, आनंदीबाई व दुसरे बाजीराव यांस वाटत होतें कीं बुडवावें? आहे तरी काय? या प्रश्नांची छाननी केल्याखेरीज मराठ्यांचा (ब्राह्मण, कायस्थ, मराठे वगैरे यांचा) स्वभाव कळणार नाहीं.

नाना फडणीसांनीं कांहीं काल खूप शर्तीनें राज्य राखलें यांत संशय नाहीं. थोरल्या माधवरावांच्या वेळीं कर्जाचा हवाला रामचंद्र नाईक परांजपे यांजकडून घेववून, खडर्याच्या स्वारीवर सर्व मराठे सरदार एकत्र जमवून, एकजुटीचा

१. Colonel Palmer quoted on p. 188, Vol. III, A History of the Mahrattas by James Grant Duff.

अखेरचा सामना दाखवून, महादजी शिंद्यांसारख्या कर्त्या पुरुषांस पुढें आणून, पटवर्धन, रास्ते सरदार लगामीं लावून, उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा दरारा वाढवून, कर्नाटक व महाराष्ट्र यांतहि त्याचा लौकिक वाढविला हें खरें आहे. दुसऱ्या बाजीरावांच्या वेळीं सुद्धां इंग्रजांच्या बादशहाचें पत्र पुढें जाऊन पेशव्यांनीं उभें राहून घ्यावें या त्यांच्या वकीलामार्फत आपलें सार्वभौमत्व पेशव्यांस कबूल करावयास लावण्याच्या घाटास दिल्लीच्या बादशहाच्या फरमानाखेरीज पेशव्यांनीं पुढें जाण्याचा रिवाज नाहीं, फार तर ते दरबारांत येतांच व उभे असतांच पत्रें द्यावींत, असें सुचवून, कांहीं काळ पडत्या पेशवाईची बाजू राखली, आब जाऊं दिला नाहीं व मरेपर्यंत पेशवाई इंग्रजांच्या आहारीं जाऊं दिली नाहीं. अर्थात् तोंपर्यंत नानांनीं खूप शर्तीनें राज्य राखिलें हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. पण नानांचे उपाय **चिरकाल टिकाऊ नव्हते.** नानासाहेबांच्या वेळेपासूनच पेशव्यांनीं आपली बाजू लंगडी करून घेतली होती. तुळाजी आंग्र्याचा सत्यानास करून आंग्र्यांचें आरमार बुडवून समुद्रकिनारा इंग्रजांस मोकळा करून दिला होता. साष्टी देऊन त्यांचें बळ वृद्धिंगत बारभाईनीं—नानांनीं—केलें एवढेंच नाहीं तर कायमचा समुद्रकिनाऱ्याचा व मुंबईच्या बाजूचा त्यांचा ताबा दृढ केला होता. रघुनाथरावांस इंग्रजांकडे जाण्याखेरीज मार्गच ठेविला नव्हता.

इंग्रज विलायतेंत घरच्याच कामांत गुंतले असल्यामुळें हिंदुस्थानांत आक्रमण करण्याची त्यांची प्रवृत्ति नव्हती. यामुळें नाना फडणीसांस मराठी राज्याचा कसाबसा बचाव करितां आला, हेंहि विसरून चालणार नाहीं. कालांतरानें हें शक्य नव्हतें. “ मनुष्यस्वभावाची पारख जशी महादजीस किंवा सखाराम बापूंस दिसते तशी नानांस दिसत नाहीं. ” ( म. रि. उ. वि. पृ. ८ ).

नानांनीं लहान लोकांस— क्षुल्लक लोकांस— महत्त्व देऊन वाढविलें. [1]दुसरे कर्ते मुत्सद्दी पुढें येऊं दिले नाहींत. याचा प्रत्यक्ष दाखला त्यांच्या समकालीन काव्यांतच मिळतो. देवनाथासारखा साधुपुरुष म्हणतो,—“ छोटे छोटे

---

१. म. रि. उ. वि १ पृ. १८८-२१२ बारभाईचें रूपांतर एक भाईत म. रि. उ. वि. १ पृ. १४३ त्यानें (नानानें) सर्व कारभार केवळ आपल्या एकट्याच्या मुठींत आणला.

आदमी बढाये, उसीपासमें आन खडे !" पेशव्यांचें घर राखलें नाहीं. फौजाहि शाबूत खडया राहिल्या नाहींत. पहा, "ना खावंदका घरहि राखा, ना फौजो साबूत खडे...'जो मैं करूंगा सोहि होयगा' ऐसी मनमें मगरुरी भई ! माल खजाना आपने हात, खावंदके घर कुछ न रही ॥" हीं विधानें किती मार्मिक आहेत ! श्री. बा. स. कुलकर्णीकृत ऐतिहासिक जुने लेख पु. २ रें पृ. १४ वर "नाना **दरबार खर्च खाऊन** करणें करितात हें पक्कें समजलें" आहे, ही माहिती 'चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती' यांत आहे. चिटणिसां-एवढी पुरी खबर कोणास मिळणार? **लांच** अथवा सौम्य शब्दांत बोलावयाचें तर **'दरबार खर्च' 'कारकुनी'** शब्द योजा. हा रिवाज त्या वेळीं सार्वत्रिक असला व रामशास्त्र्यांसारखे न्यायाधीशहि त्यापासून अलिप्त नसले तरी धन्यास सावकार जेऊं देईनात, त्यांस तेल मिळेना, बारकाचे तांदुळ मिळेनात, सरदार आसनावर बसूं देईनात तर नाना नवकोट नारायण, नव्हे त्याहून अधिक पैसे-वाले राजकारणें पैशावर खेळवणारे, हें दृश्य खरोखर प्रशंसनीय नाहीं. श्री.ना.बा. देव म्हणतात कीं खरे व भानु यांनीं नानांस अवास्तव महत्त्व दिलें आहे. आणि हें अगदीं सत्य आहे. त्यानें (नानानें) लायक माणसें जवळ ठेविलीं नाहींत, **पुष्कळांशीं दीर्घद्वेष केला,**[१] स्वतःच्याच हातीं सर्व सत्ता ठेविली, स्वतःच्या फायद्याकरितां दुसऱ्याचा कितीही तोटा झाला तरी त्यास क्षिति नसे. सवाई माधवरावाचे मृत्यूनंतर तर घटके घटकेस निराळें कारस्थान करून अत्यंत

---

१. नानांचा दीर्घद्वेष अवर्णनीयच होता. सखाराम हरीचें उदाहरण आपण सोडलें तरी रघुनाथराव दादासाहेब पेशवे मृत झाल्यावर त्यांच्या अस्थींशींहि त्यांनी द्वेष सोडला नाहीं. पे. द. भा. ४. आनंदीबाईच्या दिनचर्येंत असें आहे:—

येथें आम्हीं बहूत संकटांत आहे. कारभारी चेन पडो देत नाहीं. साहेबांच्या अस्ती देखील श्रीकाशीस पाठवीत नाहीं. **मेलयावर दाना उगवितात.** आम्हीं तर जिवंत आहों. मग चेन कसे पडों देतील. आस्तीविशीं पुण्यास लिहा पाठऊ म्हणतात. परंतु पाठवीत नाहीं. याप्रों वर्तमान आहे." १६-१०-१७८७ पृ.२१. पुढें ता. २३-७-१७८८ च्या पृ ८१ वरील छ १४ सवाल रोजच्या दिनचर्येंत असें आहे:— १ यंदा आम्हांस वाईट आहे. आधिकउणें जाल्यास आमच्या अस्ती ठेऊं नये. येथें पश्चमवाईनीमध्यें टाकाव्या. सिंहस्थांत साहेबांच्या आस्ती गंगेत (गोदावरींत) टाकाव्या.

अस्थिरपणा मात्र दाखविला, आणि शेवटीं इंग्रजांचा आश्रय जवळ केला. यांत नानांची नालायकी स्पष्ट दिसते. हा श्री. देवांचा अभिप्राय निःसंशय विचारार्ह आहे. रघुनाथराव दादासाहेबांनीं इंग्रजांकडे निरुपायानें पाहिलें तर नानांनीं काय केलें ? कलकत्तेकर इंग्रजांनीं त्यांस पाठबळ दिलें नसतें तर नानांची स्थिति काय झाली असती ?

बाजीरावांस जुन्नरहून परशुरामभाऊंस पाठवून नाना बोलावतात काय, चिमाजी आप्पांस यशोदाबाईचे मांडीवर बसवून राज्य त्यांस देतात काय, पुन्हा महाडचें कारस्थान रचून चां. से. का. प्रभूंच्या घरीं राहून बाजीरावास गादीवर आणतात काय, सातारच्या परमपूज्य छत्रपतींचा छळ करितात काय, पुन्हां त्यांसच सत्ता देऊन आपण करभार करण्याची हांव धरितात काय, करवीरकर छत्रपतींवर स्वाऱ्या करवितात काय, पुन्हां त्यांस अंतस्थ मदत करून परशुरामभाऊंस तोंडघशीं पाडतात काय, स्वजातीय मराठे लोकांवर विश्वास न ठेवतां परकी अरबांचा पहारा जवळ करून त्यांतच रहातात काय,[1] मिळून कशाचा मेळ कशाशीं नाहीं. मेळ असेल तर तो फक्त दोनच गोष्टींचा. आपल्या हातीं सत्ता ठेवण्याचा व आपल्या तुंबड्या भरण्याचा !

नानांनीं कोट्यवधि रुपये खजिन्यांतले महाडचे प्रयाणांत लांबविले[2] असें टोन म्हणतो.

श्रीमंत बाळाजी विश्वनाथ व थोरले बाजीरावसाहेब यांच्या मानानें नानांची ही राजनीति किती हिणकस वाटते ! कोठें ते बाळाजी विश्वनाथ व बाजीराव !! मराठ्यांचें राज्य त्यांनींच वाढवावें. थोरले शिवछत्रपतींचें ध्येय गांठण्याची लायकी त्यांचीच. सरंजामी पद्धतीविषयीं बोलावयाचें तर ती धाकट्या शिवछत्रपतींच्या वेळेपासून निरुपायानें अंमलांत आणावी लागली. तीस निर्बंध घालतां आला नाहीं.

---

१. "आरबांचा व गाद्यांचा पहारा तो (नाना फडणीस) नेहमीं जवळ बाळगी म्हणजे स्वजातीय मराठे लोकांवर त्याचा विश्वास नसे." म. रि. उ. वि. १ पृ. १४३.

२. म. रि. उ. वि. ३ पृ. ५९.

"मध्यंतरींच्या भानगडी चार-पांच महिने चालू असतांच नानानें सरकारी खजिन्यांतील मत्ता युक्तीनें लांबविली होती." म. रि. उ. वि. ३ पृ. १२५.

९८०९८ दां. आ ८८ ७०१७ आ-

आमच्या मतानें नानांनीं कांहीं उपयुक्त मागें नांव राहीलसें कार्य केलें असेल तर तें अर्धें पी डब्ल्यू. डी. खात्याचें नळ, तलाव, इमारती बांधून आणि अनेक ऐतिहासिक वस्तु— नकाशे, चित्रें वगैरे जमवून आणि बेल-बागेसारख्या कांहीं देवस्थानांची सुव्यवस्था लावून केलें.

त्यांनीं कांहीं काल राज्य राखलें पण तें टिकविण्याचा जोम त्यांच्या कारस्थानात नव्हता. तें चिरस्थायी करण्याचें मार्गदर्शनहि करण्याचें सामर्थ्य त्यांत नव्हतें.

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतरचें नानांचें धोरण अत्यंत घरसोडीचें होतें असें कबूल करणें भाग आहे.

विद्यमान ग्रंथकार रा. ब. गो. स. सरदेसाई म्हणतात:— [1]"असें असतां त्यानें ( नानानें ) सर्व कारभार केवळ आपल्या एकतंत्री मुठींत आणिला हें पुढील विनाशाचें बीज होय. मोरोबाचा फितूर हें रोगाचें केवळ एक लक्षण होतें, प्रत्यक्ष रोग कांहीं तो नव्हता. रोगनिवारणाचा उपाय नानानें केला नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या अंगांत कांहीं ना कांहीं गुण व पराक्रम होता. त्या प्रत्येकाच्या गुणाचा राष्ट्रकार्यांत उपयोग होईल अशी योजना निर्माण करण्याऐवजीं **नानानें असंख्य लोकांस तुरुंगवासांत डांबून ठेविलें.**" पुढें ग्रंथकार म्हणतात:— [2]"महादजी ( शिंदे ) व तुकोजी ( होळकर ) यांचें भांडण मिटविण्याऐवजीं **नानानें तें सदैव जागृत ठेविलें** ही केव्हांहि प्रशंसनीय करामत नव्हे."

देशद्रोह करून इंग्रजांस राज्य द्यावें असें कारभारी, रघुनाथराव दादासाहेब, आनंदीबाइ या कोणासच वाटत नव्हतें. ब्राह्मणी राज्य— मराठ्याचें राज्य— तर हवेंच होतें. तथापि **मूळ पाहिजे होता स्वार्थ. त्यापुढें देशाची त्यांस क्षिति वाटत नव्हती !** त्यांतल्या त्यांत अधिक स्वार्थ होता नानांचा. नाना कारभारी पेशव्यांचे ! पण त्यांस गांवेंच्या गांवें इनाम देणार कोण तर त्यांचे शत्रू निजाम[3] शामल वगैरे. नाहीं तर आलम-

---

१. म. रि. उ. वि. १ पृ. १४३. २. म. रि. उ. वि. १ पृ. ९४.

३. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ पृ. २६६-२६८. वरखेडें तो चांदोर, प्रांत वराड, निजामअली खानवहादुरकडून. कोटरें, रामनगरचे राजाकडून. मुरार खेडें पो नसिराबाद मा आलमखान नबाब याजकडून २८ होळकराकडील गांव १ शामलाकडील ५ आंगरे यांजकडोल १ विशाळगडचे प्रतिनिधि.

खान नबाब, रामनगरकर ! पेशव्यांचे सरदार शिंदे, होळकर, आंगरे इ. करवीरकरांचे विशाळगडचे प्रतिनिधि ! !

बरें, हीं गांवें पेशव्यांच्या संमतीनें मिळालेलीं असतीं तर कांहीं समर्थन करितां आलें असतें. पण ह्या देणग्या परस्पर त्यांचीं कामें केल्याबद्दल लाटावयाच्या. त्यांचीं कामें म्हणजे अर्थात् पेशव्याचें नुकसान ! नानांची पूर्वकारकीर्द बालपेशव्यांचे नांवावर झांकून गेली. पण उत्तरकारकीर्दीचें समर्थन करण्याचा तरी प्रयत्न परवांपर्यंत कोणीं केला ?

अशानें राज्य कसें टिकणार? या राजनीतींत तें कायम टिकविण्याची करामत होती काय ? तात्कालिक निभाव लागला एवढेंच. बरें, गांठ पडली ती तरी अत्यंत प्रभावी शत्रूबरोबर. तो राजनीतिकुशल. राज्याचीं शकलें पाडण्यांत तरबेज. त्याचीं शस्त्रास्त्रें अगदीं आधुनिक पद्धतीचीं.

देवनाथमहाराज हे महान् साधु होते. त्यांनीं मुद्दाम नानांचे उलट कवन करण्याचें कांहीं कारण नव्हतें. जें सर्वसाधारण लोक बोलत व त्यांच्या कानीं जें पडे तेंच त्यांनीं लिहिलें. नानांचा त्यांचा कांहीं खाजगी द्वेष नव्हता. उलट गंगाबाईचे ते गुरु असल्यामुळें व गंगाबाईस बारभाईनीं आणि विशेषेंकरून नानांनीं कारस्थानांत घेतल्यामुळें कांहींना कांहीं गोष्टी त्यांस कळत असल्या पाहिजेत यांत तिळमात्र संदेह नाहीं. या गोष्टींवरून निदान नानांविषयीं त्यांचें मत खूपच कलुषित झालें होतेसें दिसतें. त्याचाच प्रतिध्वनि त्यांचे कवनांत आहे. सामान्य ब्राह्मण बोलत असले पाहिजेत कीं नाना मुत्सद्दी, शहाणा शहाणा म्हणतात. पण त्यांनीं ब्राह्मणांचें राज्य घालविलें. मग त्याची अक्कल काय राहिली ? त्याची दौलत तरी काय कामाची ? नानांस नवकोटनारायण संबोधीत. या नवकोट द्रव्यानें जर राज्याचें रक्षण झालें नाहीं तर त्या नानांची अक्कल ती काय राहिली ? त्यांचा पैसा काय उपयोगी पडला ?

या वरील बोलण्याचा इत्यर्थ असा घ्यावयाचा कीं नानांच्या अकलेचा व दौलतीचा मराठ्यांचें अर्थात् ब्राह्मणाचेंहि राज्य कायमचें टिकविण्यास कांहीं उपयोग झाला नाहीं. उपाय फक्त तात्पुरते करण्यांत आले.[1] रोगी

---

१. "नाना फडणिसानें अनेक अडचणींतून राज्याची निभावणूक केली तरी ती केवळ तात्पुरती होती." रा. ब. सरदेसाई, म. रि. उ. वि. १ पृ. ३२.

कांहीं काल जगविला. पण नानांस तो कायम वांचवितां आला नाहींच. तो तसा कायम अथवा चिरकाल जगविण्याचे उपायहि शहाण्या म्हणविणाऱ्या नानांनीं केले नाहींत.

या वेळीं मराठ्याचें राज्य कायमचें अथवा चिरकाल टिकविणें एकट्या नानांच्या हातीं तरी होतें कीं नाहीं हा प्रश्नच आहे. नानासाहेबांच्या वेळे-पासून अगदीं जोरानें अधःपात होत चाललाच होता. जातीजातींचें खूळ माजण्यास सुरवात झाली होती. पेशव्यांनीं रामराजापासून राज्याचा राजी-नामा सागोल्यास घेतला होता. कां तर तें प्रथम ठीक दिसलें तरी पुढें कर्तृत्वहीन ठरूं लागेल. तोच किता मोटमोठे सरदार शिंदे, होळकर, जहागीरदार गिरवूं लागले. स्वतंत्र होण्याकडे प्रवृत्ति फार होऊं लागली. स्वराज्यापेक्षां स्वार्थाकडे सर्वांची नजर गेली. आंग्र्यांच्या आरमाराचा नानासो पेशव्यांनीं नायनाट केल्यामुळें समुद्रकिनारा मोकळा पडून परस्थांस येण्यास त्या बाजूनें सुकर झालें. पण त्या वेळीं इंग्रजांएवढा बलाढ्य कोणी नव्हता. "पोर्तुगीजांचा ऐवज[1] थोडा. बल थोडें. प्रामाणिकताहि कमीच असेल" असा दादासाहेबांचा अभिप्राय होता. एवढ्याचकरितां ते इंग्रजांस धरून राहिले. आमचेकडे असा नाकर्तेपणा नांदूं लागला तर याच वेळीं इंग्रजांकडे वॉरन हेस्टिंग्ज, अप्टणसारखे बलाढ्य व कर्ते लोक यांच्या हातीं त्यांचा कारभार आला. हे लोक जर नादान असते तर निदान बराच काळ इंग्रजांची डाळ शिजली नसती. त्यांचीं कारस्थानें जबर! त्यापुढें दादासाहेब, नव्हे बारभाई फिक्के पडतात! कसले आले आहेत साडेतीन शहाणे! इंग्रज सात शहाणे होते. मराठ्यांच्या दुप्पट त्यांची कर्तबगारी होती. मराठ्यांत एकी असती, मनापासून दादासाहेबांस जहागीर कां होईना देऊन त्यांस खूष ठेवण्याची बुद्धि कारभाऱ्यांस होती.[2] त्यांच्या तंत्रानें त्यांस चालवितां आलें असतें तर आणखी कैक वर्षे मराठ्यांचें राज्य टिकलेंहि असतें. तें कांहीं एकट्या नानानेंच घालविलें नाहीं. सार्वत्रिक

---

१. म. इ. सा. खं. १२ पृ. ११९. २. "त्यांचेंच (पटवर्धन, नाना फडणीस वगैरे) कारभारांत पुढें प्राबल्य झाल्यामुळें अनेक प्रकरणें विकोपास जाऊन अखेर राज्यास बाधक झालीं." म. रि. उ. वि. १ पृ. ७.

ऱ्हास झाला होता तरी नानांनीं अनेक कारस्थानें करून व याची पगडी त्याच्या डोक्यावर घालून कां म्हणाना कांहीं काल खूप शर्तीनें राज्य राखलें यांत शंकाच नाहीं. लोक अखेर जे लोक राज्य जाण्याच्या वेळीं कारभारावर असतात त्यांच्या नांवानें खडे फोडतात ! नानांची दानत उच्च प्रकारची नसली तरी ते काय, रघुनाथराव काय, फार कशाला दुसरे बाजीराव साहेब काय, कांहीं इतिहासज्ञांस वाटतात तसे वाईट खास नव्हते. नानांच्या बाबतींत नामधारी पेशवा– अल्पवयस्क मालक– गादीवर असल्यामुळें त्याच्या नांवावर नानांच्या कित्येक गोष्टी छपून गेल्या.

राज्य नष्ट होण्याच्या पंथास लागलेंच होतें हें वरील प्रतिपादनावरून लक्षांत येईल. तें जाण्यास नाना, फार कशाला हे त्रिवर्गहि सर्वस्वीं कारण झाले नाहींत.

प्रश्न इतकाच आहे कीं. नानांना त्यांनीं जे अल्पवयी पेशवे गादीवर आणले व बारभाईंनीं व आपण जो कारभार केला त्यापेक्षां दादासाहेब पेशवाई करते, चिमाजीआप्पास एकदां व बाजीरावास नंतर गादीवर आणून गोंधळ न घालतां बाजीरावाचीच बाजू धरते, छत्रपतींस अधिकार देते, दादासाहेबांस इंग्रजांच्या आहारीं जाऊं न देते तर अधिक काल मराठ्यांचें राज्य टिकलें असतें कीं नाहीं ? टिकलें असतें असेंच उत्तर द्यावें लागेल.

श्रीमंत नारायणराव मारले गेले नसते, कट होता त्याप्रमाणें त्यांस नालायख म्हणून फक्त नजरकैद करून वा त्यांस नांवाचे पेशवे करून रघुनाथराव दादासाहेब यांस खरी सत्ता दिली असती व सखाराम बापू, सखाराम हरि, नाना फडणवीस, बजाबा पुरंधरे वगैरे मंडळींनीं एकविचारानें त्यांस मदत केली असती, बारभाईंनीं त्यांस आपल्या राज्यांत कैद करण्याचा घाट घातला नसता, शिंदे–होळकर आदिकरून सरदार स्वार्थापेक्षां मराठी राज्य टिकविण्याचा कसून प्रयत्न करते, तर तर काय ते खात्रीनें पुष्कळच अधिक वर्षें टिकाव धरून रहातें, कदाचित् आजहि दिसतें, असें मनांत आल्याशिवाय रहात नाहीं.

---

# सूचि

अटक– १०८, १२४.

अष्टन–राघोबाविषयीं मत ५७, पुण्यास नेमणूक ८५, सवाई माधवरावाची पुरंधराखालीं भेट ८५, पुरंधरचा तह ८९–९०, १२८, १४६, १४७, १६७.

अबदाली– ७, १२४, राघोबास पोशाख पाठवितो १३०.

अमृतराव–४४, राघोबाबरोबर ७३, राघोबाच्या नाटकशाळा सुरतेस महमदी बागेत ७८, पेशवे करण्याचा घाट ८३, वडिलांची मर्जी संपादण्याचे धडे ८६, ११९.

अर्जोजीराव ढमाला–धनगडच्या हवालदार–सखाराम हरींची रोज बेडी पहावयाची व बोलूं न देणें अशी ताकीद ११०, सनद श्राद्धाबद्दल खर्चास– ११२, सनद सखाराम हरींस शिधा देणेबद्दलची ११२–३.

अलमखान नबाब– १६५, १६६.

अशिरगड किल्ला–७७.

आंग्रे– १६५, १६६, आरमाराचा पेशव्यांनीं नायनाट केला १६७.

आदिलशाही हुकूम– १२४.

आनंद मोगरी लढाई– राघोबा व बारभाई ७२, ७५, १२४.

आनंदराव गोपाळ– १०५.

आनंदराव तोफखाने–१६.

आनंदराव सखाराम– १५४.

आनंदवल्ली–१३३, १३६.

आनंदीबाई– 'ध'चा 'मा' ४४, नारायणरावाविषयीं मत ५५–६, नारायणराव खून ५६, गरोदर ६४, व राघोबाचा पक्ष ७७, सखाराम हरींस आशीर्वाद ' इश्वर तुमचे उर्जीत करील'–७९, ८०, नाना व बापू या दोन्ही मुत्सद्यांस चार गोष्टी सांगून एकी करण्याचा प्रयत्न १४५,

पहिलें मराठी युद्ध होण्याचे सुमारास नाना व बापूंस लिहिलेलीं पत्रें १४९–५०,–५१, इंग्रजांस घरांत घातलें १६१.

आनंदीबाई दिनचर्या–१६३.

आप्पा बळवंत–१७, पुरंदरच्या कारभाऱ्यास भीड सखाराम व बाबुराव हरि यांचे सुटकेबद्दल ९३–९४, ९५, १००.

आप्पाजीराम सहस्रबुद्धे–प्रायश्चित्ताविषयीं ३८.

आबाजी महादेव सोवनी–४४, ७७, ८३, ८५, ८९, ९५, १२५.

आबासाहेब मुजुमदार– १००.

आंबाघाट ९९, १००.

आंबेड ८३.

आंबेगांव– सखाराम हरींस सनद ७–११, १५६, १५८, १५९.

आंबेगांवकर (गुप्ते)–१०३, १११, आख्यायिका– नाना फडणीसांनीं निर्दयतेनें सखाराम हरींचा कडेलोट केला ११८, १५४.

आंबेगांवकर सरदार– १२०.

आमदाबाद– ८३, ९०, ९१, १४९.

आरब– १२४.

आरास– राघोबा बारभाईंची लढाई ७९.

आवई– सखाराम हरींची स्त्री– बारा हजारांचें आमीष दाखवितांच नाना थंड ११३, ११७.

आळंद ८३.

इंग्रज– नारायणरावाचा खून ४५, राघोबा ७१, दादासो, आनंदीबाई व त्यांचा पक्ष यास इंग्रजांकडे जाण्याची आवश्यकता कां भासली १४४–५–६.

इच्छारामपंत– ४७.

(सौ.) इंदिराबाई नारायणराव आंबेगांवकर १५५,१५९,१६०.

इष्टुर फाकडा– दादासाहेबांच्या ममतेंतील १४२.

उरवडें– सखाराम हरींचा वाडा १३, मुठे खोरें– सखाराम हरींचें कुटुंब ७१,९९,११४,१५६,१५७,१५८.

एकांडे– बाबुराव हरीस म्हणत १०५.

औसा- ८३.

कडलूर- गुजराथ ७०.

कर्नाटक- स्वारी हकीकत १७,१३२,१५६,१६२.

कपडगंज- १२४.

करवीरकर- (छत्रपति) १६४, १६६.

कऱ्हा - ८५.

कलकत्ता- ८२.

कलकत्तेकर- १२६, १२७.

